**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८**

**मा.विशेष महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ५६**

**सभावृत्तांत**

दिनांक - १६.३.२०१६ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.विशेष महापालिका सभा बुधवार दि.१६.३.२०१६ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर

२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर

३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू

५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

६. मा.भालेकर अरुणा दिलीप

७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने

८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)

९. मा.थोरात वनिता एकनाथ

१०. मा.सायकर अजय शंकरराव

११. मा.जाधव साधना रामदास

१२. मा.जाधव राहुल गुलाब

१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

१४. मा.काळजे नितीन प्रताप

१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर

१६. मा.बाबर शारदा प्रकाश

१७. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

१८. मा.उल्हास शेट्टी

१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२०. मा.पवार संगीता शाम

२१. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२२. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२३. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२४. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२५. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२६. मा.भारती फरांदे

२७. मा.आर.एस.कुमार

२८. मा.जावेद रमजान शेख

२९. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

३०. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३१. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३२. मा.राजू मिसाळ

३३. मा.नंदा विकास ताकवणे

३४. मा.नेटके सुमन राजेंद्र

३५. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३६. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३७. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३८. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३९. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

४०. मा.लोंढे गणेश नारायण

४१. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४२. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४३. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४४. मा.अपर्णा निलेश डोके

४५. मा.अनंत सुभाष को-हाळे

४६. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४७. मा.जयश्री वसंत गावडे

४८. मा.प्रसाद शेट्टी

४९. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

५०. मा.काळभोर वैशाली जालिंदर

५१. मा.शेख अस्लम शैकत

५२. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५३. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५४. मा.वाबळे संजय मल्हारराव

५५. मा.मडिगेरी वर्षा विलास

५६. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५७. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५८. मा.सुपे आशा रविंद्र

५९. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

६०. मा.मोहिनीताई विलास लांडे

६१. मा.अजित दामोदर गव्हाणे

६२. मा.गोफणे अनुराधा देविदास

६३. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६४. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६५. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६६. मा. ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६७. मा.लोंढे शुभांगी संतोष

६८. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६९. मा.सावळे सिमा रविंद्र

७०. मा.बनसोडे शकुंतला काशीनाथ

७१. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७२. मा.पालांडे सुजाता सुनिल

७३. मा.बहल योगेश मंगलसेन

७४. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७५. मा.कदम सदगुरु महादेव

७६. मा.गिता सुशील मंचरकर

७७. मा.कैलास महादेव कदम

७८. मा.छाया जगन्नाथ साबळे

७९. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

८०. मा.टाक अरुण मदन

८१. मा.आसवाणी सविता धनराज

८२. मा.वाघेरे सुनिता राजेश

८३. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८४. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८५. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८६. मा.काळे विमल रमेश

८७. मा.पाडाळे निता विलास

८८. मा.विनोद जयवंत नढे

८९. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

९०. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

९१. मा.विमलताई सुरेश जगताप

९२. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

९३. मा.बारणे निलेश हिरामण

९४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९५. मा.बारणे माया संतोष

९६. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९७. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९८. मा.कलाटे स्वाती मयुर

९९. मा.चौंधे आरती सुरेश

१००. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०१. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०२. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०३. मा.जवळकर वैशाली राहुल

१०४. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०५. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०६. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०७. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०८. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१०९. मा.प्रशांत शितोळे

११०. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१११. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११२. मा.गायकवाड संध्या सुरदास

११३. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११४. मा.शेंडगे आशा सुखदेव

११५. मा.मोटे किरण बाळासाहेब

११६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११७. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११८. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

११९. मा.पाटील सुजित वसंत

१२०. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१२१. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.पाटील,मा.चव्हाण-सहशहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.दंडवते, मा.कड्सकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर-सहा.आयुक्त, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.दुधेकर, मा.पठाण, मा.बरशेट्टी, मा.गड्डवार, मा.भोसले-कार्यकारी अभियंता, मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, पी.ए.संगमा - लोकसभेचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ नेते, पी.के.नायर - राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे माजी संचालक व ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक, प्रदिप रणपिसे - पुणे श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.स्वाती साने** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांना भाजप सरकारने अन्यायकारक, राजकीयदृष्ट्या हेतूपुरस्सर अटक केल्याबाबत निषेध म्हणून ही सभा गुरुवार दिनांक १७/०३/२०१६ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात यावी.

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुलभा ऊबाळे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, अंदाजपत्रक सभेच्या सुरुवातीला श्रद्धांजली देण्यात आली आहे. सभेला कोणत्याही प्रकारचे गालबोट लागू नये. त्याठिकाणी कायद्याचे काम चालले आहे. या गोष्टीची आम्हाला, नागरीकांना सुद्धा समज आहे. हे सन्माननीय सभागृहाला सुद्धा माहित आहे हा कायद्याच्या अखत्यारीतील विषय आहे. आपल्या अखत्यारीतील विषय नाही. सभेमध्ये श्रद्धांजली दिल्यानंतर निषेध करणे योग्य आहे का. इथल्या राजकारणात हे मिक्स करु नका. निषेध न स्विकारता फक्त श्रद्धांजली घेण्यात यावी. अन्यथा आम्हाला आपल्या कृतीचा इथे निषेध करावा लागेल.

**मा.बाबासाहेब धुमाळ** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मा.सुरेश कलमाडी साहेबांना अटक केली होती तेव्हा असा निषेध का केला नाहीत.

**मा.सुलभा ऊबाळे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, तुम्ही इथे निषेध करुन उपोषण करणार आहात का, का जेवण, अन्न-पाणी सोडून देणार आहात का. कायद्याचे काम चालले आहे. हा आपला विषय नाही. हे चुकीचे आहे.

**मा.महापौर -** सर्व सन्मा.सदस्यांच्या संमतीने ही सभा गुरुवार दिनांक १७/०३/२०१६ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८</u>**

**<u>मा.विशेष महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ५६</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दिनांक १६.३.२०१६ (दु.२.०० वा.) ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक - १७.३.२०१६</u> <u>वेळ - दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची बुधवार दिनांक १६.३.२०१६ची तहकूब मा.विशेष महापालिका सभा गुरुवार दि.१७.३.२०१६ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप

१६. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२०. मा.उल्हास शेट्टी
२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२२. मा.पवार संगीता शाम
२३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२६. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२७. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२८. मा.भारती फरांदे
२९. मा.आर.एस.कुमार
३०. मा.जावेद रमजान शेख
३१. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
३२. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३३. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३४. मा.राजू मिसाळ
३५. मा.नंदा विकास ताकवणे
३६. मा.नेटके सुमन राजेंद्र
३७. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३८. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३९. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
४०. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
४१. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४२. मा.लोंढे गणेश नारायण
४३. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
४४. मा. ॲड .संदीप गुलाब चिंचवडे
४५. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४६. मा.अपर्णा निलेश डोके
४७. मा.अनंत सुभाष को-हाळे
४८. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४९. मा.प्रसाद शेट्टी
५०. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश
५१. मा.काळभोर वैशाली जालिंदर
५२. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
५३. मा.शेख अस्लम शैकत
५४. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५५. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५६. मा.वाबळे संजय मल्हारराव
५७. मा.मडिगेरी वर्षा विलास
५८. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५९. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
६०. मा.सुपे आशा रविंद्र
६१. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
६२. मा.मोहिनीताई विलास लांडे
६३. मा.अजित दामोदर गव्हाणे
६४. मा.गोफणे अनुराधा देविदास
६५. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
६६. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
६७. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
६८. मा. ॲड .नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६९. मा.लोंढे शुभांगी संतोष
७०. मा.सावळे सिमा रविंद्र
७१. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
७२. मा.भोसले राहूल हनुमंतराव
७३. मा.पालांडे सुजाता सुनिल
७४. मा.बहल योगेश मंगलसेन
७५. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७६. मा.कदम सदगुरु महादेव
७७. मा.गिता सुशील मंचरकर
७८. मा.कैलास महादेव कदम
७९. मा.छाया जगन्नाथ साबळे
८०. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
८१. मा.टाक अरुण मदन
८२. मा.आसवाणी सविता धनराज
८३. मा.वाघेरे सुनिता राजेश
८४. मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
८५. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
८६. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
८७. मा.काळे विमल रमेश
८८. मा.पाडाळे निता विलास
८९. मा.विनोद जयवंत नढे
९०. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
९१. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
९२. मा.विमलताई सुरेश जगताप
९३. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
९४. मा.बारणे निलेश हिरामण
९५. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९६. मा.बारणे माया संतोष
९७. मा.यमुनाताई रमणनाना पवार
९८. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
९९. मा.कलाटे स्वाती मयुर
१००.मा.चौंधे आरती सुरेश
१०१.मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१०२.मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे
१०३.मा.बोकड रामदास गेणभाऊ
१०४.मा.जवळकर वैशाली राहुल
१०५.मा.जगताप राजेंद्र गणपत

१०६. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०७.मा.जगताप नवनाथ दत्तु

१०८.मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०९.मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

११०.मा.प्रशांत शितोळे

१११.मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

११२.मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११३.मा.गायकवाड संध्या सुरदास

११४.मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११५.मा.शेंडगे आशा सुखदेव

११६.मा.मोटे किरण बाळासाहेब

११७.मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११८.मा.संजय केशवराव काटे

११९.मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१२०.मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१२१.मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१२२.मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.गावडे - सहआयुक्त, मा.पाटील, मा.चव्हाण, मा.तुपे-सहशहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.माने, मा.खांडकेकर, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.अष्टीकर, मा.माछरे, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.दुधेकर, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.पठाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.औंभासे, मा.गड्डूवार, मा.शेख, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.सोनवणे-कार्यकारी अभियंता, मा.वाघमारे-पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर**- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नगरसचिव** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मा.महापौर यांनी विहीत केल्याप्रमाणे विशेष सभेतील कामकाजाचा क्रम पुढीलप्रमाणे असेल,

१) अंदाजपत्रक " अ" व "क" तसेच "प" संबंधिचे मा.सभापती, स्थायी समिती यांचे निवेदन,

२) अंदाजपत्रक " अ" व "क" तसेच "प" यावर चर्चा,

३) चर्चा समाप्तीनंतर अंदाजपत्रक " अ" व "क" तसेच "प" यावरील ठराव मांडणे - अनुमोदन देणे,

४) अंदाजपत्रकावरील ठरावास सुधारणा/फेरबदलच्या सूचना मांडल्या गेल्यास त्यांची वैधता- ग्राहय-अग्राहयता तपासण्याकरीता किमान पूर्ण २ दिवस सभा कामकाज तहकूब करणे -

५) एका सदस्यास एकच सुधारणा/फेरबदल सूचना मांडता येईल किंवा त्यांस अनुमोदन देता येईल. मांडण्यात येणारी सूचना कितीही मोठी असू शकेल

६) अंदाजपत्रकातील खर्चाची तरतूद वाढवावयाची असेल किंवा नवीन तरतूद करावयाची असेल तर कोणत्या खर्चाची तरतूद तेवढ्या प्रमाणात कमी करावयाची किंवा कोणत्या जमेत वाढवावयाची हे फेरबदलाची सूचना ग्राहय होण्यासाठी नमूद असणे आवश्यक राहील.

**मा.नगरसचिव :-** विषय क्र.१ - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीने तयार केलेले सन २०१५-१६ चे सुधारित व सन २०१६-१७ चे मुळ अंदाजपत्रक " अ " व " क " तसेच केंद्रशासन पुरस्कृत योजनांसह उर्वरित जे.एन.एन.यु.आर.एम.अंतर्गत महानगरपालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करुन शहरी गरिबांसाठीचे अंदाजपत्रक " प " विचारासाठी -

मा.सभापती स्थायी समिती अंदाजपत्रका वरील निवेदन/मनोगत व्यक्त करतील.

(मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम, सभापती स्थायी समिती यांनी अंदाजपत्रक "अ" व "क" तसेच "प" संबंधीचे त्यांचे निवेदन सादर केले.)

**मा.महापौर** - अंदाजपत्रकावरील चर्चेला सुरुवात करण्यात यावी.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, कुठेही करवाढ नसलेले बजेट केल्याबद्दल मी आयुक्त साहेबांचे आभार मानतो. उत्पन्नाचे स्त्रोत घटल्यामुळे महसूल कमी मिळणार आहे. दुसरीकडे हे अंदाजपत्रक निवडणुकीपूर्वीचे शेवटचे अंदाजपत्रक असल्यामुळे विकास कामांसाठी मोठी तरतूद करायची हमी, नगरसेवकांची आग्रही मागणी आणि त्यामुळे आयुक्त तसेच प्रशासन यांनी यानुसार अंदाजपत्रक करायचा प्रयत्न केलात त्याबद्दल मी परत एकदा आपले अभिनंदन करतो. मात्र मा.आयुक्त साहेब, एका पेपरमध्ये आपण बातमी दिली होती. ती बातमी अशी आहे की, अंदाजपत्रकात करवाढ नसलीतरी करवाढीचा प्रस्ताव मा.महासभेपुढे मांडणार असल्याची माहिती आयुक्त मा.राजीव जाधव यांनी सांगितली. पिंपरी चिंचवड महानगरपलिकेचे अंदाजपत्रक सादर केल्यानंतर ते बोलत होते. मा.आयुक्त पुढे म्हणाले, अंदाजपत्रकात करवाढ नसलीतरी करवाढीचा प्रस्ताव मा.महापालिका सभेपुढे मांडणार आहे. साहेब,आत्तातरी करवाढ करायचे काही कारण नाही. प्रथा अशी आहे की, आपण बजेट अप्रुव्हलसाठी मांडतो तिथे तुम्ही करवाढ केलेली नाही. मग ही बातमी खोटी आहे का असे मी विचारतो. असे असलेतरी करवाढ करु नका अशी मी सर्वांच्या वतीने विनंती करतो.

या बजेटमध्ये तत्कालिन आयुक्त यांनी पर्यटनासंदर्भात जे काही मांडले होते, ते गुंडाळलेले दिसते आहे. तत्कालिन आयुक्त यांनी पर्यटनासाठी उपक्रम राबविणार असे जाहिर केले होते. त्यावेळी सहा उपक्रम म्हणजे आकुर्डीचे ऑडीटोरीयम, प्लॅनेटोरीयम, चिंचवड वॉर्ड सेक्टर, मोरया गोसावी मंदीर विकास, मॉडेल वॉर्ड, बालनगरी असे सहा प्रोजेक्ट राबविणार आहात असे बजेटमधून दिसते आहे. बाकी दहा प्रकल्पांबद्दल काही स्पष्ट केलेले नाही. एपी सेंटरमधून तुम्ही ही योजना करणार नाही. हे तुम्ही प्रत्येक प्रभागाला दिलेले आहे. त्यामुळे आपण ही योजना गुंडाळली का असे मला वाटते आहे. पवना धरणातून बंद पाईपलाईन करणार होतो. त्या प्रकल्पाबद्दलही अर्थसंकल्पात काम देण्यात आलेले नाही असे मला दिसते आहे. दुसरे म्हणजे पेट्रोलसाठी रू.५ कोटी तरतूद केली आहे. तुम्ही ६०० कोटी वाचवल्याचा दावा केला होता. महापालिका अर्थसंकल्पात दिलेली सर्वच कामे ५ वर्षांत पूर्ण होतात असे नाही. त्यामुळे विकास कामांवर वाढीव खर्चाच्या नावाखाली कोट्यावधी रुपयांची उधळपट्टी करायची संधी प्रशासन व काही पदाधिका-यांना मिळते असा आरोप पेपरमध्ये केला जातो. तो आरोप फेटाळताना तुम्ही त्याला उत्तर दिले होते की, प्रत्येक कामाची निविदा प्रक्रिया राबविल्याने आणि कमी दराची निविदा प्राप्त झाल्यामुळे गेले दोन वर्षांत महापालिकेने रु.६०० कोटी

वाचवल्याचा दावा केला आहे. मग हे ६०० कोटी कुठे वाचवले. सगळी टेंडर्स ३०/३५ टक्के बिलो येतात. त्यानंतर १० टक्के वाटप करतो. म्हणजे ते ४५ टक्के झाले. ४५ टक्के प्रमाणे टॅक्स ५ टक्के म्हणजे ५० टक्के, पार्टी १० किंवा १५ टक्के तरी कमावणार. ही टोटल केलीतरी ६५ टक्के होते. एक रुपयाचे काम पस्तीश पैशांत कसे होते हा माझा प्रश्न आहे. हे होऊच शकत नाही. मग होत काय, ठेकेदार ऑर्डर मिळण्यासाठी ३० ते ३५ टक्के बिलो जातो. ठेकेदार काम पूर्ण करत नाही किंवा कामाचा दर्जा कमी असतो. म्हणून मला विनंती करायची आहे की, हे कुठेतरी बंद करा. ३० ते ३५ टक्के बिलो केले तर त्यांच्यावर कारवाई करा. त्या ठेकेदारांना ब्लॅकलिस्ट करा. कोणताही कॉन्ट्रॅक्टर आपल्याला कामाची क्वालिटी देऊ शकत नाही. हे कोणालाही विचारा. स्वतः तुमच्या अधिका-यांना विचारा. तुमच्याकडे आलो, तुम्हाला विचारले तर तुम्ही म्हणता, मला ऑर्डर द्यावी लागते. क्वालिटी चांगली नाही. डांबर कमी पडते. सिमेंट ऐवजी सिमेंटचे पाणी पडते. मेंटेनन्सचे काम एक सुरु असताना दुसरे सुरु होते मी कोणाला ब्लेम करत नाही. पण याच्यातून तुम्ही काहीतरी तोडगा काढायला पाहिजे. आपण पूर्वी १० टक्के अबोव्ह, ५ टक्के अबोव्ह, १४.९९ टक्के अबोव्ह अशा मोठमोठ्या ऑर्डर दिलेल्या आहेत. मी अबोव्ह ऑर्डर द्या असे म्हणणार नाही पण ३५ ते ४० टक्के बिलोमध्ये चांगले काम होणारच नाही.

दुसरे या बजेटमध्ये तसे बघितले तर सगळ्या फिगर्स वर-खाली होऊ शकतात. तरतूद वर्ग करता. स्टँडीगला करतात, जीबीत करतात. स्थानिक संस्था कर जमा साईडमध्ये १३५० कोटी दिले आहेत. ही फिगर कुठून आली ते मला शोधलेच पाहिजे. या वर्षाची फिगर बघितली तर एलबीटी एप्रिलमध्ये ८३ कोटी मिळाली. मे मध्ये ७० कोटी, जूनमध्ये ७० कोटी, जुलैमध्ये ९४ कोटी, ऑगस्टमध्ये ७४ कोटी मिळाली आणि अनुदान ६६ कोटी मिळाले आहे. सप्टेंबर मध्ये ६६ कोटी, ऑक्टोबर मध्ये ४६ कोटी आणि ६६ कोटी शासन अनुदान मिळाले आहे. मात्र डिसेंबरनंतर शासनाने अंदाजे २० कोटींनी अनुदान कमी केले आहे. त्यामुळे गेल्या वर्षी जरी ११०० कोटी रुपये अनुदान व एलबीटी गेल्या चार/पाच महिन्यांत मिळाली आहे. ती फिगर या वर्षी कमी होणार आहे. सप्टेंबरपर्यंत जी एलबीटी मिळाली आहे ती आत्ता मिळणार नाही. म्हणून हे उत्पन्न एक हजार कोटींपर्यंतचा पल्ला गाठणार याबद्दल शंका वाटते. याबाबत चर्चा करत असताना कमिशनर साहेबांनी आणि काही अधिका-यांनी मला सांगितले, अनुदान ४० कोटी झालेतरी शासनाकडे प्रत्येक मिटींगमध्ये कमिशनर विनंती करणार आहेत. जास्त वाटा मिळावा यासाठी प्रयत्न करणार आहेत. ही फिगर पाहिली तर आपल्याला एक

हजार कोटी सुद्धा उत्पन्न मिळणार नाही. म्हणून उत्पन्नात ३५० कोटी एक्सट्रा घेतले असे मला वाटते. एलबीटी बंद केली, जकात बंद केली मग आम्ही जगायचे का नाही. मग हे ४० कोटी, ५० कोटी अनुदान घेतो, ते पुरणार नाहीत. म्हणून मा.महापौर, मा.आयुक्त, मा.पक्षनेते, मा.विरोधी पक्षनेते यांनी सरकारकडे रिप्रेझेंट करुन ही रक्कम वाढवून द्यायला पाहिजे. नाहीतर टोटल बजेट कोलॅप्स होईल.

करसंकलनमध्ये आत्तापर्यंत ३६५ कोटींची वसूली केलीतरी पुढे ४०० कोटींपर्यंत जातील. चांगले कलेक्शन केले आहे. त्यामुळे पुढील वर्षासाठी तुम्ही ४५० कोटी बजेट ठेवले आहे ते एका दृष्टीने बरोबर आहे असे मला वाटते. पाणीपट्टीत आपले फक्त ७१ कोटी वसूल झाले असलेतरी  आत्ता तसे नसताना पुढील वर्षी इन्कममध्ये ६० कोटी घेतले ते कसे वसूल होणार. ३० चे ३५ होणार, ३५ चे ४० होणार. ६० कोटी वसूल होणार नाहीत असे मला वाटते. एवढे आहे की, वसूल होणारी रक्कम तिथे सुद्धा चांगली घेतली आहे. दुसरे असे आहे की, आपल्याकडे एकिकडे उत्पन्नाचा स्त्रोत वाढवण्याचा आपण प्रयत्न करत असताना, भूमि आणि जिंदगी विभागाचे ४५९ गाळे आपल्याकडे धुळ खात पडलेले आहेत. रिकाम्या गाळांची किंमत आजच्या बाजारभावाने एकूण १०० कोटी होते आहे. ते १०० कोटी वर्कआऊट केलेतर त्याची किंमत जास्तच होईल. भाडेतत्वावर जे गाळे दिले आहेत, त्याचे सुद्धा ६.९५ लाख थकबाकी येणे आहे. म्युनिसिपल ॲक्टप्रमाणे गाळे निर्धारीत रकमेपेक्षा कमी दराने भाड्याने देता येत नाहीत. त्यामुळे घेताना आधी भाडेतत्वावर घेतात, नंतर भाडे जास्त वाटते मग भाडे भरत नाहीत. यापैकी बहुतांशी आजी-माजी नगरसेवक किंवा त्यांचे नातेवाईक किंवा नजिकच्या कार्यकर्त्यांच्या नावावर आहेत. कर्मचारी वसुलीसाठी गेले तर त्यांना दमदाटी करतात. कर्मचा-यांच्या हातात ठराविक रक्कम देऊन ते सर्व प्रकार दाबले जातात. अशीच रक्कम वाढत गेलेतर आपले उत्पन्न बुडणार. सात/आठ वर्षांपासून आपली रक्कम बाकी आहे. म्हणून मी विनंती करतो की, यात अवश्य लक्ष घाला. हे १०० गाळे आहेत, त्यांची कशी विक्री करता येईल. यातून शंभर/दीडशे कोटी कसे उत्पन्न उभे करता येतील यासाठी आपण प्रत्यक्ष विचार करा अशी मी विनंती करतो.

घरकुल - घरकुलबद्दल १३,५०० गाळे बांधतोय. भूमिपुजन केले. ६५०० घरे बांधली. अंदाजे ४५०० घरांचे वाटप केले आहे. उर्वरित काही गाळे, अडीच एफएसआय मिळणार म्हणून पेंडींग ठेवले आहेत. तसे शासनाने डिक्लेअर केले होते. पण हायकोर्टाने सांगितले की, रेट्रोस्पेक्टिव्ह इफेक्टने देता येत नाही. म्हणून हे गाळे डिस्पोजल झाले नाहीत. त्यांच्याबरोबर तुम्ही बोललात. मी नुकतीच एक बातमी पेपरमध्ये वाचली की,

आदरणीय राजन पाटील यांनी एका संस्थेला उत्तर देताना सांगितले की, आम्ही लवकरात लवकर दुसरा फेज सुरु करणार आहोत. उर्वरीत ६५०० गाळे बांधून गाळे वाटप करणार आहोत. असे असेलतर मी तुमच्या सगळ्यांचे व श्री.राजन पाटील यांचे अभिनंदन करतो. तुम्ही १३५०० गाळे बांधायचा शब्द दिला होता. नंतर भाव वाढले, हे झाले असे सांगून उपयोग नाही. दिलेला शब्द आपण संस्था म्हणून फॉलो करायला पाहिजे. नागरीक कुठेही गेलेतरी विचारतात, माझे घर कधी मिळणार. आणि आम्ही उत्तर देऊ शकत नाही. उरलेली घरे बांधली तरी चांगले होईल. गाळे बांधा अशी मी विनंती करतो.

करसंकलन-करसंकलनमध्ये शास्तीकर वाढत जातोय. यात तुम्ही २ टक्के इंटरेस्ट चार्ज करताय. म्हणजे पहिल्या सहा महिन्यांत सप्टेंबरपर्यंतचा टॅक्स डिसेंबरपर्यंत भरला नाहीतर २ टक्कें प्रति महिना. शास्तीकरात काय होते, शासन माफी करणार या उद्देश्याने आम्ही सर्वांना सांगितले, शास्तीकर भरू नका. अधिका-यांनी सांगितले व आम्हीही सांगितले. तुम्ही मूळ टॅक्स पहिला भरुन घेताय. जोपर्यंत सरकारचा निर्णय होत नाही, तोपर्यंत शास्तीकर वसूल करु नका अशी आमची विनंती आहे. सरकारने अनाऊंस केले आहे, ही सगळी बांधकामे रेग्युलराईज करणार. मी सीएम यांचे व राज्य शासनाचे अभिनंदन करतो. यातून लाखो लोकांचे भले होईल. घोषणा लवकरात लवकर अंमलात आणण्यासाठी शासनाकडे प्रयत्न करावा अशी विनंती आहे.

वाचनालय-प्राधिकरणात डॉ.हेगडेवार भवन आहे. याचा मूळ उद्देश्य काय होता. याचा मूळ उद्देश्य होता टाऊन हॉल लायब्ररी. ज्या उद्देश्यासाठी ही बिल्डींग बांधली, ते जर चेंज केलेतर हे बरोबर आहे का. आमची कल्पना अशी होती की, तिथे ब्रिटीश लायब्ररीसारखी रेफरन्स लायब्ररी चालू करणार. अनेकवेळा पाठपुरावा करुनसुद्धा तिथे रेफरन्स लायब्ररी झाली नाही. पण तिथे एलबीटीचे ऑफीस शिफ्ट केले आहे. ज्या पर्पजसाठी ही बिल्डींग बांधली तेच तुम्ही चेंज केलेतर बरोबर आहे का. त्यामुळे विनंती आहे की, हे ऑफिस खाली करा. तिथे टाऊन हॉल लायब्ररी सुरु करा अशी विनंती आहे.

उद्यान आणि वृक्षसंवर्धन-किती गार्डन्स तयार केलीत, तुमच्या रिपोर्टमध्ये दिले आहे. मा.आयुक्त साहेब, तुम्ही कधी गार्डन्सला व्हिजिट दिलीत का. अनेक गार्डन्समध्ये लॉनची परिस्थिती फार बेकार आहे. तुम्ही प्रायव्हेटमध्ये जाऊन बघा. त्यांचे लॉन कसे आहे व आपले लॉन कसे आहे. ते मशिनरी लावून लॉन करतात. लॉन बरोबर मेंटेन करत नाहीत म्हणून मी एकदा अति.आयुक्त साहेबांना घेऊन दाखवायला गेलो होतो. शिंदे साहेब आले, त्यांनी बघितले व ते म्हणाले, अधिका-यांची ताबडतोब बदली करुन

टाका. हे उत्तर बरोबर नाही. त्यांनी नंतर झाडे लावायला सुरुवात केली. तुम्ही काहीही म्हणा लॉनची परिस्थिती बेकार आहे. १७६ गार्डनपैकी दहा गार्डन क्रिएटीव्ह आहेत. बाकी सगळ्या गार्डन एकाच टाईपमध्ये बनवल्या आहेत. त्वरित गार्डन विभागाला द्या. कुठेही बघा, गार्डनमध्ये लॉनची इम्प्रूव्हमेंट करायला पाहिजे. वीर सावरकर उद्यान आहे, ते दोन फेजमध्ये डेव्हलप केले. पहिल्या फेजमध्ये साडे पाच कोटी खर्च करुन डेव्हलप करण्यात आले. हे उद्यान सेक्टर २६ मध्ये आहे. त्यामध्ये लेजर शो ठेवला आहे. मी गेले चार वर्षापासून फॉलोअप करतोय. लेजर शोसाठी पैसा नाही पैसा नाही म्हणताय. एका पदाधिका-याने उपसूचना दिलीतर त्याच्या वॉर्डात ताबडतोब साडेतीन कोटींची तरतूद लेजर शो साठी केली. त्यांच्या वॉर्डात का करताय असे मला म्हणायचे नाही. त्यांच्या वॉर्डात करा. मला निगेटीव्ह बोलायचे नाही. पण असे असताना मला सुद्धा न्याय द्यायला पाहिजे. मी सुद्धा सिनिअर कॉर्पोरेटर आहे. माझ्या वॉर्डात इतके वर्षांत लेजर शो का केला नाही. माझ्या वॉर्डातही करा अशी माझी विनंती आहे.

संगणक विभाग-संगणक विभाग महापालिकेत १९९६-९७ साली सुरु झाला. पहिले ऑफिस आहे त्याच ठिकाणी होते. तिथे पोमण साहेब होते. त्यांनी गेले २० वर्षांत अनेक चांगली कामे केली आहेत. पण त्याकाळात जी ड्रिम होती की, all the offices should be connected to head office. फाईल आणायला सांगायची गरज पडली नाही पाहीजे. आपण मॉनिटरमध्ये ४७५ असा क्रमांक टाकलातर त्याची सगळी डिटेल्स तिथे आली पाहिजेत, अशी आमची कल्पना १९९६-९७ मध्ये होती. ही कल्पना आजपर्यंत फुलफ्लेज्ड् झालेली नाही. पेपरलेस ऑफिस ही संकल्पना आजपर्यंत पूर्ण होत नाही. प्रत्येक टेबलवर मॉनिटर पाहिजे. काही अधिकारी म्हणतात, आम्ही आमच्या क्लेरिकल स्टाफला ट्रेनिंगसाठी पाठवले होते. काही लोकं शिकले. काही लोक म्हणतात, आम्हाला जमत नाही. ज्यांना जमत नाही त्यांना घरी पाठवा. कॉम्प्यूटर प्रत्येक टेबलवर पाहिजे. आणि पेपरलेस ऑफिस करायला पाहिजे. मी टेल्को कंपनीचे उदाहरण देतो. आपल्याकडे दहा लाखांच्या कामासाठी सहा ते आठ महिने जातात. मी टेल्को कंपनीमध्ये एका ऑफिसरबरोबर बोलत बसलो होतो. मॉनिटरवर बघितले तर एक कोटींचे प्रपोजल आहे. त्यांचा ज्युनिअर स्टाफ तिथे ई-मेलने मिडल केडरला पाठवतो. एका तासात तो मिडल केडरचा माणूस डायरेक्टरला प्रपोजल पाठवतो. संध्याकाळी ५.३० वा. पर्यंत डायरेक्टर यांनी त्याला अप्रूव्हल दिले. ज्या कामाला आपल्याला नऊ महिने लागतात, ते काम ते एका दिवसांत करतात. आपण एक दिवसांत नाही, एका महिन्यात

तरी करु शकतो. पण ही सिस्टीम जाणूनबुजून दाबली जाते आपण ही सिस्टीम फॉलो केलीतर यामुळे करप्शन जाणार नाही, पण मिनिमाईज होईल.

ई-गव्हर्नन्सबद्दल दिले आहे ते चांगले आहे. डॉ.परदेशी साहेब असताना ८८००४४ वर फोन केलातर ताबडतोब ऍक्शन घेत होते. अधिका-यांनी ते आल्याबरोबर पहिला लॅपटॉप काढायचे आणि पहिले बघायचे की, कंम्पलेण्ट आली आहे का. कंम्पलेण्ट आली असेलतर ते लगेच ती कंम्पलेण्ट अटेण्ड करत होते. तेव्हा सारथीवर केलेल्या तक्रारी अधिकारी अटेंड करत होते. आता या विभागाचे बारा वाजले आहेत. कंम्पलेण्ट केलीतरी,काही ऍक्शन होत नाही. तुम्ही स्ट्रीक्ट असले पाहिजे. त्याकाळात रेटींग ठेवले होते. जो अधिकारी काम करत नाही, त्यांना पनिशमेंट. आत्ता ही भिती नाही. पब्लिक म्हणते, डॉ.परदेशी साहेब गेले आणि सारथी वेबलाईन बंद पडली.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान - याचे बजेट बोलवले आहे. पंतप्रधान यांच्या आदेशानुसार हि योजना राबवितो. एक्झिस्टींग सुविधांमधूनच काढतो. नवीन टिम तयार करुन किंवा कॉन्ट्रॅक्ट मधून करत नाही. जे लोक रेग्युलरली वॉर्डात काम करतात, साफसफाई करतात किंवा गटर साफ करतात. त्यांनी ते जिथे काम करतात, तिथे काम बंद करतो आणि अभियान कुठे राबवतो, तिथे काम करायला आणतो. रोडचे काम पण चालले पाहिजे आणि अभियानसुद्धा चालवायला पाहिजे. जिथे अभियान चालवतो तिथे स्वच्छता आणि बाकी एरियात कचरा पडला असेल, स्वच्छता नसेलतर हे चुकीचे आहे. म्हणून तीन/चार कोटी अवॉर्ड केले आहेत. यात टिम तयार करा. हि टिम रेग्युलर काम करुन, ते बंद न करता अभियान राबवेल.

नागरवस्ती विकास योजना विभाग - या विभागाच्या पर्फारमन्समध्ये गेल्या वर्षापेक्षा या वर्षी थोडी सुधारणा झाली आहे, असे मी कबूल करतो. या वेळी यात सायकल व शिलाई मशीन आहे. तुम्ही सायकल चालवून बघितलीत का माहित नाही. मी आणि काही नगरसेवक सायकल बघायला गोडाऊनला गेलो होतो. आम्ही चालवून बघितली. ही एकदम थर्ड ग्रेड क्वालिटी सायकल आहे. ही सायकल चालवायला घेतलीतर त्याची मुव्हमेंटसुद्धा बरोबर होत नाही. इतक्या बेकार क्वालिटीच्या दहा हजार सायकल्स सप्लाय केल्या आहेत. त्या चालवून पाहिल्या तरी त्यात बेअरींग आहेत ते बरोबर नाही, पेंडल बरोबर फिरत नाही. एकदम तकलादू सायकल आहे. त्यासाठी जे स्पेसिफिकेशन दिले होते, त्यानुसार सायकल सप्लाय झालेली नाही. मार्केटमध्ये हा ब्रॅंड पुणे-मुंबई इथे कुठेही दिसत नाही. बाजारपेठेत हिरो, ऍटलास, हर्क्युलिस, रॉयल सायकल, या नामांकित आयएसआय मार्क कंपनीच्या सायकल असताना या ब्रॅंडचे

कुठेही ऐकले नाही. कुठे मार्क नाही. कुठे क्वालिटी बरोबर नाही, असे असताना ही सायकल का खरेदी केलीत. याला कोण जबाबदार आहे. असा ब्रँड कोणी खरेदी केला. हि सायकल तुम्ही एक्झामिन करा, ॲनालाईज करा. तांत्रिक तपासणीनंतर तुम्हाला माहिती पडेल की, या सायकलची क्वालिटी बरोबर नाही. जोपर्यंत एक्झामिनरकडून रिपोर्ट येत नाही, तोपर्यंत त्या कॉन्ट्रॅक्टरचे पूर्ण बील थांबवावे. नाहीतर पब्लिकमध्ये अशा सायकल गेल्यातर हा इलेक्शन टाईम आहे, लोक आमच्यावर ताशेरे उडवतील.

शिवण मशीन खरेदी - नागरवस्ती विभागामार्फत पिंपरी चिंचवड शहरातील महिलांना मोफत १३,००० शिवण मशीन्स देणार आहोत. माझी विनंती आहे की, ऑलरेडी शिवण मशीन खरेदी करण्यात आल्या असाव्यात. त्यांचे मॉडेलचे नाव कंपनीचे नाव कधीही ऐकले नाही. हे मॉडेल कुठेही बाजारात उपलब्ध नाही. इथेही तसेच झाले आहे. त्यामुळे सर्वीस मिळायची शक्यता नाही. सर्वीस स्टेशन्स नाहीत. कुठे फ्री सर्वीस देऊ शकतो. अशा नित्कृष्ट मशीन्स महिलांना देण्यात येऊ नयेत ही विनंती आहे. निविदेतील अटीनुसार निविदाधारक हा शिवण मशीन कंपनी किंवा शिवण मशीन विक्रेता असणे आवश्यक आहे. ही अट त्यांनी पूर्ण केलेली नाही. आता हे त्यांच्या कागदपत्रांतून बाहेर आले आहे. असे पूर्वी कधी घडले होते का. गुगलवर सर्च केलेतरी हे मॉडेल कुठेही मिळत नाही. महिलांना मशीन द्यायच्या असतील तर, चांगल्या कंपनीच्या शिवण मशीन दिल्या पाहिजेत. बाजारात नॉव्हेल, राजेश, सिंगर अशा अनेक नामांकित कंपनीच्या मशीन आहेत. त्यामुळे या मशीनबद्दल तुम्ही स्वतः चेक करा. काही एक्सपर्टचे मत घ्या. तोपर्यंत ऑर्डर देऊ नका अशी विनंती आहे.

स्थापत्य-मा.आयुक्त साहेब, इथे तुम्ही तुमच्या रिपोर्टमध्ये सांगितले होते, ५० लाखांचे दुमजली पार्किंग होणार आहे. मा.आयुक्त साहेब, मी गेले वीस/पंचवीस वर्षांपासून दुमजली, तिमजली पार्किंग करा म्हणून विनंती करतोय. आज तुम्ही ट्रान्सपोर्ट नगरीमध्ये जाऊन बघा. इतक्या गाड्या उभ्या आहेत. पुढे जाण्यासाठी सुद्धा रस्ता नाही. त्यामुळे रहिवासी एरियात पार्किंग करतात. रहिवासी म्हणतात आमच्या एरियात कशाला ट्रक पार्क करतात. आम्ही ट्रकवाल्याला ब्लेम करु शकत नाही. ट्रक पार्किंग करण्यासाठी थोडी सूट दिली होती. स्पेस दिला होता. समज १०० ट्रक पार्किंगमध्ये पार्क केलेतर, बाकी ७५ ट्रक रस्त्यावर उभे राहतात. त्यामुळे मी पंचवीस वर्ष अगोदर विनंती केली होती की, इकडे थ्री फ्लोअर पार्किंग करा. त्याबद्दल सुद्धा आजपर्यंत काही झालेले नाही. फॉरेनमध्ये थ्री फ्लोअर खाली जातात. आपल्याकडे इथे

बांधायला सुद्धा सक्षम अधिकारी नाही. ट्रान्सपोर्ट नगरीमध्ये थ्री फ्लोअर पार्किंग सुरु करा अशी माझी विनंती आहे.

स्टेडीयम - मा.आयुक्त साहेब, तुम्ही नेहरुनगर स्टेडीयमसाठी एक कोटी ठेवले आहेत. आकुर्डी, निगडी प्राधिकरण, यमुनानगर या संपूर्ण भागाला मदनलाल धिंग्रा स्टेडियम हे एकच स्टेडियम आहे. त्या स्टेडियमची परिस्थिती जाऊन बघा. स्टेडियमसारखे दिसत नाही. कुठल्यातरी शेतीच्या जमिनसारखे दिसते आहे. स्टेज, दुरुस्ती यासाठी रु.६६ लाख खर्च केलेत. त्यापैकी रु.२२ लाख लॉन लावण्यासाठी खर्च केलेत. ते लॉन कुठेही दिसत नाही. मी मागे डिमाण्ड केली होती, चौकशी करा. चौकशीसुद्धा झाली नाही. एन्क्वायरीत माझ्या माहितीप्रमाणे आहे. कॉन्ट्रॅक्टरने काम करुन ताबा दिल्यानंतर क्रिडा विभागाकडे मेंटेनन्स करायला काहीही फॅसिलिटी नव्हती. लॉन व्यवस्थित मेंटेन केले नाहीतर ते टिकणार नाही, अशीच परिस्थिती झाली आणि रु.२२ लाख पाण्यात गेले. गेल्या वर्षी ११ ते २० लाख मेंटेनन्ससाठी ठेवले होते. मी फॉलोअप करत राहीलो. अधिकारी म्हणाले, कमिश्नर यांनी असे ठरवले. एक्झिक्युटीव्ह इंजिनिअरकडे स्थापत्य गार्डन हॅण्डओव्हर केले. मी एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर यांच्याकडे गेलोतर ते म्हणाले, माझ्याकडे तरतूद नाही. टेंडर कसे काढणार. मी त्यांना म्हणालो, मी कमिश्नर साहेबांना सांगतो. मी परत स्थापत्यकडे गेलोतर ते म्हणाले, Krida is not handed over to me. कांबळे साहेब, मी तुमच्याकडे आलो तेव्हा तुम्ही एक्झिक्युटीव्ह यांना फोन केला. आजपर्यंत त्या हेडमधले ते पैसे खर्च झाले नाहीत. ते रु.२० लाख लॅप्स होणार आहेत. माझी विनंती आहे की, तुम्ही कधीही वेळ मिळेल तेव्हा, मदनलाल धिंग्रा स्टेडियम इथे जाऊन बघा काय परिस्थिती आहे. ते ग्राऊंडसारखे दिसत नाही. तुम्ही कसे स्टेडीयम मेंटेन करताय म्हणून आम्हाला नागरीक बोंब मारतात. माझी विनंती आहे की, पुढील वर्षी टेंडरसाठी थांबू नका. तुमच्याकडे अनेक पॉवर्स आहेत. त्या पॉवर्स वापरून ते स्टेडीयम कसे कमीत-कमी खेळांसाठी उपलब्ध होईल ते बघा.

थेरगाव इथे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरामध्ये शिवचरित्रावर आधारित म्युरल्स उभारताय. प्रोजेक्ट आहे. मग भक्ती-शक्ती इथे का करत नाहीत. का आम्ही आमदार, खासदार नाही. पदाधिकारी नाही. पण गेले ३२ वर्षांपासून काम करतोय. किती वेळा सांगितले की, भक्ती-शक्ती आपल्या शहराच्या फ्रंट पेजला आहे. तुम्ही तिथे लाईट ॲण्ड साऊंड करा. मा.अजितदादा यांनी सुद्धा एका कमिशनर यांना

इन्स्ट्रक्शन्स दिल्या होत्या. तुम्ही तिथे सुशोभिकरण करा. पण तुम्ही तिथे काही करत नाहीत.

भक्ती-शक्ती ते मुकाई चौक हे रस्त्याच्या प्रोजेक्टचे काम चालले आहे. मा.आयुक्त साहेब, मला एक सांगा की, इतके मोठे-मोठे रस्ता करत असताना एका बाजूने दुस-या बाजूला जाण्यासाठी कन्व्हर्जन करायला पाहिजे, हे इंजिनिअरला वाटायला नको का. आज रस्त्याचे काम ५० टक्यांपर्यंत आले आहे. आज मला सांगा, अप्पूघर, दूर्गा टेकडी इथे जायचे असेलतर जंक्शनमधून कसे क्रॉस करणार. तिथे एफओबी करावा असे आपल्या अधिका-यांना का वाटले नाही. म्हणजे सगळा प्रोजेक्ट झाल्यावर मग त्याचा विचार करणार. तुम्ही एफओबी करा किंवा अंडरग्राऊंडमधून टनेल करा. दूर्गाटेकडीवर रोज हजारो लोक जातात. आता रोड सुरु झाला आहे. तिथे ट्रॅफिकमधून लोक जाऊ शकत नाहीत. तिथे एफओबी किंवा अंडरबायपास त्वरित सुरु करा. आपल्याकडे बजेट आहे. प्रोसेस लवकर सुरु करा अशी विनंती आहे.

पाणीपुरवठा - २४X७ चे काम सुरु करा. आज अडीच तास सुद्धा पाणी देऊ शकत नाही. तुम्ही म्हणता, यावर्षी डॅम ऐंशी टक्के भरले आहेत. पण शंभर टक्के डॅम भरले तरी शहराला चार-पांच तासांपेक्षा जास्त वेळ पाणी देऊ शकत नाही. पिंपरी चिंचवडमध्ये हजारो फ्लॅटस् मध्ये नागरीक येत आहेत. ज्याअर्थी आपल्याला माहित आहे की, शंभर टक्के डॅम भरुन सुद्धा आपण पाणी देऊ शकत नाही. तरीसुद्धा आपण पाचशे ते एक हजार कोटी या स्किममध्ये घालायचे कारण काय. आता आपण रिपोर्टमध्ये दिले आहे, आंदरा धरण व अजून एका डॅमचा उल्लेख केला आहे. परंतू पाणी कधी येणार, कधी मिळणार, कधी प्लॅन उभा करणार. ही पंचवार्षिक योजना आहे. अजून लोकसंख्या वाढणार. मग अजून पाणी कसे देणार. एकदा ट्राय केले आहे. तिथे २८ एमएलटी पाणी वापरणार होतो तर तिथे ४२ एमएलटी वापरले. चोवीस तास दिल्यानंतर लोक पाणी कमी वापरणार असे तुमच्या अधिका-यांचे म्हणणे आहे. तुम्ही पैसे घालवताय ते पाण्यात फुकट जाणार म्हणून तुम्ही विचार करुन एसटीपी चालू करा. शासन पैसे देत असलेतरी आपल्याला सुद्धा पैसे टाकायचे आहेत. ज्यावेळी दोन्ही धरणांतून पाणी मिळेल, फिल्ट्रेशन प्लँट उभा राहणार, त्यावेळी तुम्ही २४ बाय ७ चा विचार करा. अन्यथा त्यात आत्ता पैसे घालवणे चुकीचे ठरेल असे माझे मत आहे. पाणीपुरवठ्याला बजेट देताना कितीही बजेट दिलेतरी ते पूर्ण होत नाही माझ्याकडे बजेटचा पर्फारमन्स रिपोर्ट आहे. पाणीपुरवठा विशेष योजनेसाठी तीस कोटी रुपये. त्यात सुधारीत करताना तुम्ही काम झाले नाही म्हणून सत्तावीस कोटी विथड्रॉ केले आहेत

गेल्या वर्षाच्या पर्फार्मन्सबद्दल थोडे बोलतो आणि थांबतो. गेल्या वर्षी भांडवली खर्च र.रु.६७४ कोटींमधून होते. आत्तापर्यंत रु.रु.३,७६,००,००० खर्च झाला. म्हणजे ५० टक्के सुद्धा खर्च झाला नाही. इलेक्ट्रीकसाठी रु.२५ कोटींमधून र.रु.५,००,००,००० खर्च झाले. म्हणजे २० टक्के सुद्धा खर्च झाला नाही. असेच प्रत्येक विभागाचे बघितल्यानंतर महसूली खर्च व किरकोळ दुरुस्ती म्हणजे वास्तविक पाहता, १४१ कोटींमधून ४७ कोटी खर्च झालेला आहे. आणि ८८१ कोटींमध्ये ४४२ कोटी खर्च झालेला आहे. ५० टक्के पर्फारमन्स, १०/१५ टक्के बीले येणार असे गृहित धरले तरी टोटल ६० ते ६५ टक्यांपेक्षा जास्त पर्फारमन्स जाणार नाही. यामागे अनेक कारणे आहेत. मार्चमध्ये बजेट पास झाले. एप्रिल-मे मध्ये बजेट पास करताना सांगतो. मे मध्ये टेंडर का निघत नाहीत. जून,जुलै,ऑगस्टमध्ये टेंडर निघतात. या वर्षी अनेक ऑर्डर डिसेंबरमध्ये इश्यु केल्या. एका ठेकेदाराने अनेक ठिकाणी काम चालू केलेले असते. एका ठिकाणी काम सुरु केले की तो दुस-या ठिकाणी काम पूर्ण करु शकत नाही. मग असे करता-करता पूर्ण वर्षात बजेटच्या कधीही ८० ते ९० टक्के सुद्धा काम होत नाही. रक्कम लॅप्स होते. पैशांची बचत होते. एफडी होते. माझी विनंती आहे की, यावर्षी बजेट पास झाल्यानंतर तुम्ही ऑर्डर काढा. ॲडमिनिस्ट्रेटीव्ह अप्रूव्हल मिळाल्यानंतर मे मध्येच टेंडर काढून पुढील वर्षी बजेटचा फायदा आमच्या नागरिकांना मिळणार असेल तर इनडायरेक्टली आम्हाला क्रेडीट मिळणार. त्यामुळे मेहेरबानी करुन टेंडर लवकर काढून एक्झिक्युटीव्ह यांना लवकर वर्कऑर्डर द्यायला सांगा अशी विनंती आहे. फक्त एवढीच विनंती करतो की, हे वर्ष फार महत्वाचे वर्ष आहे. त्यामुळे टेंडर लवकर काढा. ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये थोडासा डिसिप्लीन आणा. पूर्वीचे कमिशनर आले की त्यांना सगळे घाबरत होते. घाबरत होते म्हणजे त्यांना रिस्पेक्ट देत होते. आत्ता फार लूज होत चालले आहे. तुम्ही व्हिजिट करत आहात. त्यामुळे ऑबर्जव्हेशन होते. आत्ता थोडे लूज झाले आहे, ते टाईट झाले पाहिजे अशी विनंती करतो.

**मा.नारायण बहिरवाडे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सन २०१५-१६ चे सुधारीत व सन २०१६-१७ चे मुळ अंदाजपत्रक मा.स्थायी समितीचे सभापती मा.डब्बू आसवानी यांनी सभागृहापुढे सादर केले आहे. मा.महापौर साहेब, हे महानगरपालिकेचे ३४ वे अंदाजपत्रक आहे. मा.आयुक्त साहेब यांचे हे दुसरे अंदाजपत्रक आहे. हे अंदाजपत्रक २७०७ कोटी रुपयांचे असून केंद्र सरकार योजना व जेएनएनयूआरएम मिळून रु.१२७५ कोटी असे एकूण ३९८२ कोटींचे अंदाजपत्रक मा.महापालिका सभेपुढे सादर केले आहे. गेल्या वर्षापेक्षा २०७ कोटी

रुपयांनी हे बजेट जास्त आहे. हे बजेट सादर करताना आयुक्त साहेबांनी निवेदन दिले आहे की, वस्तुस्थितीला धरुन कुठलीही करवाढ न करता शुद्ध पाणीपुरवठा, उत्तम वाहतूक इ. गोष्टींना आपण प्राधान्य दिले आहे. अंदाजपत्रकाकडे बारकाईने बघितलेतर शहरातील सर्व घटकांची अपेक्षा पूर्ण करणारे हे अंदाजपत्रक आहे. त्यामुळे सर्वसमावेशक असे हे अंदाजपत्रक आहे. त्याचबरोबर जुन्या कामांवर देखील भर देणारे हे अंदाजपत्रक आहे.

मा.आयुक्त साहेब यांनी हे अंदाजपत्रक सादर करताना जमा बाजूला आरंभिची शिल्लक २७७ कोटी दाखवली आहे. जेएनएनयूआरचे ८१५ कोटी अशी आरंभिची शिल्लक १०९२ कोटी दाखवली आहे. जमेची दुसरी बाजू स्थानिक संस्था कर (एलबीटी) - आपण १३५० कोटींची अपेक्षा या वर्षी ठेवलेली आहे. एलबीटी हा मनपाच्या उत्पन्नाचा सर्वात मोठा व मुख्य स्त्रोत आहे. एकूण उत्पन्नाच्या ५० टक्के उत्पन्न एलबीटीतून मिळते आहे. सन २०१५-१६ चा मूळ अंदाज ११०३ कोटी होता. सुधारीत अंदाज १३०० कोटी केला आहे. म्हणजे अपेक्षित अंदाजापेक्षा २०० कोटी रुपये जास्त ठेवले आहेत. कालपर्यंत जवळजवळ १२१० कोटी रुपये एलबीटीचे जमा झाले आहेत. शासनाचे ४० कोटी अनुदान मिळणार आहे. आपल्या हातात अजून १५ दिवस आहेत. आपण या १५ दिवसांत १३०० कोटींचे टार्गेट पूर्ण करणार आहोत. याठिकाणी मी डॉ.यशवंत माने यांचे मनापासून अभिनंदन करतो. त्यांनी ९०० कोटींची सुधारीत अपेक्षा असताना त्यांनी १३०० कोटींचे टार्गेट पूर्ण केले आहे. १ एप्रिल २०१३ साली जकात बंद होऊन एलबीटी सुरु झाली. सुरुवातीला असे वाटले होते की, जकातमधून जेवढे उत्पन्न मिळते तेवढे एलबीटीमधून उत्पन्न मिळेल का? परंतू एलबीटीतून देखील आपल्याला चांगले उत्पन्न मिळू लागले आहे. सन २०१४ मध्ये निवडणूका आल्या. निवडणूकीत भाजप-शिवसेनेच्या मंडळींनी व्यापा-यांना सांगितले आमची सत्ता आली की एलबीटी बंद करु कारण व्यापा-यांनी अनेक मागण्या केल्या, धरणे धरले, मोर्चे काढले. निवडणूका तोंडावर आल्या होत्या, तेव्हा या लोकांनी एलबीटी बंद करु असे सांगितले होते. दूर्दैवाने केंद्रात व राज्यात देखील युतीचे सरकार आले आहे. (आमच्या दूर्दैवाने) या लोकांनी आश्वासन दिल्यानंतर, सत्तेवर आल्यानंतर यांनी एक अत्यंत चुकीचा निर्णय घेतला आणि एलबीटी बंद केली. १ ऑगस्ट २०१५ रोजी एलबीटी बंद केली. आणि ही एलबीटी बंद करत असताना ५० कोटींवर ज्यांची उलाढाल आहे, अशा उदयोग-व्यापाराची एलबीटी चालू ठेवली. आता एलबीटी बंद केल्यानंतर शासनाकडून महापालिकेला अनुदान कशा पद्धतीने द्यायचे? मग यांनी काय केले. २०११ पासून २०१५ पर्यंत ५ वर्षांचा आढावा

घेतला. या ५ वर्षामध्ये ज्या वर्षी महापालिकेचे उत्पन्न जास्त असेल ती रक्कम सहाय्यक अनुदानासाठी ग्राह्य धरली. आपल्या महापालिकेची सन २०११-१२ ची हाययेस्ट अमाऊंट रु.१२२८ कोटी होती. त्याला राऊंड केले. रु.१२५० कोटी महापालिकेचे उत्पन्न गृहित धरले आहे महापालिकेचे सरासरी महिन्याचे उत्पन्न विचारात घेऊन आपल्याला एक महीन्याला ६४.४८ कोटी रुपये अनुदान द्यायला सुरुवात केली आहे. शासनाने फक्त पाच महिने हे अनुदान दिले आहे. आणि नंतर अनुदान १९ कोटींनी कमी करुन ते फक्त ४७.३५ लाख आपल्याला मिळायला लागले आहे. यासंदर्भात माहिती घेतल्यावर असे कळाले की, एलबीटीचे उत्पन्न वाढले तर शासनाकडून मिळणारे सहाय्यक अनुदान कमी होते. म्हणजे शासनाने आपल्याला फक्त १२५० कोटींचेच उत्पन्न मिळवू द्यायचे. त्यापुढे उत्पन्न जाऊ द्यायचे नाही असा शासनाचा उद्देश आहे. त्यापेक्षा जास्त उत्पन्न मिळवले तरी सहाय्यक अनुदान कमी होईल. या वर्षी आपण १३०० कोटी उत्पन्न मिळवलेलेच आहे. पुढील वर्षी आपल्याला १३५० कोटी उत्पन्न मिळवायचे आहे. वास्तविक पाहता, या उत्पन्नावरच शासनाकडून सहाय्यक अनुदान मिळाले पाहिजे. आणि यावर २० टक्के जादा वाढ द्यायला पाहिजे. खरेतर सरकार हा निर्णय घेऊन पस्तावले आहे असे मला वाटते आहे. दि.१ एप्रिल २०१६ ला एलबीटी बंद होऊन जीएसटी लागू होईल असे राज्य सरकारला वाटले होते. आजही जीएसटीचे घोंगडे भिजत पडले आहे. आत्ताच्या अधिवेशनात जीएसटी लागू करण्याबाबत निर्णय होणार नाही. जर जीएसटी लागू करण्याचा निर्णय झाला नाहीतर, तर राज्य शासनाला सगळ्या महापालिकांना दरवर्षी सात हजार कोटी अनुदान द्यावे लागणार आहे. आणि त्यात दर वर्षी १० टक्के वाढ केली आहे. गेले सहा महिन्यांत ३५०० कोटी रुपये सहाय्यक अनुदान म्हणून राज्य सरकारने दिले आहेत. जीएसटीची तर आता आशा मावळली आहे. त्यामुळे यदाकदाचित उद्या जीएसटी लागू झालीतर आपल्याला शंभर टक्के शासन अनुदानावर अवलंबून रहावे लागणार आहे. एलबीटीची उत्पन्न अपेक्षा ख-या अर्थाने पूर्ण झाली आहे. पुढील वर्षी काय होते आहे हे आपल्याला पहावे लागणार आहे.

तिसरी जमेची बाजू म्हणजे करसंकलन. करसंकलनमधून रु.४५० कोटी रुपये अपेक्षित होते. सुधारीतमध्ये रु.४२५ कोटी धरले आहेत. परंतू आजपर्यंत फक्त रु.३०० कोटीच जमा झाले आहेत. दि.३१ मार्च पर्यंत फारतर रु.३२५ कोटी जमा होतील. यात रु.१०० कोटींची तूट येणार आहे. शहरात ४,३६,२४१ मिळकती आहेत. मूळ कराची बिले रु.३५१.५६ लाख आहे. यावर्षी बांधकाम शास्ती रु.८० कोटी ८६ लाख म्हणजे रु.४३८ कोटींची बिले वाटली आहेत. याची अजूनही थकबाकी रु.६९६ कोटी आहे. यावेळची

बांधकाम शास्तीची थकबाकी रु.१६५ कोटी. आपण २०१३ मध्ये सर्वे केला होता. त्यात ८२,००० अशा मिळकती सापडल्या, ज्या कर भरत नव्हत्या. आपण ६५,००० च्यावर मिळकतींवर करआकारणी केली आहे. अजूनही १७,००० मिळकती कर भरत नाहीत. फेब्रुवारी महिन्यात अभय योजना आणली. त्यात जवळजवळ रु.४५ ते ४६ कोटींची वसूली झाली आहे. तरी अपेक्षित रु.४२५ कोटी जमा झालेले नाहीत. रु.३२५ कोटींच्या पुढे जाईल असे मला वाटत नाही. याठिकाणी शंभर कोटींची तूट येणार आहे.

बांधकाम परवानगी - मधून ३०० कोटी उत्पन्न अपेक्षित होते. सन २०१५-१६ मध्ये मूळ अंदाज ३५५ कोटी होता. सुधारीत अंदाज २५० कोटींपर्यंत खाली आलेला आहे. १०५ कोटी सुधारीत अंदाजपत्रकामध्ये कमी केले आहेत. बांधकाम परवाना विभागाकडून २५० कोटी आणि यूटीएफकडून ५५ कोटी अशी ३०५ कोटींची अपेक्षा ठेवली आहे. प्रत्यक्षात आजमितीला २४८ कोटी आणि यूटीएफचे ७० कोटी असे ३१८ कोटी जमा झाले आहेत. या विभागाकडून देखील आपण आपले टार्गेट पूर्ण केले आहे. हे शहर महानगराकडे वाटचाल करायला लागले आहे. या शहरात इन्फ्रास्ट्रक्चर अतिशय चांगले आहे. मोठे रस्ते, उड्डाणपूल आहेत, ग्रेडसेपरेटर, पाणीपुरवठा व्यवस्था, शैक्षणिक सोयी,वाहतुकीच्या सोयी चांगल्या आहेत. त्यामुळे शहरात अनेक मोठ-मोठे प्रकल्प होत आहेत. अनेक नामांकित बिल्डर या शहरात येऊ लागले आहेत. त्यामुळे निश्चितपणे भविष्यात देखील बांधकाम परवानगी विभागाचे उत्पन्न वाढल्याशिवाय राहणार नाही. आपल्याला २०११ मध्ये बेस्ट सिटी अवॉर्ड मिळाला आहे. आत्ता २०१६ ला मा.महापौर यांच्या हस्ते आपल्याला क्लिन सिटीचा देखील पहिला पुरस्कार मिळाला आहे. शासनाने अनधिकृत बांधकामे अधिकृत करायची घोषणा केली आहे. जेव्हा बांधकामे अधिकृत होतील, तेव्हा नागरीकांना निश्चितपणे काही दंडात्मक रक्कम भरावी लागेल. त्यावेळी देखील महापालिकेचे उत्पन्न वाढेल. मी मा.मुख्यमंत्री यांचे आभार मानतो. आम्ही चांगल्या कामासाठी तुमच्या पाठिशी आहोत.

छोट्या प्लॉटधारकांसाठी, एक गुंठे, दोन गुंठे किंवा तीन गुंठेधारक आहेत त्यांच्यासाठी डीसी रुलमध्ये काहीतरी बदल केले पाहिजेत. हे आयुक्त आपल्या अधिकारांत करु शकत नाही का. साईड मार्जिनचा विषय फार महत्वाचा आहे. जिथे अगदी छोटे प्लॉट असतात तिथे साईडमार्जिन सोडलीतर त्याला बांधकाम करता येत नाही. जसे गावठाणात जसा डबल एफएसआय देतो किंवा गावठाणात ज्या पद्धतीने साईड मार्जिन ठेवत नाही. त्याचपद्धतीने या लोकांसाठी ठेवलेतर, निश्चितपणे त्याचा फायदा झाल्याशिवाय राहणार नाही.

पाणीपट्टी - पाणीपट्टीतून रु.६० कोटी उत्पन्न जमा होईल असे अपेक्षित होते. मूळ अंदाज ६५ कोटींचा होता. सुधारीत अंदाजपत्रकामध्ये ५६ कोटी २३ लाख इतका अंदाज आहे. पाणीपट्टी फक्त रु.३१ कोटी जमा झाली आहे ती मार्च महिनाअखेर रु.३५ कोटी जमा होईल. यातही रु.२५ कोटींची तूट येणार आहे. आपण रु.७१ कोटींची पाणीपट्टीची बीले वाटली आहेत. यात रु.४१ कोटी थकबाकी आणि ३० कोटींची चालू मागणी केली आहे. क्रॅनबेरी नावाच्या संस्थेला तीन ते चार कोटींचे काम दिले आहे. या संस्थेने मीटर रिडींग घेऊन बील तयार करणे व बील वाटणे एवढेच काम आहे. या संस्थेला वसूलीचे काम दिलेतर. त्यांनीच बील बनवायची, त्यांनीच बील वाटायची, त्यांनीच पैसे गोळा करायचे व त्यांनी ते महापालिकेकडे आणून द्यायचे. इथले नागरीक पाण्याबाबतीत बिल्कूल सिरीयस नाहीत. त्यामुळे जर क्रॅनबेरी या संस्थेला बील वसूल करायची परवानगी दिलीतर निश्चितपणे त्याचा चांगला फायदा झाल्याशिवाय राहणार नाही. भारतात सर्वांत स्वस्त पाणी आपली महापालिका देते. आपल्याकडे पाण्याचा दर १,००० लि. पर्यंत रु.२.५०/- आहे. तो ३०,००० लि. पर्यंत रु.२.५०/- इतकाच आहे. ३०,००० लि. पर्यंत हा दर का ठेवला याची मी माहिती घेतली. एका पाच व्यक्तींच्या कुटूंबात एका व्यक्तीसाठी आपण २०० लि. पाणी देतो म्हणजे १ दिवसाचे १००० लिटर म्हणजेच ३० दिवसांचे ३०,००० लि. झाले. वास्तविक पाहता शासनाच्या नियमाप्रमाणे प्रति दिन प्रति माणसी १३५ लि. ते १४० लि. पाणी द्यायला पाहिजे तर आपण २०० लि. पाणी प्रति माणसी देतो. असे ३०,००० लि. पाणी आपण प्रत्येक कुटूंबाला फक्त २.५०/- दराने देतो. या ३०,००० लिटरमध्ये ७० टक्के जनता मोडते आहे. त्यामुळे पाणीपट्टीतून उत्पन्न वाढत नाही. तरीसुद्धा लोक पाणीपट्टी भरत नाहीत हे विशेष आहे. त्यामुळे ३० ते ३५ कोटींपेक्षा अधिक पाणीपट्टी मिळतच नाही. पाणीपट्टीचा दर तुलनात्मकदृष्ट्या बघितला तर पुणे महापालिका रु.४.५०/- दर देते. नवी मुंबई रु.४.७५/-, बेंगलोर रु.७/-, हैद्राबाद रु.१०/-, चेन्नई रु.१०/-, नाशिक रु.५.५०/-. नाशिकमध्ये तर तुम्ही पाणी वापरा अगर वापरु नका, दर महिन्याला तुम्हाला शंभर रुपये द्यावे लागतात. अशा दोन्ही बाजूंनी नाशिक महानगरपालिका पाण्याचे पैसे वसूल करते आपले एवढे स्वस्त दर असतानादेखील नागरीक पाण्याचे बील भरत नाहीत. यासाठी जनजागृती करायला पाहिजे परवा पेपरमध्ये बातमी आली होती की, लातूरला एक महिन्याने पाणी येते आहे. सोलापूरला आठ दिवसांतून एकदा पाणी येते मनमाडला बारा दिवसांनी पाणी येते. तरीसुद्धा सोलापुर शहरांचा स्मार्ट सिटी योजनेमध्ये समावेश झाला आहे याचे आश्चर्य वाटते. अशी अनेक शहरे, गावे अशी आहेत, जिथे दररोज

पाणीपुरवठा होत नाही. आणि आपण २४ बाय ७ पाणी देण्याचा विचार करतोय. आपण किती चांगले काम करतोय. मग आपलीही नागरीकांकडून अपेक्षा आहे की, त्यांनी पाणीपट्टी वेळेत भरली पाहिजे.

पवना नदीतून दररोज ४४० एमएलडी पाणी उचलतो. आपण २.५०/- नी पाणी देतो. आकुर्डी गावठाण असेल, कासारवाडी असेल, शाहूनगर असेल, आनंदनगर झोपडपट्टी असेल, या सगळ्या भागात एमआयडीसीचे पाणी देतो. रु.१७.५०/- या रेटने पाणी आहे. पाणी उचलणे, ते ट्रिट करणे, टाक्यांमध्ये भरुन नागरीकांपर्यंत पोहोचवणे, यासाठी १,००० लि. साठी रु.५.८०/- खर्च येतो. आणि आपण नागरीकांना रु.२.५०/- या दराने पाणी देतो. हा दर पूर्वी रु.३.५०/- होता. श्री.दिलिप बंड साहेब तत्कालिन आयुक्त असताना त्यांनी मिटर बसवायची सूचना केली. अधिकृत नळजोड आहेत त्यांना मीटर बसवलेच बसवले पण जे अनधिकृत नळजोड आहेत त्यांना सुद्धा मीटर बसवले. त्याचे रिडींग आपल्याकडे उपलब्ध आहे. पण आपण त्याचे बील बनवू शकत नाही. कारण ते अनधिकृत आहे. या नळजोडांना एकदा अधिकृत तरी करुन घ्या. त्यांचे मीटर रिडींग उपलब्ध होत असेलतर हे करुन घेणे अतिशय गरजेचे आहे. एवढे असूनसुद्धा रु३० कोटींपेक्षा जास्त रक्कम जमा करतोय. या शहरात लोक मिनरल वॉटरचा १० ते १५ कोटींचा धंदा करत आहेत. शहरात हजारो लिटरच्या बाटल्या येत आहेत. त्यात १ लि.ची बाटली, २ लि.ची बाटली, ५ लि.ची बाटली, २० लि.चा जार देखील मिळतो. मिनरल वॉटरची एक बाटली घेताना साध्या टपरीवर घेतली तर ती रु.१५/-ला मिळते. चांगल्या रेस्टॉरन्टमध्ये रु.२०/-ला, एसटी स्टेशन/रेल्वे स्टेशन इथे रु.२५/-ला मिळते. बिअरबार/परमिट रुममध्ये रु.४०/-ला मिळते. विमानतळावर रु.८०/- ला, थ्री स्टार हॉटेलमध्ये तीच बाटली रु.१००/- ला मिळेल तर फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये हिच बाटली रु.१२०/- ला मिळते. बॉटल तीच पण वेगवेगळ्या ठिकाणी फिरलीतर या बाटलीचे दर बदलतात. आणि लोकं घेत आहेत. पिंपळे सौदागर इ. भागात जे उच्चभ्रू लोक, आयटी क्षेत्रात काम करणारे लोक राहतात. ते आपल्या पिण्याच्या पाण्याची वाट बघत नाहीत. दुधाचा रतीब लावतो त्याप्रमाणे त्यांनी पाण्याच्या बाटल्यांचा रतीब लावला आहे. गाडी येते, २० लि. चा जार रतीब टाकते आणि दर महिन्याला पैसे घेतात. नागरीक हे महाग पाणी घेतात आणि आपले रु.२.५०/- चं पाणी घेऊन सुद्धा बील भरत नाहीत याचे खरं दुःख आहे. हल्ली लग्नसमारंभात देखील सर्रास पाण्याच्या बाटल्या वापरतात. पाऊच वापरतात आणि करोडो रुपयांचा व्यवसाय करतात. मला तर वाटले की, आपण आपल्याकडे मिनरल वॉटरचा प्लाण्ट टाकावा. सेक्टर नं.२३ मध्ये पाणी ट्रिट करतो,

तिथे मिनरल वॉटरचा प्लाण्ट टाकायचा. आपल्याकडे पाणीपुरवठ्याचे अधिकारी श्री.प्रविण लडकत आहेत. ते अतिशय चांगले, कार्यक्षम व प्रामाणिक अधिकारी आहेत. त्यांनी तो कोर्स केला आहे. मिनरल वॉटरच्या बाटल्या बनवणे, त्यात पाणी भरणे. आपले पाणी तसेही स्वच्छ आहे. त्यात ऑक्सिजन घाला, काही मिनरल्स घाला. बिस्लेरी, ऑक्सीरिच इ. या कंपन्या काय करतात. त्यांच्या व आपल्या पाण्याची तुलना केलीतर आपले पाणी केव्हाही चांगले व शुद्ध आहे. फक्त त्याची जाहिरात करताना खनिजांचे प्रमाण दाखवा, ऑक्सिजनचे प्रमाण दाखवावे निश्चितपणे चांगला प्लाण्ट उभा राहील याचा गांभिर्याने विचार करा. आपण बीओटी तत्वावर हा प्लाण्ट उभा करु शकतो. आपण हा प्लाण्ट तयार केल्यावर चांगले डिस्ट्रीब्युटर तयार करु शकतो. किंवा एखादा चांगला डिस्ट्रीब्युटर देखील आपल्याकडे येऊ शकतो. त्या पाण्याच्या बॉटलला पवना मिनरल वॉटर असे नाव द्यावे. त्याची किंमत दहा रुपये ठेवा. संपूर्ण भारतात व महाराष्ट्रात मिनरल वॉटर बनवणारी फक्त आपली पहिली महापालिका होईल. साहेब, तुमचे सुद्धा नाव होईल. तुमच्या काळात हा प्रोजेक्ट झालातर तुमचेदेखील नाव होणार आहे. अशी राज्यातली पहिली महापालिका असेल जी मिनरल वॉटर बनवणारी असेल.

खर्चाच्या तपशीलात जाऊन पाहिले तर गेल्या वर्षी २०१५-१६ मध्ये रु.१३०० कोटी महसूली खर्च झाला. गेल्या वर्षी तरतूद रु.११५६ कोटी होती. त्यात १२० कोटी वाढ झाली. महसूली खर्च दिवसेंदिवस वाढतोय. आस्थापना खर्च दिवसेंदिवस वाढतोय. याकडेही बारकाईने लक्ष देणे गरजेचे आहे.

भांडवली खर्च - आमचा इंटरेस्ट यात असतो. त्यामुळे शहरात विकास कामे होतात. त्यासाठी बजेटमध्ये रु.११९० कोटी ठेवले आहेत. जेएनएनयूआरएमचे ९३४ कोटी अशी रु.२१२४ कोटींची भरीव तरतूद इथे केली आहे. मागील वर्षी जो भांडवली खर्च झाला होता, माझ्याकडे जी आकडेवारी उपलब्ध आहे. परंतू स्थापत्य मुख्यालयामध्ये सुधारीतसाठी तरतूद रु.१८० कोटी होती, खर्च रु.६५ कोटी झाला आहे. शिल्लक रु.११४ कोटी म्हणजे फक्त ३६ टक्केच भांडवली खर्च झाला आहे. प अंदाजपत्रकात सुधारीत तरतूद रु.१५३ कोटी आहे. खर्च रु.४४ कोटी झाला आहे. शिल्लक रु.१०८ कोटी आहेत. म्हणजे फक्त ३० टक्के खर्च झाला. स्थापत्य मुख्यालय तरतूद रु.६५२ कोटी आहे. खर्च रु.३३० कोटी झाला आहे. शिल्लक ३२० कोटी आहेत. म्हणजे फक्त ५१ टक्केच खर्च झाला आहे. ३१ मार्चपर्यंत ७० टक्केच रक्कम खर्च होणार आहे.

विशेष योजना - सन २०१५-१६ मध्ये रु.४५६ कोटींची तरतूद केली आहे. तरतूदीपैकी रु.२६० कोटी खर्च झाले. शिल्लक रु.१९६ कोटी आहे. फक्त ५७ टक्केच खर्च

झाला आहे. विशेष योजनेसाठी या वर्षी रु.५७४ कोटी तरतूद आहे. मा.स्थायी समितीने त्यात वाढ केली आहे. रु.६०१ कोटींची तरतूद विशेष योजनेसाठी केली आहे. यात रु.१४४ कोटींची वाढ झाली आहे. गेल्या वर्षी आपण अनेक योजना जाहिर केल्या. अनेक योजना मार्गी पण लागल्या. त्याबद्दल मी आयुक्त साहेबांचे अभिनंदन करतो. काही योजना अगदी शेवटी शेवटी केल्या आहेत. परंतू काही योजना नुसत्याच कागदावर राहिल्या. त्यांचे काहीच झाले नाही. यासाठी गेल्या बजेटमध्ये तरतूद केली होती. गेल्या आर्थिक वर्षात ती खर्च झाली नाही. मत्स्यालय विकसित करणे - रु.२५ लाख तरतूद केली होती. हैद्राबादच्या धर्तीवर पिंपरी चिंचवड शहरामध्ये चांगल्या पद्धतीचे मत्स्यालय असावे म्हणून पर्यटन विकास आराखड्यात रु.८५ लाख तरतूद केली होती. त्यातला एक रुपयासुद्धा खर्च झाला नाही औद्योगिक संग्रहालय उभारणे - गेल्या वर्षी विशेष तरतुदीमध्ये याकरिता रु.५० लाख इतकी तरतूद केली होती. त्यातला एक रुपया सुद्धा खर्च झाला नाही. पिंपरी चिंचवड हे औद्योगिक शहर आहे इथे छोटे-मोठे ४५०० कारखाने आहेत. ऑटोमोबाईल इंडस्ट्री आहे. टाटा, बजाज, फोर्स मोटर्स या कंपन्या आहेत. या कंपन्यांमध्ये स्कूटरपासून ट्रकपर्यंत वाहने बनवितात. सायन्स पार्कमध्ये काही मॉडेल्स् ठेवले आहेत त्यापद्धतीने औदयोगीक संग्रहालय उभारायचा विषय जुना आहे. त्यासाठी रु.५० लाख तरतूद केली होती. आपण ती देखील खर्च केलेली नाही. महात्मा गांधी यांचा पुतळा उभारणे - यासाठी रु.१ कोटी इतकी तरतूद केली आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी जगाला सत्य, अहिंसेचा मार्ग दाखवला. सविनय कायदेभंग व सत्याग्रह करुन महात्मा गांधी यांनी या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले, त्या महात्मा गांधींना आम्ही गेल्या वर्षी विसरूनच गेलो. जगातला असा एक देश नाही, भारतातले असे एक शहर नाही, जिथे महात्मा गांधी यांचा पुतळा नाही. दीड वर्षांपूर्वी मा.अजितदादा पवार यांनी देखील सांगितले होते की, या शहरात महात्मा गांधी यांचा पुतळा बसवणार आहोत. त्याकरिता फक्त रु.१ लाख इतकी तरतूद ठेवली आहे. कलाकेंद्र उभारणे - यासाठी रु.५० लाख तरतूद केली आहे. पुणे शहरामध्ये गणेश कलाक्रिडा केंद्र आहे. तिथे एका वेळी चार ते पाच हजार लोक बसतात. सांस्कृतिक कार्यक्रम असेल, मोठी सभा असेल, इतर कार्यक्रम असतील, पुणे शहराच्या धर्तीवर याठिकाणी एखादे चांगले कलाकेंद्र असावे यासाठी रु.५० लाख तरतूद ठेवली होती. हे देखील काम मार्गी लागले नाही. यावर्षी आपण १५ लाख तरतूद करुन ठेवली आहे. टाळगाव चिखली इथे संतपीठ उभारणे यासाठी रु.१ कोटी तरतूद केली आहे. या योजनेचे काम चालू झाले आहे. संत तुकाराम महाराज यांचे १४ टाळकरी होते. त्यापैकी

एक चिखली गावातले होते. जेव्हा संत तुकाराम महाराज वैकुंठाला चालले होते तेव्हा त्यांनी त्यांचे टाळ चिखली गावात टाकले. म्हणून चिखली गावाला टाळगाव चिखली असे नाव पडले. हे गाव आळंदी व देहू यांच्यामध्ये असल्यामुळे या गावाला एक विशेष महत्व आहे. याठिकाणी संतपीठ निर्माण केलेतर निश्चितपणे याठिकाणी आपल्याला एक आध्यात्मिक वारसा जतन होईल. त्याचा फायदा संबंध वारकरी संप्रदायाला व आपल्या सर्वांनाच होईल. त्यासाठी आपण चालू वर्षीच रु.३० लाख तरतूद करुन ठेवली आहे. माझ्या वॉर्डात शाहूनगरमध्ये बसटर्मिनस उभारणे - यासाठी रु.६ कोटी तरतूद केली होती. पण कुठलेच काम झालेले नाही. पीएमपीएमएलचे आरक्षण असलेली जागा एमआयडीसीची आहे. आपल्याला या जागेचा ताबा खूप दिवसांपासून मिळालेला आहे त्याठिकाणी बस टर्मिनस, फ क्षेत्रिय कार्यालयाला दर वर्षाला रु.२० लाख भाडे देतो. आम्ही म्हणतो काम लवकर करा. ते देखील काम लवकर होत नाही. त्याठिकाणी नाट्यगृह प्रस्तावित आहे. या वर्षीदेखील त्याची तरतूद करुन ठेवली आहे. हे काम लवकर करावे अशी याठिकाणी अपेक्षा आहे. भक्ती-शक्ती, अप्पूघर विकसित करणे यासाठी रु.२,५०,००,०००/- तरतूद केली आहे. भक्ती-शक्ती हे समूहशिल्प आपल्या शहराचे भूषण आहे. संत तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज. छत्रपती शिवाजी महाराज यांची शक्ती आणि संत तुकाराम महाराज यांची भक्ती यांचा अतिशय सुरेख संगम याठिकाणी केला आहे. हे अतिशय चांगले समूहशिल्प आहे. हे पर्यटन स्थळ झाले आहे. संध्याकाळी जाऊन बघा, तिथे खूप गर्दी असते. आता जागा अपूरी पडायला लागली आहे. सगळे भाजीवाले, वडापाव विकणारे, आईसक्रिमवाले त्याठिकाणी असतात. हे स्थळ देखील विकसित करायला पाहिजे. यात अप्पूघर पण आले. खरेतर अप्पूघर हे स्वर्गीय रामकृष्ण मोरे यांची या शहराला देणगी आहे. ज्यावेळी अप्पूघर झाले, तेव्हा ते पहायला महाराष्ट्रातून लोक येत होते. इतके त्याचे नाव झाले आहे. आता अप्पूघरची वाट लागली आहे. याचा देखील विकास करावा. त्यासाठी फक्त रु.१ लाख इतकी तरतूद ठेवली आहे. मघाशी कुमार साहेबांनी मध्यवर्ती वाचनालय/सेंट्रल लायब्ररीचा विषय काढला होता. ही तरतूद देखील गेले चार/पाच वर्षांपासून बजेटमध्ये येते आहे. पण खर्च होत नाही. ज्याप्रमाणे मुंबईमध्ये सेंट्रल लायब्ररी आहे. जगातले सगळे ग्रंथ, सगळी पुस्तके, सगळ्या शाखेची पुस्तके तिथे आहेत. एमपीएससी असेल, युपीएससी असेल. सगळे विद्यार्थी तिथे येऊन अभ्यास करतात. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना व नागरीकांना होतो. ही सुद्धा तरतूद करुन ठेवली होती. पण खर्च केली नाही. हॅरीस ब्रीज इथे टूबायटू ब्रीज तयार करणे. त्याचे देखील काम झालेले नाही.

डेअरीफार्म रेल्वे उड्डाणपूल बांधणे. वायसीएममध्ये बहुमजली वाहनतळ उभारणे याचे देखील काम झालेले नाही. आकुर्डी इथे संत तुकाराम महाराज यांच्या जीवनावर समुहशिल्प तयार करणे. त्याची देखील तरतूद होती. ते देखील काम झालेले नाही. म्हणजे सन २०१५-१६ मध्ये या सगळ्या तरतूदी होत्या. जी कामे झाली आहेत ती मी सांगीतली व जी कामे करायची राहीली आहेत ती सुद्धा सांगितली आहेत. त्या अगोदर दोन/तीन वर्षांपासून त्याच-त्याच योजनांसाठी तरतूद केली आहे. चालू वर्षी रु.६०१ कोटींची तरतूद केली आहे. त्यात काही नवीन योजना आहेत. एसी बस खरेदी करणे - रु.१० कोटी तरतूद आहे. आपण आपल्याकडे बीआरटी चालू केली आहे. या मार्गांवर एसी बस चालवायच्या आहेत. पण मा.आयुक्त साहेब, एक लक्षात घ्या, पुणे महापालिकेने सुरुवातीला एसी बसेस घेतल्या होत्या. त्या बसेसचे दरवाजे खिळखिळे झाले. काचा फुटल्या. या बसचे तिकिटचा दर सुद्धा खूप असतो. त्यामुळे या एसी बस घ्यायच्या का नाही घ्यायच्या याचा पुन्हा एकदा विचार करा. ट्राम सेवेसाठी रु.१ कोटी तरतूद केली आहे. थेरगाव इथे शिवसृष्टी उभारणे - रु.९२ लाख तरतूद केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचे जेजे प्रसंग आहेत ते इथे उभे केले जाणार आहेत. त्याठिकाणी निश्चितपणे शिवसृष्टीच उभी केली जाणार आहे. भोसरी इथे आमदार लांडे यांनी शिवसृष्टी केली आहे. आता अजून एक खासदार शिवसृष्टी करत आहेत. मध्यंतरी भिमसृष्टी उभारणार असल्याची घोषणा माजी आमदार बनसोडे यांनी केली आहे. म्हणजे या आमदार/खासदारांचे या शहराकडे चांगले लक्ष आहे. इथे चांगली विकास कामे व्हावीत असा देखील त्यांचा याठिकाणी प्रयत्न दिसतो आहे. सायन्स पार्कजवळ भारतरत्न डॉ.विश्वेश्वरय्या यांचे स्मारक उभारणे - ही अतिशय चांगली तरतूद आहे. भारतरत्न सर विश्वेश्वरय्या यांचे इंजिनिअरींग क्षेत्रात खूप चांगल्या पद्धतीचे काम आहे. त्यांचा जन्म १५ सप्टेंबर १८६१ रोजी झाला. ते भारतातले पहिले इंजिनिअर आहेत. ते म्हैसूर राज्याचे ३० वे दिवाण होते. इंजिनिअरींग क्षेत्रात त्यांचे फार मोठे योगदान आहे. म्हैसूर इथे कृष्णराजसागर धरण त्यांनी बांधले आहे. त्यांनी भारतात इंजिनिअरींगची मुहूर्तमेढ रोवलेली आहे धरण बांधावे. त्याचे पाणी शेतीसाठी वापरावे. देश सुजलाम सुफलाम करावा, असे त्यांचे धोरण होते. त्यामुळे देशात अनेक धरणे बांधली गेली. ते अतिशय हुशार होते दूरदृष्टी असलेले ते इंजिनिअर होते. ब्रिटीशांनी त्यांना या कामगिरीबद्दल सर ही पदवी बहाल केली होती. भारत सरकारने १९५५ मध्ये त्यांना भारतरत्न हा पुरस्कार दिला होता. ते काही वर्षे पुण्यामध्ये देखील शिकायला होते. त्यांचा दि.१५ सप्टेंबर या दिवशी जन्म झाला म्हणून

हा दिवस अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. दि.१२ एप्रिल १९६२ या दिवशी वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला. अशा महान अभियंत्याचे स्मारक आपण याठिकाणी उभे करतोय, त्याबद्दल मी तुम्हाला मनापासून धन्यवाद देतो. महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा या शहरात असणे गरजेचे आहे. १२व्या शतकात जगातली पहिली लोकशाही महात्मा बसवेश्वर यांनी रुजविली आहे. १२व्या शतकात त्यांनी स्त्री-पुरुष समान अधिकार दिले आहेत. १२ व्या शतकात जातीनिहाय समाजव्यवस्था निर्माण केली आहे. म्हणून इंग्लंडच्या संसदेसमोर महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा आहे. गेल्या महिन्यात पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्यांच्या पुतळ्याचे अनावरण झाले आहे. ही देखील तरतूद आपण याठिकाणी करावी असे मला वाटते. या दोन विभूतींबद्दल मला एक शेर सांगावासा वाटतो -

आओ झुककर सलाम करे उनको, जिनके हिस्से में मुकाम आता है।

खुशनसिब होता है वो खून, जो देश के काम आता है।।

मा.आयुक्त साहेब, ही दोन्ही कामे या चालू वर्षात व्हायला पाहिजेत.

मध्यवर्ती भांडार - या विभागासाठी रु.२२ कोटी तरतूद केली आहे. हा विभाग इतर विभागांसाठी साहित्य खरेदी करतो. पूर्वी कोंडे साहेबांकडे हा विभाग होता. त्यांचा महापालिकेत इतका दरारा इतका होता. ते अनेक विषयांत स्वतः लक्ष घालत होते. हा कोठी विभाग जेव्हा त्यांच्याकडे होता, त्यावेळी या कोठी विभागामार्फत आरोग्य विभाग, वैद्यकीय विभाग, विद्युत, वायसीएम, अग्निशामक विभाग, संगणक विभाग, स्टेशनरी, फर्नीचर खरेदी ही सगळी खरेदी ते करीत असत. या कोठी विभागात छपाईसाठी रु.१,६०,००,०००/- इतकी तरतूद केली आहे. दैनंदिन कामकाजांत वेगवेगळ्या ऑफीसमध्ये फॉर्मस्, इतर साहित्य खरेदी असेल, ते साहित्य खरेदी करताना नगरसेवकांचे/अधिका-यांचे व्हिजिटींग कार्ड बनवणे, लेटर्स बनवणे यासाठी रु.१,६०,००,०००/- खर्च करतो. पुणे महानगरपालिकेचा स्वतःचा छापखाना आहे. ते एकही कागद बाहेरुन छापून घेत नाहीत. सगळी छपाई महापालिका स्वतः करते. महापौरांचे व्हिजिटींग कार्ड असो, आयुक्तांचे व्हिजिटींग कार्ड असो त्यांना त्या प्रेसमधूनच मिळतात. यासाठी फारसा खर्च येत नाही. एक चांगला D.T.P. करणारा माणूस ठेवला तर, आपण जे रु.१,६०,००,०००/- ठेवले आहेत, याठिकाणी हे पैसे वाचतील. इथे वेगवेगळ्या विभागांकरीता खरेदी होते. संगणक खरेदी, आरोग्यसाठी ढकलगाड्या खरेदी, विद्युतचे लाईट पोलस्, वैद्यकीय विभागासाठी खरेदी करणे इ. परंतू या विभागात एकही सक्षम अधिकारी किंवा टेक्निकल माणूस नाही. इथे दररोज

कोट्यावधी रुपयांची खरेदी होत असते. पण याठिकाणी चांगला माणूस नाही. त्यामुळे त्या-त्या विभागाची खरेदी त्या-त्या विभागाने केलीतर निश्चितच त्याचा फायदा होणार आहे. कोठी विभाग बंद करा.

पशुवैद्यकीय विभाग - यासाठी रु.६,३०,००,०००/- तरतूद केली आहे. या विभागासाठी गेल्या वर्षी रु.५,००,००,०००/- इतकी तरतूद केली होती. यावर्षी ही तरतूद रु.१,३०,००,०००/- ने वाढवली आहे. यात त्याचे उपलेखाशिर्ष बघितले तर, ठेकेदारी पद्धतीने डुकरे पकडणे १५ लाख रुपये. शहरातली डुकरे कमी होत नाहीत. जे डुकरं पाळणारे त्यांनाच ठेका मिळतो. ते डुकरे पकडतात, पैसे घेतात व परत सोडून देतात. डुकरांची संख्या कमी झालेली दिसत नाही. श्वान नियमन शस्त्रक्रिया - रु.३,००,००,०००/- मोठी तरतूद आहे. दोन संस्था काम करतात. प्राणी प्रेमी संघटना याच्याशी संलग्न असलेल्या या दोन संघटना यांचे हे काम आहे. वॉर्डातली भटकी, मोकाट कुत्री पकडणे, त्यांची शस्त्रक्रिया करणे, त्यांचा कुठलातरी कान कापून त्यांना परत वॉर्डात सोडून देणे. यासाठी आपण दरवर्षी कोट्यावधी रुपयांची तरतूद ठेवतो. ही तरतूद बघितलीतर ५ वर्षापासुन १८ ते २० कोटींपर्यंत चालली आहे. तरीदेखील शहरातल्या कुत्र्यांची संख्या कमी झाली आहे? का? तर कुत्र्यांची संख्या ही बिल्कूल कमी झालेली नाही. प्रत्येक प्रभाग मिटींगमध्ये भटक्या कुत्र्यांचा विषय निघतोच. नागरीक जवळजवळ रोजच फोन करत असतात. मग हे एवढे पैसे आपण खर्च करतो तर यावर काहीतरी नियंत्रण पाहिजे. तुम्ही शस्त्रक्रिया करता. वास्तविक शस्त्रक्रिया करता म्हणजे कुत्र्यांची संतती कमी व्हायला पाहिजे. पण तसे होताना दिसत नाही. हे काम कोणाकडे दिले आहे. डॉ.गोरे यांच्याकडे दिलेले आहे. वास्तविक पाहता डॉ.गोरे हे पशुवैद्यकीय अधिकारी आहेत. पाळीव प्राण्यांवर उपचार करणे हे ख-या अर्थाने त्यांचे काम आहे. मग गाय असेल, बैल असेल, घोडा असेल, तुम्ही आम्ही पाळलेली कुत्री असतील. पुणे महानगरपालिकेत व इतर महापालिकांमध्ये कुत्री पकडायचे काम आरोग्य विभागाकडे असते. या विभागाकडेच हे काम दिले पाहिजे. याठिकाणी मला वाटते, एवढे करोडो रुपये खर्च करुन जर कुत्र्यांची संख्या कमी होत नसेल तर त्यांचे संगोपन केंद्र काढले पाहिजे. त्या आधी कुत्र्यांची जनगणना केली पाहीजे. शहरात कुत्र्यांची संख्या नेमकी किती आहे. महाराष्ट्र शासनाचा वनविभाग वाघांची जनगणना करते, शेळ्यांची जनगणना करते, हत्तींची जनगणना करते, मग आपण कुत्र्यांची जनगणना का करु नये. मा.आयुक्त साहेब, कुत्र्यांची जनगणना करा. त्यांच्यासाठी एक संगोपन केंद्र करा. कुत्री पकडून त्यांच्यावर शस्त्रक्रिया करुन त्यांना पुन्हा सोडून देण्याऐवजी मोशी कचरा

डेपोपाशी दोन/चार एकर जागा घ्या. त्याठिकाणी सगळी कुत्री जमा केलीतर त्यांना आपल्या कडील हॉटेलचे वेस्टेज पण देता येईल. कुत्र्यांवर शस्त्रक्रिया केलीतरी त्यांची संख्या कमी का होत नाही हे सुद्धा कळेल.

सुरक्षा विभाग - यासाठी रु.३७,४०,००,०००/- तरतूद केली आहे. महापालिकेच्या इमारती, गोडाऊन्स, पाण्याच्या टाक्या, दवाखाने, बागा, प्रभाग कार्यालये याठिकाणी सुरक्षा व्यवस्था पुरवतो. ठेकेदारी पद्धतीने सुरक्षा व्यवस्था करण्यासाठी रु.१६ कोटी तरतूद केली आहे. गेल्या वर्षी रु.१४ कोटी इतकी तरतूद होती. यात यावर्षी आणखी रु.२ कोटी इतकी तरतूद वाढवली आहे. महापालिके व्यतिरिक्त महानगरपालिकेत आणखी ८ ठेकेदार आहेत. त्यांच्याकडून ही सुरक्षा व्यवस्था घेत असतो. महापालिकेच्या मिळकतींवर ३८३ व शाळांवर २९४ असे ६७७ रखवालदार महापालिकेच्या इमारतींसाठी आपल्याकडे आहेत. वास्तविक पाहता, या रखवालदारांचे वय २५ ते ४५ या दरम्यान असे असायला हवे. पण ५० पेक्षा जास्त वय असलेल्या व्यक्तींना देखील रखवालदाराचे काम दिले आहे. मला कोणाच्या वयावर किंवा अपंगत्वावर टिका करायची नाही. पण जे रखवालदार महापालिकेच्या इमारतीचे रक्षण करतील असे सक्षम असले पाहिजेत, पण तसे दिसत नाहीत. तुम्ही चेक करा. त्यांची शारिरीक तपासणी करा. त्यांना एक किलोमीटर पळायला लावा. असे होत नाही. वायसीएममध्ये असे एक वयस्कर रखवालदार गृहस्थ आहेत, त्यांना नागरीक घाबरत नाहीत. रात्रीच्या वेळी ॲक्सीडंट होतात, मारामा-या होतात, लोक ऐकत नाहीत. बिनधास्तपणे वॉर्डमध्ये घुसतात. सिस्टर सुद्धा घाबरून जातात. वायसीएममध्ये सुरक्षा व्यवस्था अजिबात नाही. त्यांच्याच शेजारी रुबीएलकेअर सेंटर आहे. तिथे एकच शिपाई आहे, तो शंभर शिपायांना भारी आहे. तो कोणालाच आत सोडत नाही. मी एका पेशंटला बघायला गेलो होतो, तेव्हा त्याने मलादेखील अडवले होते. मी त्याला सांगितले, मी नगरसेवक आहे. तो मला म्हणाला, तुम्ही नगरसेवक असलात तरी मला आदेश आहेत. कुणाला सोडायचे नाही. मी त्याचे कौतुक केले. मी बाहेरून फोन केला की, मी आलो आहे म्हणून. रुबी एलकेअरमध्ये एवढी सुरक्षा व्यवस्था राहू शकते मग आपल्या वायसीएममध्ये का राहू शकत नाही. फरक रखवालदाराचा आहे. आपण या कर्मचा-यांना किमान वेतन देतो. ठेकेदार या कर्मचा-यांना सहा ते सात हजार पगार देतो. त्यामुळे ते तीन/चार महिन्यांतच काम सोडून निघून जातात. भांडार विभागाच्या गोडाऊनपाशी दोन वॉचमन आहेत. तिथे करोडोंची मालमत्ता आहे आणि फक्त दोनच वॉचमन आहेत. तिथेदेखील वॉचमन वाढवायला पाहिजे. जिथे पाण्याच्या टाक्या आहेत, एसटीपी प्लाण्ट आहेत,

वायसीएममध्ये तसेच महापालिकेच्या इमारती इथे असलेले जवळजवळ ३७७ रखवालदार कमी पडत आहेत. ते आपल्याला मिळणे गरजेचे आहे. शहरातील सामाजिक सुरक्षिततेसाठी-रु.२,५०,००,०००/- ची तरतूद केली आहे. ही सामाजिक सुरक्षितता म्हणजे शहरात चौकाचौकात, गर्दीच्या ठिकाणी, जिथे ट्रॅफिक जाम होते, तिथे वाहतूक व्यवस्थेसाठी १०० वॉर्डन दिलेले आहेत. हे काम दोन ठेकेदार करतात. हे शंभर लोक कुठल्या रस्त्यावर जातात, कुठल्या चौकात जातात हे आपल्याला माहित नाही. यांच्यावर कोणत्याही प्रकारचा कंट्रोल नाही. तरीसुद्धा त्यांच्यासाठी जवळजवळ अडीच कोटी खर्च करतो. याकडे देखील आपण लक्ष दिले पाहिजे.

सार्वजनिक उद्यान - यासाठी रु.१९ कोटी तरतूद ठेवली आहे. मागील वर्षापेक्षा रु.२ कोटी तरतूद वाढवली आहे. शहरात लहान-मोठी एकूण १७२ उद्याने आहेत. लहान मोठ्या उद्यानांच्या विकासाचे काम चालू आहे. यात उपलेखाशिर्ष - उद्यान देखभालीसाठीचे काम ठेकेदारी पद्धतीने करणे यासाठी रु.३,७५,००,०००/- तरतूद ठेवली आहे. शहरातील जवळजवळ १०२ उद्याने ठेकेदारी पद्धतीने चालविली जातात. या कामांच्या निविदा बघितल्या तर फक्त ३० टक्के बिलो पर्यंत आहेत. एवढ्या कमी दरामध्ये ठेकेदाराला कसे परवडते. का आपले एस्टिमेट चुकले आहे का, हे देखील आपल्याला पहायला पाहिजे. हे लोकं निविदा भरत असताना उद्यानाच्या कामाच्या अनुभवाचा खोटा दाखला देतात. इथे प्रतिभाताईं भालेरावनीं पत्र दिले आहे. याचीदेखील आपण दखल घेतलेली नाही. कोमल एंटरप्रायजेस नावाची संस्था काम करते आहे. त्यांनी अनेक संस्थांचे काम केल्याचे खोटे दाखले दिलेले आहेत. त्यांनी ९० लाख रुपयांचे काम मिळवले आहे. त्यांनी दाखले कुठले आणले आहेत. उर्से येथील ग्रामपंचायतीचा ३ एकरचे काम केल्याचा खोटा दाखला दिला आहे. वास्तविक पाहता, त्यांनी ६.५० गुंठ्यांचेच काम केले होते. याचे ओरिजनल दाखले व डुप्लीकेट दाखले प्रतिभाताईंनी आयुक्त साहेबांना दिले आहेत. तोच प्रकार शिलाटणी ग्रामपंचायतीचा, कान्हे ग्रामपंचायतीचा. प्रेरणा संस्थेचा ३ एकर काम केल्याचा खोटा दाखला दिला आहे. हे खोटे दाखले देऊन त्यांनी काम मिळवले आहे. या सर्वांवर कारवाई व्हायला पाहिजे. मी माझ्या वॉर्डातला शाहूनगरचा किस्सा सांगतो. १५ दिवसांपूर्वीची गोष्ट आहे. मी मोरवाडी इथून जात असताना माझा एक मित्र जो बिल्डर आहे, त्याची मिसेस व त्याची मुलगी शाहू उद्यानात फिरण्यासाठी गेले होते. त्याठिकाणी भाऊराज नाटखरे नावाचा आपला तिकिट वाटणारा कर्मचारी होता. त्याने तिकिट देत असताना त्या स्त्रीच्या हाताला स्पर्श केला आणि काहीतरी असभ्य वर्तन करायचा प्रयत्न केला. तिने तीच्या

मिस्टरांना फोन लावला. तीच्या मिस्टरांनी शंभर नंबरला फोन लावला व त्याठिकाणी पोलिसांना बोलवून घेतले. त्यांनी मलादेखील फोन करुन सांगितले, असे असे माझ्या मिसेसच्या बाबतीत झाले आहे. तुम्ही कुठे आहात. मी त्यांना म्हणालो, मी पाचच मिनिटांत येतो. मी तिथे गेलोतर त्याठिकाणी पोलिस होते. ते गृहस्थ तिथे अजून पोचलेच नव्हते. हा नाटखरे नावाचा कर्मचारी फूल दारू प्यायला होता. मी त्याच्या मुस्काटात दोन लगावल्या. मी पी.एन. गायकवाड यांना फोन लावला. त्यांनी माझा उचलला नाही. म्हणून मी सुरेश साळुंकेंना फोन केला की, आपला वॉचमन दारू प्यायला आहे. त्याने एका महिलेशी असभ्य वर्तन केले आहे. त्या माणसाने पोलिसांना फोन केला आहे आणि पोलिसदेखील इथे आले आहेत. मी पण इथे आलेलो आहे. तर तुम्ही पण या. यावर त्यांनी मला काय उत्तर दिले, घ्या की साहेब बघून. काय असेल बघून घेता येईल. सकाळी अशा शब्दांत साळुंके साहेबांनी मला उत्तर दिले. शेवटपर्यंत साळुंके साहेब माझ्याकडे आले नाहीत. काय प्रकार घडला, काय झाले हे देखील त्यांनी विचारले नाही. त्या कर्मचा-यावर कोणत्याही प्रकारे कारवाई देखील केली नाही. महापालिकेची बदनामी होऊ नये. मी त्यांना विनंती केली की, प्रकरण हे इथेच मिटवा. पेपरमध्ये बातमी आलीतर नाहक आपली बदनामी होईल हे प्रकरण जेव्हा अशी काही घटना घडते, त्यावेळी साळूंखे यांनी हजर राहिले पाहिजे. ते हजर राहत नाहीत.

नागरवस्ती विभाग योजना - या योजनेचे माझ्याकडे खूप मटेरीयल आहे. मी इथे काही ठराविकच गोष्टी वाचतो. जिथे शून्य खर्च झाला आहे, तेवढेच मी वाचतो. नागरवस्ती विभागात मागासवर्गीय कल्याणकारी योजना, महिला व बालकल्याण योजना, अपंग कल्याणकारी योजना व इतर योजना या चार योजनांचा समावेश आहे. मागासवर्गीय कल्याणकारी योजनेसाठी रु.११,६५,००,०००/- इतकी सुधारीत तरतूद केली आहे. पाचवी, सातवीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी रू.१,४०,००,०००/-, आठवी व दहावीतल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे यासाठी दोन्ही मिळून रू.१,४०,००,०००/- लाख तरतूद असताना एक रुपयादेखील खर्च झालेला नाही. मागासवर्गीय सहकारी निर्माण संस्था घरबांधणी अर्थसहाय्य व दुरुस्ती - यासाठी रु.२५,००,०००/- तरतूद आहे. एक रुपया सुद्धा खर्च झालेला नाही. युवक-युवतींना चार चाकी वाहन चालवण्याचे प्रशिक्षण देणे यासाठी रु.१,२०,००,०००/- ची सुधारीत तरतूद केली आहे. पण ही योजनाच चालू नाही. तरी चालू वर्षी रू.२०,००,०००/- ची तरतूद केली आहे. विविध योजनांची माहिती व प्रसार करणे - म्हणजे ज्या योजना आहेत त्यांची नागरीकांना माहिती व्हावी म्हणून पुस्तिका असेल, पॅम्पलेट असेल हे करण्यासाठी रु.५०,००,०००/- तरतूद केली आहे. हे

देखील खर्च केलेले नाहीत. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल वाटप करणे - यासाठी रु.१,६०,००,०००/-. महिला व बालकल्याण योजनेची सुधारीत तरतूद रु.३८,९९,००,०००/- आहे. या योजनेत देखील मुलींना सायकल वाटप आहे. दोन्ही मिळून रु.२,८०,००,०००/- ची तरतूद आहे. मघाशी मा.आर.एस.कुमार यांनी सांगितले आहे. त्यातले काही मुद्दे सांगायचे राहून गेले आहेत ते मी याठिकाणी सांगतो. ८,१२२ सायकलींची खरेदीची ऑर्डर दिली आहे. एसव्हीएस केमिकल कंपनीकडून आपण एक मॉडेल ॲशेन या मॉडेलची सायकल विकत घेतो आहोत. एका सायकलची किंमत रु.३,५५३/- असून ८,१२२ सायकलींचे एकूण रु.२,८७,००,०००/- होतात. यातील तरतूद शंभर टक्के खर्च होणार आहे याबद्दल कोणाचेच दुमत नाही. परंतू कुमार साहेब व त्यांचे काही सहकारी सायकल बघायला गेले होते. त्यांनी सायकल चालवून बघितली. सायकलवर बसले, सायकलचा पॅण्डल मारला, पॅण्डल फिरायला लागला पण सायकल काय पुढे गेली नाही. म्हणजे सायकलचा दर्जा एकदम तकलादू आहे. वजनाला पण अतिशय हलकी आहे. तिच्या बेअरींगमध्ये देखील आवाज येतो. ॲशेन मॉडेल बाजारात कुठेच उपलब्ध नाही. हिरो आहे, हरक्युलस आहे, ॲटलस आहे, रॉयल आहे. हे इंटरनॅशनल ब्रँड आहेत. आपण या ब्रँडची सायकल का घेत नाही. आपण नुसतेच स्पेसिफिकेशन देतो, निविदा काढतो आणि खरेदी करतो. ४/५ ब्रँड असतील तर त्यांची नावे द्यायला काय हरकत आहे. त्यांच्यात स्पर्धा होईल. तर निश्चितपणे रेट पण कमी होतील व आपल्याला चांगल्या क्वालिटीच्या सायकली मिळू शकतील. आता हा सगळ्या सायकली घेऊन बसलाय. रु.१ कोटी पेमेण्ट सुद्धा घेऊन बसलाय. त्यांना उर्वरीत पेमेण्ट देऊ नका. ज्याने सायकली पुरवल्या आहेत, त्याचा हा व्यवसायच नाही. केमिकल पुरवठा करणारी एसव्हीएस नावाची केमिकल कंपनी असे त्यांच्या कंपनीचे नाव आहे. स्पेअरपार्ट आणून दिलेतर आपली आयटीआयची मुले देखील अशी सायकल बनवू शकतात. पण आपल्याला ब्रॅण्डेड पाहीजे. त्याने आपल्याला सायकल दिली. आपल्या अटी-शर्तीमध्ये वर्षातून चार वेळा त्या सायकलचे मोफत सर्वीसिंग आहे. सर्वीसींग कुठे करणार? यांची सर्वीस स्टेशन्स शहरात आहेत का? जर यांची सर्वीस स्टेशन्स शहरात नाहीत तर हे कुठून सर्वीसींग करुन देणार आहे. सायकलचे स्पेअर पार्टची लिस्ट उपलब्ध करुन देणे. गावडे साहेबांना विचारा, स्पेअरपार्टची लिस्ट उपलब्ध करुन दिली का. बाजारात सायकलचे स्पेअर पार्टस् सहजासहजी मिळेल, याची खबरदारी घेणे. मा.आयुक्त साहेब, आपले २० लाख लोकसंख्या असलेले शहर आहे. निगडीपासून बोपखेलपर्यंत आणि आळंदीपासून हिंजवडीपर्यंत आपले शहर पसरलेले आहे. शहरातली सगळी मुले सायकल घेऊन गेलीतर

स्पेअर पार्ट कुठे-कुठे देणार आहोत, देणार आहोत का. त्यापेक्षा स्पेअर पार्ट खराब न होणा-या सायकली द्या. जोपर्यंत या गोष्टींची पूर्तता होत नाही, तोपर्यंत त्याला पेमेण्ट अदा करु नका.

मोफत शिवण यंत्र वाटप - रु.८ कोटी तरतूद आहे. एकूण १४७३४ अर्ज आले आहेत. आपण अनेक वर्षे शिवण यंत्रे दिलेली नाहीत. ती वाटली पाहिजेत. ज्या योजनेसाठी तरतूद आहे, ती तरतूद खर्च झाली पाहिजे. ही शिवणयंत्रे वाटली पाहीजेत. यातही तोच घोळ आहे. एकूण १३२९० शिलाई मशिन्स खरेदी करणार आहोत. निविदा प्रक्रिया सगळी पूर्ण झाली आहे. आपण त्यांना फक्त वर्कऑर्डर दिलेली नाही. ऍप्रन लेनन टेक्नीक्स प्रायव्हेट लिमिटेड ही बेंगलोर इथली कंपनी आहे. ही निविदा लघुत्तम दराने मंजूर झाली आहे. आपण फक्त लघुत्तम दर तेवढा बघतो. बाकी काही बघत नाही. शिलाई मशीनचे नाव आहे स्कॉनटॅक्स. मा.आयुक्त साहेब, स्कॉनटॅक्स हे शिलाई मशीनच नाव तुम्ही कधी ऐकलं आहे का. सिमाताईंना माहित असेल. आजपर्यंत स्कॉनटॅक्स नावाची शिलाई मशीन बाजारात कुठेही उपलब्ध नाही. नॉव्हेल, उषा, राजेश, सिंगर हे ब्रॅण्डस् बाजारात उपलब्ध असून ते माहित आहेत पण स्कॉनटेक्स नावाची शिलाई मशीन कुठेच दिसत नाही. ही मशिन कुठे बनवली, कोणत्या देशात बनवली त्याचा पुरावा नाही. पण त्याचे स्पेअर पार्टस् मेड इन चायना आहेत. पुरवठाधारकाचा मशीन बनवण्याचा करण्याचा व्यवसायच नाही. त्याची शहरात कुठेही सर्व्हीस स्टेशन्स नाहीत. नॉव्हेलचं आहे, सिंगरचं आहे, उषाचं आहे, राजेशचं आहे. या महिला भगिनी मशीन्स घेऊन जातील. त्याची सर्वीसिंग करायला त्यांनी कुठे जायचे. हा विचार खरेदी करणा-याने करायला नको का. शहरात यांची सर्व्हीस स्टेशन्स कुठेच नाहीत. जर उद्या मशीन खराब झालीतर आपण काय करणार. दोन पैसे जास्त जाऊ द्या,हरकत नाही. बजेटमध्ये रक्कम शिल्लक राहणार आहे. मशीनचे स्पेअरपार्ट रजिस्ट्रेशन नाही. मशीन कोणत्या देशात बनते,याचा पुरावा नाही. असली भंगार मशीन घेऊ नका. त्याची ऑर्डर रद्द करा. पाच/सहा ब्रँडची नावे टाकून त्यात फेरनिविदा करा. मुलींना कुं-फू कराटेचे प्रशिक्षण - रु.२७,००,०००/- यावरील तरतूद खर्च झालेली नाही. जननी शिशू योजना कार्यक्रम रु.१,५०,००,०००/- वैद्यकीय विभागामार्फत ही योजना राबविली जाते. परंतू यावरील तरतूद खर्च झालेली नाही. राजमाता जिजाऊ कुपोषणमुक्त शरीर अभियान - तरतूद रु.६५ लाख. एकही रुपया खर्च झाला नाही. शासनाचे धोरण आहे, शहरात एकही कुपोषित बालक असू नये. त्या बालकाला चांगले आरोग्य मिळाले पाहिजे, चांगल्या सुविधा मिळाल्या पाहिजेत. त्याला चांगला आहार मिळाला पाहिजे. आपण हे करु

शकतो. शहरात ७५/८० झोपडपट्टया आहेत. ती मुले कुपोषित नसतील, पण सुदृढसुद्धा नाहीत. त्यांना ख-या अर्थाने गरज आहे. शिक्षण मंडळाने बालवाडीतल्या मुलांना सकस आहार व खेळणी देण्यासाठी रु.२,७०,००,०००/- तरतूद केली आहे. तिथे एक रुपया देखील खर्च झालेला नाही. पुन्हा रु.२,००,००,०००/- तरतूद केली आहे. योजनेचा प्रचार करण्यासाठी रु.१०,००,०००/- तरतूद केली असलीतरी त्यातला सुद्धा एक रुपया पण खर्च झालेला नाही.

अपंग कल्याणकारी योजना - यात रु.१३,००,००,०००/- ही भरीव तरतूद आहे. प्रत्यक्षात रु.४,००,००,०००/- खर्च झाले आहेत. रु.९,००,००,०००/- शिल्लक आहेत. फक्त २७ टक्केच खर्च झाला आहे. या व्यक्तींना चलनवलन साधने इ. सुविधा देण्यासाठी रु.१,८२,००,०००/- तरतूद करुन ठेवली आहे. खर्च फक्त ६५,००,०००/- झाला आहे. शहरात अपंग लोकं नाहीत का. मा.आयुक्त साहेब, आपण शहरात अपंगांचा एक मेळावा भरवू किंवा सगळे अपंग एकत्रित करा. कोणाला काय व्यंग आहे, किंवा कोणाला कशाची गरज आहे. हे आपल्याला तिथे कळेल. कारण आज जरी बोललोतरी, उद्याच्या बजेटमध्ये ही तरतूद कंपल्सरी येणारच आहे. पण ती तरतूद खर्च होणार नाही. तुम्हाला पुन्हा आमच्या रोषाला सामोरे जावे लागणार. अपंगांच्या व्यवसायासाठी रु.१,३२,००,०००/- तरतूद ठेवली आहे. खर्च फक्त रु.१,००,०००/- झाला आहे. शहरात व्यवसाय करणारे अनेक अपंग लोक आहेत. ही योजना त्यांच्यासाठी आहे. परंतू जेव्हा महापालिकेत अनेक अपंग लोक येतात, तेव्हा तिथे बसलेले भुजबळ किंवा यादव हे माणसाच्या अंगावर भसकन धावतात. तुम्ही असे जर त्यांच्या अंगावर धावलात, तर ती अपंग व्यक्ती तुमच्याकडे कशाला येईल. माझा एक कार्यकर्ता आकुर्डीत, बंडू सप्रे नावाचा अपंग व्यक्ती आहे. त्याची स्वतःची प्रेस आहे. त्याला पैशांची गरज होती. मी त्याला त्याठिकाणी घेऊन गेलो होतो. मी त्याच्याबरोबर जोपर्यंत होतो, तोपर्यंत अधिकारी त्याच्याशी व्यवस्थित बोलले. मी गेल्यानंतर त्याला इतकी बेकार ट्रिटमेंट दिली गेली. तो म्हणाला, भीक नको पण कुत्र आवर. मला तुमचे पैसे नकोत. अशा पद्धतीने तुमचे अधिकारी/कर्मचारी वागत असतील तर योजनेसाठी ठेवलेली तरतूद कशी खर्च होणार. ती खर्च होऊच शकत नाही. या कर्मचा-यांना माणसांशी वागायचे प्रशिक्षण दिले पाहिजे.

शासनाच्या जी.आर. प्रमाणे एकूण बजेटच्या भांडवली खर्च वजा जाता मागासवर्गीय कल्याणकारी योजनेसाठी ५ टक्के, महिला व बालकल्याण योजनेसाठी ५ टक्के आणि अपंगांसाठी ३ टक्के निधीची तरतूद केली पाहिजे. मी इथे सगळ्या योजना

वाचून दाखविल्या आहेत. पैसे कोणकोणत्या योजनेवर खर्च होत नाहीत याचा अभ्यास केला पाहिजे. सभागृहात ५२ टक्के महिला आहेत. महापौर पदी महिला, पक्षनेतेपदी महिला, क्षेत्रीय कार्यालय अध्यक्षपदी महिला सदस्य आहेत. वास्तविक पाहता, या महिलांनी या विभागाकडे बारकाईने लक्ष दिले पाहिजे. यांनी हा निधी कसा खर्च होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. अपंगांसाठी ३ टक्के इतकी रक्कम ठेवली आहे. ही रु.१३ कोटी रक्कम खूप होते. मी या विभागातील बहाद्दरपुरे यांना विचारले की, ही रक्कम खर्च का होत नाही. त्यांनी चांगले उत्तर दिले की, आता वैद्यकीय सुविधा इतक्या उपलब्ध आहेत. गरोदर माता, बालकांसाठी चांगल्या पद्धतीची औषधे आहेत. सुदृढ बालके जन्माला येतात. आता मुलांमधील अपंगत्व असण्याचे प्रमाण कमी झाले आहे. गेले १५/२० वर्षांपासून आपण मुलांना पोलिओचा डोस देतोय. बाकी डोस देतोय. त्यामुळे कोणी मूल सहजासहजी अपंग होत नाही व पोलिओ होत नाही. जर अपंगांची संख्या कमी होत असेलतर हे पैसेदेखील खर्च होणार नाहीत. खाजगी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारासाठी रु.५,००,००,०००/- तरतूद ठेवली आहे. १०वी व १२वी तील ज्या विद्यार्थ्यांना ८०/८५ टक्के पेक्षा जास्त मार्कस् मिळाले आहेतआपण त्यांना दहा ते पंधरा हजार देतो. यापूर्वी आपण मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना देत होतो आता खाजगी शाळांतील मुलांना सुद्धा देतोय. यासाठी जवळजवळ २४०० अर्ज आले आहेत. त्यापैकी १८७५ विद्यार्थ्यांना रु.२,२२,००,०००/- रुपये वाटले आहेत. यात इतका गोंधळ झाला आहे. माझ्या वॉर्डातील दोन/तीन मुलांना चेक मिळालेलेच नाहीत. वास्तविक पाहता, त्यांना ९५ टक्केंपेक्षा जास्त मार्कस् मिळून देखील पैसे मिळाले नाहीत. मी चौकशी केली. ती मुले स्थानिक आहेत. त्यांना ९५ टक्केंपेक्षा जास्त मार्कस् मिळाले आहेत ते म्हणाले ती मुले पुण्यात शिक्षण घेत आहेत म्हणून त्यांचे नाव अपात्र यादीत टाकले आहे. ज्या मुलाला दहावीला ९५ टक्के पेक्षा जास्त मार्कस् असतील तर त्याला पुण्यातल्या फर्ग्युसन, वाडीया,एसपी असेल या महाविद्यालयांमध्ये ॲडमिशन मिळणारच. त्यांनी काय केले, चालू वर्षाचा दाखला मागितला की, ही मुले चालू वर्षी कोणत्या कॉलेजमध्ये शिकलात. या मुलांना चालू वर्षाचा दाखला मागितल्यावर त्यांनी फर्ग्युसन, नेसवाडीया या महाविद्यालयांचा दाखला आणला म्हणून त्यांना अपात्र केले आहे. ही मुले हुशार आहेत, त्यांना चांगले मार्कस् आहेत मग त्यांना पुण्यातल्या कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळणारच. हे देखील आपल्याला बदलायला पाहिजे. या मुलांना हे चेक दिले पाहिजेत. रहिवास पुरावा म्हणून लाईट बील दिल्यावर त्यावर आजोबांचे नाव असते. आधार कार्डवर मुलाच्या वडीलांचे नाव असते. यामुळे देखील मुलांना अपात्र

केले आहे. आता ही लोकं कामधंद्यासाठी तीस/चाळीस वर्षांपूर्वी शहरात आली आहेत. लाईटबीलावर आजोबांचे नाव आहे. हे म्हणतात, वडीलांचे नाव असलेले लाईट बील आणा. या किरकोळ बाबी नीट तपासून घेतल्या पाहीजेत आणि त्यांना मदत केली पाहीजे. वास्तविक पाहता, माझा या योजनेला व्यक्तिशः विरोध आहे. कारण ही योजना ख-या अर्थाने महापालिकेच्या शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी असली पाहिजे. खाजगी शाळांमध्ये उच्चभ्रू व्यक्तींची मुले शिकतात. माझ्याही भावाच्या मुलीला चेक मिळाला आहे. चेक घेण्यासाठी मर्सिडीज, बीएमडब्ल्यू घेऊन लोक आले आहेत. अशा लोकांना गरज नसताना आपण पैसे देत असतो. हे बंद व्हायला पाहीजे. कुठेतरी महापालिकेच्या हिताचा सुद्धा विचार व्हायला पाहिजे. या योजनेचा आपण पुर्नविचार करावा.

आपण अंत्यविधीसाठी रु.१,००,००,०००/- तरतूद करुन ठेवली आहे. गेल्या वर्षी सुद्धा रु.१,००,००,०००/- तरतूद केली होती. पण आपण अंत्यविधीसाठी तरतूद करुन ठेवतो हे कुणाला माहितच नाही. आपण याची जाहिरात केली पाहिजे. नाशिक महानगरपालिकेत स्मशानभूमीच्याच ठिकाणी व्यक्ती मेल्याच्यानंतर त्यासाठी ८/९ मन लाकडे देतात, ५ लीटर रॉकेल देतात अशी सुविधा देतात. वास्तविक या सुविधेचा लाभ कोणी घेईल न घेईल हा पुढचा प्रश्न आहे. पण हे पैसे खर्च होत नसतील तर पुणे महानगरपालिकेत अंत्यविधीसाठी एक पुष्पक यान तयार केले आहे. ही फार सुंदर गाडी आहे. अशा आणखी गाड्या आपण घेतल्यातर ही रक्कम देखील खर्च होणार आहे.

एकंदरीत बजेटकडे बघितले तर चांगल्या गोष्टींसाठी चांगली तरतूद केली आहे. ज्या चांगल्या गोष्टींसाठी तरतूद होती, ती खर्च झालेली नाही, हे देखील मी याठिकाणी सांगितलेले आहे.

ज्यांना या बजेटमध्ये काही कमी मिळाले आहे त्यांच्यासाठी एक शेर आहे -

जो मिल गया उसे तकदिरका लिखा कहिए, जो खो गया उसे किस्मतका फैसला कहिए ।

ज्यांना या बजेटमध्ये काहीच मिळाले नाही त्यांच्यासाठी एक छोटासा शेर आहे -

फर्क होता है खुदा और फकिर में, फर्क होता है किस्मत और लकीर में ।
अगर कुछ चाहो और ना मिले, तो समझ लेना कुछ और अच्छा लिखा है तकदीर में ।।

एवढा शेर सांगतो आणि मी माझे भाषण संपवतो.

**मा.अश्विनी चिंचवडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मागील दोन-तीन वर्षे बजेटवरील चर्चा पाहिलीतर जकात बंद झाल्यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न, हाती घेतलेली विकास कामे व प्रकल्प यांची सांगड घालून शहरामध्ये मध्यंतरी सीसीटीव्ही कॅमेरे तसेच इतर केबल टाकल्यामुळे शहरातले अनेक रस्ते खोदले गेले. एमएनजीएलमार्फत गॅस वाहिन्या देखील टाकल्या जाणार आहेत. तसेच ड्रेनेज वॉटर, स्टॉर्म वॉटर यामुळे वारंवार होणारी खोदाई थांबवण्यासाठी, विशेषतः स्थापत्य विभाग यांच्याकडून कामाचे नियोजन महत्वाचे आहे. दरवर्षी किरकोळ मेंटेनन्स, स्टॉर्म वॉटर लाईन, खड्डे बुजवणे, जुने ब्लॉक काढून नवीन ब्लॉक बसविणे अथवा तेच बसविणे, रस्ते दुरुस्ती ही कामे होतात ही कामे कशी होतात. त्यांचा दर्जा काय असतो. त्यांच्या निविदा किती बिलो असतात. या खोलात न जाता माझी एक विनंती आहे की, दरवर्षी प्रत्येक प्रभागातील एक मुख्य रस्ता सेवावाहिन्या स्थलांतरीत करुन रस्ता सिमेंट काँक्रीटचा करावा की, जेणेकरुन १० वर्षांत संपूर्ण वॉर्ड परिपूर्ण होतील. त्यासाठी उपसूचना घेऊन तरतूद करावी अशी विनंती आहे. मा.आयुक्त साहेब, आपल्याकडे तसे होत नाही असे म्हणतात. पण पुणे शहरात ५ मी.चे रस्ता असलेल्या गल्ल्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण झाले आहे. माझी एक मैत्रिण तिथे नगरसेविका आहे. तिने मला हे फोटो पाठवले आहेत. तिथे होऊ शकते मग आपल्याकडे का होऊ शकत नाही. जेएनएनयूआरएम अंतर्गत निधी मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याच्या वेळी व नंतर ड्रेनेज लाईन, वॉटर लाईन, स्टॉर्म वॉटर लाईन याचा सर्वे केला होता. सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, पेव्हटेक, युनिटी कन्सल्टंट यांची मदत घेतल्याचे माहित आहे. परंतू आजरोजी प्रभागात काम करणा-या जे.ई. यांना पाण्याची लाईन कुठे आहे, ड्रेनेज लाईन कुठे आहे, स्टॉर्म वॉटर लाईन कुठे आहे याबाबत माहिती नसते. त्या-त्या प्रभागातील जे.ई. यांच्याकडे सर्वे, नकाशे उपलब्ध पाहिजेत. कारण त्यांना फिल्डवर काम करायचे असते. काही दिवसांपूर्वी चिंचवड इथे बंगल्याच्या खाली खाजगी प्लॉटमध्ये बोअरींग घेत असताना महापालिकेची लाईन फुटली. लाखो लिटर पाणी वाया गेले. हे आपल्या अधिका-यांना माहितच नाही. खाजगी प्लॉटवर महापालिकेच्या पाण्याची लाईन कशी. पत्रकार आल्यावर हे बींग फुटले. आम्ही प्रत्यक्ष स्थळी जाऊन पाहतो, असे सांगून अधिकारी वेळ मारुन नेतात. तसाच प्रकार सीसी कॅमेरे, बीएसएनएलची लाईन व केबल टाकताना झाला आहे. केबल टाकताना एमएसईबीची मुख्य प्रवाहाची वाहिनी तुटली गेली. त्यामुळे शॉर्ट सर्किट होऊन घरातल्या टि.व्ही.,इलेक्ट्रॉनिक वस्तू जळाल्या होत्या.

यासाठी सर्व वाहिन्यांचे नकाशे,दिलेले परवाने, सर्वे हे तपासून खोदाईसाठी मान्यता देण्यात यावी व हे सर्व तेथील जे.ई., उपअभियंता यांच्याकडे उपलब्ध असावेत.

महिलांसाठी गर्दीच्या ठिकाणी स्वच्छतागृहे असावीत. यासाठी प्रत्येक बजेटच्या सभेमध्ये सूचना केल्या जातात. परंतू प्रत्यक्षात कोणतेही नियोजन केलेले नसते. पर्यावरण विभागाचा अहवाल डॉ.नागकुमार हे असल्यापासून आम्ही पाहिला असता नदी सुधार प्रकल्प ऐकत आहोत. राज्य व केंद्र शासनाकडून एवढे कोटी मिळणार व योजना होणार हे किती वर्षे चालायचे. ज्या पवना नदीचे पाणी आम्ही पितोय, त्या नदीची अवस्था मरणासन्न झाली आहे. यास सर्वस्वी मुंगेरीलाल के हसीन सपने पाहणारे अधिकारी जबाबदार आहेत. राज्यशासन व केंद्रशासन काय देतील ते नंतर पाहू. महानगरपालिका म्हणून आपले काही कर्तव्य आहे का नाही. नदीतला गाळ काढायचा हे देखील आपल्याला जमत नाही हे दूर्दैव. सभागृहातील अनेक अधिकारी व पदाधिकारी परदेशात जाऊन आले आहेत. तेथील नद्या पाहिल्या की हेवा वाटतो. परंतू देशातील अग्रगण्य अशा आपल्या महानगरपालिकेच्या क्षेत्रातील नद्यांची झालेली अवस्था भूषणावह नाही. मला २०१२ मध्ये महापालिका सभागृहात प्रश्नोत्तरांमध्ये लेखी माहिती देण्यात आली होती. त्यात आम्ही नदीत मिसळणारे सर्व नाले बंद करणार आहोत, असे दिले होते. परंतू आज २०१६ साली चार वर्षांत काय केले याचे थोडे आत्मपरीक्षण करा. जोपर्यंत नदीत मिसळणारे नाले बंद होणार नाहीत, तोपर्यंत जलपर्णी निर्माण होणार. आपण दरवर्षी लाखो रुपये फक्त जलपर्णी काढण्यासाठीच घालवणार का. इंद्रायणी व पवना नदीतील गाळ काढणे, स्वच्छता करणे यासाठी या अंदाजपत्रकात भरीव तरतूद हवी होती. ती केलेली नाही हे दूर्दैव आहे. पिंपरी चिंचवड शहर पर्यटन नगरी म्हणून ओळखले जावे यासाठी श्री मोरया गोसावी यांची संजिवन समाधी, क्रांतीवीर चाफेकर बंधू यांचे जन्मस्थळ, बोटक्लब, अप्पूघर, भोसरी सहल केंद्र ही नाविन्यपूर्ण, वैशिष्ट्यपूर्ण स्थळे विकसित करण्यासाठी शहरात पर्यटन विकास आराखडा तयार केला गेला होता. मोठा गाजावाजा झाला, उदघाटने झाली, टेंडर झाले, वर्कऑर्डर झाली. परंतू कन्सल्टंट व्यवस्थित काम करत नसल्यामुळे या सगळ्या प्रकल्पाची कामे रेंगाळलेली आहेत. या कन्सल्टंटवर आपण काय कारवाई केलीत. आपले या प्रकल्पावर काम करणारे पदाधिकारी अक्षरशः वैतागलेले आहेत. महत्वाकांक्षी प्रकल्प फक्त कन्सल्टंटच्या जीवावर केले जात आहेत. त्या प्रकल्पांचे भविष्य काय आहे. फक्त पर्यटन विकास आराखडा व त्याची आजपर्यंत झालेली कामे यांचा एकत्रित आढावा घेऊन भविष्यात नियोजन न केल्यास कोट्यावधी रुपये पाण्यात जातील व प्रकल्प अर्धवट राहतील.

शहरात १७२ उद्याने आहेत. उद्याने खरचं चांगली आहेत. परंतू त्यामध्ये काहीतरी वेगळे, नाविण्य असावे, वैशिष्ट्य असावे याकरिता आपण प्रयत्न करत आहोत का. आजरोजी उद्यानांची ओळख फक्त तरुण-तरुणींना,जोडप्यांना बसण्यासाठी झाली आहे. हे बदलणे गरजेचे आहे. खूप दूर नाही पण शेजारी पुण्यामध्ये जा तिथे प्रत्येक उद्यानात वेगळेपणा आहे, क्रिएटीव्हीटी आहे. उद्यानातील वातावरण असे पाहिजे की, तिथे लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांना जावेसे वाटेल यासाठी प्रयत्न करावा अशी विनंती करते.

मा.आयुक्त साहेब, या अंदाजपत्रकात पार्किंगकरीता भरीव तरतूद आवश्यक होती. शहरात वाढलेली वाहनांची संख्या लक्षात घेता शहरात सगळीकडे बहुमजली पार्किंगची व्यवस्था करणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी पार्किंगची आरक्षणे ताब्यात घेणे गरजेचे आहे. उदा. आपली महानगरपालिकेची इमारत. या इमारतीच्या परिसरात पुरेसे पार्किंग आहे का. इमारतीत किती स्टाफ आहे, याठिकाणी येणारे व्हिजिटर्स, नगरसेवक, इतर नागरीक यांची ये-जा पाहता इथे पार्किंग करणे अवघड होऊन बसले आहे. आपल्या मुख्य इमारतीत पुरेसे पार्किंग नसेलतर इतर ठिकाणची काय कथा. यावर उपाय म्हणून शहरामध्ये आवश्यक तिथे बहुमजली पार्किंग होणे व तसेच नियोजन करणे ही गरज आहे.

शहरातली वाढलेली लोकसंख्या, रुग्णांची संख्या, अपघातांची संख्या लक्षात घेता एक रक्तपेढी कमी पडते आहे. म्हणून चिंचवड येथील क्रांतीवीर चाफेकर रक्तपेढी पुन्हा सुरु करण्यासाठी ठराव देखील मंजूर झाला आहे. परंतू प्रशासनाकडून कोणतीही कारवाई झालेली दिसत नाही. शहरात भटक्या कुत्र्यांची समस्या मोठी आहे. कायद्यातील अडचणींमुळे ही कुत्री पकडून, नेऊन, लसीकरण करुन नंतर सोडून दिली जातात. व पुन्हा त्याच तक्रारी सुरु होतात. यासाठी कुत्र्यांसाठी संगोपन केंद्र सुरु करणे गरजेचे आहे. संबंधित विभागाने त्याबाबतीत विचार करणे गरजेचे आहे. महिला व बालकल्याण समितीचे बजेट पूर्णपणे वापरले जाते का ही पण चिंतनाची बाब आहे नागरवस्ती विभागाकडून विविध योजना राबविल्या जातात. त्याची नागरीकांपर्यंत किती माहिती जाते. सुलभाताईंनी मागे सूचना केली होती, प्रत्येक प्रभागात समुहसंघटक नेमून नागरीकांपर्यंत या योजना पोहचवल्या जाव्यात. जेणेकरुन, सर्वसामान्य, गरजू व्यक्तीलाच या योजनांच लाभ होईल. मा.आयुक्त साहेब, आजपर्यंत त्याची अंमलबजावणी किती झाली. या विभागाच्या योजना ह्या नागरीकांशी संबंधित असतात. त्यामुळे तेथील अधिकारी व स्टाफ हे नम्र असावेत. तसेच पुरेसे कार्यदक्ष,

संगणकीकरणाचे काम येणारे असा स्टाफ असावा. या विभागामार्फत गेल्या वर्षी दहावी, बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली गेली परंतू असे निदर्शनास आले आहे की, एकाच वर्गात, एकाच बाकावर बसलेल्या दोन विद्यार्थीनींपैकी एका ९० टक्के पडलेल्या विद्यार्थीनीला शिष्यवृत्ती मिळते आणि दुसरी विद्यार्थीनी जिला ९६ टक्के पडले आहेत, तिचे आई-वडील वारले आहेत, तिचे आजी-आजोबा सांभाळतात, तिला ही सुविधा उपलब्ध होत नाही. कागदपत्रांची पूर्ण पूर्तता केली आहे दोघींनी बरोबर अर्ज भरले आहेत. मग हा अधिका-यांचा किंवा स्टाफचा गलथानपणा नाही का. या गोष्टीचा सुद्धा विचार व्हावा. या विभागातील स्टाफ गलथानपणे, निष्काळजीपणे काम करतो हे यावरुन दिसून येते. बजेटवर बोलत असताना ही चिंतनाची बाब आहे. आम्ही एवढे बोलतो म्हणजे त्यात काहीतरी तथ्य आहे. मा.आयुक्त साहेब, आपण यात लक्ष घालून काहीतरी कारवाई करावी.

**मा.अपर्णा डोके** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आजचा हा अर्थसंकल्प सादर केला आहे. खरेतर हा सर्व नगरसेवकांचा या टर्मचा शेवटचा अर्थसंकल्प आहे. निश्चितच आम्हाला निवडणूकीला सामोरे जायचे आहे. त्यामुळे या वर्षाचा हा अर्थसंकल्प खरेतर परीक्षेचा पेपर आहे. जेणेकरुन आम्हाला नागरीकांच्या प्रश्नांची उत्तरे व विकास कामे सोडवण्यासाठी हा अर्थसंकल्प आहे. निश्चितच यात शहराच्या दृष्टिकोणातून वेगवेगळ्या महत्वाच्या योजना आहेत. वेगवेगळे हेड ओपन केले आहेत. नगरसेवकांचे,नागरीकांचे मत लक्षात घेऊन वेगवेगळ्या गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे. त्याबद्दल मी आयुक्त साहेबांचे अभिनंदन करते. निश्चितच मला या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून म्हणायचे आहे की, अर्थसंकल्पा हा नागरीकांसाठी असतो. जेणेकरुन नागरीकांच्या रोजच्या समस्या दूर होऊन त्यांना मुलभूत गरजा कशा प्राप्त होतील. हा अर्थ असेलतरच तो अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने यशस्वी होईल. आणि ख-या अर्थाने तो पूर्णपणे खर्ची पडणे हे सर्वांचेच काम आहे. खरेतर आजची समस्या बघता, आपण घरपट्टी, पाणीपट्टीची जी बिले देतो आणि लोक ही बीले भरायला तयार आहेत आणि त्यांची भरायची इच्छा आहे. पण आज आपण प्रभागातले चित्र बघितले तर लोकांना उन्हातान्हात दोन-दोन,तीन-तीन तास रांगेत उभे रहावे लागते. आपल्याकडे जे मनुष्यबळ आहे, ते तिथे त्या-त्या वेळी वापरण्यात आलेतर निश्चितच सगळ्यांचाच वेळ व कष्ट वाचणार आहे. महिलांसाठी म्हटलेतर आम्ही नेहमीच महिला स्वच्छतागृहांची मागणी वेळोवेळी करतो. मात्र प्रत्यक्षात शहरात कुठेही या मागणीची अंमलबजावणी झालेली दिसत नाही. प्रत्येक प्रभागात दोन एस.टी. बसस्टॉप दिले

आहेत. त्याप्रमाणे या वर्षी प्रत्येक प्रभागात महिलांसाठी स्वच्छतागृहांचे नियोजन केलेतर भविष्यात ते निश्चितच उपयोगाचे ठरणार आहे.

पवना नदी सुधार प्रकल्प - खरेतर आपण पाण्याची समस्या बघतोच आहोत. नदीच्या माध्यमातून पाहतोय. नदी आपल्या शहरातून वाहते. या नदीचे सौंदर्य व जीवन सुधारण्यासाठी मा.आयुक्त साहेब व मा.महापौर साहेब आपण ताबडतोब प्रयत्न करावा. जेणेकरुन जलपर्णी व त्यातून डास,मच्छर याचा प्रादूर्भाव होऊन डेंग्यू मलेरीया होऊन याचा आरोग्यावर परिणाम होतो. आपण यातून वेगवेगळ्या आजारांना आमंत्रण देत असतो. ज्या नागरीकांच्या हिताच्या योजना आहेत, प्रत्यक्षात त्यांच्यावर फरक पाडणा-या आहेत. त्यांची उपाययोजना ताबडतोब करावी. मी या माध्यमातून विनंती करते की, बीआरटी योजना आहे. भविष्यात जे प्रलंबित मार्ग आहेत, ते त्वरित पूर्ण करावेत. जेणेकरुन पब्लिक ट्रान्सपोर्टवरील जो ताण आहे, वाहतुकीची जी समस्या आहे, त्यात पार्किंग असेल, पेट्रोल असेल, नागरीकांचा वेळ असेल यात निश्चितच सगळ्यांच्या फायद्याचे होईल. या दृष्टीने मी आपले लक्ष वेधू इच्छिते.

स्मशानभूमी - ही शहरातली आवश्यक बाब आहे. त्याच्यावर वेळोवेळी दूर्लक्ष होते. जेणेकरुन ज्या सोयी-सुविधा, विद्युत वाहिन्या बंद असतात, काही अडचणी असतात. त्याच्यावर तितकीच दृष्टी दिली पाहिजे. महिलांसाठी समुपदेशन केंद्र - खरेतर आजच्या या भावी पिढीच्या जगात महिल्यांच्या समस्या ह्या वाढतच चालल्या आहेत. यासाठी प्रभागांमध्ये किंवा जिथे शक्य आहे तिथे समुपदेशन केंद्रे उभारली गेली पाहीजेत. मतदार नोंदणी, आधार नोंदणी सुविधा - या सारख्या चालूच असतात. इलेक्शन लागतात त्यावेळी मतदार नोंदणी सुरु होते. यासाठी प्रभागाच्या माध्यमातून कायमस्वरुपी एक विभाग चालू असावा. जेणेकरुन नगरसेवकांवरील ताण कमी होईल. त्याबाबतीत आम्ही अपडेट सुद्धा राहू शकू आपल्यावर देखील एकदम ताण येणार नाही. एक कायमस्वरुपी केंद्र चालू रहावे अशी मी विनंती करते.

निश्चितच या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून शहरात वेगवेगळी कामे होणार आहेत. आपले स्मार्ट शहर हे स्वच्छ शहर म्हणून देखील ओळखले जाते. आपले थोडेसे प्रयत्न कमी पडतात व आपण तितका वेळ देत नाही. म्हणून वेळेचे नियोजन केलेतर सगळ्या गोष्टी वेळेत झाल्यातर, निश्चितच हा अर्थसंकल्प यशस्वी व्हायला वेळ लागणार नाही. पुन्हा एकदा आपल्या सर्वांचे अभिनंदन करुन मी माझे दोन शब्द संपवते.

**मा.शारदा बाबर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आत्तापर्यंत सर्वजण बजेटवर एकदम सुंदर बोलले आहेत. त्यांच्यानंतर मला बोलणे अवघड वाटते आहे. मा.नारायण बहिरवाडे यांनी पिंपरी चिंचवड शहराविषयी इतके सुंदर वर्णन करुन सांगितले. खरेच वाटले, किती योजना, किती छान. मधूनचे चांगले सांगताहेत, मधूनच वाईट पण सांगताहेत. सत्ताधारीही तेच आणि बोलताहेत तेच. त्यामुळे मला थोडे गोंधळल्यासारखे वाटते आहे. मशीनपासून सायकलपर्यंत, कुत्र्यापासून डुकरापर्यंत सगळे बोलून झाले. माणसाचे आयुष्य कुत्र्यापेक्षा कठीण झाले आहे. कुत्र्यासारखे जीवन म्हणतात तसे माणसाचे जीवन झाले आहे. मशीन असेल किंवा सायकल ते खरेच वाटायची गरज आहे का. निवडणूका आल्या म्हणून वाटतोय का, कशासाठी वाटतोय हे समजत नाही. खरेतर महिलांविषयी किंवा नागरीकांविषयी कळकळ वाटत असेलतर मा.आयुक्त साहेबांनी या विषयावर व्यवस्थितपणे विचार करुन वाटप करावे. महिला व बालकल्याणची योजना आहे म्हणून काहीतरी महिलांसाठी करायचे. माजी महापौर आत्ताच बोलल्या, त्यांनी महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालू करावे. मशीनचे क्लास करतोय तसे हे केलेतर कितीतरी महिला एकट्या पडतात, तेव्हा त्यांना मानसिक आधाराची गरज असते. हेही केलेतरी चांगला उपयोग होईल.

तसेच पिंपरी चिंचवड शहरात भरपूर पुतळे आहेत. पुतळ्याच्या विषयाला विरोध नाही. पण महात्मा गांधी यांचा पुतळा बसवायचा असेलतरी आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याची मागणी किती दिवसांपासून केलीतरी आजपर्यंत पुतळा बसवलेला नाही. आपण महात्मा गांधी यांचा पुतळा बसवतोय. पण त्यांनी आपल्याला स्वातंत्र्य का मिळवून दिले याचा सुद्धा विचार व्हावा. आपली कालची महापालिका सभा आपण कशासाठी तहकूब केलीत. याचे कारण देखील सर्वांना माहित असेल. पुतळा बसवल्यानंतर त्यांच्याकडे पाहून तरी भ्रष्टाचा-यांसाठी आपण सभा तहकूब करणार आहोत का. अशा किती सभा तहकूब होतील. प्रत्येक वेळी सभा तहकूब करणार आहोत का. आण्णाभाऊ साठे मंडळात एवढा घोटाळा झाला, त्यावेळी सभा तहकूब केली नाहीत. गैरव्यवहार एका दिवसांत होत नसतो.

मा.महापौर साहेब,आत्ता सदस्य पाणीपट्टीविषयी बोलले. लोकं महागाईने एवढे त्रासलेले आहेत. पाणीपट्टी न वाढवता, आहे तशीच कंटीन्यू ठेवावी. एलबीटी बंद केली म्हणून एवढा गोंधळ चालला आहे. मंदीची लाट असल्यामुळे व्यापा-यांचा धंदा होत नाही. त्यात एलबीटी बंद केल्यामुळे दर मिटींगला गोंधळ होतो आहे. शिलाई मशीन व सायकली हे भंगारसाठी वाटतोय का कशासाठी ते कळत नाही. तरी कालच माझ्या

वॉर्डातल्या एका माणसाला स्लिप मिळाली असूनसुद्धा त्याला सायकल देत नाहीत. त्याचे यादीत नाव आलेले नाही. हा असा सगळा सावळा गोंधळ चालला आहे. आज अप्पुघर पाहायला सगळे लोक महाराष्ट्रातून येत आहेत. आणि इथे नगरसेवक म्हणतात, अप्पूघरची वाट लागली आहे. आपण हे बजेटच्या मिटींगला बोलतो. पण मला वाटते, बजेट मिटींग होण्याअगोदरऽ काय केले. मिटींग घेऊन काय योजना केल्या पाहीजेत. याच्यासुद्धा सूचना घ्याव्यात. ते बोलायला म्हणून बोललो. दोन दोन/तीन तीन तास बजेटवर सांगायचे आणि भाषणबाजी केल्यासारखेच वाटते आहे. तरी त्यातून काय योजना करणार आहोत. त्यावर काय उपाय करणार आहोत. का ऐकायचे व पुढचे चालू ठेवायचे हे सांगावे, एवढीच विनंती करते.

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आज बजेटवर मिटींग चालली आहे. प्र.क्र.४८ माझा एवढा मोठा प्रभाग आहे. जिथे डांबरीकरणाचे रस्ते आहेत. तिथे आम्हाला बजेट वाढवून द्या. काही रस्ते अर्धे-अर्धेच झालेले आहेत. काही ठिकाणी रस्ते झालेलेच नाहीत. ब्लॉक बसवताना नवीन न बसवता जुनेच बसवले जातात. मनपाचे फुटपाथ आहेत, त्यांवर अक्षरशः दुकाने थाटली गेली आहेत. कलिंगड, बुटाचे, चायनीजची दुकाने थाटली गेली आहेत. तिथे तीन मंगल कार्यालये आहेत. तिथे नागरीकांना जाण्या-येण्यासाठी इतकी अडचण होते. प्रमाणाच्या बाहेर अडचण आहे. मा.आयुक्त साहेब, तुम्ही अक्षरशः वॉर्डात एक दिवस व्हिजिट द्या. म्हणजे किती अडचणी आहेत, किती समस्या आहेत ते समजेल. बीआरटीबद्दल बोलायचे म्हटलेतर आमच्याकडे बीआरटी वारंवार अजूनही चालू झालेली नाही. हे वर्ष संपतं येईल, बीआरटी कधी चालू करणार. तापकीरनगरमध्ये बसस्टॉपची मागणी केली आहे. तिथे बसस्टॉप बसवले जात नाही. शिलाई मशीन - सगळ्या महिलांनी शिलाई मशीचा कोर्स करुन ४ वर्षे झाली. हा विषय पेंडींग आहे. त्यांना अजूनही मशीन्स मिळाल्या नाहीत. आमच्या महिलांना मशीन्स नक्कीच मिळवून द्या. हा सर्व महिलांचा प्रश्न आहे. सायकलच्या बाबतीत बघितलेतर फॉर्मस् भरुन घेतले आहेत पण तिथे गेल्यावर त्या यादीमध्ये नागरीकाच्या मुलाचे नाव सुद्धा सापडत नाही. नागरी सुविधेचा हा घोळ चालला आहे. ज्या आरक्षणाच्या जागा आहेत, त्या तुम्ही ताब्यात घ्या. २५ वर्षे झालीतरी नागरीकांना रस्ता नाही. काही-काही माजी नगरसेवकांनी नाल्याचे काम अडवले आहे. मा.आयुक्त साहेब, आपण वॉर्डात येऊन पाहणी करावी. आमच्या वॉर्डचे बजेट वाढवून द्यावे अशी विनंती आहे.

**मा.साधना जाधव** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, सन २०१६-१७ करिता बजेट मिटींग चालू आहे. सर्व नगरसेवक, सगळे सदस्य अंदाजपत्रकावर जे बोलले आहेत, त्याबद्दल मी ही बोलणार आहे. प्र.क्र.५ कुदळवाडी-जाधववाडी हा आमचा भाग आहे. आमच्या भागात अजूनही रस्ता असेल, ड्रेनेज लाईन असेल, पाण्याची लाईन असेल, अंडरग्राऊंड गटर असतील, डिपी रस्ते असतील या सुविधा झालेल्या नाहीत. या सुविधा होणे अत्यंत गरजेचे आहे त्यासाठी या भागाला आवश्यक तो निधी मिळाला आहे. बजेट वाढवून मिळाले आहे. पण एवढ्या बजेटमध्ये आमचा भाग पूर्ण विकसित होणार नाही. अंडरग्राऊंड केबल, गटर, ड्रेनेज याचे सर्व रस्त्यांतून काम चालू असते खोदाई होते. खोदाई झाल्यानंतर रस्त्याची दूरावस्था होते. त्यानंतर स्थापत्यची जी कामे आहेत. ती या कामामुळे पूर्ण होत नाहीत. प्रामुख्याने शहराला जोडलेला ग्रामिण भाग कुदळवाडी, जाधववाडी नव्याने समाविष्ट झाला आहे. या समाविष्ट झालेल्या गावाला आर्थिक निधी मिळालाच पाहिजे. गेली ४ वर्षांपासून काम करत असताना प्रामुख्याने कुदळवाडी भागात इंडस्ट्रीयल एरिया आहे. इथे खूप मोठ्या प्रमाणावर दोन वेळा आग लागली होती. या भागात अग्निशामक दलाचे केंद्र उभे करण्यासाठी मा.महापौर यांच्या हस्ते भूमिपूजन झाले आहे आपण याकरिता रु.२७ लाख इतके बजेट ठेवले आहे. या रकमेमध्ये अग्निशामक केंद्राचे काम पूर्ण होणार नाही. याकरिता आणखी जास्त निधी देण्यात यावा. कारण या भागात वारंवार आग लागते. प्रामुख्याने मा.आयुक्त साहेब, माझ्या भागात लक्ष घालावे. हा भाग कसा विकसित होईल याकडे प्रामुख्याने लक्ष द्यावे. मा.आयुक्त साहेब, डिपी रस्ते थोड्या प्रमाणात ताब्यात आले आहेत. याकरिता थोडा वेळ जाणार आहे. तरीसुद्धा आम्ही प्रयत्न करतो आहोत. आमच्या भागात प्लेग्राऊंड, गार्डन व पाण्याची टाकी यासाठी बजेट आहे. त्यासाठी निधी द्यावा. प्रामुख्याने रस्त्याबाबतीत लक्ष घालावे अशी विनंती करते व जास्तीत जास्त निधी मिळावा अशी विनंती करते.

**मा.निता पाडाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मला एक प्रश्न सांगायचा आहे. आपण एलईडी लाईटस् एकत्रित खरेदी केल्या होत्या आपल्याला एलईडी फिटींगज् खूप चांगल्या दरात मिळतात पण मा.आयुक्त साहेब, जो कोणी ठेकेदार असेल त्याच्याकडून आपण हे स्पष्ट करुन घेतले आहे का, या लाईटस् तीन/चार वर्षांत खराब होणार आहेत. आपण या लाईटसचे मेंटेनन्स करणार असे सांगितले होते. पूर्ण शहरात एकच ठेकेदार मेटेनन्स करणार असेलतर माझ्या प्रभागात २५ एलईडी फिटींग खराब झाल्या अशा प्रत्येक वॉर्डातल्या याप्रमामे किमान ३०० ते

४०० एलईडी खराब झाल्यातर तो ठेकेदार एकटाच मेंटेनन्स करणार आहे का. त्याच्याकडे तेवढे कर्मचारी उपलब्ध आहेत का. आत्ता आम्हाला सांगण्यात आले की, आपण त्याच्याकडून दंड वसूल करणार आहोत. पण आम्ही नागरीकांना काय उत्तर देणार. जर एलईडी फिटींग दुरुस्त झाले नाहीतर तुम्ही त्याला दंड करणार पण आमचे नागरीक ८ दिवस अंधारात बसले तर तुम्ही काय करणार. बरेच वेळा आपले वायरमनसुद्धा सांगतात की, गाडी आली नाही. गाडीचा प्रॉब्लेम आहे. पालिकेची गाडी घेणार का तो स्वतःची गाडी घेणार. ठेकेदाराने हे उत्तर द्यायला नको की, आमच्याकडे गाडी नाही. पालिकेने गाडी दिली नाही. एलईडी फिटींग ३/४ वर्षांनी खराब होणारच. तो इलेक्ट्रॉनीक पार्ट आहे. तो खराब होणारच आहे. मग आपण त्याच्या मेंटेनन्सचे नक्की काय करणार. मा.आयुक्त साहेब मला याचे स्पष्टीकरण पाहिजे आहे. नागरवस्ती विभागाबद्दल बोलायचे झालेतर, आपण बजेट चांगले ठेवले आहे. सायकलचे वाटप चालू आहे. मशीनचे देखील वाटप होईल. परंतू ज्यादिवशी मी स्वतः ६० सायकल वाटल्या. ज्यावेळी सायकल टेम्पोतून खाली घेतली तेव्हा खरोखरच त्याची क्वालिटी नव्हती. जवळपास १०/१५ नागरीकांनी त्या सायकल लगेच सायकलच्या दुकानात नेऊन पन्नास/साठ रुपये खर्च करुन किरकोळ सर्वीसिंग केले या सायकली मुलांना व्यवस्थित करुनच द्यायच्या होत्या. आत्ता मा.नारायण बहिरवाडे यांनी सांगितले की, चार वेळा सर्वीसिंग करुन देणार आहेत. ज्या सायकली वाटल्या, माझ्या माहितीप्रमाणे ४००/४५० जुन्या सायकली शिल्लक होत्या. त्यांचे वाटप करण्यात आले. नागरवस्ती विभागाने नागरीकांचा अवमान केला. त्या सायकलींची कंडीशन इतकी बेकार होती की, कोणतेही मूल ती सायकल चालवू शकत नव्हते लोकांनी ती सायकल तशीच आणली. नागरवस्ती विभाग इतका हुशार आहे त्यांच्या हुशारीची दाद देते ज्यावेळी नगरसेवक हे सांगतात, त्यावेळी ते ठामपणे सांगतात की, ताई, आमच्याकडून अशी चूक होणार नाही. त्या मुलांचे नवीन लिस्टमध्ये नाव असताना त्यांना जुनी सायकली दिली. त्यांचे नाव पुन्हा नवीन लिस्टमध्ये आले आहे. मी माझ्या वॉर्डमध्ये त्या मुलांना लिस्टप्रमाणे पावत्या आणून दिल्या. नागरीकांनी येऊन मला विचारले की, आम्हाला जुन्या सायकली दिल्या होत्या. म्हणून आम्हाला परत नव्या सायकली देत आहेत का. तसे झाले असेल असे मला वाटले म्हणून मी खांडकेकर साहेबांना विचारले. तर ते म्हणाले, मॅडम तसे होणार नाही. त्यानंतर त्यांनी सगळे चेक झाले. त्यांनी त्या लोकांना फोन केला की, ताबडतोब आधी आजच्या आज इथे या. आमच्या लोकांना तुमच्या घरापर्यंत यायला लावू नका. तुमचे अधिकारी नागरीकांना असा दम कसा काय देतात. यात चूक तुमच्या

अधिका-यांची आहे का नागरीकांची आहे. मा.आयुक्त साहेब, यात आपल्या अधिका-यांची चूक आहे. त्यांना सांगून सुद्धा त्यांनी बेजबाबदारपणा केलेला आहे. हा नागरवस्ती विभाग काय करतो. आत्तापर्यंत विधवा महिलांची शंभर/सव्वाशे नावे दिलेली आहेत. त्या महिलांना अपात्र ठरवले आहे. ती महिला कशामुळे अपात्र ठरली हे ते सांगू शकलेले नाहीत. मी बचत गटांच्या पोचपावत्या आज सुद्धा खाली दिल्या आहेत. या बचतगटाचे हे नाही, ते नाही. बचत गटांच्या फाईली देऊन वर्ष वर्ष झाली. यांनी काय केले. आता मार्च एंडींग आल्यावर ते फाईली काढायला लागले आहेत. आम्हाला मार्च एंडींगच्या आत क्लिअर करायचे आहे. हे चुकीचे आहे. या महिला ज्यावेळी पोचपावती देतात, त्या फाईल सापडत नाहीत. मी आत्ता दोन वाजता पोचपावत्या दिल्या आहेत. मा.आयुक्त साहेब, त्यातल्या किती फाईली सापडतात ते विचारा. बचत गटातल्या महिला कधी दोन महिन्यांनी, कधी तीन महिन्यांनी पैसे जमा करतात. महिलांना वेळ नसतो. त्यांनी हे कारण दाखवले आहे की, त्यांची बचत नियमित नाही. परंतू हे बचत गट चालूच आहेत. त्या दोन/तीन महिन्यांनी पैसे भरतातच ना. असे नाही की त्या एक वर्षाने पैसे भरतात. त्यांना शुल्लक शुल्लक कारणांसाठी अपात्र ठरवले आहे. माझ्या वॉर्डातली एक मुलगी आहे. टिल्ले असे तीचे नाव आहे. तिच्या पोचपावतीवर अपात्र असण्याचे कारण काय लिहिले आहे की, ५० टक्यांपेक्षा आम्हाला जास्त देता येत नाही. त्या मुलीला ९० टक्के आहेत. आपले बजेट अशा चुकीच्या पद्धतीने खर्च होते आहे

मा.आयुक्त साहेब, आपण अंदाजपत्रकामध्ये खूप चांगल्या योजना जाहीर करता. परंतू त्याची अंमलबजावणी व्यवस्थित होत नाही. नागरवस्ती विभागाचे बजेट पूर्णपणे खर्च झाले पाहिजे. त्याचा लाभ सर्वांना व्यवस्थित मिळाला पाहिजे. माझा प्र.क्र.४७ हा गेल्या वर्षी मा.अजितदादा पवार यांनी सांगितल्याप्रमाणे मॉडेल वॉर्ड म्हणून घेतला होता. गेल्यावर्षी मला सांगितले की तरतूद घेता येत नाही. परंतू या वर्षी तरी माझा वॉर्ड मॉडेल वॉर्डच्या पद्धतीने विकसित करण्यात यावा. माझा वॉर्ड मॉडेल वॉर्ड म्हणून विकसित करण्यासाठी फक्त १०,०००/- इतकी तरतूद ठेवली आहे. या रकमेत आम्ही काय करणार आहोत. या दहा हजारात एखाद्या कॉलनीचे काम केले तरी चालेल. आमची जास्त अपेक्षा नाही. १८ मी.चा. डिपी आहे. त्याच्यासाठी जवळजवळ दीड ते दोन कि.मी. चा रस्ता वॉर्डातून जातो आहे. मा.आयुक्त साहेब, आपण व्हिजिट सुद्धा दिली आहे. खरोखरच घरे पाडली आहेत. सगळे केले आहे. त्यासाठी सुद्धा बजेट कमी दिले आहे. इंजिनिअर सांगतात, ड्रेनेज लाईन, स्टॉर्म वॉटर लाईन टाकली पाहिजे. ५०

लाखांत काम कसे करणार आहोत. जिथे गरज आहे, तिथे बजेट वाढवून द्यावे अशी मी आपल्याला विनंती करते.

**मा.झामाबाई बारणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आपण आत्तापर्यंत बजेटवर खूप काही ऐकले आहे. आणि मा.आर.एस.कुमार, मा.नारायण बहिरवाडे साहेब यांनी चांगल्या पद्धतीने पूर्ण बजेट वाचून दाखवले आहे कारण मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब तुम्हाला मला विनंती करायची आहे की, ज्या-ज्या वॉर्डात, ज्या-ज्या कामासाठी सर्वांना बजेटची माहिती दिली होती, ती-ती कामे प्रत्येकाच्या वॉर्डात पूर्णपणे होणार आहेत का. प्र.क्र.५० बाबत मी सूचना देते. माझ्या वॉर्डात आत्तापर्यंत फक्त रस्त्याची, थोडी स्थापत्यची कामे किंवा एखाद्या शाळेच्या इमारतीच्या रंगरंगोटीचे काम अशी कामे झाली आहेत. यापलिकडे माझ्या वॉर्डात आत्तापर्यंत भरीव कामे झालेली नाहीत. मेघडंबरी असेल, रस्त्याचे काम असेल, आपण व्हिजिट सुद्धा दिली आहे. पत्र काढले. सहा महिने झाले. स्मशानभूमीचे काम आजपर्यंत असेच थांबले होते. त्यात बजेट थोडेसे वाढलेतरी, तुम्हीच पाहिले आहे, स्मशानभूमीतले पत्रे कसे झाले आहेत. आजूबाजूला किती दूर्दशा झाली आहे मी खरेतर याठिकाणी सांगू इच्छिते की, थोडेफार कमी-जास्त होत असेल, एखाद्याच्या ताटात अर्धी भाकरी वाढायची असेलतर आपण एक भाकरी वाढतो. कारण त्याला जास्त खायची अपेक्षा असते का. मा.आयुक्त साहेब, मला हेच याठिकाणी सांगायचे आहे की, अनेक वॉर्डांत चांगल्या पद्धतीची कामे होतात. आमच्या वॉर्डात किरकोळ कामे आहेत. बजेटमध्ये एवढा फुगवटा दाखवतो. या-या वॉर्डसाठी एवढी कामे आहेत. परंतू ती खरेच होत नाहीत. हे मी ठामपणे सांगू इच्छिते की, अशा पद्धतीने जर याठिकाणी कामे होत असतात. आता हे शेवटचे वर्ष आहे. शेवटच्या वर्षी जर प्रभागात कामे झाली नाहीत तर आम्ही लोकांपुढे काय घेऊन जायचे. साधी-साधी स्थापत्यची, ड्रेनेजची कामे आहेत. सगळ्या प्रभागांमध्ये लाईटची कामे चालू आहेत. पण ड्रेनेजची खूप दूर्दशा झाली आहे आत्ता पाऊस नाही पण पावसाळ्यात अक्षरशः लोकांच्या बाथरुममध्ये, संडासमध्ये ड्रेनेजचे पाणी जाते. आपण तरी हे थांबवू शकतो का. हे लोक कसे स्वयंपाक बनवत असतील, कसे जेवत असतील. आत्ता सुद्धा हिच परिस्थिती आहे. जुनी बांधकामे असल्यामुळे, ब्लॉक उंच आल्यामुळे ही घरे खाली झालेली आहेत. त्यामुळे ही परिस्थिती झाली आहे. ही ४०/५० वर्षांपूर्वीची बांधकामे आहेत. साध्या-साध्या चाळींची ती बैठी बांधकामे आहेत. मी मागे सुद्धा सांगितले होते. कोणतीही मोठी कामे नाहीत. ही किरकोळ नागरी सुविधांची कामे व्हायला पाहिजेत. शेवटच्या वर्षीतरी ही कामे

झपाट्याने झाली पाहिजेत. डांगे चौकातली कामे चालू व्हायला पाहीजे होती थेरगावातले मेघडंबरीचे काम देखील व्हायला पाहिजे. हे सुद्धा काम होत नाही. रस्ते ताब्यात घ्यायचे आहेत. ते ताब्यात मिळतील. आपण जरी पाठपुरावा केलातरी ठेकेदार म्हणतो, बजेट संपले आहे. म्हणजे त्या ठेकेदाराला बजेट वाढवून द्यायचे. हे सगळे आत्तापर्यंत सांगून झाले आहे. काम पूर्ण होत नसेलतर त्या ठेकेदाराला पैसे मिळत नाहीत. मग अशा पद्धतीने कामे करत असताना बजेट वाढवताना ज्या-ज्या परिस्थितीत ही कामे होतात त्यासाठी भरपूर बजेट पाहिजे. बजेटच्या पुस्तकात दाखवले आहे. अंदाजपत्रकात ही कामे पूर्ण होत नाहीत. नागरीकांची नागरी सुविधांची कामे झाली पाहिजेत. पाणीपट्टी वाढवायची, मग सगळ्या लोकांना पाणी मिळाले पाहिजे. माझ्या भागात तीन/चार ठिकाणी टँकरचे पाणी येते. काही ठिकाणी दिवसाआड टँकर जातो. लोकांना पाणीच नाही. सगळ्या लोकांना माहित आहे. पाऊस नाही. पाणी नसल्यामुळे पाणीकपात केली आहे. नागरीकांना पण हे माहिती आहे. पाणी प्यायला पाहिजे. पिंपरी चिंचवड महापालिका २४ तास पाणी देणार आहे असे कालच पेपरमध्ये वाचले होते. काही भागांत २४ तास पाणी आहे. पण सगळ्यांना समान पाणी वाटप झाले पाहिजे. सगळ्यांकडून पाणीपट्टी घेतो, कर वसूल करतो. सगळ्यांना समान सुविधा द्यायला पाहिजेत. काही ठिकाणी पाणी भरपूर, काही ठिकाणी अजिबातच नाही. नागरीकांना सुविधा पूर्णपणे, व्यवस्थित मिळाल्या पाहिजेत. बजेट किती कोटींचे आहे हे नागरीक पाहत नाहीत. नागरीकांच्या मुलभूत गरजा आहेत, त्या गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत.

**मा.शमिम पठाण**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,आत्ता ब-याच सन्मा.सदस्यांनी सांगितले की, या पंचवार्षिकमधील हे शेवटचे बजेट आहे. म्हणून हे बजेट मांडणे, ते तयार करणे, त्यात तरतूद करणे हे सगळे खूप कसरतीचे काम आहे. मा.आयुक्त साहेब, तुम्ही ते केले म्हणून मी तुमचे व तुमच्या सर्व सहका-यांना धन्यवाद देते. या वर्षीच्या बजेटचे वैशिष्ट्य म्हणजे आवक कमी व हे शेवटचे वर्ष असल्यामुळे आपल्या प्रभागातील जास्तीत-जास्त कामे कशी मार्गी लावता येतील, आपल्याला जास्तीत-जास्त तरतूद कशी मिळेल यासाठी प्रत्येक नगरसेवक जागरुक झालेले आहेत, सावध झालेले आहेत त्यासाठी ते प्रयत्न करत आहेत. कमी आवक असताना खरेतर जास्तीत जास्त खर्च या बजेटवर केला आहे. त्यामुळे वॉर्डातली कामे पूर्ण करायची आम्हाला घाई झालेली आहे. जसे एखादा कुटूंबप्रमुख मूल मोठे झाल्यावर आवक तीच असते पगार तेवढाच असतो आणि मुलावरचा खर्च अधिक वाढत असतो. तसे आम्ही जागरूक झाल्यानंतर तो खर्च वाढतो आहे. तरीसुद्धा तुम्ही तोंडमिळवणी

केली आहे. या वर्षाचे ठिक आहे. पण पुढील ५ वर्षांत ते पंचवार्षिक मला धोक्याचे दिसतेय. या बजेटमध्ये फक्त एलबीटीची थकबाकी वसूल करण्याचाच आपला प्रयत्न झाला आहे. त्यामुळे आपल्याला अंदाज होता, तेवढी एलबीटी आपल्याला मिळालेली नाही. सरकारी अनुदान म्हटले तर आपले मायबाप सरकार असे कोणीच राहीलेले नाही आणि त्यामुळे जरी सरकार आपल्याला अनुदान देते. त्यांना महाराष्ट्रात फक्त पुणे व पिंपरी चिंचवडच दिसते. आणि त्यांचे अनुदान कमी होते आहे. हेही जे घोड्यावर बसले आहेत त्यांनी लक्षात ठेवावे. अनुदान कमी होते आहे. मा.आयुक्त साहेब, आवक कमी होत असतानासुद्धा आपण जे बजेट मांडले आहे, त्याबद्दल मी पुन्हा एकदा तुमचे कौतुक करते, धन्यवाद देते. आपल्याला आहे त्यातच सुंदर दिसायचे आहे, स्मार्ट व्हायचे आहे. यासाठी आपल्याला खूप तारेवरची कसरत करावी लागणार आहे. परंतू घाबरायचे काही कारण नाही. पिंपरी चिंचवडच्या विकासासाठी, या शहराच्या मुलभूत सोयी सुविधा इथल्या गरजा या पूर्ण करण्यासाठी या शहराचे पूर्ण इन्फ्रास्ट्रक्चर व पुढील ५० वर्षांत या शहराचा विकास होणार आहे, असा दूरदृष्टिकोण ठेवूनच आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब, कै.रामकृष्ण मोरे साहेब व आत्ता मा.अजितदादा पवार साहेब यांनी इथल्या पायाभूत सुविधा व त्यांचे नियोजन भक्कम प्रकारे केलेले आहे त्यामुळे कोणीही, कितीही अडवणूक केली तरीही या पाच वर्षांत काय, पुढील पाच वर्षांत सुद्धा आपली विकासगंगा अशीच वाहत राहणार आहे. पिंपरी-चिंचवडवासियांना कुठल्याही विकासाच्या बाबतीत आम्ही काही कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही मी शहरवासियांना देते. तरीही काही त्रुटी आहेत. आपण त्या लक्षात घ्याव्यात. आकडेमोड खूप मोठ्या प्रमाणात आहे. आपण तरीही तोंडमिळवणी केली आहे. मी हे पुन्हापुन्हा सांगत नाही आमचे ज्येष्ठ सहकारी मा.आर.एस.कुमार व मा.नारायण बहिरवाडे यांनी त्यांचे चांगले विश्लेषण केले आहे.

याठिकाणी मला काही मुद्दे सन्मा.पक्षनेत्यांना सांगायचे आहेत. मॅडम, आपण आमच्या चिंचवडकडे जरा दूर्लक्षच करताय भोसरीच्या प्रमाणात चिंचवड बरेच दूर्लक्षित झाले आहे. भोसरीचे वर्णन म्हणून किती करावे. तिथे किती कामे मोजावीत. पक्षनेते तिथले, महापौर तिथे होते, आमदार तिथले, त्यामुळे भोसरी हे कामाच्या बाबतीत आघाडीवर आहे. अद्ययावत जिम तिथलाच. पोलिस आयुक्तालय तिथे. मागासवर्गीय मुलींचे-मुलांचे होस्टेल तिथे, बालनगरी तिथे, डिअर पार्क तिथे. आता होणार आहे, आखाडा गाजवण्यासाठी कुस्ती केंद्रही तिथेच. सगळ्या स्पर्धा तिथेच. स्वरसागर तिथेच,

फुले-फळे, पैठण्या, सगळी प्रदर्शने तिथेच. पुतळ्यांचे संच म्हणजे समुहशिल्प तिथेच. पुढे-मागे भोसरी हे खूप मोठे शहर व्हावे, अशी आमचे मा.आमदार, सगळ्यांनी खूप प्रयत्न केले आहेत. विशेषतः माजी आमदार यांनी खूप प्रकल्प आणले सुरु केले. अर्धवट झाले असलेतरी समाधान असेलच. काम करणे महत्वाचे आहे. पूर्णत्वाला नेणे, ते होईल नाहीतर न होईल. त्या दृष्टीने तुम्हाला चिंचवडचे थोडेसे लक्षात आणून द्यायचे आहे. चिंचवडला पाणी देताना, आता पाण्याच्याही बाबतीत भोसरीपेक्षा आम्हाला ५ एमएलटी पाणी कमी मिळते. आणि आम्ही साप साप म्हणून भुई धोपटल्यासारखे तांबे साहेबांना धोपटत असतो. १९७७ साली सुमारे ४० वर्षांपूर्वी टाकलेल्या आमच्या या सगळ्या पाण्याच्या पाईपलाईन आहेत. गंजलेल्या आहेत. या अशा गंजलेल्या पाईपलाईन मधून आम्ही आत्ता कमी दाबाने आलेले पाणी घेतो आहोत मा.आयुक्त साहेब, याकडे विशेष लक्ष देतोय. आम्ही लोकांना दुष्काळाचे कारण सांगतोच. तरीपण या ज्या पाईपलाईनबाबतीत तुम्ही जास्तीत जास्त लक्ष द्यावे. खरेतर २४ बाय ७ प्रमाणे पाणी देणार, हे आम्ही गेले चार वर्षांपासून ऐकतोय. मी सभागृहात अनेकवेळा याबद्दल बोलले आहे. पण काय झालेय. नमनालाच खूप तेल जळालं आहे. ती स्काडा सिस्टीम त्यावर कोट्यावधी रुपये खर्च केले तरीसुद्धा ती पूर्ण होत नाही. मागील मा.स्थायी समितीला जमले नाही. पण या स्थायी समितीने पहिल्याच झपाट्यात पैसे मंजूर केले आहेत. याकडे एकदा लक्ष द्या. २४ बाय ७ का होत नाही. काय कारण आहे. तुम्ही इतके फायदे सांगता. लोकांना जगाच्या अथपासून इतिपर्यंत इतिहास सांगितला. लोकांच्या मिटींग घेतल्या. आमच्याकडेतर काही लोकांनी आम्हाला काही कळायच्या आतच मिटींग घेतल्या. म्हणजे सुरुवात आपणच करावी. अशा पद्धतीने हे चुकीचे झाले आहे. अजूनही का होत नाही याचे गौडबंगाल काही कळत नाही. शहरात ब-याचशा ठिकाणी नदीला संरक्षक भिंत आहे. चिंचवडमध्ये नदीला कुठेही संरक्षक भिंत नाही आणि त्याची तरतूदही नाही. क्रांतीवीर चाफेकर यांच्या पुतळ्याचे काय झाले. आपण किती वेळा ती जागा पहात बसायची. कधी मुहूर्त मिळेल याची आपण नोंद घ्यावी. हे काम दोन/चार महिन्यांत पूर्ण करावे. चिंचवडची भाजी मंडई मध्यवर्ती ठिकाणी आहे. त्याचे एवढे एकच वैशिष्ट्य आहे. बाकी गळणारी छपरे, वर टाकलेली पोत्याची झाकणे, इतकी त्याची दयनीय अवस्था आहे. या भाजी मंडईचे नुतनीकरण का होत नाही. कोण आडवं येतय. याबाबतीत आम्ही जरी कोणी पाठपुरावा केला नाहीतरी प्रशासनाने तो करायला पाहिजे. चिंचवडमध्ये एवढ्या मोठ्या जागेत प्रशस्त व चांगली अशी भाजीमंडई उभी करायला पाहिजे.

स्विमिंग पूल - स्विमिंग पूल खूप कमी आहेत त्या स्विमिंग पूलासाठी किती कामे आहेत. पण तरतूद शून्य. आत्ता त्याला डेट कमी करायची आहे. टाईल्स बदलायच्या आहेत. लिकेजमुळे पाण्याचा अपव्यय होतो आहे. २० वर्षापूर्वी स्विमिंग पूल काढले आहेत. आता आजूबाजूला उंच उंच इमारती झाल्या आहेत. त्यामुळे या स्विमिंग पुलाला कव्हर केले पाहिजे हे मात्र नक्की. थेरगाव ते पिंपरीला जोडणारा नदीकिनारी १८ मी. रस्ता आहे. शेतक-यांशी चर्चा होत नाही आणि शेतक-यांशी चर्चा करुन निर्णय घेतला जात नाही, कोणताही तोडगा काढला जात नाही. हा नदीकिनारीचा रस्ता विकसित व्हावा अशी आमची अपेक्षा आहे.

पर्यावरण - आपण पर्यावरणाबाबतीत बरेचसे बोलतो. बराच खर्च करतो. आमच्याकडे क्रांतीवीर चाफेकर उड्डाणपूल आहे. त्याठिकाणी साऊंड बॅरिअर बसविणे अत्यंत महत्वाचे आहे. तसेच एम्पायर इस्टेटच्या पूलावर सुद्धा पाहीजे म्हणजे ध्वनी प्रदूषणाचा त्रास लोकांना होणार नाही. बीआरटी - मा.आयुक्त साहेब, तुम्ही बीआरटी ब-याच ठिकाणी पूर्ण केलेले आहे. आम्हाला वाटत नव्हते, बीआरटी इतक्या यशस्वीपणे चालतील. पण व्यवस्थित चालले आहे. आपण बीआरटी रस्त्यावर क्रॉसिंग करतो. लोकांना रोडवरुनच क्रॉसिंग करावे लागते. खरे म्हणजे तिथे हेड फूटवे सुद्धा आवश्यक आहे. म्हणजे तिथे अपघाताला कुठेही जागा राहणार नाही व अपघात कमी होतील. ब-याच सहका-यांनी सांगितलेले महत्वाचा विषय मी इथे घेते आहे. तो म्हणजे स्त्रियांसाठी स्वच्छतागृह. मा.आयुक्त साहेब, मी बजेटचे कौतुक केले पण हेही सांगितले की काही त्रुटी आहेत. त्यातलीच ही एक त्रुटी आहे. तुम्हाला संधी आहे. तुम्ही मनात आणले तर करु शकता. प्रत्येक प्रभागात किमान जिथे मेन रोड केला आहे, अशा ठिकाणी फक्त स्त्रियांसाठी दोन तरी स्वच्छतागृहे असावीत नव्हे ती करावीत. बजेटमध्ये फक्त रु.५० लाखच तरतूद ठेवलेली आहे. एका स्वच्छतागृहाला रु.१० लाख खर्च येतो. पाण्याची सुविधा सगळे व्यवस्थित करायला पाहिजे. एवढ्या मोठ्या शहरात फक्त पाचच करणार आहोत का. इतकी कमी तरतूद ठेवलेली आहे, हे अत्यंत चुकीचे आहे. माझ्या वॉर्डमध्ये चौकातल्या दोन चांगल्या जागा पाहून दोन्हीचे टेंडर काढले आहे

हॉस्पिटल - चिंचवडमध्ये तालेरा हॉस्पिटल आहे. त्याचे एक्सटेंशन चांगले केले आहे. पण हे बांधकाम किती वर्षे चालले होते. हॉस्पिटल म्हटल्यावर तिथे ऑपरेशन थिएटर पाहिजे. तिथे हॉस्पिटल आहे पण ऑपरेशन थिएटर नाही. तिथे बाकी काही सुविधा नाहीत. तिथे सीटी स्कॅन मशीन नाही. इतके सगळे आहे. डॉक्टर नाहीत. बरेचसे विभाग बंद आहेत. मा.आयुक्त साहेब, तुम्हाला एक किस्सा सांगते. तालेरा

हॉस्पिटल काय भ्रष्टाचार आहे मी काही जास्त लक्ष दिले नाही. मी एक पेशंट घेऊन गेले होते. एकदा गेलं की तिथे अनेक लोक भेटतात. चिंचवड गावातली एक महिला तिथे बसली होती. ती मला येऊन भेटली व म्हणाली, माझ्या डोळ्याचे ऑपरेशन झाले आहे. ऑपरेशन करुन सुद्धा मला अजिबात दिसत नाही. डोळ्यांना त्रास होतो आहे. तिथे त्या बाई नव्हत्या. मग मी त्या बाईसाठी थांबले. त्या आल्यावर मी त्यांना विचारले, अहो मॅडम, एवढे ८० लोक बसले आहेत. आणि तुम्ही कुठे गेला होता. यांना दिसत नाही हे तेवढे बघायला पाहिजे. तेवढ्यात त्या बाई मला म्हणाल्या, बाई, आम्ही अठराशे रुपये भरले आहेत. मा.आयुक्त साहेब, डोळ्यावरचे ऑपरेशन नेत्र शिबीरासाठी ऑपरेशन करणे किंवा शस्त्रक्रिया करणे हा राष्ट्रीय कार्यक्रम आहे. तो सर्वांना फ्रि आहे. मोफत असताना या राष्ट्रीय मोफत कार्यक्रमात सुद्धा तिथले डॉक्टर अठराशे रुपये कशाचे घेतात. लेन्सचे घेतात. मी याबाबत जास्त माहिती घेतली. त्या मॅडम ऑपरेशन थिएटरपाशी गेल्या. आणि डॉक्टरांकडून घेतले की, अठराशे रुपये कशाचे घेतलेतर त्या म्हणाल्या, तालेराकडून ॲफिलन्स या लेन्स मिळतात. त्याचे स्टिकर मी आणले आहे. रेकॉर्डवर रुग्णांचे जे पेपर असतात, त्यावर हे स्टिकर लावलेले असतात. ते खूप कमी आहेत. तुम्ही ते प्रत्यक्ष मागवून घ्या किंवा डॉ.रॉय यांना सांगा. हे अठराशे रुपये घेऊन या फ्रिडम लेन्स लावल्या आहेत. त्या किती लावल्या आहेत. ९० टक्के त्याच लावल्या आहेत. इथे काय चालते. रात्रीस खेळ चाले, असा प्रकार तालेरा हॉस्पिटलमध्ये आहे. आम्ही पाठिंबा दिला. वायसीएम असेल नसेल तरी सगळ्या बाबी आम्हाला मान्य आहेत. तरीसुद्धा आम्ही खूप खोलात जात नाही. तरी एक हिमनगाचे टोक जे जाता-जाता सहज दृष्टिला आले आहे ते मी तुम्हाला सांगितले. हॉस्पिटलबाबतीत अनेकजण बोलले. तालेरा हॉस्पिटल म्हणा किंवा वायसीएम म्हणा, तिथे ५० टक्के पेशंट हे बाहेरचे येतात. आपले बजेट कोणासाठी आहे. आपण या शहरातील नागरीकांच्या कराचा पैसा या हॉस्पिटलवर खर्च करतो. बाहेरुन येणारे ४० टक्के लोक ॲडमिट होतात. म्हणजे जे येतात त्यातले ८० टक्के लोक ॲडमिट होण्यासाठी इथे येतात. एकूण टोटल रुग्णांपैकी ४० टक्के लोक बाहेरचे असतात. ते ॲडमिट झालेले असतात. यावर काहीतरी उपाय करायला पाहिजे. आपल्या लोकांना सेवा लवकर मिळावी हा उद्देश्य आहे. पण उशीर होतो, काही गैरप्रकार होतो यात लक्ष द्यावे. आपण काहीतरी धोरण ठरवावे. म्हणजे आपल्या शहरातील लोकांना सहज व योग्य सुविधा उपलब्ध होतील. मी बरेच वेळा आपल्याकडे वैद्यकीय विभागाबद्दल बोलायला आले आहे. इथे डॉक्टरांचा खूप तुटवडा आहे आणि आम्हाला असे कळते की, तुम्ही त्यांना लवकर मान्यता देत नाही. म्हणून

त्यांना सहा महिन्यांसाठी टेम्पररी घेतो. मग पुढे सहा महिने वाढवण्यासाठी प्रशासन दोन महिने लावते. त्यांना या २ महिन्यांचा पगार सुद्धा मिळत नाही. त्यामुळे आपल्याकडे डॉक्टर रहात नाहीत. आपण त्यांना पस्तीस ते चाळीस हजार इतके मानधन देतो. या डॉक्टरांना बाहेर एक ते दीड लाख मिळतात. आपल्याकडे दहा डॉक्टरांचे काम एक डॉक्टर करतोय. मा.आयुक्त साहेब, आपण यातून एक सुवर्णमध्ये काढावा. आपल्याला सेवा पाहिजे. आरोग्य सेवा पाहिजे. मी सभागृहाला विनंती करेन, आपल्याला सुद्धा विनंती करेन की, हे राज्य सरकारच्या सुपूर्त करा. म्हणजे आपल्याला फक्त सेवा कशी मिळेल ते पहा. ससून सारखे हे हॉस्पीटल झालेतर यापेक्षा चांगल्या सुविधा उपलब्ध होतील. माझी याठिकाणी एवढीच विनंती आहे. कारण आपला वैद्यकीय विभाग अस्वस्थ नाहीतर अत्यावस्थ आहे हे लक्षात घ्या.

पीएमपीएमएल - हा विभाग म्हणजे आ बैल मुझे मार! आपण त्यांना आत्तापर्यंत अब्जावधी रुपये दिले आहेत. पण सेवा मात्र २५ वर्षांपूर्वीचीच दिली जाते. छान छान बसेसे कात्रजकडे, कोथरुडकडे. पिंपरी चिंचवडला त्याचप्रमाणात आणि तशाच नवीन बसेस घ्या. मी मा.महापौर साहेब यांना विनंती करेन की, आपल्याकडे कुठल्या बसेस आहेत याची फोटोसह माहिती घ्या. आपल्याकडून सुद्धा चूका होतात. आपण हिंजवडीपासून विमानतळापर्यंत ए.सी. बस केली आहे. हिंजवडीला पिंपरी चिंचवडचे लोक आहेत का. हिंजवडीच्या लोकांसाठी, ज्यांना विमानतळाला जायचे आहे अशा श्रीमंत लोकांसाठी ए.सी.बस आहे. पिंपरी चिंचवडकरांसाठी खिडक्या गेलेल्या, तुटलेल्या, ब्रेकडाऊन झालेल्या, मध्येच बंद पडणा-या बसेस देतात. काय चालले आहे हे. पीएमपीएमएलबद्दल किती वेळा बोलायचे. काही लोकांना चालवण्यासाठी अशा प्रकारे आपण या बजेटमध्ये त्यांना रु.११५ कोटी ठेवले आहेत. त्यांना प्रत्येक महिन्याला रु.१० कोटी देतोय. तरीही आपल्या शहरात पुरेसे बसथांबे दिलेले नाहीत. १८ फूट लांब, १८ फूट उंच, त्याच्याआड ४/५ दुकाने लपतात. लोकांचा विरोध होतो. बसथांबे रस्त्यावर लावायचे. लोक उन्हात उभे असतात. चिंचवड स्टेशनच्या पेट्रोल पम्पाजवळ बघा. उन्हापावसात लोक उभे असतात. लोकांना बसायला कुठेही आसरा नाही. लोकांची तारांबळ उडते. अशाप्रकारे ते आपल्याला दुय्यम समजतात. आपला कामगार दुय्यम समजतात. सगळ्याच बाबतीत हाल आहेत. मला एकच म्हणायचे आहे की, जर त्यांना वर्षाला रु.११५ कोटी, बसस्टॉपसाठी दर महिन्याला रु.१० कोटी देत असू तर त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना फ्रि बसपास द्यावेत. याची नोंद घ्यावी.

मेट्रो - हे आपले दिवास्वप्न होते. ते आपल्याला मिळेल असे वाटत नाही. या सरकारवर, त्यांच्या घोषित योजनांवर किती विश्वास ठेवायचा हे लोकांनाच माहित आहे. शहरातील क्रिडांगणे - लहान मुलांना वाढायला कुठेतरी मुठभर माती त्यांच्या अंगाला लागू द्या. शहरातली क्रिडांगणे मोकळी करुन घ्या. त्या पत्राशेडबद्दल मी तुमच्याकडे वारंवार येते. तुम्ही ते पत्राशेड निम्मे रिकामे केले एक/दीड महिना झाला, परत वाढायला लागले. आता स्वतः पत्रे आणून ठोकायला लागले आहेत. ते पुन्हा वाढायला लागले आहेत. तुम्ही आदेश देऊनसुद्धा ते का ऐकत नाहीत. मी तुम्हाला हायकोर्टाचा निर्णय दिला आहे. अशाप्रकारे तुम्ही यात जास्त लक्ष द्या. हे सर्वे नं.१९५ चे झाले. सर्वे नं.६४ मध्ये चिल्ड्रन्स प्लेग्राऊंडसाठी जागा आरक्षित आहे. त्याठिकाणी एक बिल्डींग झाली आहे. आदर्श घोटाळा झाला आहे. माझ्याकडे सगळे पेपर्स आहेत. मी पत्रकार परिषद घेऊन ते सांगणार आहे. त्याठिकाणी बिल्डींग झाली आहे. म्हणजे आपले प्रशासन किती दूर्लक्ष करतेय, किती हलगर्जीपणा करतेय. आत्ता तिथे काँक्रीट मटेरीयल, डबर सगळे आणून टाकले आहे. खेळायला एवढीच जागा शिल्लक आहे. १९६७चा आमचा ले-आऊट आहे. तिथे क्रिडांगणाचे रिझर्वेशन आहे. त्या प्लॉटची ही परिस्थिती आहे. आपल्या अधिका-यांनी फोन केला तर त्यांनी सांगितले, आम्ही विकत घेतले आहे. मा.आयुक्त साहेब, हे काय चालले आहे. कोई भी आओ-जाओ, घर तुम्हारा. लोक ओपन स्पेसवर, क्रिडांगणाच्या जागेवर कशी काय परवानगी देतात. याची चौकशी झाली पाहिजे. ओपन स्पेस कोणाची असते ते विचारा.

रेल्वे हद्दीतल्या ज्या रिकाम्या जागा आहेत. तिथे झोपडपट्टीशिवाय दुसरे काही वसलेले नाही. आपण त्याचा उपयोग करुन घेत नाही. तिथे झोपडपट्टी वसली जाते. त्याचे आपल्याला काही दुःख नाही. परंतू त्यांना द्यावयाच्या सुविधा आता इतक्या महाग पडू लागल्या आहेत. त्याचा ताण आपल्यावर येतो आहे हे लक्षात घ्यायला पाहिजे. शहरात एमआयडीसी जागा असतील, प्राधिकरणाच्या जागा असतील, त्यांना जर ते प्लॉट विकसित करायचे नसतीलतर ते ताब्यात घ्या. आपला एवढा मोठा विभाग आहे. आपला भूमि आणि जिंदगी विभाग काय करतोय. काहीच नाही. त्यांनी सगळ्या हॉलची लिस्ट केली. कुठलाही हॉल ताब्यात घेतलेला नाही. आपल्या मिळकती अशाच पडून आहेत. या अधिका-यांना कुणाला काही देणे-घेणे नाही. आपण कृपया यात लक्ष द्यावे. प्रत्येक प्रभागात ज्येष्ठ नागरीकांसाठी एक ओपीडी सुरु करावी.

विद्युत विभाग - मी एलईडीच्या विषयाला विरोध केला. म्हात्रे साहेब तुम्ही मात्र विरोध केला नाही. तुम्ही विषय पलटवायला सुरुवात केली. प्रभागातले सगळे गोळा

करुन मुख्य कार्यालयाकडे दिले. त्यांनी टेंडर काढले. तुम्ही सांगितले, तुम्ही त्यांचे खूप कौतुक केले. त्यांना स्वस्त मिळाले. वर्ष गेले, एलईडी कुठे आहे. महाग का होईना, प्रभागात एलईडीचा वापर तरी सुरु झाला असता. त्या लागल्या तरी असत्या. एलईडी कुठे गेले. आम्हाला या वर्षात एलईडी पाहीजेत. सन २०१५-१६ मध्ये आर्थिक वर्षातील एलईडी आम्हाला आमच्या वाट्याच्या मिळाल्या पाहिजेत. प्रभागाच्या वाट्याच्या मिळाल्या पाहिजेत. सन २०१६-१७चे वेगळे काय चालले आहे. म्हणून आम्ही विरोध करत होतो. कुणाचा तरी दबाव आणतात. आणि साहेब, तुम्ही दबावाखाली येता. तुम्ही त्यांच्या प्रलोभनाला बळी पडता. आमच्याकडे आत्ता वेळ नाही. आमची कामे राहतात. मा.आयुक्त साहेब, तुम्ही एलईडी बरेच ठिकाणी लावणार आहात. नव्हे संपूर्ण शहरात लावतोय. आपण सोलर पॅनल बसवायला पाहिजेत. आपण सोलर पॅनल बसवले तर आपला एनर्जीचा खर्च झिरो होईल. अत्यंत महत्वाचे आहे. त्याला फारसा खर्च नाही. म्हणजे एमएसईबीकडून लाईट बील येते, ते एक्दम कमी होईल. खर्च कमी होण्यासाठी त्याचा खूप उपयोग होईल. कारण पॉवर फॅक्टर इम्प्रूव्ह करण्यासाठी आपल्याला खूप मदत होईल.

वृक्षप्राधिकरण नव्हे वृक्षतोड समितीची मी पण सदस्य आहे या वृक्षतोड समितीत बरेचसे विषय येतात. आमच्यापुढे एकच विषय असतो - वृक्षतोड करायचा. कुठल्यातरी बिल्डरचा असे विषय येतच असतात. हे विषय आम्ही प्रामाणिकपणे मंजूर करतो. विषय मंजूर केले नाहीतरी ते पंचेचाळीस दिवसांत तोडू शकतात. सांगूनही होत नाही असे अकार्यक्षम अधिकारी तिथे बसवलेले आहेत. खेळणीचे टेंडर या पाच वर्षांत त्यांनी किती काढावेत. एक टेंडर ते सुद्धा पास नाही. ते अजून कार्यान्वित झालेले नाही. अधिका-यांना विचारले की, टेंडरचे काय झाले. तर ते म्हणतात, या ४/५ दिवसांत येईलच. इतके ते चुकीचे आहे. हे तुमच्या लक्षात येत नाही का. तुम्हाला सांगूनसुद्धा तुम्ही काहीच मनावर घेत नाही. अशा प्रकारे या भागात जी निष्क्रियता आहे ती घालवायची असेलतर प्रत्येक प्रभागाचे विभाग करा व वाटून द्या. तुम्ही बिल्डींग परमिशन विभागाचे काम जसे वाटून दिले आहे, तसे वाटून द्या. त्यांचा जो म्होरक्या आहे, त्यांना नेहरुनगरला एका बाजूला ठेवले आहे. त्यांना इथे ठेवा. इथे जागा नसेलतर चिंचवड गावात जागा आहे. झोनिपू विभागात एक फ्लोअर रिकामा आहे. तिथे देऊन टाका. ते गावाच्या मध्यावर तरी होईल. जवळ होईल. त्यांच्यावर कंट्रोल करणे अत्यंत आवश्यक आहे. दोन/तीन वर्षे झाली, मी या समितीत असूनसुद्धा साधे लॉनसुद्धा आम्हाला मिळत नाही, अशी परिस्थिती आहे. आपल्याकडे शहरात खूप मोठमोठ्या

स्किमस् होत आहेत गृहप्रकल्प होत आहेत आता आपण तसे घेतच आहोत. तसा नियमच आहे, प्रत्येक २०,००० पुढील गृहप्रकल्पाला एसटीपी, वॉटर हार्वेस्टींग, पाणी शुद्धीकरणासाठी ऍरो प्रकल्प, पाण्याचे रिसायकलिंग हे सगळे आपण कंपल्सरी करतो. पण त्याची अंमलबजावणी होते का. यावर आपण कटाक्षाने नजर ठेवली पाहिजे.

ब-याच ठिकाणी इंडस्ट्रीयल प्लॉट रहिवासी झोनमध्ये घेतो. त्यांना बांधकामासाठी परवानगी देतो. ते करत असताना त्यांच्याकडून ५ टक्के ऍमिनिटी स्पेस घेतो. ती जागा महापालिकेच्या मालकीची होते. माझ्याकडे उद्योगनगरमध्ये सर्वे क्र.१९५/९६ मध्ये ८० एकर जागा असेल. त्यांनी अशीच शक्कल लढवली. त्याचा ले-आऊट केला. कुठेही ओपन स्पेस ठेवली नाही. पाच/दहा गुंठ्यांचे असे प्लॉट केले. आणि असे ठरवले आहे की, त्या पाच/दहा गुंठ्यांमध्ये त्या जागेच्या मालकाने ५ टक्के ओपन स्पेस किंवा ऍमिनिटी स्पेस सोडावी तुम्ही त्या जागेचं काय करणार आहात. २५ स्क्वे.फूट, २०० स्क्वे.फूट, १०० स्क्वे.फूट म्हणजे त्याचा शून्य लाभ. हे तुम्ही लक्षात घ्या. बिल्डींग परमिशनमध्ये सगळा लेआऊट होतो, त्यावेळी त्यांना या सूचना द्याव्यात. जर आमच्याकडून मंजूरी हवी असेलतर ती सुद्धा घ्या. लेआऊट असेलतर एकत्रित ऍमिनिटी स्पेस किंवा ओपन स्पेस मिळावी. त्यासाठी प्रयत्न करावा.

स्मशानभूमी - शहरातील प्रत्येक माणसाला शेवटी इथेच जायचे आहे ते म्हणजे. स्मशानभूमी. मा.आयुक्त साहेब, तुम्ही एकदा लिंकरोडच्या हिंदू स्मशानभूमीमध्ये जा आणि फक्त पाहणी करुन घ्या. तुम्ही त्या स्मशानभूमीची आज/उद्या कधीतरी पाहणी करुन घ्या. तुम्हाला तिथे सगळे रात्री काय पण दिवसा सुद्धा गरबुले भेटतील तिथे पडायला झालेली अशी कुठलीतरी एक शेड आहे. कुठल्यातरी साहेबाने गाडी पार्क केलेली असते. लोकांना बसायला शेड नाही. शेड आहे ती एका बाजूला आहे. माणसापेक्षा कुत्रीच जास्त आहेत. ही स्मशानभूमी कोणी चालवायला घेतली त्याची ताबडतोब चौकशी करा आणि त्याला तिथून काढून टाका. तिथे एक टाकी आहे. पण पाणी नाही. पाण्याचा एकच नळ आहे. अंत्यविधी झाल्यानंतर लोकांना हातपाय धुवून सगळ्या चिखलातून तुडवत यावे लागते. स्मशानभूमीतले वरचे पत्र गळत आहेत. खाली ब्लॉक निघालेले आहेत. दहन करतो ते हौद तुटलेले आहेत. काय चालले आहे. माणसाला शेवटीतरी नीट जाता यावे. तिथे टू व्हिलर तर न्यायला नको वाटते. फोर व्हिलर नेलीतरी पार्किंगमध्ये गाड्या कशा लावायच्या हा प्रश्न असतो. त्या रस्त्याला दूतर्फा इतकी दूर्गंधी असते इतकी घाण असते. मला तर वाटते, एखाद्या दिवशी ते मडं सुद्धा त्या दुर्गंधीने उठून बसेल. आणि तो प्रेतात्मा तो उठलेला माणूस धन्यवाद देईल की, बरे झाले घाण गेली,

मी उठून बसलो. अशाप्रकारे त्या स्मशानभूमीचे हाल आहेत. अशा अनेक गोष्टी आहेत. आपण कार्यक्षम आहात. आपण अष्टावधानी आहात. आपले सर्व बाजूंना लक्ष असते. आपण आपले प्रशासनही तसेच केले. आपण प्रशासनावरही थोडा अंकुश ठेवला तर सर्व विकास व्हायला सुकर होईल. त्यासाठी आमच्या लिडरने तेवढ्याच पावरफुलपणे आपल्याला साथ द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करते. मी आपल्याला धन्यवाद देते व थांबते.

**मा.अश्विनी चिखले** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मी सर्वप्रथम एक घोषणा देऊ इच्छिते, भारत माता की जय! भारत माता की जय! भारत माता की जय! त्या लोकांना घोषणा द्यायला लाज वाटते म्हणून आम्ही निषेध म्हणून इथे घोषणा देतोय. माझा पहिला विषय असा आहे, भक्ती-शक्ती चौक हे शहराचे प्रवेशद्वारच आहे. तिथे खूप मोठ्या प्रमाणात वर्दळ चालू झालेली आहे ट्रॅफिक सुद्धा खूप वाढले आहे. रस्त्याची सुद्धा कामे चालू आहेत बीआरटीएसचे काम चालू आहे. आण्णाभाऊ साठे स्मारकाचे काम चालू आहे. तसे पाहिलेतर तिथे अनेक अपघात झाले आहेत. ट्रॅफिकमुळे माझ्या डोळ्यासमोरदेखील अनेक अपघात झाले आहेत. याबद्दल आपण काहीतरी निर्णय घ्यावा. इथे चौकात ग्रेडसेपरेटर तरी हवा किंवा उड्डाणपूल तरी हवा. जेणेकरुन ट्रॅफीकचे प्रमाण कमी होईल आणि अपघातांचे प्रमाण देखील कमी होईल. तिथे लोकांना रोड क्रॉस करताना अक्षरशः भिती वाटते. त्याभागात मंगल कार्यालये आहेत. कृष्णमंदीर आहे. जास्त गर्दीच्या वेळी लोकांना खूप प्रॉब्लेम होतो. तुम्ही आम्हाला सांगितले की, आम्ही त्यासाठी कन्सल्टंट नेमला आहे. कारण तिथे सात रस्ते आहेत. खूप मोठे बजेट आहे. नंतर आम्हाला त्याबद्दल काहीच सांगण्यात आले नाही. काय नियोजन करणार आहे, कन्सल्टंटने काय डिसिजन दिला, त्याबद्दल बैठक घेतली नाही. आमची अशी मागणी असणार आहे की, आपण पुन्हा एकदा बैठक घेऊन आम्हाला विश्वासात घेऊन सांगावे. सायन्स पार्क इथे आपली कार्यशाळा झाली होती. त्यात सांगितले होते की, भक्ती-शक्ती चौकापासून मेट्रो किंवा मोनोरेलचे आपले नियोजन चालले आहे. आपण पहिले ग्रेडसेपरेटर किंवा उड्डाणपुलाचे काम मार्गी लावावे. ते जास्त महत्वाचे आहे. मेट्रो किंवा मोनोरेलला आमचा विरोध नाही. परंतू आधी या बेसिक गोष्टी व्यवस्थित झाल्यावर पुढील गोष्टी जास्त चांगल्या होतील. तिथे आत्ता आण्णाभाऊ साठे स्मारकाचे बांधकाम चालू आहे. नवीन नवीन टप-या येत आहेत. तिथे हळूहळू अतिक्रमणे वाढत चालली आहेत. आपण आत्ता भक्ती-शक्तीचा रस्ता नवीन करतोय. निगडी सिग्नल बसस्टॉपची जशी दूर्दशा झाली आहे, तशी दूर्दशा या भागातली

व्हायला नाही पाहिजे, अशी माझी विनंती आहे. तिथे टप-या होणार नाहीत, त्यांना तिथे स्टॉल उभे करायला जागाच मिळाली नाही पाहीजे, याचे नियोजन पाहिजे. बसस्टॉप आणि आण्णाभाऊ साठे स्मारक, या दोन्ही प्रोजेक्टसाठी एवढा खर्च केला आहे. त्याचा काही उपयोग होणार नाही. त्याचे अक्षरशः विद्रूपीकरण होईल. त्याचे व्यवस्थित नियोजन झाले पाहिजे. निगडी उड्डाण पूल, बीआरटीएसचे बसथांबे इथे भिकारी लोकांनी अक्षरशः संसार थाटले आहेत. तिथे चादरी लटकलेल्या असतात. हे लोक उड्डाणपूलाखाली बिनधास्त रहात आहेत. त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे.

महिलांना २०११ पासून शिवण यंत्रे मिळालेली नाहीत. नागरवस्ती विभागाच्या या योजनेचा उद्देशच हा आहे की, महिलांना स्वयंरोजगारासाठी शिलाई मशीन पुरवणार होतो. ते अजूनही काही मार्गी लागलेले नाही. त्यासाठी लवकरात लवकर कारवाई करुन शिलाई मशिनचे वाटप करावे. महिला आमच्याकडे वारंवार येत असतात. महिलांना उत्सुकता असते. शिलाई मशिन कधी मिळणार. आम्ही त्यांना काय उत्तर द्यायचे. यावर लवकरात लवकर निर्णय घ्यावा. पिंपरी चिंचवडमध्ये बरेच ठिकाणी युपीएससी, एमपीएससीची स्पर्धा परीक्षा केंद्रे झाली आहेत. या केंद्रांवर गर्दी खूप असते. रिस्पॉन्स चांगला येतो आहे. ही केंद्रे विद्यार्थ्यांना खूप उपयोगी पडत आहेत. याप्रमाणे सीए करणा-या मुलांसाठी असे केंद्र व्हायला पाहिजे. ज्या मुलांची घरची परिस्थिती दुर्बल आहे. त्यांची पुस्तके विकत घेण्याची किंवा फी भरण्याची क्षमता नाही, अशा सी.ए.ची परीक्षा देणा-या मुलांसाठी एक लायब्ररी असावी. अशी ब-याच विद्यार्थ्यांची आमच्याकडे मागणी आहे. काही लोकांना डॉक्टर व्हायची इच्छा असते. बरीच गरीब घरातली मुले आहेत, ते हुशार आहेत त्यांना कॉलेजची फि भरता येत नाही. त्यांच्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेकडून संस्था उभारण्यात यावी. जेणेकरुन त्यांना शिक्षण घेता येईल. त्यांना उपयोग होईल आणि त्यांना लाभही मिळेल. एवढे बोलून थांबते, धन्यवाद.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, प्रशासनाने या बजेटच्या माध्यमातून जास्तीत जास्त सगळे देण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्याकडे बजेट चांगल्या पद्धतीने सादर करायचा प्रयत्न केला आहे. त्याबद्दल मी प्रशासनाचे अभिनंदन करते. आपल्याकडे एलबीटी बंद झाली आहे. आपला उत्पन्नाचा स्त्रोत कसा वाढेल या दृष्टीने आपण विचार केला पाहिजे. आपल्या ब-याचशा जागा, दुकाने आहेत, ते तसेच रिकामे पडलेले आहेत. ते २ वर्षांचे कराराने, ५ वर्षांचे कराराने किंवा तुमच्या नियमांत बसेल तसे देऊन आपल्याला उत्पन्न कसे मिळेल या दृष्टिने

प्रयत्न करा. त्याचप्रमाणे ब-याच नागरीकांनी पाणीपट्टी भरलेली नाही. दहा दिवसांत जवळजवळ रु.५ कोटी कसे वसूल करणार या दृष्टीने योजना राबवत असालतर या दृष्टीने अधिका-यांना सांगा. त्याचप्रमाणे बीआरटीएसचे ११५ कोटींचे सन २०१६-१७ चे बजेट आहे. पिंपरी चिंचवडमध्ये नवीन बसस्टॉप खूप आलेले आहेत त्यांवर आपली जाहिरात द्यायची. आणि त्याचे इन्कम आपल्याकडे घ्यायचे. या दृष्टिने सुद्धा आपले इन्कम वाढेल. आपली एकूण १७२ उद्याने आहेत. त्या उद्यानांत प्रत्येक वर्षी सबंध पिंपरी चिंचवडमध्ये उद्यान विभागात आपल्याकडे झाडांच्या फांद्यांचे कटींग होते त्याची विल्हेवाट कशी लावतो. आता मनुष्य येतो, तो जातोच हे ठरलेलेलच आहे. तर या झाडांच्या फांद्या वाळवून दहन करण्यासाठी स्मशानभूमीत ठेवल्यातर हे सुद्धा एक इन्कमस्त्रोत होईल. छोटे-छोटे असले तरी थेंबे-थेंब तळे साचे असे केल्यास त्यात भरपूर भर पडेल. एलईडी बल्ब घेतले आहेत. आमच्याकडे काही आलेले आहेत. आता सगळे म्हणणार, आम्हाला द्या, आम्हाला द्या. आता २०१७ मध्ये निवडणूका आल्या आहेत. प्रत्येकजण म्हणेल, माझा भाग चांगला कसा दिसेल, प्रकाशित कसा दिसेल. अशा दृष्टीने व्यवस्थित नियोजन करा. कारण प्रत्येकाला २०१७चे वेध लागलेले आहेत. त्यादृष्टीने बघा.

त्याचप्रमाणे आपण बांधकाम परवानगी देताना काही सवलती देतो. वॉटर हार्वेस्टींग करतो. त्याचप्रमाणे घनकच-याचे पण करावे. पुण्यामध्ये जसा कच-याचा प्रश्न निर्माण झाला आहे, तसा पिंपरी चिंचवडमध्ये कच-याचा मोठा प्रश्न पुढे येणार आहे. आपण सोसायट्यांमध्ये अशी योजना राबवा की, सोसायट्यांचा कचरा, ओला कचरा हा तुम्ही सोसायटीमध्येच जिरवत असालतर त्यांना टॅक्समध्ये किंवा सोसायटीचा टॅक्स येत असेल त्यामध्ये ५ टक्के किंवा १० टक्के अशी सवलत द्या. कारण पाच/दहा वर्षांनी तरी हा प्रश्न पुढे येणार आहे. त्यादृष्टीने विचार करा. त्याचप्रमाणे प्रत्येक गार्डनमध्ये स्वच्छतागृहे - सन २०१२-१३ मध्ये स्वच्छतागृहांसाठी भरपूर योजना केली होती. त्या दृष्टीने सुद्धा तुम्ही उपाययोजना करा त्याचप्रमाणे अभय योजना आहे, त्याचा आपल्याला किती फायदा झाला. त्यातून रिकरींग किती झाले आहे. त्याचे भविष्यात काय होईल, या दृष्टिनेसुद्धा विचार करा. त्याचप्रमाणे आत्ता जी बीआरटी केली आहे. बीआरटीचे रुटस् केले आहेत चांगले चालले आहे. आत्तापर्यंत एकही अपघात झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. त्यामुळे मी बीआरटीचे खूप अभिनंदन करते. दळणवळणाची साधने जर कार्यक्षम केलीतर लोक स्वतःची वाहने वापरणार नाहीत. आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये दळणवळणाची साधने कशी वाढवता येतील,

या दृष्टीने तुम्ही उपाययोजना करा. मी मागील वर्षी देखील हे म्हटले होते की, आपले बजेट मार्च महिन्यामध्ये येते. नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये सादर करता येईल अशी मिटींग घ्या. आता आम्ही मार्चमध्ये बजेट सादर करणार आहोत. या-या वर्षाचे एवढे-एवढे राहीलेले आहे. या तीन महिन्यांत तो खर्च तुम्ही करा. तसे तुम्ही सूचवा पण गेल्यावर्षी सांगून सुद्धा या वर्षी तसे अजिबात केले गेले नाही. तरी इथून पुढे तरी ही उपाययोजना करा की, नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये सगळे नगरसेवक, अधिकारी यांची मिटींग लावा आणि सांगा की, शंभर टक्यांमधले साठ टक्के बजेट खर्च झालेले आहे. उरलेले बजेट खर्च करण्यासाठी उरलेले तीन महिने अधिका-यांना व आम्हाला सुद्धा मिळतील या दृष्टीने सुद्धा प्रयत्न करा.

**मा.मंदा आल्हाट**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, सर्वात महत्वाची बाब म्हणजे देहू-आळंदी रस्त्याचे काम चालले आहे. हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. या रस्त्यासाठी तरतूद कमी पडते आहे. माझी मा.आयुक्त साहेबांना विनंती आहे की, या रस्त्यासाठी तरतूद वाढवून मिळावी. कंपनीच्या लोकांनी रस्ते खोदले आहेत. स्थापत्य विभागाकडून पुन्हा करायचे म्हटले तर खूप प्रॉब्लेम होतो. महिला व पुरुष यांच्यासाठी मोशी भागातील चौकात व अन्य दोन ठिकाणी शौचालयाची सोय करणे अत्यंत आवश्यक आहे. रोटरी क्लबतर्फे शौचालये उभारण्याची मागणी केली होती. परंतू काही झाले नाही. मी गेले २/४ वर्षापासून सभागृहामध्ये बोलतेय प्रभागातील सभेमध्ये हा विषय असतो. कितीही आंदोलन केले काही केलेतरी काही होत नाही. दुसरे म्हणजे मला स्मशानभूमीबाबत बोलायचे आहे. स्मशानभूमीत मैतीचा किंवा दहाव्याचा कार्यक्रम असला की आम्हाला लोक येऊन सांगतात की, बेस्ट सिटी आहे, तरी नदीमध्ये एवढी जलपर्णी का आहे. तुम्ही काही करत नाही का. नगरसेवकांना पेचात पडल्यासारखे वाटते. कच-याच्या प्रश्नावरुन एवढे आंदोलन केलेतरी काहीच निर्णय झाला नाही. आयुक्त साहेबांना निवेदन देऊन सुद्धा शासनाचा काही निर्णय झाला नाही. मोशी चौक याठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्याची जास्त आवश्यकता आहे. बजेटमध्ये जी तरतूद केली आहे, त्यामानाने मोशी भाग मोठा आहे. त्यामुळे जेवढ्या प्रमाणात तरतूद द्यायला पाहिजे होती, तेवढ्या प्रमाणात ती मिळालेली नाही. मा.नारायण बहिरवाडे यांनी मघाशी सांगितले की, कुत्र्यांसाठी मोशी कचरा डेपो इथे संगोपन केंद्र करायला पाहिजे. मोशीवाल्यांनी कुत्र्यांचा सांभाळ करायचा काय ठेका घेतला आहे का. त्या-त्या प्रभागातच कच-याची विल्हेवाट लावा. मला या निमित्ताने एवढेच सांगायचे आहे.

**मा.शुभांगी बो-हाडे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, सेक्टर नं. २२ मध्ये गेले ४ वर्षांपासून ऐकतोय, रेडझोन, रेडझोन, रेडझोन. दुरुस्तीच्या माध्यमातून तिथे कामे चालू आहेत. दरवर्षी आपले शिक्षण मंडळाचे सभापती बदलतात आणि शाळेला व्हिजिट देतात. पेपरमध्ये बातम्या लागतात. माझ्या भागात दोन शाळा आहेत. तुम्हीपण त्या शाळांना व्हिजिट दिली आहे. त्या शाळांची अवस्था फार वाईट आहे. मी काही उपसूचना दिल्या आहेत. त्या मंजूर कराव्यात अशी विनंती राहील. सेक्टर २२ मध्ये कुत्र्यांचा खूप उपद्रव झाला आहे. त्यावर काहीतरी कडक कारवाई करण्यात यावी. नागरी सुविधा केंद्र आहे. तिथे महिला बचत गटांच्या फाईली जमा करतात. त्या नागरवस्ती विभागात व्यवस्थित पोचल्या जात नाहीत. माझ्या वॉर्डामध्ये शिलाई मशीनबाबत एक मोठा प्रश्न आहे. मुस्लिम समाजाच्या ज्या महिला आहेत, त्यांच्या आडनावापुढे महम्मद किंवा अब्दूल असे शब्द लागलेले असतात ते रेशन कार्डमध्ये आहे आणि त्यांच्याकडे जे प्रमाणपत्र आहे, त्यावर असे नाव लागलेले नाही. त्यावर उपाययोजना म्हणून त्या महिलांकडून प्रतिज्ञापत्र भरुन घेऊन त्यातून काहीतरी मार्ग काढण्यात यावा. अंकुश चौकात वनवे वाहतूक आहे. तिथे रोज संध्याकाळी मोठी गर्दी होते. तिथे ट्रॅफीक पोलिस किंवा सिग्नल ठेवावा. भविष्यात काय नियोजन असेल ते होईल, परंतू आत्ता त्यासाठी तात्पुरती उपाययोजना करण्यात यावी. बीआरटी बसस्टॉप व कै.मधुकर पवळे पुलाखाली झोपडपट्टी आहे. तिथे त्यांच्या गोधड्या, चादरी लटकलेल्या असतात. मी व मा.सुलभाताई ऊबाळे आम्ही जवळजवळ ७/८ महिन्यांपूर्वी प्रभाग समितीमध्ये हा विषय घेतला होता. तरीसुद्धा त्यावर काहीच कारवाई झालेली दिसत नाही. याबाबतीत काहीतरी ठोस निर्णय घेण्यात यावा. एवढे बोलून मी थांबते.

**मा.स्वाती साने**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मी आयुक्त साहेबांचे अभिनंदन करेन की, तुम्ही सन २०१६-१७ करिता खरोखर सगळ्यांना चांगले बजेट असे म्हणता येणार नाही, परंतू जेवढे देता येईल तेवढे देण्याचा प्रयत्न केला आहे. आम्ही समाविष्ट गावांत आहोत. गेले ४ वर्षे आम्ही समाविष्ट गाव, समाविष्ट गाव असे म्हणायची आम्हाला आता लाज वाटायला लागली आहे. असे म्हटल्यामुळे आम्हाला बजेटमध्ये कुठेही वाढ झालेली दिसत नाही. तुम्ही बजेट दिले नाही असे नाही. पण म्हणतात ना, खा पेढा हो वेडा. अशी आमची त-हा केली आहे. पेढा दिला पण तो खायला दिलेला नाही. मा.आयुक्त साहेब, चिखलीमध्ये एकही उद्यान नाही. मी उद्यान विभागाला सांगितले होते, बजेट तयार करताना बजेटमध्ये चांगली तरतूद करा. त्यांनी फक्त हेड ओपन करुन ठेवले आहेत. तरतूद फक्त रु.८ लाख. गार्डन एकही

नाही. पुरेशी तरतूद नसेलतर कसे करणार. एक छोटेसे गार्डन आहे. मागील वर्षी रु.७ लाखाची तरतूद होती. वर्कऑर्डरही आली. आता मार्च एंडींग आले आहे. १७ तारीख आली. अजूनही कामाला सुरुवात नाही. हे लोक दुरुस्तीचे काम करत नाहीत. हे काम कधी संपणार आहे. परंतू शहरात एकच उद्यान स्थापत्य विभाग आहे. त्यांच्याकडे इंजिनिअर कमी आहेत. ते म्हणतात, मॅडम आम्ही काय काम करायचे, काम करायचे म्हटले तर त्यासाठी वेळ द्यावा लागतो. नगरसेवकांनी बोलवल्यानंतर व्हिजिटलाही जावे लागते. त्यांच्याकडे लोक कमी आहेत. लोक वाढवता आलेतर बघा. नाहीतर पूर्वीसारखे स्थापत्यकडे उद्यान स्थापत्य द्यावे अशी मी विनंती करते.

आरोग्य - माझ्या वॉर्डकरिता आरोग्यसाठी असलेले बजेट खूप कमी आहे. आरोग्यचाही प्रश्न खूप गंभीर आहे. मा.धनंजय आल्हाट हे मोशी भागात नदीमध्ये जलपर्णी आहे म्हणून जलपर्णी लावून आले आहेत. परंतू आमच्याकडेसुद्धा तशीच अवस्था आहे. आमच्याकडे देखील जलपर्णी आहे. आमच्याकडे गावे आहेत. आता गावातला एरिया वाढतोय. आरोग्य विभागाच्या कचरा उचलणा-या गाड्या वाढवायची खूप गरज आहे. गेल्या सहा महिन्यांत हा एरिया खूप झपाट्याने वाढतोय. त्याचे आत्ता बजेट केले पाहिजे. आमच्याकडे खूप मोठी समस्या निर्माण झाली आहे. विद्युतसाठी देखील बजेट खूप कमी आहे. एक एरिया वाढला तरी लाईटस् द्यावे लागतात, पोल द्यावे लागतात. एक एरिया वाढला की शंभर ते दीडशे पोल वाढतात. आत्ता बजेटमध्ये चांगली तरतूद दिली तरच आम्ही हे काम करु शकतो. जशा निवडणूक झाल्या, आम्ही तेव्हापासून कमानीसाठी पाठपुरावा करतोय. दोन्हीही संत एका बाजूला आळंदी आणि एका बाजूला देहू आणि मध्ये आम्ही आहोत म्हणून दोन्हीही संतांच्या कमानीसाठी आम्ही प्रयत्न करतोय. परंतू आजही कोणतेही काम झालेले नाही. दूसरी गोष्ट आम्हाला भाजीमंडईची खूप गरज आहे. नगररचना विभाग झोपला आहे. त्यांना जरा जागे करा. कोणतीही गोष्ट वर्षभरात दिलेली नाही. आम्ही फक्त मार्किंग सांगितले होते. डिपी ओपनियन किती दिवसांत घेतात. त्यांना ते सुद्धा नगरसेवकांना सांगायला लाज वाटते. त्यांना सांगावे लागते की, आमचे हे डिपी ओपिनियन द्या म्हणून. एवढी वेळ येते. कुठलेच काम व्यवस्थित करत नाहीत. नागरवस्ती विभागामार्फत आत्ता सायकल वाटप चालू आहे. त्यात सुद्धा मोठी तफावत आहे. आपल्या विभागातील पात्र यादीमध्ये नावे आहेत. पण नेहरुनगरच्या पात्र यादीत त्यांची नावे नाहीत. मग त्या लोकांना जा तुम्ही नागरवस्ती विभागात, जा नेहरुनगरमध्ये. अशा चकरा मारत फिरावे लागते. नागरीक अक्षरशः वैतागतात. त्यांना

वाटते, जाऊ दे सायकल मिळाली नाहीतरी चालेल. कशाला डोक्याला ताप करायचा. अशी वाईट अवस्था आहे. मशीनबाबतीत सुद्धा अशीच अवस्था आहे. आत्ता मा.शुभांगी बो-हाडे यांनी सांगितले. माझ्या प्रभागात सुद्धा असाच प्रकार झाला होता. नावात बदल झाला होता. जिथे महिलेच्या पतीचे नाव यायला पाहिजे तिथे पत्रकावर चुकून सासऱ्याचे नाव आले होते. प्रतिज्ञापत्र जोडून सगळे सबमिट केले. मी नगरसेविका झाले त्यावेळी त्या महिलेने सबमिट केले होते. अजूनही तिला शिलाई मशीन मिळाली नाही. ज्यांना गरज आहे त्यांना मशीन देत नाहीत. मशीन्स पडून आहेत. फोर व्हिलर ड्रायव्हींग - मी महिला ब बालकल्याण समितीमध्ये असताना त्यावेळी फोर व्हिलर ड्रायव्हींगचा विषय केला होता. त्यावेळी लायसनचा प्रॉब्लेम झाला होता. तेव्हा रिटेंडरींग करायला सांगितले होते. रिटेंडरींग करुन एक वर्ष झाले तरी कुठेही क्लास चालू झाले नाहीत पालिकेचे शिवण क्लास सुरु नाहीत. ते सुद्धा चालू करा शिवणक्लास एप्रिल-मे मध्ये सुरु करतात. महिला दारांत येतात. सुट्यांच्यावेळी हे क्लास सुरु करतात. सुट्यांच्या वेळी क्लास सुरु केलेतर आपल्याला काय फायदा. कारण त्यावेळी मुलांना शाळा-कॉलेजना सुट्टी असल्यामुळे लोक गावाला जातात. हे क्लासेस वेळेत चालू झाले पाहीजेत, एवढेच मला म्हणायचे आहे. सार्वजनिक शौचालय-आमच्याकडे कुठेही नाहीत. मुख्य रस्त्यावर, चौकाचौकात महिलांसाठी एक व पुरुषांसाठी एक अशी सार्वजनिक शौचालये सुरु करण्यात यावी. बोलायला संधी दिल्याबद्दल धन्यवाद!

**मा.सुरेश म्हेत्रे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आपण सन २०१६-१७ चे जे अंदाजपत्रक सादर केले आहे. त्यात शहराचा विशेषतः ग्रामिण भागाच्या विकासाचा समतोल साधण्याचा चांगला प्रयत्न केला आहे. याबद्दल मी आपल्याला खरोखरच धन्यवाद देतो. आपले उत्पन्न कसे वाढवावे, आपला रुपया कसा वाढावा याद्दृष्टिने विशेष प्रयत्न करावेत. विशेषतः एलबीटीची टक्केवारी आहे, ४९.८७%. म्हणजे उत्पन्नातील जवळजवळ ५० टक्के वाटा एलबीटीचा आहे. आता जीएसटी लागू होणार आहे. जीएसटी लागू होण्याआधी एलबीटी राहणार आहे का याबाबत एलबीटी विभागाचे प्रमुख मा.डॉ.माने यांनी माहिती घेणे गरजेचे आहे. कारण आपल्याला जर कुठले टॅक्सेस वाढवायचे असतील तर त्याआधी वर्षभर किंवा सहा महिने आधी त्याचा अभ्यास करुन वाढ करावी लागेल. मिळकत कर असेल, पाणीपुरवठा कर असेल किंवा अन्य इतर मार्ग असतील, त्याचा आधीच अभ्यास करावा लागेल. जीएसटीमध्ये काय तरतूद आहे. एलबीटीपेक्षा काय वेगळे आहे याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. दुसरे म्हणजे पाणीपुरवठा - पाणीपट्टीचे उत्पन्न वाढले पाहिजे. त्यात वाढ होऊ शकते याची अनेक

उदाहरणे मी मागे दिली आहेत. परंतू आपण या विभागाकडे पाहणे गरजेचे आहे. तिसरा प्रश्न म्हणजे - भूमि आणि जिंदगी. महापालिकेच्या इमारती धूळ खात पडल्या आहेत असे मा.नारायण बहिरवाडे यांनी सांगितले. यातून उत्पन्न कसे वाढेल ते मार्ग बघितले पाहीजेत.

आत्ता एलबीटीची जी करपद्धती आहे, त्यात ५० कोटींपेक्षा जास्त उत्पन्न असलेले कारखाने आहेत त्यांना एलबीटी आहे. असे अनेक छोटे-छोटे कारखाने असतील, आपला टर्नओव्हर रु.५० कोटींच्या पुढे जाऊ नये याकरिता विभागणीचा (डिव्हायडेशनचा) मार्ग वापरतात. अनेक प्रकारच्या फर्म काढून ते एलबीटीत कसे बसणार नाहीत ते पाहतात. अशाप्रकारे आपल्याला काळजी घेतली पाहीजे. आणि ज्या कारखान्यांची उलाढाल ५० कोटींपेक्षा जास्त आहे, ते कारखाने मंदीमुळे स्थलांतरीत होण्याची शक्यता आहे. त्यांचीही काळजी आपण घेतली पाहीजे. तसेच मा.आयुक्त साहेब, आपण आल्यापासून ग्रामिण भागाकरिता चांगले बजेट दिले आहे. जाधववाडी असेल, चिखली असेल, च-होली असेल. मी हे पूर्वीही सांगितले आहे. परंतू भूसंपादन प्रक्रिया गतिमान करणे गरजेचे आहे. रस्ते ताब्यात घेणे किंवा जागा ताब्यात घेणे हे गरजेचे आहे.मी यावर यापूर्वी अनेक वेळा बोलून झाले आहे.

टेंडरींग प्रोसेस जलद करणे - हे निवडणुकीचे वर्ष आहे. नोव्हेंबर किंवा डिसेंबर दरम्यान आचारसंहिता चालू झालीतर नगरसेवकांचे कामाकडे दूर्लक्ष होईल. तरी ही टेंडरींग प्रोसेस कशी कमी करता येईल याकडे आपण लक्ष द्यावे. आपण जसे शिक्षण मंडळाचे बजेट मांडताना गणवेश असतील, बूट असतील यावर सर्व सभागृहात चर्चा झाली होती. त्याप्रमाणे विशेषतः स्थापत्य विभागाची कामे याची दखल घ्यावी.

मा.शमिम पठाणताईंनी एलईडीवर सांगितले. भांडार विभागाने लम्पसम खरेदीचा प्रकार केला. पठाणताई माझा हेतू तसा नव्हता. फक्त आम्हाला एलईडी मिळेल का. त्यातले टेक्निकल पॉईंट मी सांगितले होते. सोडिअम व्हेपरचे दिवे कसे खराब होतात ते सांगितले होते. आपण एका संस्थेच्या माध्यमातून ते मिळतील म्हणून थांबलो होतो नंतर भांडार विभागाने ते खरेदी करायचे ठरवले, त्यानुसार ते खरेदी केले. परंतू यात जो एक वर्षाचा काळ गेला. अजूनही एलईडी दिवे बसलेले नाहीत. इथून पुढेही तसेच होणार असेल तर भांडार विभागामार्फत खरेदी करु नका. प्रभागाचे बजेट ठेवलेले आहे. त्या प्रभागाच्या बजेटनुसारच ही खरेदी करावी. लम्पसम खरेदी करण्यामागे तुम्हाला जर रेट कमी मिळत असेल तर सहाही प्रभाग आपल्या महापालिकेचेच आहेत. त्यांना

का देऊ नये. एलईडीची खरेदी ही प्रभागामार्फतच झाली पाहिजे,अशी माझी आपल्याला विनंती आहे.

मघाशी मा.नारायण बहिरवाडे यांनी म्हटले होते, औद्योगिक संग्रहालय होणे गरजेचे आहे. तारांगण किंवा सायन्स पार्क आहे, इथे जागा आहे. सीएसआयआरमार्फत कंपन्यांची मदत घ्यावी. आपल्याकडे टू व्हिलर बनविण्यामध्ये बजाज कंपनी अग्रेसर आहे. एक टू व्हिलर कशी घडली. गिअर किंवा गिअर बॉक्स यांचे कॉम्बिनेशन वाहनांत कसे जुळते. फोर व्हिलरसाठी टाटा कंपनी. या कंपन्यांची मदत घेऊन करता आलेतर अशाप्रकारे विद्यार्थ्यांनी तारांगण किंवा सायन्स पार्क इथे मोठ्या प्रमाणावर व्हिजिट केलीतर त्या विद्यार्थांना ती माहिती त्याठिकाणी उपलब्ध होऊ शकेल. आपण सीएसआयआरमार्फत अशा कंपन्यांची मदत घेतलीतर निश्चितपणे आपल्याला असे औद्योगिक संग्रहालय उभे करता येईल.

नदी प्रदूषण-नदीमध्ये फक्त पावसाळ्याचे पाणी आले पाहिजे. आत्ता जे गटारीचे पाणी येते आहे. ते आलेच नाही पाहिजे. त्याचा उगम कुठून होतो हे पाहणे गरजेचे आहे. स्वच्छ भारत या अभियानाअंतर्गत या योजनेकरीता आपण जरुर बजेट ठेवले आहे. नदीमध्ये गढूळ पाणी कुठून येते, याचा उगम कुठे आहे. याला प्रथम प्रतिबंध केला पाहिजे. नद्या प्रदूषित होणार नाहीत. म्हणजे मा.धनंजय आल्हाट यांच्यावर ही वेळ येणार नाही असे मला वाटते.

पार्किंग-ग्रेड सेपरेटर करताना पार्किंगचा योग्य तो विकास केलेला नाही. उदाहरण घ्यायचे झालेतर बीगबझार आहे. तिथे पार्किंग करायचे झालेतर दुस-या बाजूला झोपडपट्टी आहे. तिथे पार्किंग केलेतर तिथे एफओबी फूटपाथ उभारावा लागेल. तो सुद्धा खर्च वाढेल. अशाप्रकारे पार्किंग करता येईल. परंतू ज्या-ज्या ठिकाणी खरेदीसाठी माणसांची गर्दी होते, व्यापारी केंद्र आहे, हा विषय महत्वाचा आहे. आपण तो ध्यानात घ्यावा.

बसस्टॉप - इंग्लिश अक्षर इ आकाराचे बसस्टॉप प्रत्येक प्रभागाला दोन दिले आहेत. प्रत्येक नगरसेवकाची मागणी असल्यामुळे ते दिले आहेत. परंतू ते उभारणे गरजेचे आहे. ते पहायला मिळत नाहीत. जागा मिळत नाही. एका ठिकाणी वेटींगला दहा पॅसेंजरपण उभे राहिलेले दिसत नाहीत. आवश्यक त्या ठिकाणी हे बसस्टॉप उभे रहावेत. सन्मा.नगरसेवकांना मी हे सांगू इच्छितो की, आपल्या वॉर्डात जर गरज नसेल तर त्यांनी जे मोठे रस्ते असतील त्याठिकाणी ते उभे करावेत. हा बदल करावा. जेणेकरुन आपले रस्ते वाचतील.

नागरवस्ती विभाग - सायकल खरेदी व मशीन खरेदीबद्दल अनेक सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. नागरीकांचा अपेक्षाभंग होतो आहे, आमचाही अपेक्षाभंग होतो आहे. वेळेवर काही मिळत नाही. अर्ज अपात्र जास्त केले जातात. म्हणून नागरवस्ती या विभागाचे नाव बदलून नांगरवस्ती असे ठेवावे असे मला वाटते. काहीच मिळत नाही. विशेष म्हणजे बोलण्यासारखे खूप होते नारायणरावांनी अनेक शेर मारले. थोड्या काळांत तिन्ही लोकांत फिरणारे, तिन्ही लोकांची एक ना एक खबर घेणारे वक्ते होते. आणि ती खबर देव लोकांत पोहोचण्याचे काम करणारे एक देवता होते, त्यांचे नाव नारदमुनी. नारायण नारायण. आत्ताच्या कलियुगातले असेच एक व्यक्तिमत्व आपल्या सभागृहात आहे, जे अंदाजपत्रकाच्या पान अन पानावर नजर ठेवून त्याचा अभ्यास करुन आपल्या सर्वांना प्रत्येक पानाची खबर घेणारे असे व्यक्तिमत्व म्हणजे मा.नारायण बहिरवाडे. आज त्यांनी अंदाजपत्रकावर भरपूर काही सांगितले. त्यामुळे जास्त काही बोलण्यासारखे राहीलेले नाही. धन्यवाद.

**मा.सुलभाताई ऊबाळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, सन २०१६-१७ चे रु.२७,०७,०४,०१,०००/- रुपयांचे अंदाजपत्रक मांडले आहे. त्यात जेएनएनयूआरएमचा सहभाग घेतलेला नाही. आर्थिक स्त्रोत एलबीटी घेतला आहे. पहिल्यांदाच आरंभीची शिल्लक ही रु.२,७७,३७,००,०००/- एवढी पहिल्यांदाच दिसते आहे. मागील आर्थिक वर्षात ११०३ कोटी इतके एलबीटीचे उत्पन्न होते. या वर्षी जवळपास रु.१३०० कोटी मिळाले. ११०३ कोटींचे टार्गेट आपण जानेवारीमध्येच क्रॉस केले होते. त्याबद्दल एलबीटी विभागाचे अभिनंदन करणे क्रमप्राप्त आहे. परंतू हे अभिनंदन करत असताना त्याची कारणे सुद्धा आपण तपासली पाहिजेत. कारण पुढील वर्षी ही वाढ होईल का नाही हे आपल्याला माहित नाही. हे लक्षात आले आहे म्हणून मा.आयुक्त साहेब यांनी ५० कोटींची वाढ पुढील वर्षी धरलेली आहे. जकात बंद व एलबीटी सुरु या घोषणेदरम्यान १ एप्रिल ते १ ऑगस्ट आपल्या विभागाने जोरात वसूली केली. किंवा लोकांनी काय होणार हे घाबरुन स्वतः आणून पैसे जमा केले आहेत. दररोजचा भरणा रु.७०/८० लाख असा होता. त्यामुळे या चार/पांच महिन्यांत ४०० कोटी जमा झाले होते. त्याचवेळी ५० कोटींपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या लोकांना एलबीटी माफ अशी घोषणा झाली. त्यावेळी आपले मुख्यअधिकारी जे एलबीटी विभागाचे प्रमुख आहेत, डॉ.यशवंत माने व त्यांच्या पूर्ण टिमने याची पूर्वकल्पना असल्यामुळे व्हॅटकडून आधीच ५० कोटींपेक्षा जास्त उत्पन्न आहे त्यांचा डाटा मिळवला होता. म्हणून अजिबात वेळ न दवडता या मंडळींनी संबंधित सगळे एलबीटीचे जे ग्राहक आहेत, त्यांना नोटीसा पाठवून

अगदी उत्तम प्रकारे वसूली केली आहे. त्याबद्दल त्यांचे पुन्हा एकदा अभिनंदन. आपल्याला ५० कोटींच्या खालच्या एलबीटीबद्दल शासनाने अनुदान देऊ केले आहे. प्रथमतः ६० टक्के अनुदान दिले. आणि आता ते ४० ते ४२ टक्क्यांवर आले आहे. मा.महापौर साहेब, जकात जाऊन एलबीटी आली, त्याचवेळी ७४व्या घटनेनुसार आपल्या मनपाच्या अधिकारावर गदा आली होती. जकात होती त्यावेळी आपल्याला शासनाच्या अनुदानासाठी वाट बघावी लागत नव्हती. २०१३ला एलबीटी आली, त्यावेळी आपण शासनावर १० टक्के अवलंबून होतो. २०१५ ला आपण शासनावर ६० टक्के अवलंबून आहोत. जीएसटी येणारच नाही असे मा.नारायण बहिरवाडे म्हणाले. त्याची काळजी करु नका बहिरवाडे साहेब. जीएसटी ही येणारच आहे. येणार नाही असे नाही. जेव्हा जीएसटी येईल, त्यावेळी आपल्याला शंभर टक्के शासनाच्या तोंडाकडे बघत बसावे लागेल हे खरे आहे. तेव्हा शासनाचे तोंड बघायच्या ऐवजी आमचे बघा. शासनाच्या कुबड्यांवर आपल्याला आपले हे पुढचे बजेट न्यायचे आहे हे आपण मान्य केले पाहीजे. त्यासाठी तरी नीट वागावे, नम्र वागावे, नेमाने वागावे, आदराने वागावे, अशी आम्ही आपल्याला नागरीकांच्या वतीने विनंती करतो. पुढचा महानगपालिकेच्या स्थायी समितीचा चेअरमन हा भाजप-शिवसेना युतीचाच बजेट वाचणार आहे हे मी तुम्हाला सांगते. युती होईल नाही होईल पण बजेट आमचाच चेअरमन वाचणार आहे, हे मी याठिकाणी आपल्याला सांगते.

या अर्थसंकल्पात वॉर्डस्तरीय निधी चांगला दिला आहे, त्याबद्दल मी आयुक्त साहेबांचे अभिनंदन करते. राष्ट्रवादीचेच चालले असते तर ज्येष्ठ नगरसेविका मा.झामाबाई बारणे आत्ता काय बोलल्या याचे आत्मपरिक्षण आपण सर्वांनी करा. मला या विषयाकडे जायचे नाही. आपण मला या विषयाकडे घसरायला लावू नका. सगळ्यांचे समाधान करायचा प्रयत्न मा.आयुक्त साहेबांनी केला आहे. तुम्ही जगा, दुस-याला जगवा ही आपली जी उदार भावना आहे. म्हणून तुम्ही सगळ्यांना व्यवस्थित बजेट देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतू पुढील वर्षी अनुदानामुळे समजा कुठे कात्री लावायची वेळ आली, त्यात आपल्याकडून काही चूका झाल्या, त्यामुळे जेव्हा कुठे कात्री लावायची वेळ येते. तेव्हा तुम्ही जिथे १०० कोटींचे बजेट दिले, तिथून कात्री लावायला चालू करा. म्हणजे तुम्ही वॉर्डमध्ये सगळ्यांचे बजेट दिले आहे. मघाशी मा.नारायण बहिरवाडे यांनी सांगितले, आमच्याकडे नको. मोशीत कुत्री पाठवा. अशाप्रकारे जेव्हा बजेटमध्ये कमी तरतूद करायची वेळ येईल, कात्री लावायची वेळ येईल, तेव्हा सगळ्यांत जास्त बजेट जिथे दिले आहे, तिथून सुरु करावे.

मा.महापौर साहेब, आपले दुसरे स्त्रोत आहे, मिळकत कर. सन २०१६-१७ च्या आर्थिक वर्षामध्ये रु.४५० कोटींचे उत्पन्न अपेक्षित आहे. एकूण मिळकत संख्या ४,२८,९१९ आहे. अवैध शास्ती ६५,७०६ आहे. सर्वेनुसार अजून बारा ते पंधरा हजार मिळकतींच्या नोंदी होणे शिल्लक आहे. सन २०१३-१४ ला २५० कोटी उत्पन्न अपेक्षित होते. पण २५१ कोटी गोळा झाले. डॉ.श्रीकर परदेशी साहेब असताना सर्वे झाला होता. त्यात या सगळ्या अनधिकृत नोंदी सापडल्या होत्या. या नोंदी नसलेल्या मिळकती सापडल्यामुळे, या नोंदी नसलेल्या बांधकामांमुळे आपल्या इच्छा-आकांक्षा वाढल्या. आपण सन २०१४-१५ मध्ये १५० कोटींवरुन वाढून डायरेक्ट ४०० कोटींची अपेक्षा बजेटमध्ये केली. परंतू ३१२ कोटीच जमा झाले. कारण त्यावेळी निवडणूका होत्या. शास्तीकरासंदर्भात महासभेतून, सगळ्या स्तरांतून जाहिर घोषणा केल्या गेल्या की, कोणी शास्तीकर भरू नका. त्यामुळे मिळकत कर कमी प्रमाणात गोळा झाला. आपण सन २०१५-१६ ला ४२५ कोटी अपेक्षित धरले आहेत. परंतू आजपर्यंत ३६१ कोटीच जमा झालेले आहेत. शास्तीकराची रक्कम ही जवळजवळ १०० कोटींपर्यंत आहे. आणि ती वसूल झाली नाही. ती आता होणार नाही आणि ती तुम्ही वसूलही करु नका. ज्यावेळी शासन आदेश प्राप्त होतील, त्यावेळी आपल्याला शास्तीकर मिळणार नाही. मिळकत कर वसुलीमध्ये कोर्ट केस आणि लिक्विडेशन यामध्ये आपले जवळजवळ २७६ कोटी रुपये अडकले आहेत. सामान्य नागरीक वेळच्या वेळी कर भरत असताना कर वेळेत भरला नाहीतर आपण धाक दाखवून जप्तीची नोटीस दाखवून कर गोळा करतो. परंतू मोठमोठ्या धेंडांना ज्यांची करोडो रुपयांची बाकी आहे, ते स्वतः करोडो रुपये कमवतात, त्यांना कोर्टकेसच्या नावाखाली मुभा देतोय. आपल्याला माहित आहे की, आपल्याकडे काय-काय विभाग आहेत. इथे रेकॉर्ड उपलब्ध आहे. १४५ मिळकतींसंदर्भात कोर्ट केस चालू आहे. आपल्या कायदा विभागातले लोक तिथे जातात व मान खाली घालून परत येतात. १४५ मिळकत कराच्या केसेस प्रलंबित असताना त्याचा पाठपुरावा कोणी करायचा. २०११ पासून शैक्षणिक संस्थांना मिळकत कर माफी असे म्हटले होते. पण आपण महापालिका सभेमध्ये ठराव करुन ही माफी रद्द केली आहे. त्यांच्याकडून निवासी दराने मिळकत कर घ्यावा असे आपल्या महासभेने मंजूर केलेले आहे. असे असताना आत्तापर्यंत फक्त ५० टक्केच शैक्षणिक संस्था कर भरत आहेत. ज्या संस्था लाखो रुपयांचे डोनेशन घेतात, मुलांकडून फी घेतात, अशा संस्थांना मात्र आपण सोडले आहे. डी.वाय.पाटील संस्थेकडे रु.१८ कोटींची थकबाकी आहे. सरळ सरळ महासभेने ठराव केलेला असताना आपण गोरगरीबांकडून कर वसूल करतोय. मग अशा संस्थांना

कर माफ केला नसताना सुद्धा आपला कायदा विभाग काय करतोय. आपण ही गोष्ट कशी काय खपवून घेतोय. त्याचबरोबर रुबी एलकेअरला वाय.सी.एम.मध्ये जागा देत असताना प्रचंड विरोध झाला असताना सुद्धा आमचे स्वर्गीय डॉ.नागकुमार यांच्या विनंतीनुसार सगळ्यांना याला परवानगी दिली. त्यांनी रु.८५ लाख इतका कर थकवला आहे. नुसता थकवला नाहीतर त्यांनी कोर्टात जाऊन स्टे घेतला आहे. मा.महापौर साहेब, तुम्ही सांगा, आपण जेव्हा कोणत्याही संस्थेला एखादी गोष्ट भाड्याने देतो, त्यावेळी बिटविन टू ॲग्रीमेंट असते. त्यात सरळ-सरळ लिहिले आहे की, या मिळकतीचा कर संबंधित संस्था भरणार आहे. ही धर्मादाय संस्था नाही. आपण आपली इमारत त्यांना देऊ केली आहे. असे असताना त्यांनी स्टे घेतला आहे. कायदा विभाग काय करत होता. ॲग्रीमेंटमध्ये क्लिअरकट म्हटले असताना कायदा विभागाला प्रश्न उठू नये. याचा अर्थ एवढाच होतो की, कायदा विभाग त्याठिकाणी मॅनेज होतो. ते वकील त्याठिकाणी मॅनेज होतात व महापालिकेचे आर्थिक नुकसान करतात. या वकीलांना या महासभेत उभे करुन सदस्यांनी त्यांची उलट तपासणी घेतली पाहिजे की, का तुम्ही आमच्या पैशांचा असा दुरुपयोग करताय.

पाणीपट्टी-मा.महापौर साहेब, पाणीपट्टीची वसूली अत्यंत निष्काळजीपणे सुरु आहे. एकिकडे नागरीक आमच्याकडे येतात आणि सांगतात, आम्हाला पाण्याचे बील भरायचे आहे. पण आम्हाला बीलच आले नाही. सन २०१३-१४ ला रु.५८ कोटी अपेक्षित असताना रु.३३ कोटीच वसूली झाली. सन २०१४-१५ ला रु.६० कोटी अपेक्षित असताना रु.३२ कोटींची वसूली झाली. सन २०१५-१६ ची वसूली अजून पूर्ण झालेली नाही मला कळत नाही की, सन २०१५-१६ मध्ये ६५ कोटी अपेक्षित असताना सन २०१६-१७ करिता ६० कोटीच का अपेक्षित धरले. म्हणजे तुम्ही हायर साईडला जायला पाहिजे का लोअर साईडला जायला पाहिजे. तुम्ही कमी अपेक्षित का धरलेत. तुमचा तुमच्या विभागावर विश्वास नाही. किंवा अपेक्षित उत्पन्न कमी धरल्यानंतर पुढे कोणी बोलायला नको म्हणून अपेक्षित उत्पन्न कमी धरले. पाणीपट्टी बील वाटपात सुसुत्रता नाही पुणे महानगरपालिका प्रॉपर्टी टॅक्स बीलाबरोबरच पाण्याची बीले पाठवते. जातील त्यांना बीले जातील. नागरीकांना बीले वेळेत मिळाली तर निदान आपले उत्पन्न वाढणार आहे. आपण अनधिकृत नळ कनेक्शन्स शोधून काढले पाहिजेत जेव्हापासून त्यांच्या मिळकतीला अनधिकृत नळ कनेक्शन लागले आहेत, तेव्हापासून त्यांच्याकडून दंड घेऊन ते अनधिकृत नळ कनेक्शन्स अधिकृत केले पाहिजेत. पाण्यावाचून कोणी राहत नाही. तुम्ही नळ कनेक्शन द्या अथवा नका देऊ. लोकं पाणी घेतात, पाणी वापरतात.

अधिकृत नळ कनेक्शनवाले दोनशे रुपयाचे पाणी वापरत असतील तर अनधिकृत नळ कनेक्शनवाले चारशे रुपयाचे पाणी वापरतात याचे तुम्हाला भान आहे का. मग अशा लोकांसाठी तुम्ही काहीतरी योजना काढली पाहिजे. आत्ता तुम्हाला आजचा सकाळ पेपर दिला गेला आहे. त्यामध्ये चार ठिकाणी मोठी पाणी गळती आहे अशा प्रकारची फोटोसह बातमी छापून आली आहे. तुम्ही अधिका-यांवर काय कारवाई करणार आहात ते तुम्ही सांगा. आपण एकिकडे लातूरची उदाहरणे देतो, दुसरीकडे आपल्या नागरीकांना पाणी नाही. असे असताना एवढी मोठी पाणीगळती होत असेलतर याला जबाबदार कोण. हे नगरसेवकाचे काम आहे का. आपण याकडे स्वतः लक्ष दिले पाहिजे.

इतर विभागांत, परवाना विभाग, जो सगळ्यांत महत्वाचे उत्पन्न देऊ शकतो. त्याकडेसुद्धा आपण लक्ष दिले पाहिजे. बिनाखर्चात जास्तीत जास्त उत्पन्न मिळवून देणारा हा विभाग आहे. आपली काय इन्व्हेस्टमेंट यात आहे. काही मेंटेनन्स नाही. तरीसुद्धा तुम्ही या विभागाकडे लक्ष देत नाही. पुणे महानगरपालिकेत या विभागाकडून जवळजवळ रु.३० कोटी वसूल होतात. आणि आपल्याकडे फक्त रु.४.६० कोटी वसूल झाले आहेत. रु.६ कोटी अपेक्षित आहेत. आपले दर अत्यंत कमी आहेत. अनधिकृत बोर्डांची संख्या प्रचंड झाली आहे. ज्याच्याकडे जागा आहे तो बोर्डाचा एक पाय आपल्या शेतात टाकतो आणि दुसरा पाय रस्त्यावर टाकतो. खुशाल जाहिरातीचे भाडे वसूल करतो. दोन बोर्डांमध्ये अंतर किती असावे याचे नियम असतांना सुद्धा मोशीवरुन बाजार समितीकडे जात असताना किती मोठा बोर्ड लागला आहे. तिथे जास्तीत जास्त अपघात होतात. अशाप्रकारे समोरच बोर्ड असेलतर अपघातांचे प्रमाण वाढणार आहे. तुमच्या घराकडे वळताना कितीतरी बोर्ड रस्त्याच्या कडेला आले आहेत. आत्ता फ्लायओव्हरचे काम चालले आहे. रस्ता टर्न करताना हे बोर्ड समोर येतात. यो गोष्टीकडे कोणी लक्ष देणार आहेत का. अनधिकृत बोर्डचे तुम्ही सांगितले की, सर्वे चालू आहे. सर्वे सुरु झाला आहे. पण तुम्हाला हे देखील माहिती आहे की, एकिकडे आपल्याला कोर्टाने सक्त ताकीद दिली आहे. कोर्टाने सगळ्या महानगरपालिकांना आदेश दिले आहेत की, अनधिकृत बोर्डांवर कारवाई झाली पाहिजे. तुम्ही करत नाही आहात. मग तुमच्यावर कन्टेम्प ऑफ कोर्ट का होऊ नये. तुम्ही याकडे लक्ष द्यायला पाहिजे होते. मुख्य म्हणून तुमची जबाबदारी आहे. या गोष्टींवर सुद्धा आपण निर्णय घेणे गरजेचे आहे.

मा.महापौर साहेब, आपल्या काही योजना आहेत. यात भामा-आस्केड हि सगळ्यात महत्वाची योजना आहे ज्याकडे आपल्या सगळ्यांचे दूर्लक्ष आहे कारण प्रशासनाचे कागदोपत्री काम चालले आहे. परंतू मी सगळ्या सभागृहाला हे सांगू इच्छिते

की, आपल्याला दि.६/३/२०१४ रोजी पाणी उचलण्यासाठी शासनाने मान्यता दिली आहे. तीन महिन्यांत करारनामा करण्यात यावा असेही नमूद केले आहे. परंतू आजतागायत तो करारनामा केलेला नाही. आपल्याला त्याठिकाणी रु.८६.४९ कोटी म्हणजे एकूण २१७ कोटी भरायला सांगितले आहेत. तुम्हाला ही रक्कम जास्त वाटली. त्याचे कारण आपल्याला एवढे पैसे भरायचे नाहीत. शासनाकडून माफी मागायची ही तुमची मनस्थिती आहे. तसा पत्रव्यवहार तुम्ही शासनाकडे केला आहे. यामुळे चिखली, मोशी, वडमुखवाडी, दिघी व मोशी या परिसराची पाण्याची तहान भागवली जाणार आहे. मग असे असताना आपण रु.२१७ कोटींकडे बघत बसायचे का शासनाला म्हणायचे की आम्हाला माफी मिळत नसेलतर ८/१० वर्षांसाठी पुणे महापालिकेने जसे इन्स्टॉलमेंट घेतले आहे, तसे इन्स्टॉलमेंट घेतले तर आपल्याला वर्षाला रु.२१ कोटी भरायला लागतील. फालतू खर्च बंद केलातर आपण हे रू.२१ कोटी भरू शकतो. मग तुम्ही विषाची परीक्षा का बघताय. आज पाण्यावरून महायुद्ध होण्याची चिन्हे असताना तुम्हाला मंजूर असलेला कोटा तुम्ही घेत नाही नंतर शासनाच्या नावाने दोन्ही हातांनी बोंब ठोकायला तुम्ही रिकामे व्हाल. आजच्या या आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये तुम्ही तुमचे रिझर्व्ह पाणी घेतले नाही, आणले नाही, दुस-या कोणाला दिलेतर, तुम्हाला पाणी-पाणी करुन रहावे लागेल. मा.महापौर साहेब, मी तुम्हाला सगळ्यांना सांगू इच्छिते की, डॉ.श्रीकर परदेशी आयुक्त असताना आंदरा धरणवाल्यांनी आपल्याला आंदरा धरणाचे बांधकाम व खर्च मागितला होता. त्यांनी आपला ७० टक्के हिस्सा मान्य केला होता. फक्त १०० कोटी भरायचे होते. परंतू तो प्रस्ताव विधी समितीपुढे गेलाच नाही. आज परिस्थिती काय आहे. त्यावेळी पैसे भरले असतेतर आज ते धरण आपल्या नावावर झाले असते. नवी मुंबईचे मोडवी म्हणून धरण आहे. त्यांनी त्या धरणाचे पैसे भरुन त्यात आपला हक्क ठेवला. आज आख्खी नवी मुंबई स्वतःच्या धरणाचे पाणी पिते. त्यांना कुठेही हात पसरावे लागत नाहीत. हे सगळे आपल्याला करणे अवघड होते का. आपल्याला देखील संधी आली होती. युतीचे शासन असताना रु.६० कोटींमध्ये त्यावेळी बंद पाईप योजना होत होती. परंतू याठिकाणची सत्ता व युतीचे शासन यांचा ताळमेळ बसला नाही म्हणून यांनी ती योजना नाकारली. आणी पुढे जाऊन हिच योजना रु.४५० कोटींपर्यंत गेली. म्हणजे योग्य वेळी योग्य निर्णय घेणे हे सुद्धा सत्ताधा-यांचे प्रशासनाचे कर्तव्य असते. ते त्यांनी केले नाही तर त्याचे भोग पुढल्या लोकांना भोगावे लागतात. मा.महापौर साहेब, मी तुम्हाला यानिमित्ताने विनंती करते की, जे काही रु.२१७ कोटी भामा-आस्केड यांनी मागितले आहेत, ते पैसे कुठे जात नाहीत. शासनाचे

पैसे शासनाकडेच जातात. त्याचे टप्पे करुन घ्या. डब्ल्यूटीपीसाठी चिखली इथे जागा आहे. हे सगळे केलेतर पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. सुरुवात केलीतर शेवट होईल. सुरुवातच केली नाहीतर तुम्ही कोणाच्या नावाने ओरडणार आहात तुम्ही या प्रकल्पाची सुरुवात करा. शासनाची वाट बघत बसू नका. माफ करण्यामध्ये आता शासन पुढे नाही. शासन म्हणते, तुम्ही काम करा, आम्ही तुम्हाला पाहिजे तेवढी मदत करतो, पाहिजे तेवढे अनुदान देतो. मा.आयुक्त साहेब, यात आंदर-भामा-आसखेडमध्ये पुढील ४० वर्षांचे नियोजन आहे. पुढची ४० वर्षे आपल्याला पाण्यासाठी कोणाकडे बघावे लागणार नाही. हे कोणी केलेतर, तुमचे नाव, सत्ताधारी पक्ष असताना यांचे नाव आणि सदस्य म्हणून आम्हाला सुद्धा कुठेतरी सांगावेसे वाटेल की, ही योजना आमच्या काळात झाली. मा.महापौर साहेब, आत्ता रिवाईज डिपी होतो आहे. यात शहराच्या प्रतिष्ठेत भर घालतील असे प्रकल्प करुन घेतले पाहिजेत. आपले बजेट आहे. आपण नेहमी पुण्याशी तुलना करतो. पुणे स्मार्ट झाले. आम्ही झालो नाही असे आपण नेहमी म्हणत असतो. खरे आहे. पण तुम्ही सांगा, पुण्यामध्ये युनिव्हर्सिटीज् आहेत, मोठे-मोठे ऐतिहासिक काळातले कॉलेजेस आहेत, स्कूलस् आहेत आपण अशी कधी इच्छा व्यक्त केलीत का, अशी तरतूद ठेवली आहे का की, आपल्याकडेही एखादे विद्यापीठ असावे. आज ना उद्या आपल्या शहराची लोकसंख्या पुणे शहराच्या बरोबरीने होईल. आपल्याकडे इतक्या आरक्षित जागा आहेत. आपण त्या शिक्षण संस्थांना देऊ केल्या, तुम्ही शिक्षण संस्थांना बोलवले व सांगितले की, आमच्या भागातल्या गोरगरीब वर्गातील २५ टक्के/३० टक्के मुलांना तुमच्या संस्थांमध्ये प्रवेश दिलाच पाहिजे त्यांच्याकडून फी घ्यायची नाही. तरीदेखील या संस्था हसत-हसत इथे येतील. आपल्याकडे डेव्हलपमेंट करायला पैसे नाहीत. पण डबल टिडीआरमुळे लोक आरक्षित जमिनी द्यायला तयार होतील. परंतू संस्था कुठे आहेत. तुम्हाला नियोजन करायला देखील वेळ मिळणार नाही. निवडणूका आहेत. पुढील वर्षी यातील कितीजण बजेटला असतील हे माहित नाही. असे असताना तुम्ही या गोष्टींकडे, रिवाईज डि.पी.कडे गांभिर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. आपल्याला माहित आहे की, डबल टिडीआरचे धोरण आले आहे. त्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेने ९ मी.चा विषय घेतला आहे. आपणही या गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे. ज्याठिकाणी रिडेव्हलपमेंट आहे, तिथे ६ किंवा ७ मी.वर परवानगी देण्याची सूचना केलीतर आपल्याला प्रिमियम सुद्धा मिळेल आणि आपला सुद्धा विकास झाल्याशिवाय राहणार नाही. आपले सगळ्यांचे स्वप्न आहे की, आपले शहर संपूर्ण देशामध्ये क्रमांक एक चे शहर असावे. त्यासाठी आपण सर्वजण प्रयत्न करतोय. इथे कुठल्याही पक्षाचा विरोध

म्हणून विरोध करायची कोणाचीच भूमिका नाही. ज्यावेळी आमच्या शहराचा विषय येतो, तेव्हा आम्ही शहराबरोबर असतो. ज्यावेळी मावळातला विषय वेगळा असला तरी त्यावेळी आम्ही शहराबरोबरच राहिलो होतो की, आम्हाला पाणी पाहिजे आहे. यावेळी देखील सगळ्या विकास कामांसाठी आम्ही तुमच्याबरोबर राहणार आहोत.

सभागृहात जे काही विषय चर्चीले गेले ते विषय मी परत रिपीट करणार नाही. महिला व बालकल्याणचा विषय चर्चीला गेला. परंतू त्याकडे लक्ष द्या. महाराष्ट्रातल्या सगळ्या महापालिका आपण त्यासाठी ठेवलेले एवढे पैसे, त्यावरील खर्च होणार पैसा व विभाग यांच्याकडे तोंड वासून बघतात. एवढे पैसे, एवढे पैसे असे म्हणतात. पण त्याचे आऊटपुट काय. नील आहे. तिथे आपल्याकडे सक्षम अधिकारी नाही. आहेत त्यांचं काय होतय ते तुम्हाला माहित आहे. पुणे महापालिकेत शंभर ते दीडशे समुह संघटक आहेत, आपल्याकडे १६ आहेत. ते पण आपल्याकडे क्लेरिकल जॉब करत आहेत. कुठच कुणाला कुणाचे पडलेले नाही. ज्याला त्याला आपला वॉर्ड सुधारावा असे वाटतेय. मा.महापौर साहेब, तुम्ही कमीत कमी लोकांच्या भावना जाणता. तुम्ही तीन ते चार वेळा निवडून आला आहात. तुम्हाला माहित आहे, आपल्या लोकांना काय पाहिजे आहे. मा.आयुक्त साहेब, भामा-आसखेड या गोष्टीचा जो उल्लेख होतो आहे, त्यावर आपण प्रामुख्याने लक्ष द्यावे. तुम्ही उत्तम प्रकारचे बजेट मांडले आहे, त्याबद्दल मी तुमचे आभार मानते. धन्यवाद.

**मा.आशा शेंडगे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आज आपल्या महानगरपालिकेचे सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक याठिकाणी सादर होते आहे. खरेतर बराच वेळ झाला मी हात वर करतेय. तुम्हाला सांगतेय, मला बोलू द्या. मी थोडीशी बॅटींग करणार आहे आणि जाणार आहे. कदाचित आमची विकेट पडेल. परंतू तुम्ही आमच्याकडे लक्ष दिले नाही. आज याठिकाणी बजेट सादर करत असताना मी ज्यावेळी याचे अवलोकन केले, त्यावेळी मला जाणवले की, आपल्याकडे रु.२७७ कोटींची शिल्लक दिसतेय. आणि मला कौतुक वाटतेय की, सन्मा.आयुक्त राजीव जाधव साहेबांनी किती सुंदर नियोजन केले व आपल्याकडे एवढी रक्कम शिल्लक ठेवली. आणि म्हणून मी मागील वर्षाचे पुस्तक काढले. त्यातही पाहिले की, सुधारीत अंदाजपत्रक व मुळ अंदाजपत्रक, त्यावेळी सुद्धा असेच होते की, बजेटमध्ये आपल्याकडे शिल्लक राहणार आहे. परंतू ज्यावेळी या वर्षाच्या पुस्तकावर १५-१६ आले आणि तुम्ही ते खोटे ठरवले. या वर्षी जमा पेक्षा खर्च जास्त झाला आहे. या वर्षी तसेच होऊ नये याची काळजी याठिकाणी घेणे गरजेचे आहे. तसेच यावर्षी बजेटचे पुस्तक चाळत

असताना आणखी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की, जेवढी विकासकामे आहेत, ती सगळी विकासकामे आपण याठिकाणी त्वरित मंजूर केली. त्याची कार्यवाही केली. त्याची निविदा प्रक्रिया संपवली. आणि लवकरात लवकर आमच्या आमच्या प्रभागांत सगळ्या नगरसेवकांना काम करण्यासाठी मुभा दिली. असे तुमचे म्हणणे असलेतरी आज सुद्धा आमच्या प्रभागात जानेवारी-फेब्रुवारी पर्यंत निविदा प्रक्रिया चालू होती. जर हिच परंपरा या वर्षीही ठेवलीतर निश्चितपणे आम्ही जेवढे नगरसेवक सभागृहात निवडून आलो आहोत, आमची अवस्था बिकट झाल्याशिवाय राहणार नाही. आज तुमच्या बजेटला मंजूरी मिळेलच. म्हणून मी विनंती करते की, आपण देखील विडा उचलला पाहिजे. जसे आज २० मार्च म्हटले आहे. बजेट मंजुरीसाठी देणार आहोत. आपण सुद्धा शप्पथ घेतली पाहिजे की, पुढील महिन्याभरात जे काही टेंडर्स असतील ते काढून वर्कऑर्डर दिली जाईल. नगरसेवकांच्या वॉर्डमध्ये कामे चालू असतील. परंतू दूर्दैवाने तसे झालेले दिसत नाही. महिनोनमहिने आपल्याकडे कामाची प्रक्रिया चालू असते. आपल्या अधिका-यांना विचारले की, कामाचे काय झाले. ताई, बजेटच नाही, आपल्याकडे काम होणारच नाही अशा प्रकारची चुकीची उत्तरे आम्हाला ऐकायला मिळतात. त्यामुळे मी आपल्याला विनंती करते की, आपण कोणत्याही परिस्थितीमध्ये निश्चय कराल. आम्ही सुदैवाने तुम्हाला सभागृहामध्ये दुस-यांदा पाहतोय. आम्हाला सगळ्यांना तुमच्याशी जवळीक देखील निर्माण झाली आहे की, आमचे साहेब काम करतात. भले नाही म्हणत नाहीत. हो म्हणतात. तुमचा पॉझिटीव्ह ॲटीट्युड आहे. त्यामुळे आम्ही खूप खुष आहोत. त्यामुळे तुमचे मनापासून धन्यवाद

मा.आयुक्त साहेब, ज्यावेळी हे बजेट मांडले, त्यात बजेटच्या १.५४ टक्के बजेट आपण उद्यान विभाग व पर्यावरण विभागासाठी राखीव ठेवण्याचे नियोजित आहे. आपण या विषयावर इतकी रक्कम खर्च करणार आहोत. सन्मा.बहिरवाडे काकांनी उद्यान विभागाचे कौतुक सांगितले. वस्तुस्थिती पाहिली तर, तुम्ही १२३ नगरसेवकांना विचारा. साळुंके साहेबांना फोन केल्यानंतरचे रिपोर्टींग काय असते. तुम्हाला आठवत असेल, साहेब, आपण मागे एकदा एका कामासंदर्भात विद्युतच्या तुपे साहेबांना फोन लावला होता. पण ते कधीच फोन उचलत नाहीत. हिच अवस्था साळुंके साहेबांची आहे. त्यांना फोन उचलण कधीच माहित नाही. आमचं दोन रुपयांचं पर्सनल काम त्यांच्याकडे येत किंवा आमच्या प्रभागात फुलांचे प्रदर्शन मांडायचे आहे, असा आमचा कोणताही विषय त्यांच्याकडे नसतो. तरीसुद्धा ते फोन उचलत नाहीत. या बजेटमध्ये उल्लेख केला आहे की, आपण शहराचे ३१ टक्के ग्रीन कव्हरेज केले आहे. एवढे ग्रीन शहर असेलतर

कसे काय प्रदूषण खूप आहे पर्यावरण खराब आहे असे आपण म्हणतो. म्हणजे हे कोणत्या बेसवर केले आहे. आणि त्यावर लिहिले आहे, यावर्षी आपल्याला पन्नास हजार झाडे लावायची आहेत. हे आपले या वर्षाचे प्लॅनिंग आहे. असेही त्यात नमूद केले आहे. आपण या वर्षी पन्नास हजार झाडे लावायचा मानस ठेवतोय तर मग मी मागील वर्षाचे पुस्तक चाळायचा प्रयत्न केला. मग इथून मागे आपण काय केले तर जवळपास सन २०१५-१६ मध्ये त्यांनी सांगितले की, त्यांनी ४३,६४८ झाडे लावलेली आहेत. त्याही वर्षी ते म्हणाले होते, ५५,००० झाडे लावणार आहोत. याही वर्षी ते ५०,००० झाडे लावणार आहेत. असे आहेतर आमचा पर्यावरणाचा आलेख इतका ढासळलेला का दिसतोय. आपण महानगरपालिकेत पर्यावरण विभाग वेगळा स्थापन केला आहे. तिथे बसणारे एचओडी हे फक्त त्यांच्या केबिनचे पर्यावरण सांभाळतात की काय. तांब्या भांडं सगळ्या गोष्टी अत्यंत चांगल्या प्रकारे पाळतात. ही चांगली गोष्ट आहे. परंतू त्यांनी शहरात देखील पाहणे गरजेचे आहे. त्यांच्याबाबतीत सांगायचे झालेतर मा.धनंजय आल्हाट इथे जलपर्णी लावून आले आहेत. म्हणजे उद्यान विभाग असेल, पर्यावरण विभाग असेल, आरोग्य विभाग असेल, या सगळ्यांची एकमेकांशी नाळ जोडलेली आहे. उद्यान विभागाला सांगितले, ग्रीन गार्डन तयार करा. तुम्ही सगळ्या ठिकाणी हिरवळ मेंटेन करा. तर आपल्या उद्यान विभागाला जमणार नाही. तितक्या चांगल्या प्रकारे नदीवर जलपर्णी तयार झाली आहे. बघितले तर हेवा वाटतो, इतके सुंदर गार्डन कुठे दिसणार नाही. परंतू आपल्या शहरातील नदीवर ही जलपर्णी आहे.

मा.आयुक्त साहेब, चार वर्षे पूर्ण झाली. आता हे आमचे पाचवे वर्ष सुरु झाले आहे. दरवर्षी जलपर्णीवर बोलायचं. ना आयुक्त टस की मस होतं ना अधिकारी टस की मस होतं. मग पुढच्या वर्षी पुन्हा जलपर्णीवर बोलायचं दरवर्षी त्या जलपर्णीवर लाखो रुपये खर्च करतो. आमच्याकडे डास निर्माण झालेले असतात. आमच्या नागरीकांचे आरोग्य धोक्यात आलेले असते. मग आपण करतो काय. जर आम्हाला चार वर्षांत मेंटेन करता येत नाही. मागील टर्ममधील नगरसेवक यावर बोलले नसतील असे मला वाटत नाही. परंतू आम्ही स्वतः या चार वर्षांत साक्षीदार आहोत. आम्ही अनेक वेळा या विषयावर बोललो तरी ना तुमच्यात, ना तुमच्या अधिका-यांमध्ये या चार वर्षांत कसलाही बदल झालेला दिसला नाही. म्हणजे तुम्ही अधिका-यांना चॅलेंज करा. त्याप्रकारची गार्डनमध्ये ग्रीनरी निर्माण करा. मग आपल्याकडून बक्षिस घ्या. त्यांचा पगारात वाढ झालीतर तीही द्या. एखाद्याने चांगले काम केलेतर त्याला ॲप्रेशिएट सुद्धा केले पाहिजे. परंतू काम केले नाहीतर आपण चाप लावतो तसा लावलाच पाहिजे. अनेक

वेळा ऐकायला मिळते आणि खूप वाईट वाटते की, एखाद्या अधिका-याने वाईट कर्मचा-यावर कारवाई केलेली असते. मग कोणाचातरी फोन येतो आणि त्या कर्मचा-यावरील कारवाई मागे घेतली जाते. मग त्या अधिका-याची काय किंमत राहते. खुर्चीवर बसल्यानंतर इथे कोणाचे नाते नसते. मला काम हवे आहे. तुम्ही काम केले पाहिजे. आणि काम केले नाही म्हणून अधिकारी त्याच्यावर दंडात्मक कारवाई करतो. तर आयुक्त साहेब, तुम्ही त्याठिकाणी आमच्या कोणाच्यातरी दबावामुळे ही कारवाई मागे घेता. किती लाजीरवाणी, अत्यंत खेदजनक गोष्ट आहे. महानगरपालिकेचे आयुक्त लगेच इतके डगमगलेले आम्हाला निश्चितपणे आवडणार नाहीत. म्हणून इथून पुढील काळात पुन्हा जलपर्णीचे काम दिले आहे. किती लाखांचे दिले, किती कोटींचे काम दिले हा विषय नाही. परंतू शहरात जलपर्णी अजिबात आलीच नाही पाहिजे. पूर्ण दिसली नाही पाहिजे. पर्यावरण विभाग काम करतो. याठिकाणी आपण पर्यावरण विभागाला १.५४% बजेट देतो. परंतू त्यांनी आजपर्यंत कोणत्या कंपनीकडून येणा-या पाण्यावर किती हरकत घेतली आहे. कंपन्यांवर दंडात्मक कारवाई केली आहे का. या चौकात एक बोर्ड लागला आहे, इतके प्रदूषण आहे, इतके इतके पर्सेंटेज आहे. यावर खरोखर कुणाचे नियंत्रण आहे का. का नुसतेच आकडे येतात. आणि ते फिरतात, याकडे आपले लक्ष वेधायचा प्रयत्न करते.

उद्यान विभागात १७२ उद्याने आहेत. तावरे नावाचा ठेकेदार आपल्या महापालिकेचा जावई आहे का. त्यांच्याकडे किती उद्याने दिली आहेत. तो त्याच्या मुलीच्या, बायकोच्या, सासूच्या अशा वेगवेगळ्या नातेवाईकांच्या नावावर टेंडर्स टाकतो. त्यालाच बहुतांशी टेंडर्स मिळलेली असतात म्हणून आमच्या उद्यान विभागाची वाट लागलेली असते. हे सगळं आम्हाला माहित असतं. परंतू हे तुमच्यापर्यंत कुठेही येत नाही. कारण त्यांचेसुद्धा कुठेतरी सेटलमेंट लागलेले असते, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्याचबरोबर याठिकाणी ज्यावेळी आपण आरोग्य विभागाबद्दल बोलतो. आपल्या आरोग्य विभागामार्फत सगळ्या महापालिकेच्या शाळांच्या स्वच्छतेचे काम देतो. आम्ही जेव्हा निवडणुकीला उभे राहतो, त्यावेळी म्हणतो, लाईट, पाणी, शाळा या सगळ्या बेसिक गोष्टी त्याठिकाणी नागरीकांना देणे लागतो. परंतू आमच्या शाळांची अवस्था पहा. आमच्या शाळांच्या मोठमोठ्या इमारती आहेत. शाळांचे मोठे क्षेत्र आहे. परंतू तिथे ४० ते ५० हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. अशी अवस्था का झाली. याठिकाणी कोण कमी पडते. तिथले शिक्षक कमी पडतात, तिथले मुख्याध्यापक कमी पडतात, आपले प्रशासन कमी पडते का आपल्याकडे असणा-या सुविधा आपण प्रॉपर वेळेत देत नाहीत

म्हणून आपण कमी पडतो. मी अनेक वेळा सांगितले. याठिकाणी दंडवते साहेबांना सांगितले. इथल्या कर्मचा-यांना पगारच दिला जात नाही. तुमचा पगार दोन महिने नका येऊ द्या. तुम्ही सगळे आमच्यापर्यंत येता किंवा कोणा सन्माननीयांकडे जाता. सगळ्या गोष्टी करता. पण या कर्मचा-यांनी कोणाकडे जायचे. त्यांच्या हातावर दोन/तीन हजार टेकवले जातात आणि काम करायला सांगितले जाते. मग ते सुद्धा दोन/तीन हजाराच्या लायकीचे काम करतात. साहजिकच जेवढे दाम, तेवढे काम अशा भावनेतूनच ते त्याठिकाणी काम करताना दिसतात.

मी अंदाजपत्रकात पाहिले, अत्यंत पवित्र आपण जिला आई म्हणून पुजतो, अशी आपली नदी. नदी सुधार योजनेसाठी फक्त १.५ कोटी ठेवले आहेत. यातून नदी सुधार कसा शक्य आहे. फक्त १.५ कोटींमध्ये आम्ही आमच्या शहरातील नदी सुधरवणार. पवना नदी, इंद्रायणी नदी आपल्या शहरातून जाते. त्या नदीसाठी १.५ कोटी. आणि गॅस दाहिनीसाठी, ही शहराची गरज आहे. त्यासाठी रु.५ कोटी तरतूद ठेवतो. परंतू नदी हा शहराचा प्राण आहे. तिच्यावर हे आपले शहर आहे. त्यासाठी फक्त १.५ कोटींचे नियोजन करतो. हे कितपत योग्य आहे. आपल्याला शासनाकडून पैसे मिळतील किंवा नाही मिळतील. नदी सुधार प्रकल्प राबवला जाईल नाही जाईल. पण आपण यासाठी प्रत्येकवेळी त्यांच्यापुढे झोळी घेऊन उभे राहणार आहोत का. ज्या गोष्टी आपल्या हातात आहेत. हे आज नाही, मागील तीन वर्षे आपण तेच वाक्य,त्याचठिकाणी तेवढीच तरतूद आपण रिपिटेशन करतोय. बजेटमध्ये कॉपीपेस्टचे सुंदर काम आपल्याला पाहायला मिळते. याकडे सुद्धा आपण लक्ष देणे अत्यंत महत्वाचे आहे.

ज्या वायसीएमवर आपल्या शहरातील नागरीक असो, बाहेर गावाचे नागरीक असो, त्यांच्या ह्रदयाची टिकटिक चालू राहते. काहींना जीवनदान सुद्धा दिले जाते. असे आमचे अत्यंत महत्वाचे ठिकाण म्हणजे वायसीएम. वायसीएमची असणारी अवस्था. तिथे खरेतर अनेक नागरीकांचा जीव वाचला जातो. तिथे काही वाढीव करायचे किंवा काही विकास करायचे असे कुठेही दिसले नाही. अनेक वेळा नगरसेवक डॉक्टरांना फोन करतात की, आयसीयूत व्यवस्था करा. मला बजेटमध्ये वायसीएममधील बेड वाढवणार आहोत, हे करणार आहोत असे नियोजन कुठेही दिसले नाही. मा.आयुक्त साहेब, आपण मला एका प्रश्नाचे देणे लागता. २० डिसेंबरला आपण डॉक्टर्सची परीक्षा घेतली. आज २० मार्च आला आहे. आपण चार-चार महिने निकाल लावत नाही. मागच्या आठ दिवसांपूर्वी निकास लागला. त्याची प्रोसेस होणे, सगळ्या गोष्टी होणे इतके सोप्पे आहे का. आम्ही प्रत्येकवेळी डॉक्टरांना सांगतो. आम्हाला कळते, आम्ही वाईट बोलतो. पण

आम्हाला आमच्या नागरीकांसमोर डॉक्टर सुद्धा कमी वाटतात. पण आपण इतके दिवस का लावता. परीक्षा दिलेला आहे. पेपर आपल्या हातात आहेत. चेकींग करायला उशीर का होतो. नियोजन का केले जात नाही. या सभागृहातील सगळे याला साक्षीदार आहेत की, डॉ.श्रीकर परदेशी साहेबांच्या काळात आज परीक्षा झाली की संध्याकाळी निकाल लागत होता. आमचा निकाल लावायला तुम्ही नवीन पेपर घेऊन देता का. नंतर चिटींग करायची असे काही आहे का. मी तुमच्यावर हा आरोप केलातर तुम्हाला वाईट वाटायचे काही कारण नाही. आपल्याला २५ नर्सेस, १४ डॉक्टर्स भरायचे आहेत. आर्थोचे आहेत, रेडिओलॉजिस्ट आहेत. हे डॉक्टर्स इथून निघून गेले तुमच्या तुटपुंज्या पगारावर कोणी अवलंबून नाही. एखाद्या डॉक्टरला खाजगी नोकरी मिळाली तरी तो आपली महापालिकेची नोकरी सोडून जाणार नाही. आज परीक्षा, उद्या निकाल, दहाव्या दिवशी तो कामावर रुजू झाला पाहिजे. परंतू याला प्रशासनाचा ढिसाळ कारभार तितकाच कारणीभूत आहे. या प्रक्रियेत अत्यंत चुकीच्या घटना घडतात का नाही ते माहित नाही. पण बाहेर नक्कीच चुकीचा मेसेज जातो आहे.

पाणीपुरवठा - यासाठी आपण स्काडा प्रणाली आणली आहे. आमच्या नागरीकांना तुम्ही चोवीस तास पाणी देणार असे म्हटले. तुम्हाला चोवीस तास पाणी कोणी मागितले. काहीपण करा पण २४ तास पाणी द्या म्हणून आमच्या शहरातला कोणता नागरीक तुमच्याकडे आला का. प्रत्येक प्रभागातला नागरीक हेच म्हणतो की, एकच तास पाणी द्या, फक्त ते प्रेशरने द्या. तुम्ही स्वप्न दाखवायचं, नंतर ते स्वप्न चुकीचे आहे हे सिद्ध करायचं. २००७ला याच सभागृहात ठराव झाला की, नागरीकांच्या नळाला मीटर लावणार. मीटर लावून बील घेऊ व लोकांना २४X७ पाणी देऊ. २००७ पासून २०१६ला आलोतरी इतक्या वर्षांत ही योजना कार्यान्वित करता आली नाही. आता स्काडाच्या नावाखाली तुम्ही पैसे घेताय, पैसे खर्च करताय अजिबात ऑबजेक्शन नाही. परंतू त्याचा रिझल्ट येणार आहे का. २००७ ला ज्या अधिका-याने हे मंजूर केले. ज्या अधिका-याचे हे डोके होते की, मीटर लावले की आपण २४ तास पाणी देऊ. त्या अधिका-यावर तुम्ही काय कारवाई केलीत. तो रिकामा फिरतोय. सगळे नागरीक कामाला लागले. पर्यायाने सगळे नगरसेवक कामाला लागले. आजसुद्धा याठिकाणी रु.२१७ कोटी द्यायला आपण टाळाटाळ करतोय. प्रशासन टाळाटाळ करतेय. टाळाटाळ तुम्ही करणार, प्रशासन करणार. नंतर त्याचे खापर शासनावर फोडायचे. आधी देताना घ्यायचे नाही. नंतर देत नाही देत नाही म्हणून गावभर ओरडायचे, त्यातला प्रकार झाला. वेळेवर निर्णय घेणेसुद्धा तितकेच गरजेचे आहे. ही स्काडा प्रणाली आधी शहरातून

काढा. लडकत साहेबांनी हे सांगावे की, सहा प्रभागांपैकी दोन प्रभागांमध्ये स्काडा प्रणाली चालू आहे का. इंजिनिअरला सुद्धा टाकी किती भरली आहे हे स्काडा प्रणालीतून कळते. आम्ही सांगतो, मोबाईल दाखवा, कोणती टाकी किती भरली आहे ते दाखवा. मग अधिकारी हळूच सांगतो, ते आत्ता चालू नाही. त्याची अडचण आहे. मग आम्ही प्रत्येकवेळी तुम्हाला फोन लावायचा की, साहेब असे असे झाले आहे. आपण काम करतो तर रिझल्ट ओरिऐंटेड काम करणे, ही सुद्धा आपली तितकीच मोठी जबाबदारी आहे. आपण कॅनबेरी सारख्या संस्थेला काम देतो. लोकांना ऑनलाईन बील भरायला सांगा. लोकांनी पाण्याचे बील सुद्धा ऑनलाईन भरले पाहिजे. लोक खूप फॉरवर्ड झाले आहेत. लोकांची बीलं भरायची मानसिकता नाही असे काही नगरसेवक म्हणाले. असे काहीच नाही. लोकांना वाटते की, तुमचे बील वेळेत भरले पाहिजे. माझ्या प्रभागातली एक घटना आहे. वयस्कर नवरा-बायको राहतात. महिलेला डोळ्याचा प्रॉब्लेम आहे. अशा घरांत रु.३,५००/- बील तीन महिन्यांचे येत असेलतर ती महिला ते बील कसे भरेल. मग एअरने मीटर फिरतो का हे बघायची सुद्धा आपल्या अधिका-यांना गरज वाटत नाही. तिथे नगरसेवकांना मत दिली आहेत मग ते फक्त नगरसेवकांचे प्रॉब्लेम आहेत. मीटर फुकटचा कसा चालू राहील याकडेच सगळ्यांचे लक्ष असते. त्यांना पगार मिळतोय, मिळू देत. पण त्यांनी त्याची पाहणी करणे देखील गरजेचे आहे असे मला वाटते.

मागील वर्षी आपल्या शहरामध्ये सीसीटीव्ही लागले होते. कोणाला विचारले होते हे ज्याला विचारले त्यालाच माहित होते. आमच्यापैकी अनेकांना सीसीटीव्ही कुठे लागले आहेत हेच माहित नाही. यावर्षी रु.५.१९ कोटी तरतूद केली आहे. चांगले आहे. सीसीटीव्ही कॅमेरे निश्चितच लागले पाहिजेत. परंतू सगळ्या नगरसेवकांना विचारले पाहिजे की, तुमच्याकडे आवश्यकता आहे का. काहीच नाही. जिथे वाटेल, जो नगरसेवक येऊन बसेल, सांगेल की, मला या ठिकाणी कॅमेरा बसवून पाहिजे तर त्याचठिकाणी ते केले जाते. दुसरा महत्वाचा विषय एलईडी. खांब लावायचे मग त्याच्यावर दिवा कधी येईल याची वाट जर आमच्या जे.ई.ला बघायला लागलीतर तर हे किती दूर्दैव आहे. म्हणजे माझ्याकडे आज खांब लागले असतील तर सहा महिने त्याच्यावर दिवा लागत नाही. मग आमचे नागरीक सुद्धा हुशार असतात ते फोटो काढतात आणि फेसबुकवर आमचा फोटो फिरतो की, खांब लावून सहा महिने झालेतरी नगरसेवकाला एलईडी दिवा लावता आला नाही. मा.आयुक्त साहेब, इथे आमचा उदोउदो होतो. तुमचा होत नाही. आज शहरातील पूर्वी लागलेल्या एलईडींची अवस्था अशी आहे की, आज एलईडी बंद

पडल्यावर साहेबांना फोन करुन सांगितले की, साहेब आमच्या भागातला एलईडी बंद पडला आहे. तर ते म्हणतात, ताई, तो जो कोणी ठेकेदार आहे तो म्हणतोय आमच्याकडे आत्ता दिवा उपलब्ध नाही. तो म्हणतोय मी करतो. करतो करतो म्हणतो. आम्ही त्याचा पाठपुरावा करतो, त्यानंतर तो एलईडी बसतो. आतातर एकत्रित एलईडी विकत घ्यायचा तुम्ही घाट घातला आहे. कोणाचा फायदा, कसा फायदा ते तुमचं तुम्हीच जाणो. आम्हाला यात इंटरेस्ट नाही. परंतू आम्हाला अडचण येऊ नये, याची काळजी घेणे तुम्ही लागता.

सगळ्यात महत्वाचे मघाशी बहिरवाडे साहेब म्हणाले की, आपण दहावीतल्या मुलांना अनुदान देतोय, ते गरजेचे नाही. मा.आयुक्त साहेब, मला असे वाटते, आपण आपल्या एकूण बजेटपैकी स्थापत्यचे एकूण क्लिअर बजेट काढले. किंवा त्यातला भ्रष्टाचार जरी थांबवली तरी त्यातून त्या मुलांचे पैसे निश्चितपणे निघतील. त्या पैशांवर तुमचा कुठला नागरीक किंवा विद्यार्थी जगतो, असे मला मुळीच वाटत नाही. काही विद्यार्थी गाडीतून येतात. पण काही गरजू विद्यार्थी सुद्धा आहेत. त्या विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप आहे. म्हणून आपण त्यांना हे पैसे देणे लागतो, हेही याठिकाणी लक्षात ठेवले पाहिजे.

आमच्या सगळ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय म्हणजे महिला व बालकल्याण विभाग - मा.आयुक्त साहेब, तुम्ही एकदा तरी व्हीजिट कराच. मी तुम्हाला या महिन्यामध्ये या विषयावर पाच तरी फोन केले असतील. तिथल्या कर्मचा-याचे किंवा लिपीकाचे इथे नाव घेणे योग्य होणार नाही. परंतू मी एका लिपीकाला फोन केला होता. कोण बोलतयं, हा. ती नावे मिळाली का, हा. अरे हा काय, तुम्ही एका सन्माननीय सदस्यांशी बोलताय. हो म्हण. ते नाव लिहून घेतले का, हा. मग कामे होतील का, नाही. मी गाडी काढली आणि पालिकेत आले. मी खांडकेकर साहेबांना विचारले, हा काय प्रकार आहे. ते म्हणाले, ताई मला न विचारणेच योग्य. कारण तशा प्रकारचे कर्मचारी जर माझ्या हाताखाली असतील. साहेब, जर अधिका-याने कारवाई केलीतर तुम्ही सुद्धा ती रेटून नेली पाहिजे. तुम्ही त्याठिकाणी जाऊन मुळीच रिझवत नाही आपल्या महापालिकेतले जेवढे लिपीक आहेत, त्यांना बोलवा व पत्र ड्राफ्ट करायला सांगा. आणि तुम्ही सगळ्यांची पत्र जमा करुन घ्या. मग कळेल की, आपल्या पालिकेतले अधिकारी यांच्याकडून काम करुन घेतात. ते कर्मचारी बघा कसे काम करतात. सगळ्या अधिका-यांचे कर्मचा-यांचे अपग्रेडेशन आधी झाले पाहिजे. नगरसेवकांना महिला व बालकल्याणचा विषय जिव्हाळ्याचा विषय असतो. नागरवस्ती विभाग असतो. आम्हाला

आमच्या लोकांसाठी योजना राबवायच्या असतात. त्या लोकांना व्यवस्थित मिळाल्या पाहिजेत याची आम्ही काळजी घेतली पाहिजे. मग ठोकीन, मारीन, बघेन अशी भाषा आम्ही वापरणे नक्कीच कौतुकास्पद नाही. परंतू नाईलाज होतो. कारण आम्हाला ज्या योजना आहेत, त्या आम्हाला आमच्या नागरीकांपर्यंत पोचवायच्या असतात. विधवा महिला असेल, सायकल असेल, मशीन असेल त्याच्यावर लिहून येते, नो रेकॉर्ड. नो रेकॉर्ड कसे शक्य आहे. स्लिप उपलब्ध असताना तुम्ही कोणत्या बेसिसवर नाही म्हणून शकता. नागरी सुविधा केंद्र आहे. त्यांचे व तुमचे कुठेतरी कोऑर्डीनेशन चुकते आहे आम्ही नगरसेवक म्हणून किंवा आमचे नागरीक ज्यांच्या जीवावर महापालिका चालते. त्यांनी हा अन्याय का सहन करायचा. मला फार कौतुक वाटते, सन २०१५-१६ मध्ये रु.५० कोटी तरतूद होती. या वर्षी रु.६३ कोटी म्हणजे अजून रु.१३ कोटींची वाढ आहे. मग ती वाढ आहे का नागरीकांचा छळ आहे. आपण नागरीकांचा छळ करतो, अशी भावना त्याठिकाणी गेल्यावर मला जाणवते. कोणत्याही कर्मचा-याला तिथे येणारा नागरीक हा करदाता आहे व त्यांच्या जीवावर आपला पगार निघतो. जर त्याला एखाद्या योजनेचा लाभ दिलातर तो समाधानी होईल,अशी भावना तिथे कुठेही दिसत नाही. फक्त पैसै देऊन भागत नाही तर ते योग्य वेळी, योग्य माणसाला देणे हा देखील आपल्या कर्तव्याचा भाग आहे. याठिकाणी यापुढे एखादी योजना एक्स पर्सन पाहत असेलतर त्याच माणसाने नावापासून फॉर्मपर्यंत, त्या योजनेचा लाभ देण्यापर्यंत काम करावे. मी एक्स पर्सनला फोन केला, मी त्याला विचारले, काय रे बाबा, नावे का टाईप करुन दिली नाहीत. तर तो म्हणाला, दुस-याने मला फॉर्म चेक करुन दिला नाही. नागरवस्ती विभागातील कर्मचारी तिथे चांगल्या प्रकारे काम करत नसेलतर ती योजना कितीही चांगली असलीतरी ती योजना आम्ही नागरीकांपर्यंत समाधानकारकपणे पोहचवू शकत नाही, हे दूर्दैव. या पुढील काळात २०१७ कडे आमच्या सगळ्यांचे लक्ष आहे. आणि तुम्ही ते लक्षात ठेवून आमच्या सगळ्यांना कसे चांगल्या प्रकारे काम करता येईल याची प्रक्रिया आपण पूर्ण करावी. एवढे बोलून थांबते. धन्यवाद.

**मा.बाळासाहेब तरस** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, अर्थसंकल्पावर बोलत असताना समाधानकारक बजेट करायचा प्रयत्न झाला आहे, त्याबद्दल मी याठिकाणी आपले अभिनंदन करतो. परंतू हे करत असताना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत प्रवेश करत असताना मुंबईकडून येत असताना,मघाशी आमच्या चिखले ताईंनी सांगीतले होते की, निगडीला आल्यानंतर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्द सुरु होते, तिथे भक्ती-शक्ती समुहशिल्प मोठ्या प्रमाणावर

उभारलेले आहे. त्यामुळे आपल्या शहराची नवीन ओळख निर्माण होते आहे. परंतू हे करत असताना मुंबईकडून येताना प्रभाग क्र.१८ किवळे-विकास नगर या भागातून पुणे-बेंगलोर हाय-वे व एक्सप्रेस हाय-वे हे दोन्हीही मोठे रस्ते तिथून जात असताना त्याठिकाणी असे एखादे समुहशिल्प किंवा स्वागत कमान व्हावी असा उल्लेख किंवा त्याबाबतची तरतूद या अंदाजपत्रकात किंवा यापूर्वीच्या कोणत्याही अंदाजपत्रकात कुठेही केली गेलेली नाही. याठिकाणी नवीन समाविष्ट झालेली गावांतले नगरसेव व नव्याने नगरसेवक झालेले यांनी इथे आपली व्यथा मांडली आहे. इथे काही जुने नगरसेवक आहेत, त्यांनी तीन,चार,पाच,सहा टर्म काढलेल्या आहेत. त्यांची याठिकाणी अपेक्षापूर्ती झालेली नाही. त्यामुळे नव्याने नगरसेवक झालेल्या आणि नवीन समाविष्ट झालेल्या गावांतील नगरसेवकांची व्यथा खूप आगळ्या-वेगळ्या प्रकारची आहे. अजूनही नवीन समाविष्ट गावांमध्ये, माझे स्वतःचे म्हटलेतरी त्याठिकाणी एखादी प्रशासनाची इमारत, एखादी शाळेची इमारत, एखादे क्रिडांगण, एखादे उद्यान किंवा दवाखाना हेच काय, परंतू प्रभागात आमच्याकडे एखादा ओपीडी दवाखाना सुद्धा नाही हे करत असताना आम्ही नवीन नगरसेवक झाल्यानंतर पहिला पहिला रेडझोनचा प्रश्न उपस्थित झाला. नंतर प्रश्न उपस्थित झाला, जकात बंद. नंतर तिसरा प्रश्न उपस्थित झाला, अनधिकृत बांधकाम. चौथा प्रश्न उपस्थित झाला, शास्तीकर. म्हणजे आम्ही नव्याने नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर आम्हाला प्रश्न पडला की, चुकून नगरसेवक झालो का काय. नवीन नगरसेवक असताना, इतक्या गोष्टी सांभाळत असताना, इतक्या मोठ्या प्रभागाला तोंड देत असताना खूप अडीअडचणी येत असतात. आम्ही पालिकेत येताना शक्यतो प्राधिकरणातून, निगडीकडून येत असतो. बाकीचे प्रभाग एवढे हाय-फाय दिसत असताना आम्हालाच कुठेतरी बाय-बाय केल्यासारखे आम्हाला वाटते. कारण मी तर म्हणेन की, आयुक्त साहेब माझ्या प्रभागात सगळ्यात जास्त वेळा आले असतील. त्यांनी अनेक वेळा भेट देऊन सुद्धा, त्या कामांची पूर्तता करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत असून सुद्धा हे मामहापौर साहेबांना व मा.आयुक्त साहेबांना माहित आहे. पाणी असेल, जमिनी असतील बाकीच्या गोष्टी असतात, त्यावेळी आणखी पुढे गेलो की, अजून कमी दरात जमिनी कशा मिळतील याबाबतीत प्रयत्न केला जातो. परंतू त्या भागात नागरी सुविधा पुरविण्यासाठी नगरसेवक म्हणून प्रयत्न करत असताना त्याठिकाणी अजून मुलभूत सुविधा सुद्धा पोहोचलेल्या नाहीत देहू कँटोनमेंट बोर्डाची हद्द असल्यामुळे देहू कँटोनमेंट बोर्डाची साठसत्तर हजार लोकसंख्या असलेल्या देहू रोड परिसरातून आमच्या प्रभागात दोन/तीन नाले येतात. आणि अशुद्ध पाणी इथे पवना

नदीमध्ये सोडले जाते. परंतू जास्त प्रयत्न करुन सुद्धा याठिकाणी नाले बांधणीचे काम अद्यापपर्यंत झालेले नाही. मा.आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब, याठिकाणी नव्याने समाविष्ट गावांचा विचार केला आहे. परंतू अधिक विचार व्हावा, यासाठी प्रयत्न करावा. आपण या अर्थसंकल्पामध्ये समतोल मांडायचा प्रयत्न केला आहे. परंतू ही उणीव आपण भरुन काढावीत. मी पुन्हा एकदा तुमचे अभिनंदन करुन थांबतो, धन्यवाद.

**मा.अनंत को-हाळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आज जनतेच्या पैशांचे जनतेसाठी, शहरासाठी जे बजेट सादर झाले आहे, त्यावर मला काही गोष्टी बोलायच्या आहेत. मा.आयुक्त साहेब, आम्ही सर्वजण पोटतिडकीने बोलतो आहोत. परंतू शहराच्या विकासाचा विचार करताना व उद्याचा दृष्टीकोण लक्षात घेऊन हे बजेट मंजूर होण्याआधी काही गोष्टींचा विचार निश्चितपणे करावा. ज्या-ज्या सदस्यांनी काही गोष्टी मांडल्या, त्याचा निश्चितपणे विचार करुन या बजेटमध्ये बदल व्हावा अशी याठिकाणी मी अपेक्षा व्यक्त करतो. सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे अतिशय चांगले बजेट असते, सगळ्या गोष्टी असतात. प्रशासकीय यंत्रणा किंवा कर्मचारी यांचा ताळमेळ नाही. त्यामुळे ही यंत्रणा नागरीकांपर्यंत पोहचत नाही. नागरवस्ती विभागाचेच बघा. या वर्षातली दहावीची परीक्षा झाली आणि आपण मागील वर्षाच्या दहावीची परीक्षा दिलेल्या मुलांचे चेक देतोय. त्यांना निकालानंतर तीन महिन्यांमध्ये हे चेक दिले पाहिजे. हे चेक म्हणजे त्यांचे बक्षीस आहे. हे चेक आपण वर्ष, दोन-दोन वर्षे देत नाही. अशा ब-याच अडचणी आहेत. यात प्रशासकीय कर्मचारी कारणीभूत असतील किंवा त्यांची कमतरता कारणीभूत आहे. आपण त्यांच्या भरतीविषयी विचार करत नाही. नवीन योजना राबविल्या पाहिजेत. आपण त्यांचा पण विचार करत नाही. सगळ्यांच्याच भागात ज्येष्ठ नागरिक आहेत. आज त्यांची अवस्था अशी आहे की, त्यांना मुले सांभाळतात. परंतू त्यांचा वैयक्तिक खर्च औषधांचा खर्च त्यांना पेलवत नाही. आपले वायसीएम आहे, तालेरा आहे. परंतू त्यांच्या औषधासाठी त्यांना दर महिन्याला हजार रुपये तरी लागतात. त्यांना औषधे घेण्यासाठी कुठली योजना तयार केलेली नाही. आपण पुण्याच्या धर्तीवर योजना आणतो. त्या थोडा चेंज करतो. पण आपण आपल्या नागरीकांची गरज ओळखून, शहराची गरज ओळखून कुठली योजना आखतो का. आपल्याकडे तशी यंत्रणा आहे का. योजना आखण्यासाठी एक कमिटी आहे. असे काहीच नाही. याबाबतीत विचार केला पाहिजे. आपले वायसीएम रुग्णालय आहे. तालेरा रुग्णालय आहे. पण तिथे पुरेसे डॉक्टरच नाहीत. न्युरोलॉजिस्ट नाहीत. काही डॉक्टरांची आपण भरती करत नाही. भरती होत नाही. काही ठिकाणी

पगाराचा काही इश्यु असेल. आपल्याला ट्रीटमेंट द्यायची आहे. आपल्याकडे येणारे सगळे रुग्ण गरीब आहेत. त्यांना आजारावर बाहेर उपचार घेणे खूप अवघड आहे. आपण मुलभूत गरजा लक्षात घेत नाही. जनतेची मुलभूत गरज बीआरटी नाही. बीआरटी रूट बंद आहे, चालू नाही. तिथे लोक गाड्या पार्क करतात. आपल्याला नागरीकांच्या मुलभूत गरजा लक्षात आल्या नाहीत, त्यांच्या आरोग्याविषयी विचार केला नाही, त्यांच्या गरजांविषयी विचार केला नाहीतर जनतेच्या पैशांनी तयार केलेले हे बजेट जनतेच्या काय कामी पडणार.

अग्निशामक - शहरात ब-याच ठिकाणी अचानक काही गोष्टी घडतात. संत तुकारामनगरमधून अग्निशामकची गाडी यायला उशीर होतो. आमच्या चिंचवड गावात भरपूर जागा शिल्लक आहेत. चिंचवड गावात एक अग्निशामकची गाडी उभी केलीतर तो संपूर्ण परिसर, रावेत, वाल्हेकरवाडी, पिंपळे सौदागर सगळ्या परिसरात पोहोचू शकेल. तसा विचार करुन अग्निशामकसाठी तरतूद केली पाहिजे. तालेरा हॉस्पिटल नवीन बांधले आहे. तिथे ॲम्ब्यूलन्स नाही. आम्हाला वायसीएम मधून बोलवाव्या लागतात. वायसीएममध्ये सात किंवा आठ ॲम्ब्यूलन्स असतील, तुम्ही त्यातल्या दोन ॲम्ब्यूलन्स तिथे उभ्या करु शकता. त्यामुळे कुठे घटना घडलीतर गाडी लवकर पोहचू शकेल. डिझेल किंवा पेट्रोल देखील वाचेल. याचाही इथे विचार करावा. एलईडी संदर्भात बरेच नगरसदस्य बोलले. खरेदी कशी केला हा विषय नाही. आपण जेव्हा प्रत्येकाच्या भागात नवीन पोल उभे केले आहेत आणि नवीन पोलला जुनीच फिटींग लावली आहे. लोक आमच्याकडे लगेच बघायला लागतात. आम्ही काय घोटाळा केला आहे का. त्यांना काय वाटते, नवीन पोल म्हणजे नवीन फिटींग. आम्हाला त्यांना सांगावे लागते की, फिटींग वेगळी आहे, पोल वेगळा आहे. त्या फिटींग हळूहळू येतील. त्या भागात एलईडी बसवल्या आहेत, तिथे परिस्थिती अशी आहे की,जेव्हा एलईडी बंद पडतात, तेव्हा आपले कर्मचारी ते काढून नेतात, मग आठ/दहा दिवसांनी तिथे दुस-या एलईडी लावल्या जातात. आपल्याकडे त्याचा बॅलन्स सुद्धा नाही. हे आपले कसले नियोजन. आपण अश्या छोट्या-छोट्या गोष्टींचे नियोजन करावे. मा.आयुक्त साहेब, तुम्ही खूप पॉझिटिव्ह पद्धतीने काम करताय. माझा अनुभव आहे. परंतू तुम्ही कर्मचा-यांना थोडेसे धाकातच ठेवा. त्यांनी काम केलेतर तुम्हाला, आम्हाला आऊटपुट मिळणार आहे. नाहीतर आऊटपुट मिळणार नाही.

ब-याच ठिकाणी खोदून ठेवले आहे. काही ठिकाणी एमएसईबीच्या लाईन टाकल्या आहेत. काही कंपन्यांच्या वायरी गेलेल्या आहेत. तुम्ही प्रत्येक प्रभागाला

तरतूद ठेवली आहे. परंतू प्रॉब्लेम असा आहे, माझ्या प्रभागात तुम्ही खोदायला परवानगी दिली आहे. खोदून ठेवले आहे. त्यासाठी काहीतरी नियोजन करा. या दहा कोटींतून आम्हाला दिले पाहिजे. नदीचे प्रदूषण हा मुलभूत विषय आहे तुम्हाला सुद्धा हे माहित आहे. नदी प्रदूषित झालीतर तुम्हाला उद्या पाणी मिळणार नाही पाण्याचे सोडून द्या साहेब, पण ती नदी आहे, आपली माता आहे. आपण तिला तरी स्वच्छ ठेवले पाहिजे. आपण या मुलभूत गरजा लक्षात ठेवल्या नाहीत. सिमाभिंत बांधण्यासाठी आणखी जास्त तरतूद ठेवायला पाहिजे होती. माझ्या पूर्ण प्रभागातून नदी गेली आहे तीन वर्षे झाली तरी सिमाभिंतीसाठी पाटबंधारे विभागाची परवानगी मिळत नाही. ही कुठली पद्धत आहे. आपण अशा पद्धतीने यात वेळकाढूपणा केलातर निश्चितच पुढचे पिंपरी चिंचवड शहर दिसायला सुंदर पण आतून अत्यंत बकाल असेल. आम्ही गेले चार वर्षांपासून महिला स्वच्छतागृह व पुरुष स्वच्छतागृहाची मागणी करतोय. पुण्यामध्ये पाचशे मीटरवर स्वच्छतागृहे दिसतील. बरे वाटले. तुम्हीही हा चांगला निर्णय घ्या. आपल्या लोकांच्या सोयीच्या दृष्टीने हे महत्वाचे आहे. बजेट मंजूर होत असलेतरी तुम्ही मंजूर होत असताना त्यात अशा काही तरतूद टाका. आणखी काही चांगले बदल करा. नाहीतर आम्ही एवढे सगळे तुमच्यापुढे मांडणार, त्यात बदल व्हायचा नाही आणि आहे तेच मंजूर होऊन आमच्यापुढे येणार. माझी आपल्याला प्रामाणिक मागणी आहे की, शहरात डायलिसिस करणा-या रुग्णांचे प्रमाण वाढले आहे. रोटरी क्लब असेल किंवा आपल्याकडून त्यांना आणखी मदत केली पाहिजे. हा आजार खूप वाढला आहे. माझ्या भागात कमीत कमी दोनशे रुग्ण डायलिसिस करतात. बिर्ला हॉस्पिटलमध्ये गेलो, मोरया हॉस्पिटलमध्ये गेलो, निरायम रुग्णालयात गेलोतर तिथे रु.१२००/- घेतात. त्यांना आठवड्यातून दोन वेळा डायलिसिस करायला जावे लागते. एवढे पैसे कुठून आणणार. गरीब असो नसो, तो आपल्या शहराचा नागरीक आहे. आपले कर्तव्य आहे. वायसीएम रुग्णालय एवढे मोठे आहे. याविषयी कल्पना केलीतर नागरीकांना एक चांगली सोय उपलब्ध होईल हे पण आपण थोडेसे लक्षात घ्यावे.

ज्येष्ठ नागरीकांसाठी औषध योजना यावर मी बोललो. अशी योजना करुया की त्याचा उद्याच्या लोकांना फायदा होईल. आपण काय करतो, उद्याचा विचारच करत नाही. ओला व सुक्या कच-याच्या बास्केट वाटल्या. किती खरेदी केल्या. त्याचा काही उपयोग झाला नाही. आपले पैसे वाया गेले. ज्या योजना करु त्यातून नागरीकांना खराखुरा फायदा व्हायला पाहिजे. दिखावू फायदा नको. निश्चितपणे हे बजेट मंजूर होईल. त्यातून शहरासाठी, नागरीकांसाठी आणखी काय बदल करता येतील ते करावेत.

मी सूचविलेल्या सूचनांचा चांगल्या पद्धतीने अभ्यास करुन त्याप्रमाणे करावे अशी विनंती करतो. मला बोलायची संधी दिल्याबद्दल आपले धन्यवाद.

**मा.आशा सूर्यवंशी** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मला आयुक्त साहेबांना सांगायचे आहे की, आमच्या बिजलीनगर भागात पहिल्या पाण्याच्या टाक्या भरायचे बजेट द्या. कारण पाण्याच्या टाक्या १५ ते २० टक्के भरल्या गेल्यामुळे, पूर्ण न भरल्या गेल्यामुळे पूर्ण वॉर्ड डिस्टर्ब होतो आहे सकाळ-संध्याकाळ पाणी आले नाही म्हणून महिला घरी येतात. मी तुम्हाला भरपूर फोन लावले आहेत. वॉर्डात एमएसईबीच्या केबल खोदाईमुळे रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी जास्तीत जास्त बजेट द्यावे. मी दोन उपसूचना दिल्या आहेत. त्या आवश्यक आहेत, त्या मंजूर कराव्यात. मा.आयुक्त साहेब, तुमच्यामुळे सर्व नगरसेवक आनंदात असतात आमच्या प्रभागातला तेवढा पाण्याचा प्रश्न सोडवावा. मी लडकत साहेबांना देखील म्हणते की, बिजलीनगरच्या टाक्यांमध्ये जरा जास्तच पाणी सोडा. या आर्थिक वर्षात सर्व नगरसेवकांना निवडणुकीला सामोरे जाण्याच्या दृष्टिकोणातून सर्वांना एकसारखी तरतूद दयावी. सगळ्या वॉर्डांना एकसारखी तरतूद द्यावी, सगळीकडे एकसारखी कामे काढावीत एवढीच प्रार्थना करते.

**मा.आरती चौंधे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, सन २०१६-१७ चे बजेट याठिकाणी सादर होत असताना सर्वांना चांगले बजेट दिले आहे. पिंपरी चिंचवड हे अत्यंत चांगले शहर आहे. आपण पाहतो, पालिकेतर्फे नागरवस्ती विभागाकडून अनेक चांगल्या योजना चालवतो. विधवा महिलांसाठी असेल, शिवण क्लास असेल या योजना चालवतो. महिलांना ड्रायव्हिंग क्लास ही योजना शासनातर्फे चालू आहे. परंतू पालिकेतर्फे ही योजना चालू झालेली नाही. म्हणून महिला आम्हाला वारंवार विचारत असतात. जे दहावी-बारावीतील विद्यार्थी प्रायव्हेट शाळेत शिकतात, त्यांना देखील अनुदान दिले आहे. त्यांना कौतुकाची थाप म्हणून हे अनुदान दिले आहे. जी मुले पिंपरी चिंचवड शहरामध्ये गेले २० वर्षांपासून राहतात, पण पुणे शहरातील शाळा-कॉलेजमध्ये शिकण्यासाठी जातात. याकरिता त्यांना अपात्र ठरवले आहे ते योग्य आहे का. पुणे महापालिका सुद्धा त्यांना अनुदान देत नाही यासाठी आपण पुढील वर्षासाठी या योजनेमध्ये सुधारणा करावी. त्यामुळे या मुलांनादेखील या योजनेचा लाभ घेता येईल. पाणीपट्टी बीलाबाबत बरेच जणांनी सांगितले. नागरीक बील भरायला तयार असतात. परंतू बीले वेळेवर येत नाहीत. तीन-तीन महिने बील येत नाही. लोक

म्हणतात, आम्ही वेळेवर बील भरतो, मग आम्ही दंड का भरायचा. पाणीपट्टीची बिले वेळवर आली पाहिजेत. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवते.

**मा.संगिता भोंडवे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,माझ्या प्रभागात बीआरटी बसस्टॉप आहे, तो कोलमडलेला आहे. तिथे काहींनी संसार थाटला आहे. तुम्ही त्यावर लक्ष केंद्रीत करा. मला स्वच्छतेबाबतीत थोडे बोलायचे आहे. स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत वैयक्तिक घरगुती अनुदान दिले आहे. पण महिला महापौर, महिला पक्षनेत्या सर्व पदांवर महिला अधिकारी असताना देखील शहरामध्ये महिला शौचालयांची कमतरता आहे. सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी शौचालय व्यवस्था नाही. ही प्रशासनाची उदासिनता आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात दहा लाख लोकसंख्या असताना त्याप्रमाणात किती महिला शौचालये आहेत. मा.आयुक्त साहेब, भक्ती-शक्ती टेल्कोपासून नाशिक फाटा या मार्गावर ट्राम-वे करायचे नियोजन आहे. परंतू परदेशात पूर्वीपासून ट्राम चालते. आपल्या मा.मंगलाताई कदम व मा.दिलिप बंड साहेबांनी तर बाहेरच्या देशांत जाऊन ट्राममध्ये बसून फोटो काढला होता. पण ट्राम इथे आली नाही. आपण पिंपरीपर्यंत करतोय तर त्या मेट्रोला जोडणारे मिनी बस मार्ग जरुर करावेत. नाशिक फाट्यापासून चाकणला जोडता येईल. रहाटणीपासून हिंजवडीला जोडता येईल. सगळ्यात शेवटी मला सांगायचे आहे की, राष्ट्रवादी पक्षाच्या सर्व पदाधिका-यांना विनंती आहे की, आपला कारभार नगरविकास खात्याअंतर्गत चालतो. आपण आपले शहर किती सुंदर आहे हे दाखवण्यासाठी आपल्याकडे येत असलेल्या अडचणी सांगण्यासाठी आपण सन्माननीय मुख्यमंत्री यांना बोलवावे अशी विनंती आहे.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आजचे हे बजेट सादर करताना हिंदी-मराठी मिश्रीत अत्यंत गोड भाषेत ज्यांनी हे बजेट सादर केले असे आमचे बंधू मा.डब्बु आसवानी. मा.महापौर साहेब, महापालिकेचे सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक महापालिकेच्या सभागृहासमोर मांडण्यात आले आहे. खरेतर सगळ्यांनीच जमाखर्चाचे आकडे मांडले आहेत. ज्याला जसे जमेल तसे त्यांनी त्यांचे आकडे मांडले आहेत. परंतू श्रीमंत महापालिका असा लौकिक असणारी आपली महापालिका गेले तीन/चार वर्षांत आपले बजेट दुप्पट झाले आहे. बजेट दुप्पट होत असताना तिथे आवक वाढली, कामे वाढली म्हणून बजेट सुद्धा वाढले. याला एकच कोणी जबाबदार नसून संपूर्णपणे काम करत असलेले कर्मचारी असतील, आयुक्त असतील, नगरसेवक असतील यात या सगळ्यांचाच हातभार आहे. वर्तमानपत्रात मोठमोठ्या बातम्या छापून येतात की, ३/४ वर्षांत बजेट वाढले. परंतू मार्च महिन्यामध्ये ज्यावेळी बजेट मंजूरीसाठी येते,

तेव्हा सगळे नगरसेवक म्हणत असतात की, माझ्या वॉर्डातले काम झाले नाही. मग बजेट मंजूर करताना हे तुमचे अभिनंदन करतात, हा बार फुसकाच निघतो. आपले कुठे चुकते का, याचे प्रशासनाने आत्मपरिक्षण केले पाहिजे. कारण बजेट सादर होताना तसे वागणे महत्वाचे आहे. आणि दुसऱ्या वर्षी जेव्हा नवीन बजेट येते, त्यावेळी त्या मधल्या काळामध्ये प्रत्येक मिटींगला किंवा या सभागृहामध्ये नवीन सदस्य, जुने सदस्य सगळे हेच म्हणत असतात की, माझ्या वॉर्डात कामच होत नाही. काम होत नाही मग पैसे कुठे जातात. हा सुद्धा महत्वाचा प्रश्न आहे. काही म्हटले की, पैसे नाही. एकतर आम्हाला जसे पाहिजे तसे काम होत नाही म्हणून आमची ओरड आहे का किंवा आपण खरेच गाजर दाखवत आहात का. दोन्हीपैकी काहीतरी एक सत्य आहे. आणि बहुतांशी सत्य हेच आहे की, आपण गाजर दाखवायचे काम करताय. म्हणजे गाजराची पुंगी वाजली तर वाजली, बाकी काय आहे. आपण ज्याप्रकारे अभिनंदन स्विकारता, त्याचप्रमाणे टिका सुद्धा स्विकारली पाहिजे. तेवढे मोठे मन ठेवले पाहिजे. एवढे मोठे बजेट सादर करत असताना माझ्या मनात हाच प्रश्न येतो की, या बजेटच्या माध्यमातून आपण शहराला योग्य न्याय देतो का. पूर्ण बजेटचे पुस्तक चाळत असताना एकही नाविण्यपूर्ण गोष्ट आपण आणलेली नाही. आपल्याजवळ हे जे मोठे पुस्तक आहे, ते पूर्णपणे सन २०१५-१६ चेच पुस्तक सन २०१६-१७ च्या पुस्तकात कॉपी पेस्ट केलेले आहे. सन २०१३-१४ च्या पुस्तकात गावांचा विकास आराखड्याचा विषय घेतला होता. तो या पुस्तकातून गायब केला आहे. ज्यावेळी डॉ.श्रीकर परदेशी आयुक्त होते, त्यावेळी आम्ही विकास आराखडा मांडला होता. मा.आयुक्त साहेब, अशा काही योजना आणा की त्या चालू राहतील. त्यांनी सांगितले होते की, मी योग्य प्रकारे, अभ्यासपूर्वक आणला आहे. आणि ते पुढे चालू राहणार आहे दूर्दैवाने, सारथी असेल, पर्यटन विकास आराखडा असेल याचा समावेश आज बजेटमध्ये नाही. सारथी तर जवळपास शंभर टक्के बंदच पडले आहे. ज्यावेळी परदेशी साहेबांनी महापालिकेत सारथी हेल्पलाईन आणली, त्यावेळी आम्ही त्यांना सांगितले होते, तुम्ही नागरीकांच्या तक्रारी नगरसेवकांना सांगा. कारण तो तिथे आहे. नागरीक डायरेक्ट तक्रारी करतात. मग माझा तिथे उघडकीस येते म्हणून माझी खरेतर तिथे तक्रार होती. साहेबांची बदली झाली आणी तुम्ही ते बंदच केले. दबावाने झाले, दूर्लक्ष केल्यामुळे केले कसे केले हे देवच जाणो. पण सारथी निश्चितपणे बंद झाले आहे. मा.महापौर साहेब, मागील अंदाजपत्रकात रु.१८४.९२ कोटी आरंभीची शिल्लक म्हणून नमूद करण्यात आली होती. हिच सुधारीत अंदाजपत्रकात रु.२२९.६८ कोटी आरंभीची शिल्लक आहे. म्हणजे २०१४-

१५च्या बजेटमध्ये तरतूद करुन सुद्धा सुमारे रु२२९.६८ कोटी रुपये खर्चच झाले नाहीत. आपण याचे उत्तर प्रशासनाकडून मागितले नाही. कारण विषय असा आहे की, बजेटचे पुस्तक एवढे मोठे आहे की, वाचायला लागलो तर डोळे बंद होत होते. रोज थोडी-थोडी पाने वाचतोय. मनात सारखी शंका यायला लागली की, मागील वर्षीची १२० कोटींची प्रिंटींग मिस्टेक या वर्षी आहे का नाही. शोध-शोध शोधली. काही दिसलेच नाही. माहिती पण घेतली. लेखापाल जगदाळे यांना पण विचारले. मुख्यलेखापाल, श्री.प्रमोद भोसले यांचे खास करुन अभिनंदन करु का, त्यांच्या पदाची गुर्मी, त्यांचा धिक्कार करु का नाही ते कळत नाही. त्यांना कोणताही प्रश्न विचारा, साहेब, मला याची माहिती पाहिजे. हे माझे काम नाही. त्या विभागाला विचारा असे उत्तर देतात. मग तुम्ही काय पाट्या टाकायचे काम करता का. तुम्हाला कळत नाही. मी विचारत नाही. तुम्हाला कळत नाही असे तुम्ही म्हणूच शकत नाही. तुम्ही ज्या पदावर आहात, तुम्हाला कळालेच पाहिजे. जर प्रत्येक विभाग तुमच्याकडे आणून देतोतर, आलेल्या पैशांचा विनियोग कसा करायचा हे तुमचे डिपार्टमेंट ठरवते. मग आम्ही जर प्रश्न विचारला, तुमचे सगळे विभाग कागदाचे चिटोरे देतात. यांनी ते सगळे एकत्र करुन द्यावे. माझा यांच्याबद्दल रोष असा आहे की, नवीनने विचारले तरी हेच उत्तर, जुन्यांनी विचारले तरी हेच उत्तर. कदाचित त्यांना पदाची गुर्मी आहे. खरेतर यांनी इथून लवकर जावे. कारण अशा लोकांची इथे गरज नाही. याआधी जे अधिकारी होते, त्यावेळी बजेटवर ब-यापैकी साधकबाधक चर्चा होत होती. मी गेले दहा वर्षांपासून या सभागृहाचे प्रतिनिधित्व करते आहे. पण अशा प्रकारची उर्मट उत्तरे, किंवा अशाप्रकारचे हात वर करणे कोणी केले नाही. तेवढे आता प्रमोद भोसले यांनी त्यांच्या तीन/चार वर्षांच्या काळात केले आहे. डॉ.परदेशींना प्रमोद भोसलेंना इथे आणले. त्यावेळी आम्हाला वाटले, ते जितके प्रामाणिक, हुशार आहेत, तशीच त्यांची टिम असेल असे आम्हाला वाटले होते. परंतू हे खोटे ठरवले. डॉ.परदेशी साहेबांना एखादी गोष्ट कळाली नाहीतर ते कळवून घेत होते. आणि उत्तर द्यायचे. नंतर सांगतो, तासाभराने सांगतो पण शंभर टक्के सांगायचे. प्रमोद भोसले यांचे तसे अजिबात होत नाही. मा.महापौर साहेब, कोणीही परिपूर्ण नसते. मी तर अजिबात नाही. मी तर म्हणेन की, मी तर विद्यार्थी आहे. मी पहिलीतली विद्यार्थी आहे आणि मला शिकायची खूप इच्छा आहे. एखादा पॉईंट जर समजत नसेलतर मी शंभर टक्के विचारणार. माझ्याकडून सभागृहामध्ये चुकीची माहिती जाऊ नये म्हणून मी विचारते. तर मला त्यांनी ती माहिती पुरवली पाहिजे. हे हेड कुणाचे स्थापत्यचे, मग स्थापत्य विभागातले त्यांचे लेखापाल यांच्याकडे जायचे. त्यांनी

बजेटच्या पुस्तकातल्या पानाची झेरॉक्स काढून द्यायची. एवढा सगळा प्रवास आम्ही करायचा, तो कशासाठी करायचा. आम्हाला जर हे कळाले असते तर हे जे काही आम्हाला टोप्या घालायचे काम चालते, ते आम्ही तुम्हाला करु दिले असते का आम्हाला ते कळत नाहीतर आम्हाला ते कळू द्यायची आमची इच्छा आहे, आमची शिकायची इच्छा आहे. म्हणून आम्ही तुमच्याकडे ती मागणी करतोय. परंतू त्याची पूर्तता न करता तुमच्या विभागाकडून वाटाण्याच्या अक्षता लावल्या जातात आणि यात तुमचा कमीपणा आहे, तुमचे अपयश आहे. मा.आयुक्त साहेब, तुम्ही जितके चांगले नगरसेवकांबरोबर वागता तेवढेच चांगले तुमच्या हाताखालच्या कर्मचाऱ्यांबरोबर देखील वागता. ज्यांच्यावर खरेच प्रशासनाचा दबाव असला पाहिजे, दरारा असला पाहिजे. त्यांच्याशी तुम्ही इतके चांगले वागता, आणि त्यातून निष्पन्न काय होते. तुम्ही एकटेच असता. मा.आयुक्त साहेब, आपण या गोष्टीकडे सुद्धा लक्ष द्यायला पाहिजे. मला वाटते, मी मागील वर्षी सुद्धा बजेट सभेत भोसले साहेबांची तक्रार केली होती. या वर्षी सुद्धा तक्रार केली आहे. सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात रु.२७७.३७ कोटींची आरंभीची शिल्लक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाची गती पाहता ही रक्कम रु.३५० कोटींच्या घरात पोहोचेल अशी मनात निश्चित खात्री आहे. ज्यावेळी सायन्स पार्कला बजेट समजून घेण्यासाठी बोलवले होते. तेव्हा बजेटच्या व्हिडिओ क्लिपिंगज् दाखवल्या होत्या. त्यावेळी सांगितले होते की, एलबीटीचे उत्पन्न वाढले आहे. म्हणून आमच्याकडे ही आरंभीची शिल्लक जास्त दिसते आहे. पण साहेब, आपणच सागिंतले की, बांधकाम परवाना विभागाकडून शंभर कोटी उत्पन्न कमी झाले आहे. म्हणजे एकूण एकच झाले आहे. एकिकडे एलबीटीचे उत्पन्न शंभर कोटींनी वाढले. दुसरीकडे बांधकाम परवाना विभागाचे उत्पन्न शंभर कोटींनी कमी झाले आहे. तरीसुद्धा आरंभीची शिल्लक वाढलेली दिसते. खरेतर इथे डॉ.माने साहेबांचे अभिनंदन व कौतुक केले पाहिजे. एलबीटी आल्यानंतर जी काही ओरड होत होती. आम्ही जकात सुरु करावी म्हणून आंदोलन केले होते. ज्या-ज्या वेळी जे-जे नगरसेवक अगदी शब्दशः उद्धार करत होते. आज त्यांना काय आहे. आपण बोलायची घाई किती करतो. भीक लागेल, हातात कटोरा येईल, हे होईल, ते होईल, त्यांचं वाट्टोळे होईल. आंदोलन करतात, असंच करतात, तसंच करतात. आज काय, रु.१३५० कोटी एलबीटीच्या माध्यमातून वसूल झाले असतील, आले असतील तर आज काय. त्यावेळी केलेले आंदोलन खरे होते. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर असते. फक्त वेळ व काळ येऊ द्यावा लागतो. त्याची वाट पाहणे अत्यंत गरजेचे आहे.

शहराच्या विकासाचा वेग वाढवायचा असेलतर प्रशासनाच्या कामाचा वेग वाढवणे सुद्धा तेवढेच गरजेचे आहे. परंतू प्रशासनावर सत्ताधा-यांचा व आयुक्तांचा वचक राहिलेला नाही. म्हणून सगळ्या महापालिकेत आम्हाला बेधुंद कारभार पहायला मिळतो आहे. फ्लेक्सबाबतील एक छोटेसे उदाहरण देतो. सन्मा.हायकोर्टाने एवढी तंबी दिली. आदेश काढले. परंतू संपूर्ण शहरभर अनधिकृत फ्लेक्स पाहिलेतर असे वाटते की हे फ्लेक्सचे शहर आहे का काय. इतके सुंदर, इतके अप्रतिम शहर आणि या शहरात लागलेले बेकायदा फ्लेक्स हे जर पाहिलेतर आपले प्रशासन किती कार्यक्षम आहे हे यावरुन आपल्याला दिसून येते आहे. आणि तक्रार केली, जिथे नगरसेवकांचे बोर्ड लागलेले आहेत, आता तिथे मोठमोठे फ्लेक्स लागलेले आहेत. आणि एखाद्या नागरीकाचा फोन आला की, मला तुमच्या घरी यायचे आहे. किंवा बाहेरुन आलेल्या व्यक्तीला सांगतो, तिथे असा असा बोर्ड लागला आहे, तिथे ॲरो आहे, तिथून या. तो म्हणतो, कुठे बोर्ड लागला आहे. मग लक्षात येते, अरे तिथेतर मोठा फ्लेक्स लागलेला आहे. मग काय सांगायचे, अरे तिथे घूस, बघ आणि घरी ये. मा.आयुक्त साहेब, हे फ्लेक्स काढले पाहिजेत. एक दिवस,दोन दिवस,वाढदिवस किती दिवस साजरा करायचा. सोम्या गोम्या चिम्या सगळ्यांच्या वाढदिवसाचे फ्लेक्स लागलेले आहेत. कारवाईच होत नाही. मा.आयुक्त साहेब, आत्ता खरेतर कारवाईची गरज आहे. तुम्ही आत्ता फौजदारी दाखले केलीतर निवडणुकीला अर्ज छाननीतच अर्ज बाद होणार. मी इथून पुढे तक्रार करताना तुमच्याकडे लेखी तक्रार करणार आहे. मी तुम्हाला कारवाई करायला भाग पाडणार आहे. मा.महापौर साहेब, अंदाजपत्रकाबाबतीत आयुक्त साहेबांनी केलेल्या निवेदनात पान नं.२वर म्हटले आहे, या वर्षाचे अंदाजपत्रक हे वस्तुस्थितीला धरुन व्हावे म्हणून प्रभागनिहाय बैठका घेऊन जास्तीत जास्त कामांचा अंतर्भाव केला आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मला असे म्हणायचे होते की, तुम्ही हे करायची कबूली दिली की, मागील वर्षाचे बजेट हे वस्तुन्ष्ठि नव्हते. तुमच्या कोणाच्याच निवेदनात हे नाही. तुम्ही या वर्षी तसे निवेदन केले आहे. त्यामुळे मला वाटते की, या शहरात जे पोटन्शियल आहे, त्याला धरुन आपला हवा तसा विकास झालेला नाही. आणि जर आपल्याला तसा विकास करायचा असेलतर मा.आयुक्त म्हणतात तसा वस्तुनिष्ठ, जर त्यांनी याठिकाणी अभ्यास केला असेल आणि खरोखर प्रभागनिहाय बैठकांचा आपण तिथे आढावा घेऊन कामाच्या निविदा चालू केल्या, जर कामे काढलीततर तर निश्चितपणे या वर्षाचे हे अंदाजपत्रक वस्तुनिष्ठ अंदाजपत्रक म्हणता येईल. बजेटमध्ये काही ठिकाणी असे झाले आहे की, काही भागांचा अतिविकास झाला.

म्हणजे अजून विकास नको असे म्हणायची वेळा नागरीकांवर आली. एकाच भागात तुमचे थिएटर, एकाच भागात तुमचे गार्डन, एकाच भागात तुमचे सांस्कृतिक केंद्र, एकाच भागात तुमचे सर्पोद्यान, काय-काय म्हणून देणार आहोत. त्यांना देताय याचे आम्हाला दुःख नाही. परंतू गेले अनेक वर्षांपासून, २० वर्षे झाली, जी नवीन गावे महापालिकेत येऊन देखील आजही आपले त्यांच्याकडे दूर्लक्ष आहे ख-याअर्थाने शहरात सर्वांत जास्त उत्पन्न देणारी ही गावे आहेत. त्यांच्याकडे जाणूनबुजून दूर्लक्ष करताय कारण तिथले नगरसेवक तेवढे ताकदवान नाहीत. ते दबावतंत्र वापरणारे नाहीत. म्हणून आपण दूर्लक्ष करताय हा माझा आरोप आहे. हे मी आकडेवारीवरुन स्पष्ट करुन देऊ इच्छिते. नवीन गावे आहेत, त्यातील पाणीपुरवठ्याचा विषय असेल, स्थापत्यचा विषय असेल, जलनिःसारणाचा विषय असेल, विद्युतचा विषय असेल याकरिता केलेली तरतूद अत्यंत तोकडी आहे. जुने शहर आहे तिथे वाढीला जागा राहीलेली नाही. मघाशी काही बंधूंनी सांगितले, आजूबाजूच्या गावांत बिल्डरचे खुप मोठमोठे प्रकल्प होत आहेत. महापालिकेने इथे सुविधा दिल्यातर महापालिकेला जास्तीत जास्त उत्पन्न मिळेल. नागरीकांना सुखसुविधा मिळणार आहेत. आपण त्यांच्याकडून उत्पन्न काढणार आहोत. आपण टॅक्स घेणार आहोत. खरेतर आपण या गावांकडे जाणिवपूर्वक लक्ष द्यायला पाहिजे. हे खरेतर आयुक्त साहेबांचे काम आहे. मा.महापौर साहेब, तळवडे, चिखली, दिघी, पुनावळे, मोशी, रावेत, च-होली या नवीन गावांचा समावेश झाला असल्याचे मा.आयुक्तांचे म्हणणे आहे. ही गावे १९९७ साली महापालिकेत समाविष्ट होऊन वीस वर्षे झाली आहेत. विकासाचा पॉईंट एक टक्का येथे धरता येईल असा विकास आपण त्याठिकाणी केला. या गावांमध्ये टिडीआर वाटप जास्त झाला. आरक्षणे ताब्यात घेतली. पण आरक्षणे विकासित कुठे झाली आहेत. आरक्षणे ताब्यात घेतली म्हणजे विकसित होतात का. मला त्यात एक सुखद धक्का किंचितसा असा वाटतो की, किमान ज्या गावक-यांच्या जमिनी ताब्यात देऊन टिडीआर दिला असेल, तेवढेच त्यांच्या वाटेला आलेले सुख म्हणता येईल. परंतू नागरीक म्हणून सुविधा देताना तुम्ही कमी पडला आहात हे सुद्धा विसरून चालणार नाही. या वीस वर्षांमध्ये आपण या गावांना मुलभूत सुविधा सुद्धा देऊ शकलो नाहीत, हि अत्यंत संतापजनक घटना आहे.

मा.आयुक्त साहेब, मी मघाशी मुख्य उद्यान अधिक्षक, श्री.साळुंके यांच्याकडून माहिती घेतली. साळुंके यांचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. बघा कोणालातरी दुसरा शोधा, त्याला आणा, त्याला ट्रेनिंगला पाठवा. त्याला उद्यानाचे काय शिकवायचे ते शिकवा. पण साहेब, हात जोडून विनंती करते की, साळुंके यांना तिथून बदला. नाहीतर

आता आम्हाला बदलावे लागेल. इतकी वाईट वागणूक ते नगरसेवकांना देतात. मला वाईट वागणूक देत नाहीत म्हणजे इतरांना देत नाहीत असे नाही. आम्ही सुद्धा चौदावे रत्न दाखवले म्हणून ते माझ्याशी नीट वागतात. त्यांना काहीच माहित नसते. आपणच सांगितले होते, नवीन समाविष्ट गावांमध्ये दहा प्रभागांमध्ये एकही उद्यान नाही. सात प्रभागांत उद्यान विकसित करण्यासाठी मोहिम हाती घेतली आहे. बजेटमध्ये तरतूद केली आहे. आपण नवीन पन्नास हजार झाडे लावणार आहोत. शहराचा ग्रीन भाग ३१ टक्के आहे. मागील वर्षी शहराची ग्रीनरी ३१ टक्के होती. त्याच्या आदल्या वर्षी ३१ टक्के होती. म्हणजे ३१ टक्यांच्या पलिकडे आपण काही जात नाहीत. दर वर्षी पन्नास हजार, एक लाख, दीड लाख झाडे लावतो. मग ती कुठे जातात. त्यांची टक्केवारी का वाढत नाही. त्यांची टक्केवारी हा विषय नाही. एकतर ही झाडे जगतच नाहीत. आणि दुसरे म्हणजे साहेब, मी उद्यानचे एक प्रकरण दिले होते. उद्यान विभाग एक फुटाच्या, दीड फुटाच्या पन्नास हजार, एक लाख झाडांची खरेदी करताना स्थायी समितीची मंजूरी होण्याआधीच आपण वर्कऑर्डर दिली होती. इतकं धाडस, इतकं धारिष्ट्य, इतका मुजोरपणा, इतरका माजोरपणा एखाद्या अधिका-यात कसा येऊ शकतो. या विषयावर आपण ऑटोक्लस्टरला माझी सुनावणी घेतली होती. त्यावेळी त्यांनी तुमच्यासमोरच कबूल केले होते की, हो मंजूरी घेण्याआधी वर्कऑर्डर दिली आहे म्हणून. त्यावेळी ठरले होते की, अडीच फुटांची, पाच फुटाची झाडे जी काही असतील ती आमच्या समोर आणा. आपण हे मुद्दाम केले नाही. आपण सुद्धा साळुंके साहेबांना पाठिशी घातले. कुंपणच शेत खात असेलतर कोणाकडे दाद मागायची. तुम्ही त्यांना धारेवर धरायला पाहिजे होते. तुम्ही त्यांच्यावर कारवाई केली नसती, तुम्हाला त्यांच्यावर कारवाई करायची नव्हती. तरी हे सत्य तरी लोकांसमोर आले असते की, झाडे अडीच फुटांची घेतली आहेत, आणि पाच फुटांचा रेट दिला आहे. आपल्या एखाद्या ठेकेदाराला त्यात बसवण्यासाठी अटी-शर्ती कशा बदलू शकतात. सहाशे रुपायाला अडीच फुटाचे झाड येत नाही, हे माहित असताना सुद्धा त्याने निविदा भरली. आणि निविदा भरुन त्यालाच कंत्राट का देण्यात आले. माझा याठिकाणी ठाम आरोपच नाहीतर माझ्याकडे याची पूर्ण माहिती आहे. ही झाडे घेतली ती एकाच प्रकारची घेतली होती. आणि घेतली असतील तर आपले ठरले होते की, आपण त्याठिकाणी मोजणी करणार आहोत. मघाशी कोणीतरी बंधुंनी सांगितले की, आपण झाडांची गणना केली पाहिजे. आपण झाडांचीच गणना करत नाहीतर कुत्र्यांची कधी करणार आहोत. मागील वर्षी मी विनंती केली होती की, आपण झाडांची गणना करु यात. झाडे जगत नाहीत मग आपण दरवर्षी

कोट्यावधी पैसे कसे खर्च करतो. मा.महापौर साहेब, मला असे वाटते की, याकडे आयुक्त साहेबांनी गांभिर्याने बघायला पाहिजे आहे. मा.आयुक्त साहेब, आपण बहिणाबाई चौधरी प्राणीसंग्रहालयासाठी या बजेटमध्ये साडे पंधरा कोटी रुपये ठेवले आहेत. आपण ग्रामीण भागातल्या एकातरी उद्यानासाठी एवढे पैसे ठेवलेत का. याच्या .१ टक्के ठेवले आहेत. साहेब, तुम्हाला बोलले की राग येतो. खरे आहे, वस्तुस्थिती आहे. जे दबाव आणतात, जे सभागृह चालवतात त्यांचे ऐकता सभागृहातले ग्रामिण भागातले नगरसेवक सुद्धा लोकशाही पद्धतीने निवडून आले आहेत. त्या भागातलेही नागरीक टॅक्स भरतात. तुम्ही त्यांच्यासाठी तरतूद केली नाही पाच लाख, दीड लाख अशा तरतूदी ठेवल्या आहेत.

मागील वर्षी जेएनएनयूआरएम अंदाजपत्रकात रु.११०० कोटींची रक्कम जेएनएनयूआरएमच्या योजनांसाठी वापरण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले होते. महत्वाचे म्हणजे बजेट मांडताना मी हे सांगितले होते, ही तरतूद फसवी आहे. त्यावेळी तुम्ही माझे म्हणणे नाकारले होते माझे म्हणणे खोडून काढण्यासाठी आपण खूप प्रयत्न केले. इतर सदस्यांनी पण केले. परंतू साहेब आपल्याला स्वतःला हे माहित आहे की, ही तरतूद खर्च झाली नाही. किंवा बजेटच खर्च झालेले नाही सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात जेएनएनयूआरएमच्या विविध योजनेअंतर्गत ईडब्ल्यूएस योजनेसाठी रु.१०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. बीएसयूपीसाठी रु.७३ कोटींची तरतूद करण्यात आली होती. बीआरटीसाठी रु.१८०.७२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. मात्र सन २०१५-१६च्या सुधारीत अंदाजपत्रकामध्ये ईडब्ल्यूएस मधील तरतूद रु७० कोटी कमी करुन रु.३० कोटी केली आहे. ही तरतूद का कमी केली आहे. ईडब्ल्यूएसचा प्रकल्प वादातीत आहे, कोर्टात आहे. आपण ते करु शकत नाही म्हणून ही तरतूद कमी केली आहे का. का काम पूर्ण होणार नाही म्हणून तरतूद कमी केली बीएसयूपीचे रु.५२.६६ कोटी तरतूद कमी करुन ती रु.२०.३४ कोटी करण्यात आली आहे. बीआरटीसाठी असलेल्या तरतूदीमधून रु४०.७८ कोटींनी कमी करुन रु.१३९.९४ इतकी कोटी करण्यात आले आहेत. इथे बीआरटीची तरतूद आपण कमी केलीत. बीआरटीबाबतीत आम्हाला वारंवार सांगावेसे वाटते. मघाशी एक भगिनी म्हणाल्या की, बीआरटी उत्तम चालली आहे. मला त्यांना रावेत इथला एक किस्सा सांगायचा आहे. तुमच्या रावेत इथे बस आल्यानंतर पूर्ण बॅरीकेटस् धडाधडा काढत गेले साहेब, आपले इंजिनिअर आहेत का ते मिस्त्री आहेत का ते गवंडी आहेत हा प्रश्न मला खरेच पडतो. बसची लांबी-रुंदी किती आहे हे न मोजता बॅरीकेटस् लावले तिथे सुशोभिकरण केले. ते

तुटले गेले. त्याठिकाणी जीवघेणा अपघात होता होता राहीला. आपण आत्ता काय केले, संपूर्ण शहरातले जेवढे बीआरटीएसचे बसस्टॉप तयार केले होते ते सगळे खोदले व नवीन तयार केले. कारण बसची उंची व त्या बसस्टॉपची उंची मॅच होत नव्हती. हा खर्च कोणाच्या डोक्यावर ठेवणार आहात. करदात्या नागरीकांचे हे पैसे आहेत. हा तुमच्या-आमच्या घरातला पैसा नाही. आणि अशा पद्धतीने आपण बेजबाबदारपणे जे-जे काम करत असतील, मग एचओडी म्हणून राजन पाटील जर काम पाहत असतील तर त्यांच्यावर सुद्धा कारवाई होणे तितकेच गरजेचे आहे. आज आपण पाहिले की, मागील पाच वर्षे आम्ही सूचना देतोय. नागरीक उन्हापावसात उभे राहतात. या पाच वर्षांत हे चित्र दुर्मिळ झाले आहे सगळे जुने बसस्टॉप काढून त्याजागी नवीन बीआरटीएसचे बसस्टॉप लावले आहेत. कोट्यावधी रुपयांचा चुराडा आहे. याला जबाबदार कोण आहे. कुणावर ॲक्शन घेतलीत. तुम्ही कुणावरच ॲक्शन घेतली नाही. तुमच्याकडे ॲक्शनच नाही. त्यामुळे आमची सगळी रिॲक्शन तुमच्यावर येते. ईडब्ल्यूएस, बीएसयुपी व बीआरटीएससाठी सन २०१५-१६ च्या मूळ अंदाजपत्रकातली तरतूद रु.३५३.७२ कोटी रुपयांची तरतूद रु.१६३.४४ कोटी रुपयांनी कमी करुन सुधारीत अंदाजपत्रकात ती रु.१९०.२८ कोटी करण्यात आली. परंतू प्रत्यक्षात ईडब्ल्यूएससाठी असलेल्या मूळ तरतूदीतील रु.१०० कोटींपैकी फक्त रु.११.९१ कोटी खर्ची पडले आहेत. खर्ची पडत नसतील तर कशाला एवढी तरतूद ठेवता. आपल्याकडे खूप कामे करण्यासारखी आहेत. त्यासाठी हे बजेट ठेवा. घरपट्टी वसूली कशासाठी करता. आमच्यासारख्या नगरसेवकांना ज्यांच्या वॉर्डात ही कामे चालतात किंवा आत्ता जी लोकं ओरडत होती. त्यांना हे बजेट करायला दिलेतर तुमच्या आजपेक्षा जास्त तरतूदी करतील. तुमचा या जी.बी.त सत्कार करतील. काम करुन घेण्यासाठी आम्ही निवडून आलो आहोत. पहिले वर्षभर आम्हाला बजेट मिळतच नाही. हे बजेट सुद्धा आमचे शेवटचे बजेट आहे. जे निवडून येतील ते सभागृहात असणार, बाकीचे सभागृहात नसणार. मग तुम्हीच नगरसेवक, तुम्हीच अधिकारी. आमचे कुठे काय असते. तुम्हीच तरतूद करणार, तुम्हीच शासनाकडून मंजूरी घेणार. आम्ही येणार. आमचे गॅझेट येईपर्यंत मार्च महिना संपलेला असतो. त्यापुढे २०१८ चे बजेट आम्हाला मिळणार. जे बिचारे मागच्या पंचवार्षिकमध्ये निवडून आले त्यांना बजेट काही कळालेच नाही. सन २०१३-१४ चे बजेट मिळाले. त्यात नीट तरतूद करता आली नाही. अधिका-यांना बोलायचे धाडस होईपर्यंत बजेट आले होते. आजपर्यंत जे कळाले त्यात सुद्धा तुम्ही आमच्या नवीन लोकांची डाळ शिजू दिलेली नाही त्यात मी सुद्धा आहे. बीएसयुपीसाठी मूळ तरतुद रु.७३ कोटींपैकी फक्त रु.६.७२ कोटी खर्ची

पडले आहेत. रु.७३ कोटी ठेवतो व रु.६.७२ कोटी खर्च करतो. ६.७२ कोटी कुठे खर्च केले ते सांगा. हा फुगवटा आणतो का श्रीमंतीचा थाट ठेवतो. तो न ठेवता आपण आपल्या परिस्थितीनुसार बजेट केलेतर मला वाटते, जास्त चांगले होईल व आपण टिकेचे धनी कमी व्हाल. तसेच बीआरटीसमधील मूळ तरतुदीतील केवळ रू.१८० कोटींपैकी केवळ रु.४२.६३ कोटी खर्ची पडले आहेत. मा.आयुक्त साहेब, गेली साडेतीन वर्षे झालीत, मी एका विषयाचा पाठपुरावा करतेय. माझी तुम्हाला हात जोडून विनंती आहे की, मुंबई-पुणे हाय-वे निगडीपासून दापोडीपर्यंत जातो. मधला ग्रेडसेपरेटर, बीआरटीएस स्लॅबने, रोज सकाळ, दुपार, संध्याकाळ इतके ट्रॅफिक जाम होते. मला वाटते, मी मुंबईत रहायला आले आहे काय. कधीही रस्ता मोकळा मिळत नाही. कधीही बाहेर निघालो आणि सिग्नल लागला नाही असे होत नाही. यापूर्वी असे होत नव्हते. आपण बीआरटीएस चालू करायच्या नादामध्ये पुणे-मुंबई हाय-वे फिजिबल नसताना सुद्धा आपला जो हट्ट चालला आहे तो सोडा ना. एखादे घर उद्धवस्त केल्यानंतर आपण हा हट्ट सोडणार आहात का. का आम्ही तुमच्या विरोधात कोर्टात गेल्यावर सोडणार आहात. त्यावेळचे आयुक्त डॉ.श्रीकर परदेशी यांना त्यावेळी सांगितले होते. त्यांना त्यासंदर्भात नोटीस बजावली आहे. बीआरटी बसने पुणे-मुंबई हाय-वे वर एकजरी जीव गेलातरी त्याला जबाबदार जो कोणी आयुक्त असेल त्याला धरण्यात येईल. जीव काय रस्त्यावर पडला आहे का. जीव गेला की काय परत मिळत नाही. माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे की, रावेत असेल, आळंदी असेल नवीन डेव्हलपमेंट जिथे आहे, तिथे रस्ता वाढायला जागा आहे. जिथे जागा नाही तिथे बीआरटी करताय अशी परिस्थिती केली आहे. चिंचवडला प्रदिप स्विटस्  च्या अलिकडे आत लेनमध्ये कशीपण गाडी काढा टाक टाक दोनदा जॅक बसल्याशिवाय गाडी पुढे जातच नाही. तुम्ही कशाला असे करताय. मुळात स्पीड ब्रेकरने स्पीड कमी केला पाहिजे. सरळ जाणारी गाडी व इकडून येणा-या गाडीचा स्पीड मॅच झाला पाहिजे. त्यांनी त्यांचे इंजिनिअरचे डोके वापरले पाहिजे. आम्ही इंजिनिअर नसताना आम्हाला एवढे कळते. मग यांना सुद्धा कळायला पाहिजे. केवळ पाट्या टाकायचे काम करतो आहोत. मा.महापौर साहेब, जेएनएनयुआरएमची मुदत मार्च २०१५ ला संपली होती. परंतू केंद्र शासनाने अर्धवट प्रकल्प पूर्ण करण्यासाठी दोन वर्षांची मुदतवाढ दिली आहे. जेएनएनयूआरएमच्या अंदाजपत्रकातील आरंभीची शिल्लक रु.८१५.८८ कोटी आहे. या सर्व प्रकल्पांची मुदत मार्च २०१७ ला संपणार आहे. तुमचे नशीब समजा तुम्हाला अजून मुदत वाढवून दिली ती संपणार असेलतर आपण कोट्यावधी रुपयांचे काय करणार आहोत. यासाठी आपल्याला काय करता येईल. याकडे

सुद्धा आपण लक्ष दिले पाहिजे. आपण फक्त मुदतवाढीची रक्कम बजेटमध्ये टाकतोय आणि काम तर होत नाही. या प्रकल्पाच्या कामाची गती, भूसंपादनाची सद्यस्थिती आणि कायदेशीर गुंतागुंत पाहता सन २०१६-१७ च्या बजेटमधली जेएनएयूआरएमची १० टक्के सुद्धा रक्कम खर्च होणार नाही याबद्दल माझ्या मनात खात्री आहे. जेएनएनयूआरएमची मुदत मार्च २०१७ला संपत असल्यामुळे आणि राज्य शासन व केंद्र शासन यांनी मुदतवाढ दिली नाही तर रु.२५० कोटींची निधी परत करायची नामुष्की आपल्यावर येऊ शकते. हे आपल्याला नाकारता येणार नाही.

मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मघाशी खरेतर ज्येष्ठ नगरसेवक मा.आर.एस.कुमार यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की, महापालिकेचे कामकाज पेपरलेस व्हायला पाहिजे. पेपरलेस करायचे म्हणून आपण कोट्यावधी रुपये संगणकीय पद्धतीवर खर्च केले. साहेब, तुम्हाला खरे सांगू का. एखाद्या अधिका-यांना जर चुकून फोन झाला, त्यांना सांगितले की, साहेब, मेसेज पाठवला आहे तो जरा बघा. तर ते अधिकारी म्हणतात, ताई मला मेसेज बघता येत नाही. कोणालातरी सांगा. तुम्ही शिका, शिकले पाहिजे. जिथे मेसेज बघता येत नाही, तिथे पेपरलेस कामकाज कसे करणार. त्याठिकाणी अधिका-यांना जबरदस्तीने ट्रेनींग द्यायला पाहिजे होते. आपण इलेक्ट्रीकल जॉब आहे, लिपीक आहेत त्यांना कॉम्प्यूटरच्या दोन दोन परीक्षा पास करायला लावतो. डीटीपी आलेच पाहिजे, टॅली आलेच पाहिजे. मग यांना सुद्धा संगणक वापरायला सांगितले पाहिजे. माझ्या वरिष्ठांना येत नाही आणि मला येते. हे मला माहित आहे. मग मी काय करते, काय लिहिते त्यांना काही कळत नाही. मग माझी मजाच आहे ना. तुम्ही त्यांच्याकडे सुद्धा लक्ष द्यावे अशी मी विनंती करते

नुकताच ८ मार्च होऊन गेला आहे. स्त्रीशक्तीचा जागर. आपल्या शहरभरात, जगभरात जागतिक महिला दिन म्हणून महिलांसाठी वेगवेगळे सामाजिक उपक्रम, योजना राबविल्या गेल्या. आपण मात्र महिलांसाठी काही करत नाही. तुमचे महिला व बालकल्याणचे बजेट सोडलेतर एक योजना सांगा जी महिलांसाठी केली आहे. महिलांना सक्षमीकरण करण्यासाठी तर सोडाच जी नैसर्गिक गरज आहे, टॉयलेटची ती सुद्धा तुम्ही आमची पूर्ण करत नाही आहात. चार वर्षे झाली, तुम्ही येऊन सुद्धा दोन अडीच वर्षे लोटलीत. गेले १० वर्षांत आजपर्यंत एकाही बसस्टॉपच्या बाजूने एकही लेडीज टॉयलेट बांधले गेले नाहीत. हे या महापालिकेचे दुर्दैव आहे. काय काडी लावायची तुमच्या या साडेतीन हजारच्या बजेटला आम्ही. जर नैसर्गिक गरज भागवण्यासाठी जर आम्हाला घर गाठावे लागते, मग या बजेटचे काय करायचे. आमच्या सभागृहाबाहेर महिलांचे

टॉयलेट आहे. ते एकच आहे. जेव्हा सभागृह बंद असेल तेव्हा फेरफटका मारुन बघा आतमध्ये काय परिस्थिती आहे. ज्याठिकाणी कमोड ठेवले आहे, बरोबर त्याच्या समोरच दुसरे टॉयलेटची व्यवस्था केली आहे. म्हणजे काय करायचे. साहेब, हा बोलायचा विषय नाही. परंतू बोलावे लागते. मी ज्या-ज्या वेळी महापालिकेत आतमध्ये आले की माझा पहिला फोन दंडवते साहेबांना असतो. दंडवते साहेब, अहो किती टॉयलेट/बाथरुमचा वास येतोय. सांगायचे तात्पर्य काय, लिफ्टच्या बाजूला आलो की तिथे गॅरंटीने कळते की आपण तिथे आलो आहोत. काय परिस्थिती आहे. पहिला मजला, दुसरा मजला, तिस-या मजल्यावरच्या टॉयलेट ब्लॉकची काय अवस्था आहे. या बिल्डींगमध्ये अशी अवस्था असेलतर तुम्ही शहराची अवस्थातर विचारुच नका. मा.महापौर साहेब, मला खरेतर खूप अपेक्षा होती की, तुम्ही काहीतरी कराल. जेंडर बजेटमध्ये प्रशिक्षणापलिकडे जात नाही. जी आमची गरज आहे ती तुम्ही पूर्ण करत नाहीत. महिलांसाठी एकही पीएमपीएमएलची बस जात नाही. दोन बसेस चालू केल्या होत्या. त्यासुद्धा आपण बंद केल्या आहेत. महिला म्हणजे तुमच्या उत्पन्नाचे साधन आहे का. ही आमच्यासाठी सोयीसुविधा होऊ शकत नाही का. सोय म्हणून तुम्ही याकडे का बघत नाहीत. जर आम्हाला धक्का खायचा नसेल, गर्दीत जायचे नसेल. आमच्या म्हणजे माझ्या जमातीतल्या महिला, मुलींच्या, भगिनींच्या अंगचटीला पुरुष येतात म्हणून आम्हाला स्पेशल बस पाहिजे आहे. आणि ती आमच्या कामाच्या वेळत पाहिजे. ही गरज सुद्धा तुम्ही पूर्ण करत नाही आपण पीएमपीएमएलला रु.११० कोटी देतोय. तुम्ही करत नाही. याठिकाणी तुम्ही सभागृहात ६५-६५ जणी महिलांचे प्रतिनिधित्व करतोय. आम्हाला लाज वाटते, ६५ जणी असून सुद्धा आम्ही स्वतःला न्याय देऊ शकत नाही तर दुस-यांना काय न्याय देणार. त्याचे तुम्ही इम्प्लिमेंटेशन करत नाहीत. तुमच्याकडून इम्प्लिमेंटेशन झाले पाहिजे. मा.आयुक्त साहेब, आपण मागील वर्षी दुसरा एक विषय केला होता. महिलांसाठी जलतरण तलावात सकाळची वेळ द्या म्हणून सांगितले होते. सकाळी ६ ते ७ ही वेळ घेतली होती. आम्ही आंदोलन केले, तुमच्याकडे आलो. तुम्ही मान्य केले. त्यानंतर ६/७ महिने ही योजना चालू होती. वेगवेगळ्या नगरसेवकांनी वेगवेगळ्या पद्धतीने दबाव तंत्र वापरले. आत्ता मा.संगिताताईंनी सांगितले की, मतदार यादीनुसार आम्ही गेलोतर या शहरातील महिलांची लोकसंख्या सुमारे दहा लाख आहे. आम्हाला देखील गाजर दाखवता की, तुम्ही जर महिलांच्या नावावर प्रॉपर्टी केलीतर पन्नास टक्के सूट मिळेल. तुम्हाला आमची काळजी आहे म्हणून तुम्ही हे करत नाहीत तर तुमचे उत्पन्न वाढावे म्हणून हे तुम्ही करता त्या जलतरण

तलावामध्ये तुम्हाला काय उत्पन्न आहे. पार अगदी बोपोडी,खडकीमधून लोक आपल्या शहरामध्ये येतात. स्विमिंग पूलचा वापर करतात आपण दहा रुपयाचे तिकिट ठेवले आहे. तुम्ही जे जलशुद्धीकरण करता, त्या प्लँटचे सुद्धा पैसे आमच्या नागरीकांच्या खिशातून जातात. परंतू आम्ही ज्यावेळी महिलांसाठी मागणी केलीतर दूर्दैव म्हणावे लागेल किंवा काही म्हणावे लागेल, काही जणांच्या पोटात दुखले. दबावतंत्र वापरले गेले. माझे प्राधिकरणातील एक बंधू, ते नगरसेवक आहेत. त्यांनी मला एक व्हिडिओ क्लिपिंग दिली होती. मी ती तुम्हाला सुद्धा दाखवली होती. महिला, मुली तलावात पोहत आहेत. आणि एक धटींग खालून येऊन त्यांच्या शरीराला स्पर्श करतो एवढे दाखवून सुद्धा आपण ही वेळ रद्द केलीत. आमचा या बजेटवर अधिकार नाही का. तुम्ही आम्हाला टॉयलेट ब्लॉक्स् द्यायचे नाहीत तुम्ही आम्हाला बस द्यायची नाही. तुम्ही आम्हाला स्विमिंग पूल द्यायचा नही. एका सेशनला ४५ मिनिटे लागतात, ती सुद्धा तुम्ही आम्हाला द्यायची नाहीत. तुम्ही एकही स्विमिंग पूल आमच्या टाईमला राखीव ठेवायचा नाही. खूप महिला व मुलींना वेगवेगळे खेळ खेळायची आवड असते तो सुद्धा तुम्ही देत नाहीत. तुम्ही सगळ्या जेंडर बजेटची ऐशी-तैशी करताय. मग महिला कमिटी आली होती त्यावेळी आम्ही सगळ्यांनी म्हणजे, सुलभाताई असतील, मंगलाताई असतील आम्ही सगळ्यांनी ठरवले होते की, आपण महापालिकेबद्दल बोलायचे नाही. त्याचे हे फळ. त्याची कुणालाच खंत वाटू नये. त्याठिकाणी ज्यावेळी असा विषय घेतला होता. ज्यावेळी आम्ही त्या महिला भगिनींबरोबर पोलिस स्टेशनला गेलो होतो, त्यावेळी पोलिसांनी सांगितले की, स्त्री-पुरुष एकत्र आंघोळ करत असतील तर काय गुन्हा दाखल होतो, हे कलम सुद्धा दाखवले होते. मा.आयुक्त साहेब, तरी आपणे ते केलेले नाही. उद्या परवा माझी नोटीस तुम्हाला येईल. ही नोटीस मी एकटी नाही पाठवणार तर हजारो महिलांना देखील पाठवायला लावणार आहे. मी स्विमिंग करत असताना माझ्याकडे वाईट दृष्टीने बघतले जाते किंवा माझी खिल्ली उडवली जाते. एका स्विमिंग पूलामध्ये एकावेळी चाळीस/पन्नास लोक जायला नाही पाहिजेत. जर स्विमिंग पूल मोठा असेलतर तिथे ६० लोक उतरवतो. महिला भगिनी त्यांच्या कामाच्या वेळा सांभाळून तिथे जात असतील तर त्यांना तिथे पोहायला मिळत नाही. म्हणजे आम्ही आमची आवड जोपासायचीच नाही. आम्ही तोंड दाबून बुक्यांचा मार सहन करतोय. आणि तुम्ही या बजेटमध्ये सुद्धा आम्हाला तोंड दाबून बुक्यांचा मार दिलेला आहे. आमचे दूर्दैव आहे. सभागृहामध्ये एवढ्या महिला असताना, शहरात दहा लाख महिलांची संख्या असताना आम्ही त्यांना एक तास पंचेचाळीस मिनिटे सुद्धा आपण देऊ शकत

नाही. हे बजेट वाचत असताना आम्हाला या बजेटची शरम वाटते. मा.आयुक्त साहेब, एकदातरी माणुसकीच्या दृष्टीकोणातून आमच्याकडे बघायला शिका. आम्ही अबला नाही आहोत, शंभर टक्के आम्ही अबला नाही आहोत, सबला आहोत. पण आमचा अधिकार आम्हाला तुमच्याकडून हिसकावून सुद्धा घेता येतो परंतू प्रत्येक वेळी संघर्ष केलाच पाहिजे अशी जर प्रशासनाची इच्छा असेलतर आम्ही त्याला सुद्धा तयार आहोत. मा.आयुक्त साहेब, मला काल याठिकाणी चार्ट दिला आहे. काल माझी मा.फुंदे, सहा.आयुक्त यांच्याशी हमरीतुमरी झाली. माहिती मागीतली, माहितीच नाही. तुमच्या क्रिडा विभागाच्या एका एका अधिका-याबद्दल काय बोलायचे. कसे का होईना, मी म्हटले, उद्या माहिती पुरवली नाहीतर सकाळी प्रभाग ऑफिसमध्ये लॉक लावणार. म्हणून सकाळी सकाळी माहिती दिली. आपण संख्या पाहिलीतर पुरुषांच्या तुलनेत सकाळच्या बॅचला तेवढ्याच महिला येत होत्या. विरोधी पक्षाने एखादे चांगले काम केले की, त्याचे क्रेडिट मिळू नये म्हणून असे करत असतात मघाशी मा.सुलभाताई ऊबाळे म्हणाल्या होत्या, पुढील महापालिकेचा महापौर व स्टँडींग चेअरमन हा युतीचा असणार आहे, याबाबतीत अजिबात दुमत नाही. आणि माझे याठिकाणी स्वप्न आहे, चॅलेंज आहे. हे आम्ही करुन दाखवणार. या शहरातील भगिनींना मी हे आश्वासन देऊ इच्छिते की, मघाशी मा.नारायण बहिरवाडे यांनी खूप शेरोशायरी वाचली. बहिरवाडे साहेब, मी तुम्हाला एक शेर ऐकवते,

संघर्ष में आदमी अकेला होता है, सफलता में दुनिया उसके साथ होती है।
जब जब दुनिया उसपर हँसती है, उसीने इतिहास नया लिखा है ।।

हाच शेर मी पुढच्या २०१७ च्या अंदाजपत्रक सभेमध्ये पुन्हा वाचणार आहे.

मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पोटतिडकीने बोलत असताना खरेतर आजच्या ज्येष्ठ नगरसेविका मा.झामाबाई बारणे यांना बघितल्यानंतर नगरसेवक कसा असावा, त्यांच्यासारखा असावा असे मनापासून वाटते. त्या सुद्धा मघाशी अत्यंत तळमळीने बोलल्या. त्या कशासाठी एवढे बोलतात. एकदातरी त्यांची मने ऐकून घ्या. जे तुमच्या इथे येऊन रोज बसतात, फोन करतात त्यांचेच ऐकू नका. जे येत नाहीत त्यांचे सुद्धा काहीतरी विषय आहेत. मघाशी मा.शमिम पठाणताईंनी सांगितले, आमच्याकडे बालनगरी,कुस्तीचा आखाडा, सोन्याच आगर. बाई, आमच्याकडे सोन्याच आगर नाही बरं का. भोसरीत काही असलं फळाफुलांचे प्रदर्शन असलेतरी आम्हाला त्याच निमंत्रण सुद्धा येत नाही. स्वरसागर शंभर टक्के झाले पाहिजे आणि ज्या भागात पब्लिक जास्त जात असेलतर तिथे झालेच पाहिजे. परंतू शहरातले सगळे नागरीक कर

भरत असतील तर ते भोसरी, चिंचवड, पिंपरी या तिनही मतदार संघांत,तिनही ठिकाणी दरवर्षी ठिकाण बदलून दिले पाहिजे. जेणेकरून त्या भागातले नागरीक सुद्धा आनंद घेऊ शकतील. फळाफुलांचे प्रदर्शन - जे काही करतात. मग ते चांगले आहे का वाईट आहे हे कळायला वेळच मिळत नाही. मग दुसऱ्या दिवशी बातमी येते की, कच-याचे ढिग साठले आहेत. त्याचे फोटो आले होते. मग आपण एकच दिवस करतो का काय असा त्याठिकाणी विचार केलातर उत्पन्न वाढीच्या हिशोबाने आपण थोडेफार लक्ष दिले पाहिजे. जाहिरात फलकांचा विषय आहे. आपले जे आताचे उत्पन्न आहे, ४.५ कोटी रुपये. फारफारतर हे उत्पन्न ६.५ कोटींवर जाईल. परंतू आपण जर हे टेंडरींग केलेतर महापालिकेच्या हद्दीत कोणालाही जाहिरात फलक लावायचा असेल, अगदी मूळ मालक असलातरी त्याचे टेंडरींग केलेतर त्याचे ४० टक्के रक्कम आपल्याला व ६० टक्के रक्कम त्याला जर दिलीतर तो सुद्धा खुशीखुशीने करेल टेंडरींग केलेतर हा विभाग सुद्धा १०० कोटी उत्पन्न मिळवेल. आपण काय करणार, तुमची इच्छाशक्तीच तिथे कमी पडते. या शहरात हजारो फ्लेक्स आहेत. तुम्ही कासारवाडीच्या उड्डाणपूलापाशी पुण्याकडे जाताना आलात तर त्या चौकात तिथे २४ फ्लेक्स लागलेले आहेत. किती फ्लेक्स लावायचे याची सुद्धा मर्यादा राहिलेली नाही. आपण टाळाटाळ का करतो. आपण निर्णय घ्या. हा चांगले उत्पन्न देणारा विभाग आहे. टेंडरींग झालेतर महापालिकेच्या तिजोरीत पाच पन्नास कोटी वाढतील. हे पैसे आपल्या विकास कामांसाठी उपयोगी येतील.

मा.महापौर साहेब, मघाशी शिवणयंत्रांचा विषय झाला, सायकलचादेखील विषय झाला. मला काल कळाले की, आपण वर्कऑर्डरवर सही केली आहे. सायकलसंदर्भात आम्ही विरोध केलातरी आपण वर्कऑर्डर दिली आहे. आम्ही सांगितले होते, आपण ब्रँडेड घेत नाही आहात. ब्रँडेड घ्या. आपल्याकडे त्यांचे दुरुस्तीचे दुकान असले पाहिजे आपल्याकडे स्पेअरपार्टस् मिळाले पाहिजेत पण आपण या विषयाकडे दूर्लक्ष केलेत. त्याचप्रमाणे आपण Swantex नावाचे शिलाईमशीन घेताय. Swantex मॉडेल नं.२२६८ शिवण मशीन घेताय. याची आजच्या बाजारभावाप्रमाणे किंमत रु.३०८२/- आहे व ती आपण रु.१६००/- जास्त दराने घेतले आहेत. असा दक्षता नियंत्रण विभागाचा रिपोर्ट आहे. आपण त्यांच्याकडे पाठवले होते. तुम्हाला जर दक्षता पथकाचे काहीच ऐकायचे नसेलतर तुम्ही दक्षता पथक बंद करा. आमच्यासारख्यांना वाटू द्या की तुम्ही सुद्धा त्यांच्यातलेच एक आहात. पण तुम्ही सुद्धा त्यांचे ऐकत नाही या मशीन चाईनामेड आहेत. आपल्याकडे त्यांची सर्वीस सेंटर्स कुठेही नाहीत. विकत घ्यायला गेलोतर

मार्केटमध्ये या मशीन कुठेच मिळत नाहीत. जर त्या व्यावसायिकाला फोन केलातर ती मशीन रु.१८००/- पासून उपलब्ध आहे. परंतू ती घेण्यासाठी चायनाला जावे लागते. आणि अशा मशीनसाठी आपण फॅक्टर लेवल टेक्नीक्स् प्रायव्हेट लिमिटेड यांना टेंडर दिले आहे. यांना देताना आपण सांगितले होते, निविदा अटी-शर्तीत होते की, मॅन्युफॅक्चरर आपले असले पाहिजेत. पण तो मॅन्युफॅक्चरर नसून हा डिस्ट्रीब्युटर सुद्धा नाही. जो व्यक्ती आहे तो या विषयाचा पाठपुरावा करत असतो, तो वायसीएमला पडदे पुरवतो, तो वायसीएमला फिनेल पुरवतो, तो वायसीएमला कपडे पुरवतो, औषधे पुरवतो, खुर्च्याही पुरवतो, म्हणजे याठिकाणी ज्याने टेंडर भरले आहे तो मल्टीटॅलेंटेड व्यक्ती आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, कुठल्या कोर्टाचे दार वाजवायला नका लावू. या खरेदीप्रक्रियेवर आम्ही जर कोर्टात जायचे ठरवले तर तुमचे काय आहे. तुम्हीसुद्धा कुठेतरी विचार करा ना. आणि अशा प्रकारे तुम्ही त्या माणसाला वर्क ऑर्डर देणार असाल तर मला वाटते, माझ्या नोटीसा मी तयार ठेवल्या आहेत. त्या मी अशाप्रकारे देऊन टाकेल. तुम्ही भ्रष्टाचाराला पाठिशी घालून करणार असालतर मला वाटते, आपण हे करु नये. Swantex मशीन घेण्यापेक्षा ज्या लाभार्थी महिला आहेत, त्यांच्या खात्यावर RTGS करा. त्यांना पैसे मिळू द्या. Swantex मशीन आणली आहे, ती मशीन पंधरा मिनिटेच चालते. नंतर गरम होते. गार व्हायला चाळीस मिनिटे लागतात. एकही प्रकारची सुई किंवा बॉबीन हरवली किंवा तुटलीतर ती मिळत नाही. साहेब, मशीन फेकूनच द्यावी लागते. त्यामुळे स्पेअर पार्टचे दुकानच ठेवले नाही जर दुरुस्तीच करायची झालीतर सर्वच केले पाहिजे. मा.आयुक्त साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की, आपल्याकडे खूप वेळा चर्चा झाली आहे. चर्चा होत असतानासुद्धा आपण जर अशा प्रकारचे काम करणार असालतर मला वाटते, आम्हाला त्याविरोधात दाद मागावी लागेल.

पाणीपुरवठा - पाणीपुरवठ्यात १५ टक्के कपात केली आहे. संपूर्ण राज्यभरात दुष्काळसदृश्य परिस्थिती आहे. मा.आशाताई शेंडगे यांनी मघाशी सांगतिले, तुम्ही मीटर बसवताना विरोध केला नाही का. मी त्यांना म्हणाले, त्यावेळी आम्ही नगरसेवक म्हणून या सभागृहामध्ये नवीन होतो तत्कालिन आयुक्त दिलीप बंड साहेब होते. त्यांनी सांगितले, आपण मीटर याचसाठी बसवतोय की आपण २४ तास पाणी देणार आहोत. हे २४ तास पाणी देण्याचे स्वप्न बघत-बघत माझे १०वे वर्ष पण संपेल. आता तुम्ही २४ बाय ७ देण्यासाठी १४६ कोटींची निविदा पण काढली आहे. संपूर्ण शहरातील पाईपलाईन आपण बदलणार आहोत. आपल्याच म्हणण्यानुसार निम्या भागातल्या

पाईपलाईन बदलाव्या लागणार आहेत. उर्वरीतसाठी आणखी निधी लागणार आहे. एकतर तुम्ही पाणी कपात करताय का २४ तास पाणी देताय. एक काहीतरी ठरवा. जर पाणी कपात करणार असालतर १४६ कोटींची झंझट ठेवू नका. निविदा प्रक्रिया आत्ताच थांबवून टाका. जे आले त्यांना तुम्ही सेट देऊ शकत नाही. नाहीतर पाणी कपात करु नका. म्हणजे तुम्ही काय करताय, दोन्ही कडून तुम्ही आम्हाला कैंचीत पकडताय. एकिकडे पाणी कपात करतो म्हणून नगरसेवकांना सहकार्य मागताय. आत्ता तुम्हाला सांगते. जे आमच्या विरोधात लढलेले असतात, त्यांना आमच्याआधी कळते की पाणी येणार नाही. मग लोकांचा हंडा मोर्चा असतो. मग तुम्ही त्यांना पोषक असं वातावरण तयार करता की काय अशी माझ्या मनात दाट शंका येते. तुमचं काय ते एकदा ठरवावे लागेल. तुम्ही २४ तास पाणी देणार असालतर रु.१४६ कोटी द्यायची गरज नाही. तसेही तुम्ही आम्हाला २४ तास पाणी देताय. त्यावर पाणी सुद्धा खर्च होत नाही. शहरात पाणी येते. शहरात सगळीकडे मारामार चालू असताना दुसरीकडे याच्यासाठी रु.१४६ कोटी खर्च करणार असालतर मला वाटते, भामा-आसखेडमधून जे पाणी उचलणार आहोत, त्यासाठी दोनशे ते अडीचशे कोटी लागणार आहेत. त्यावर आपण हे खर्च केले पाहिजेत. तुम्ही म्हणाल अधिका-यांचे तर विचारूच नका. सन्मा.लडकत साहेबांचा खूप अभ्यास आहे. पंधरा पंधरा वर्षे एकाच अधिका-याने एकाच खुर्चीवर रहायचे योग्य नाही. काही गोष्टी बोलायच्या नसतात. तुम्ही चांगले तज्ञ आहात. मग लडकत साहेब, तुम्ही रिटायर्ड झाल्यावर आम्ही कुणाकडे बघायचे. याचा विचार तुम्ही सुद्धा केला पाहिजे. तुम्ही एकिकडे धडाक्यात बदल्या करताय. एखादा अधिकारी सहा महिने झाले, चांगले काम करतोय न करतोय त्याची बदली करताय. मी फोन केला की, साहेब, माझ्या वॉर्डातले ते काम झाले नाही. तो म्हणतो, ताई, मी तुमच्या वॉर्डात नाही. साहेबांनी माझी बदली केली. मी तुम्हाला फोनच करणार होतो. या सगळ्यांच्या बदल्या होतात. लडकत यांची पण बदली करा. नवीन लोकांना तिथे जाऊ द्या. त्यांना शिकू द्या. उद्या लडकत साहेब तिथून गेलेतर ती पोकळी कोण भरुन काढणार आहे याचा सुद्धा विचार तुम्ही आजच केला पाहिजे. एखादा अधिकारी १५/१५ वर्षे तिथे असेल आणि तरीसुद्धा स्काडा फेल होत असेलतर. स्काडाला आपल्याकडे आजही रेटींग सिस्टीम आहे का, नाही. स्काडा हे हवेवरचे गणित आहे. आपण कोट्यावधी रुपये खर्च करतो. ज्यावर्षी स्काडा आला, त्यावेळी त्याचे आम्हाला प्रेझेंटेशन दिले होते. त्यावेळी आम्हाला ऑटोक्लस्टरला सांगितले होते की, स्काडामुळे आम्हाला मोबाईलवर कळणार आहे की, पाण्याची टाकी कुठे भरली, किती टक्के भरली. दरवर्षी कोट्यावधी रुपये खर्च करतो. अजूनही आम्हाला

कळत नाही. टाकी भरली का नाही भरली. जो तो नगरसेवक मिटींगमध्ये उठतो व बोलतो, साहेब, माझ्या वॉर्डातली टाकी भरतच नाही. मग तुमचा स्काडा काय करतो. त्याचे पेटंट करुन घ्या.

पर्यावरण विभाग - याबद्दल न बोललेलेच बरे. या वेळी संजय कुलकर्णींना सुट्टी. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण पर्यावरणावर एक नवीन प्रकल्प हाती घेतला आहे. ज्या लोकांना आत्ता इलिजिबल केले आहे, ते सन्माननीय कोण आहेत हे तुम्हाला चांगले माहित आहे. मला ते माहित आहेत. त्यांच्या कामाचा अनुभव माहित आहे. तरीसुद्धा त्यांना साडेचार कोटींच्या निविदेत बसवले, कसे बसवले ते श्री.संजय कुलकर्णी यांना विचारा. तसेही इथे मसल पॉवर खूप चालते. हे मी पुराव्यानिशी सिद्ध करु शकते. आज तसाही पर्यावरणाचा -हास झाला आहे. तुमचे वायुप्रदुषण असेल, तुमचे पाणीप्रदुषण असेल, तुमचा कचरा वाहतुकीचा प्रश्न असेल, शहरातले सगळे प्रश्न रेंगाळत पडले आहेत. तुम्ही नवीन-नवीन प्रकल्प आणताय. तुम्ही वेस्ट एनर्जी प्रकल्प आणला आहे. त्याबाबतीत समोरच्याला काय अनुभव आहे ते सांगा. त्यांनी सारखे रिसर्च अँड डेव्हलपमेंट करायचे. एक-दोन वर्षे नाहीतर दहा वर्षे झालीतरी रिसर्च अँड डेव्हलपमेंट करताहेत. काल बीव्हीजीबरोबर चालले होते, आज नवीन कंपनीबरोबर चालले आहे. निविदा होण्याआधी मनात सारखे वाटायचे की, संबंधित लोक माझ्या ओळखीचे आहेत. सारखे येरझारा, येरझारा करत असतात. ज्यावेळी टेंडर मिळाले, तेव्हा कळाले की हे त्यांच्यासाठीच होते. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण मागील इतिहास न बघता अशा प्रकारची कामे देतो. मा.महापौर साहेब, आपण खरेतर यात जातीने लक्ष दिले पाहिजे. मागील वर्षी विकास आराखड्यात भक्ती-शक्तीचा विषय घेतला होता. भक्ती-शक्तीचे प्रतिक म्हणून संपूर्ण शहरातील लोक तो पुतळा बघायला येतात, गार्डन बघायला येतात. तिथे वडापावच्या गाड्या असतील, मिसळपावच्या गाड्या असतील, तिथे हॉकरझोन करा. एका बाजूने गाड्या लावा. ती सुद्धा गरज आहे. कारण आलेले लोक सुद्धा तिथे गरम स्वयंपाक करुन खाणार नाहीत. तर त्यांना सुद्धा तिथले लागणार आहे. त्यांची सुद्धा काळजी घ्या. आज खरेतर अप्पुघर कोणाच्या ताब्यात आहे हेच आम्हाला माहित नाही. तिथे वॉटर पार्क आहे. माझा मुलगा लहान असताना मी त्याला घेऊन जायचे. अनेक दिवस झाले. ते बंद आहे का चालू आहे ते कळत नाही त्याचा ताबा कोणत्या नेत्याकडे आहे. मागे एकदा गोळीबार सुद्धा झाला आहे. रात्रीच्या वेळी पार्ट्या चालतात. त्याचा सुद्धा मागोवा घ्यायची फार गरज आहे. ते म्हणतात ना, आयजीच्या जीवावर बायजी उदार, तुम्हाला पार्ट्या करायचा खूप शोक आहे तर तुमच्या

घरी करा. किमान महापालिकेचे जे क्षेत्र आहे ते तरी वगळा. झोपडपट्टी - यासाठी कोणतीही भरीव तरतूद केलेली नाही. खरेतर मी त्या भागाचे प्रतिनिधित्व करते. मागील वर्षी तुम्ही माझ्या वॉर्डमध्ये ड्रेनेज लाईनसाठी तरतूद केली होती मा.आयुक्त साहेब, मी तुमचे यासाठी कौतुक करेन की, तुम्ही मला जे रु.८० लाख दिले होते, त्यातून संपूर्ण बालाजीनगरमध्ये ड्रेनेज लाईन झाली आहे ७५ लोकांनी घरात शौचालये बांधली आहेत आणि ३०० लोकांचे बांधकाम चालू आहे. इथे एमआयडीसी असल्यामुळे ओपन डिफीकेशन जास्त होत होते. आणि त्यामुळे कंपन्या बंद पडत होत्या. माझे मागच्या पंचवार्षिकला सांगितलेले या पंचवार्षिकला ऐकले गेले. मा.आयुक्त साहेब, तुम्ही जे काम केले त्याबद्दल तुमचे मनापासून अभिनंदन कारण तुम्ही जे काम केले ते चांगले त्याबद्दल तुमचे अभिनंदन. परंतू या वर्षी ती तरतूद तुम्ही दिलेली नाही माझ्या वॉर्डमध्ये तीन झोपडपट्या येतात, त्याठिकाणी ही तरतूद कमी पडते. घरोघरी टॉयलेट बांधायचे हा भारत सरकारचा उपक्रम आहे. त्याअंतर्गत शौचालये बांधायचा उपक्रम हाती घेतला आहे. माझी विनंती आहे, आपले अधिकारी सक्षमपणे पाहणी करत नाहीत. नीट इन्सपेक्शन करत नाहीत. त्यामुळे वॉर्डातले ४च लोक इलिजिबल झाले होते. काही लोकांनी फॉर्मच भरले नव्हते. पहिले ७५ आणि आता ३०० म्हणजे ३७५ शौचालये बालाजीनगर झोपडपट्टीत होत आहेत. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सगळ्या झोपडपट्यांमध्ये खरेतर शौचालयांचा हा विषय गंभीर आहे. आपण जास्तीत जास्त तरतूद द्यायला पाहिजे होती. तशी ती झालेली दिसत नाही. दिलेली तरतूद अत्यंत कमी आहे.

मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, जसा मशीनचा विषय घेतलात तसाच मागासवर्गीयांसाठी ११ कोटी निधी ठेवला आहे. त्यातले फक्त रु.१,४०,००,०००/- खर्च झाले आहेत. घर बांधणे याची आज अशी परिस्थिती आहे की, शहराचे एक माजी आमदार आहेत, २००२ ते २००५ च्या दरम्यान त्यांनी या मागासवर्गीय योजनेत भाग घेतला होता. त्यावेळी त्यांनी जे काही रु.६६,००,०००/- पैसे दिले होते. त्यावेळी मा.उल्हास जगताप,नगरसचिव त्या विभागाचे प्रमुख होते. त्यावेळी त्यांनी दिलेले पैसे आज तिथे जाऊन बघा, चिखली इथे त्या घरांचा सांगाडा पडलेला आहे. त्यांच्यावर आपण काही कारवाई केली नाही. आपण त्याठिकाणी कमी पडतो. आपली यंत्रणा कमी पडते हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आम्ही किती दिवसांपासून मागणी करतोय, महिलांना चार चाकी वाहन प्रशिक्षण दिले पाहिजे. हिंजवडी सारख्या भागात महिलांना उत्पन्नाचे स्त्रोत मिळेल म्हणून या दृष्टीने आम्ही बघतो. म्हणून आपण ते दिलेतर ते

आमच्यासाठी चांगले होईल. म्हणजे महिलांना उभारी मिळेल. कालच मी पेपरमध्ये फोटो पाहिला होता, ठाण्यामध्ये एक महिला रिक्षा चालवते. असे आमच्याही शहरातील महिलांचे फोटो पेपरमध्ये येऊ द्यात.

मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मागच्या वेळी १७ तारखेला आम्ही जे महाआरोग्य शिबीर घेतले होते. नागरवस्ती विभागाचे याठिकाणी सांगायचे तात्पर्य हेच आहे की, आपण श्रवणयंत्रासाठी ज्या अटी-शर्ती लावतो. त्यामुळे लोक आपल्याकडे येत नाहीत. एकतर आपली यंत्रणा अपूरी आहे. ज्या पेपरमध्ये आपण छापतो, ते पेपर लोक वाचत नाहीत किंवा खरेच लोकांना कळत नाही. कारण आपण ती जाहीर लिस्ट करतो. जवळपास ६५० लोकांना श्रवणयंत्रे म्हणजे त्याठिकाणी केंद्र शासनाच्या योजनेमुळे होते आहे. अनेक लोकांना कॅलिफर दिले आहेत. सायकली वाटप केल्या आहेत. असे असूनही महापालिका देखील करु शकते. नोडाऊट की महापालिकेने सुद्धा संजय गांधी निराधार योजना किंवा ज्या काही योजना असतील त्यात महापालिकेने सहभाग घेतला होता. मग महापालिकेचे वायसीएम हॉस्पिटल असेल त्यांनी त्यात चांगली भूमिका निभावली आहे. त्यामुळे त्यांचे मनापासून अभिनंदन करते. तसेच मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस साहेब यांनी अनधिकृत बांधकामाचा प्रश्न हा जवळपास निकाली काढलेला आहे. कोर्टात विधी मंडळ हे सर्वांत मोठे असते. विधी मंडळात एखादा कायदा झाला, किंवा कोर्टाने म्हणण मागवल व विधीमंडळात जर ते केल तर मला असं वाटते, जीआर प्रमाणे त्यांना सुद्धा ते मंजूर करावे लागते. आणि लवकरच सगळ्यांच्या डोक्यावरची टांगती तलवार हटणार आहे. परंतू आजही बांधकामे थांबलेली नाहीत. आधी आपण मार्च २०१५ म्हणालो होतो. आता दि.३१ डिसेंबर २०१५ केले आहे. अजूनही बांधकामे चालू असतील तर आपल्या लोकांचे लक्षच नाही. त्याकडे सुद्धा आपण लक्ष द्यावे. २०१५ पर्यंतची बांधकामे असतील तर आज शास्ती लागणार नाही. या एका आदेशामुळे तुम्ही ज्या घराची मोजणी केली असेल तर ते घर अनधिकृत ठरणार नाही, ते अधिकृतच ठरेल. त्याला शास्ती लागणार नाही. शास्ती नाही, परंतू जो काही दंड लागेल, तो पुढील पाच/दहा वर्षे या शहराला तारुन नेईल इतका दंड महापालिकेत जमा होऊ शकतो. उद्या म्हणतील दंडही भरायचा नाही. जर कायदाच ठेवला नाहीतर इथे लावलेले संविधान व घटनेचे पुस्तक सुद्धा आपल्याला फेकून द्यावे लागेल. कायदा व सुव्यवस्था कशी राहिल याकडे सुद्धा लक्ष द्यावे लागेल. आपण आत्ताच योग्य प्रकारे लक्ष घातले तर पुढे होणारी अनधिकृत बांधकामे थांबतील. मी मा.मुख्यमंत्री साहेबांचे आभार मानते. महाराष्ट्र शासनाचे

अभिनंदन करते की, एकामागून एक धडाकेबाज निर्णय घेतले आहेत. त्यांनी राजकारण म्हणून नाहीतर लोकांच्या हितासाठी निर्णय घेतले आहेत. ज्या-ज्या कोणी, ज्या-ज्या पक्षांनी तिथे प्रयत्न केले होते. कुंटे समिती नेमली असेल, ज्या ज्या पक्षांनी प्रयत्न केले, त्या सगळ्या पक्षांचे, सगळ्यांचे मी इथे आभार मानते. मा.महापौर साहेब, आपण मला बोलायची संधी दिलीत त्याबद्दल धन्यवाद. जयहिंद, जयमहाराष्ट्र!

**मा.बाबासाहेब धुमाळ** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ताँ हमारा, हम बुलबुले है इसकी यह गुलसिताँ हमारा ।। आपण याठिकाणी २०१६-१७ चे अंदाजपत्रकावर आपण सर्वच दुपारी २.०० वा. पासून चर्चा करत आहोत. मला विषय माहित नव्हता. कारण मी वाचतच नाही. वाचायला वेळच नसतो. वाचून काय करणार. गेल्या दहा वर्षे मी वर गॅलरीत बसायचो, पत्रकार असायचे. तुम्ही लोक सगळे खाली असायचे, मला वाटायचे की मी कधी खाली जातोय. हे लोक इतकं बोलतात. विरोध करतात. मानदंड उचलतात. आपण हे एकदा तरी करावे ही परीक्षा बघण्यासाठी म्हणून मी याठिकाणी आलो. पण गेल्या चार वर्षांच्या इतिहासात मी पाहिल्यावर आता वाटतेय की इथे पुन्हा सभागृहात कधी येऊ नये ही वस्तुस्थिती आहे. कारण याठिकाणी इथे सत्ता असल्याशिवाय आपले काहीच चालत नाही. मी चार वर्षांचा इतिहास बघितला, इथे सत्ता असेलतरच तुमची कामे होतात नाहीतर होत नाहीत. तुम्ही कितीही ओरडलात, तुम्ही कितीही उपसूचना दिल्यातरी शेवटी एकमेव करता करविता मागे बसलेले आहेत. त्यांनी सांगायचे तरच पुढे चालू. म्हणून मघासपासून मी त्यांच्याकडे बघत होतो, ताई काय सांगताहेत. बरोबर आहे. असे असताना सुद्धा मघाशी मा.नारायण बहिरवाडे यांनी फार चांगले भाषण केले. मा.आर.एस.कुमार चांगले बोलले. त्याठिकाणी नारायणरावांनी चांगले काम केले. पण यावर्षी त्यांची आश्वासनपूर्ती झाली नाही. म्हणून कदाचित त्यांनी इतके मोठे लेक्चर मारले. पण तुम्ही काळजी करु नका. पुढील सत्ता आमची येणार आहे. तुम्हाला चेअरमन करु हे तुम्ही विसरु नका. पुढल्या वेळी तुमचे स्टँडींग चेअरमन व्हायचे स्वप्न आहे ते आम्ही साकार करू. याठिकाणी सांगायचा मतितार्थ हाच की, आपण रु.२७७ कोटी शिल्लक ठेवले आहेत. आयुक्त साहेबांनी चांगले अंदाजपत्रक केले आहे. परंतू जेव्हा पैसे येतात, तेव्हा खर्च करणारा माणूस लागतो. साहेब, तुम्ही हे रु.२७७ कोटी का शिल्लक ठेवले आहेत. सगळेजण सांगताहेत, चायनाचे मशीन घेतले आहे. त्याऐवजी चांगली वस्तु दिली असतीतर काय झाले असते. मी गेल्या वेळी किती भांडलो होतो. मुलांना शाळेचा गणवेश देतो. तेव्हा बॉम्बे डाईंग, रेमण्ड, ग्वालियर सुटींग या

कंपन्यांच्या कापडाचे गणवेश का देत नाहीत. मघाशीच एका ताईंनी सांगितले की मशीनला शंभर रुपये आत्ताच गेले. सायकलला पण खर्च आला. चायना मेड म्हणजे काय आहे, हे सगळ्या जगातल्या देशांना, सगळ्यांना माहित आहे, तरीसुद्धा आपण तेच घेतोय. साधे पेन घेतले दोन दिवसांत मोडून जातो. लायटर घेतले तासाभरात त्यातले पेट्रोल संपून जाते. ही विचार करण्याची गोष्ट आहे. सायकल चांगली इंडियाची दिली असती. म्हणून म्हटले सारे जहाँ से अच्छा... इतका आपला देश चांगला आहे. आश्चर्य वाटेल साहेब, मी अमेरीकेला गेलो होतो. आणि अमेरीकेवरुन येताना ज्यावेळी विमानतळावर उतरलो होतो. सगळे सामान इ. घेतले होते. सगळ्यांचे चेकींग चालले होते. सगळे मोठे-मोठे ऑफीसर तिथे बसले होते. माझे सामान आले त्यावेळी मी एवढेच म्हटले की, सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ताँ हमारा. सगळे बघायला लागले. सगळे सामान चेक न करता पाठवले. या वाक्यात एवढी ताकद आहे, असे असताना सुद्धा आपण आपल्या सगळ्या जनतेचा विश्वास संपादन करायची गरज आहे. मी हे सांगू इच्छितो की, आपण चायना सोडून द्या. चांगले मशीन घ्या. अजून ४/५ कोटी यात गेले असते. चांगल्या दर्जाच्या सायकली, शिवण मशीनी मिळाल्या असत्या. त्या मशिनचा धागा जर तुटत राहीला तर तुम्हीच सांगा, ती बाई गप्प बसणार आहे का. कुठल्या मेल्याने ही मशीन दिली असे बोलणार. आत्ता एका ताईंनी सांगितले की, ही मशीन १५ मिनिटे चालते व ४५ मिनटे गरम होते व बंद पडते. सायकलच्या बाबतीत हेच आहे. त्या मशीनचे टेबल आता गोधड्या उचलून ठेवायला उपयोगी येते. माझे मत आहे, ताई, तुम्ही एवढे गेले १५/२० वर्षांपासून नगरसेवक आहात. तुम्ही तरी या लोकांना शिकवायला पाहिजे. तुम्ही का शिकवत नाहीत. दादांसारखा माणूस नाही. जर तुम्ही दादांना सांगितले असते, दादा असे नाही असे. तर ते तुमच्यावर रागावले नसते. त्यांना डायरेक्ट म्हणाला असतात, हे द्या म्हणून. ही वस्तुस्थिती आहे. मी साधा सदस्य. मला सांगायला अभिमान वाटतो की, मला कुठला वॉर्ड नाही. तरीसुद्धा मी ट्रान्सपोर्टेशनमध्ये काम करतोय. महापालिकेने आम्हाला ट्रान्सपोर्टनगरी दिली आहे. तिथे काम करतोय. तिथे प्रत्येक वर्षी डांबरीकरण करतोय. प्रत्येक वर्षी रोड बदली करतोय. त्याठिकाणी प्रत्येक वेळी खडी वर येतेय, मुरुम वर येतोय. मी साहेबांना सांगितले, आम्हाला तिथे सिमेंट कॉंक्रीटचा रोड करुन पाहिजे आहे. लगेच साहेबांनी रु.८ कोटी मंजूर केले. तिथे सिमेंट-कॉंक्रीटच्या रोडचे काम सुरु झाले. त्यानंतर म्हटले तिथे पार्किंगची व्यवस्था नाही. तिथे इतका चिख्खल असतो. एक जरी गाडी आलीतरी सगळा चिख्खल रोडवर येतो. तेव्हा मा.आयुक्त साहेबांनी पार्किंगसाठी रु.१२ कोटी मंजूर केले.

साहेबांना काही न सांगता १३/१४ कोटी त्याठिकाणी मंजूर केले. मी सगळ्यांना सांगितले आहे, मी परत निवडणूक लढणार नाही. परत येणार नाही. आत्ता सगळ्यांनी सांगितले, नारायण बहिरवाडे यांनी सांगितले, सुलभाताईंनी सांगितले, सिमाताईंनी सांगितले. आपण विरोधक म्हणून जेव्हा बोलतो, त्यावेळी तिथे काम कसे होते आहे, हे त्या-त्या वेळी अंकुश ठेवणे गरजेचे आहे. आपण बजेटबद्दल बोललो, असे व्हायला पाहिजे तसे व्हायला पाहिजे. त्यावर आता बोलून ते होणार आहे का. आपण किती विषयांवर बोललो. ते होणार आहे का. त्रुटी दूर होणार आहेत का. एवढे पैसे मिळणार आहेत का. आत्ता इतके जण बोलले. जवळजवळ पाचशे ते सहाशे कोटींच्या विषयांबद्दल बोलले तिथे एवढे रु.६०० कोटी देणार आहोत का. ज्या-ज्या वेळी बजेट होते त्या-त्या वेळी हे पैसे टाकले असतेतर काम झाले असते. म्हणून मी आयुक्त साहेबांना, महापौर साहेबांना सांगतो की, इथले जे पदाधिकारी सगळे मित्र आहेत. सगळे ऑफीसर लोक बसलेले आहेत. मला हेच सांगायचे आहे की, मी सगळ्यांमध्ये सामील होतो. गेले १३/१४ वर्षे मी नगरपालिकेत येतोय. मी नगरसेवक नसताना सुद्धा माझी कामे केली जातात. तुमची सांगायची पद्धत चांगली पाहिजे. तुमची सांगायची पद्धत जर व्यवस्थित नसेल तर तुमचे काम होणार नाही. ॲडमिनिस्ट्रेशन ऑफिसर एका फाईलवर लिहितो की, होणार नाही,होणार नाही,होणार नाही. हा शब्द खास का निर्माण केला हे माहित नाही. आपण म्हणतो, हा माझा खास नातेवाईक आहे, खास मित्र आहे. पण ही फाईल मंत्रालयात गेलीतर, या खास शब्दावर ऑफीसरचे मन वळवणे गरजेचे आहे. का करणार नाही. अहो,कायदेशीर कामे सगळेच करतात. पण बेकायदेशीर काम कायद्यात बसवून करतो तो हा बाबा धुमाळ. तशी कामे मी करुन घेतली आहेत. आजवर कोणीही मला नकार दिला नाही. गेले ४ वर्षे काम केले. पण या पाठिमागे शहर प्रमुख असताना सुद्धा कामे केली आहेत. मार्चे आणलेत, आंदोलने केलीत, गाढव मोर्चा काढलात. एवढे सगळे मोर्चे काढले, पण त्यावेळी माझ्या फक्त पोलिसकेस पोलिसांत गेल्या. २२ केस होत्या. माझा सांगायचा मतितार्थ हाच आहे की, आपल्या वर्तणुकीवर सगळे अवलंबून असते आता इथे भोसले साहेब बसलेले आहेत. परदेशी साहेब होते, त्यांना मी सांगितले, असा असा विषय आहे. त्यांनी पाच मिनिटांत भोसले साहेबांना सांगितले. माझा विषय पाच मिनिटांत मिटला. मी जर डायरेक्ट भोसले साहेबांकडे गेलो असतो तर होणार नाही. परंतू कायद्यात बसवून काम करणे ही काळाची गरज आहे. मग नगरसेवक कसा असला पाहिजे. प्रत्येकाने प्रेमापोटी प्रेम करा व प्रेम करु द्या. चांगले बोललात तर काम होते. त्याचे जीवंत उदाहरण मी आहे. माझे आत्तापर्यंत कुठेही काम अडलेले

नाही. भविष्यातही माझी कामे होतील. माझा पक्ष माझ्याबरोबर आहे. हे पक्षाची कामे होतात. माणूस त्या पक्षाचे चार शब्द घेऊन येत असतो. सभागृहात येत असताना त्या पक्षाची इज्जत असते,स्टेटस असते. प्रत्येक वेळी अडवणूक करुन चालत नाही. शेवटी तो माणूस आहे, त्याच्या पाठिमागे चार अक्षरे आहेत, ती चार अक्षरे पण महत्वाची असतात. कुलकर्णी साहेब प्रदूषणाचे काम बघतात गेल्यावेळी मी त्यांना पत्र दिले. मला त्यांना चार ओळींचे पत्र दिले. मी काय नाराज झालो नाही. मी त्यांना चार ओळींचे पत्र दिले असते. आपण आपली समजूत घालणे गरजेचे आहे. ही समजूत घातली तरच ही दोन चाके, रथाची गाडी महापालिका व्यवस्थित चालू शकते. तरच आपली कामे होतात, नाहीतर होत नाहीत. मी आपला जास्त वेळ घेणार नाही. यापुढे बडे बडे बोलणार आहेत. त्यांना देखील मी हेच सांगतो की, सगळे एका ताटात राहून कामे करु यात पुढील निवडणुकीत आमची सत्ता येणार आहे. हे सगळ्यांनी सांगितले आहे. भविष्य बदललेले आहे. पण प्रत्येकाने, ताई पुढच्या वेळी विरोधात असेलतर बोलू शकतात. तुमच्या पाठिशी अनुभव आहेत. तुमच्या चार वर्षांच्या कामाबद्दल मी तुम्हाला शुभेच्छा देतो. जयहिंद, जयमहाराष्ट्र!

**मा.नंदा ताकवणे**- मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य,आयुक्त साहेबांनी सर्वसमावेशक बजेट ठेवले आहे म्हणून मी त्यांचे अभिनंदन करते, आणि त्यांना धन्यवाद देते. आज प्राधिकरणात जी प्राधिकरणाची बिल्डींग आहे, ती सोलर एनर्जीवर चालते. आपल्या मिळकतींचे लाईट बील पहा. आज आपण एलईडी बसवतोय. त्यामुळे लाईट बील कमी येते आहे. आपल्या महापालिकेच्या मिळकतींवर जर सोलर एनर्जी बसवली तर ते आपल्या फायद्याचे होईल. दि.१ मार्च पासून आपण प्लॅस्टिक वापरावर बंदी केली आहे असा विषय मागील वर्षी मा.महापालिका सभेत केला होता. आम्ही सगळे शाळेत गेलो होतो. भाजी मंडईत प्लॅस्टिकच्या पिशव्यांमधूनच भाजी दिली जाते. मग आपला पर्यावरण विभाग काय करतोय. मा.आयुक्त साहेब, आपण याबाबतीत पर्यावरण विभागाला सूचना द्याव्यात. प्लॅस्टीकच्या पिशव्या जप्त केल्यातर लोक ते वापरणार नाहीत. शहर प्लॅस्टीकमुक्त करण्यासाठी हे गरजेचे आहे. आज सर्व सदस्यांनी सांगितले आहे, शहरात महिलांसाठी स्वच्छतागृहा असावीत. आपण महिला व बालकल्याण विभागाकडून हा निधी महिलांसाठी खर्च करतो. हा सगळा निधी खर्च होत नाही. या निधीमधून सर्व शहरामध्ये महिलांसाठी स्वच्छतागृहे करण्यात यावीत अशी मी विनंती करते. आम्ही इतर राज्यात फिरत असताना एक्सप्रेसवेवर प्रत्येक दहा/बारा कि.मी. अंतरावर टॉयलेट आहे. आपल्या महापालिकेच्या हद्दीतील एक्सप्रेसवे-वर टॉयलेट

बांधले तर चांगली सोय होईल. महिला सक्षमीकरणासाठी आपण त्यांना शिलाई मशीन देतो. त्याचे टेंडर झाले आहे. हे टेंडर का अडवले गेले आहे हे सुद्धा मला विचारायचे आहे. पूर्वी ज्या शिलाई मशीन देत होतो, त्यापेक्षा या शिलाई मशीन्स चारशे/पाचशे रुपयांनी कमी आहेत. मशीन का मिळत नाही, सगळ्या महिला विचारायला येतात. या मशीनचा निर्णय लवकरात लवकर घेण्यात यावा. २०१३ पर्यंतच्या महिलांचे शिवण क्लास झाले आहेत. त्या सर्व महिलांना मशीन मिळाव्यात. पुन्हा शिलाई मशीनचे क्लासेस सुरु व्हावेत व सर्व महिलांना या मशिन्स मिळाव्यात. विधवा महिला निराधार, असहाय्य असतात. आपण त्यांना वर्षातून एकदा फक्त रु.६,०००/- देतो. त्यासाठी त्यांना खूप हेलपाटे मारावे लागतात. त्यांचा विचार करावा. एकदा फॉर्म भरला की तो अपात्र होतो. अपात्र फॉर्म कशासाठी घेतात. फॉर्म चेक करुनच घ्यावा. म्हणजे त्या महिला अपात्र ठरणार नाहीत. त्यांना महापालिकेत हेलपाटे मारावे लागणार नाहीत. तुम्ही यात लक्ष घालून नागरवस्ती विभागाला सूचना द्याव्यात अशी विनंती करते

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरंतर बजेट संदर्भात फार मोठी चर्चा झालेली आहे. सर्वांनी आगदी आकडेवारीसह संक्षिप्त, सखोल आगदी मायक्रोस्कोप अभ्यास याठिकाणी मांडलेला आहे त्यामुळे त्या मुद्दयाकडे मी बिलकुल जाणार नाही पण मला जे महत्वाचे मुद्दे वाटतात एक सामान्य माणूस म्हणून मला जे महत्वाचे मुद्दे वाटतात ते म्हणजे आरोग्य आणि पर्यावरण आरोग्य आणि पर्यावरण चांगले असेलतर माणुस जगू शकतो नाहीतर कितीही मोठे पुल झाले कितीही मोठे प्रोजेक्ट झालेतर त्याचा उपभोग घेण्यासाठी माणुस त्याठिकाणी राहणार नाही, त्यासाठी माणुस राहीला पाहिजे. माणुस राहण्यासाठी, जगण्यासाठी त्याला मोकळा श्वास मोकळ आरोग्य याठिकाणी मिळाले पाहीजे. पण सन्मा.आयुक्त साहेब आपल दुर्दैव की जगाच्या पाठीवरती आज आपल्याला सगळया शहराचा संक्षिप्त अभ्यास केलातर आपले बजेट आणि आपल्या बजेटमध्ये आरोग्य आणि पर्यावरण या आकडेवारीमध्ये मी बिलकूल जाणार नाही संक्षीप्त भरपुर मला बोलता येईल पण आरोग्याला विकासकामासाठी ३ टक्के, आस्थापना नाही आणि पर्यावरणाला १ टक्का. म्हणजे आपण आपल्या आरोग्या विषयी किती चिंगूस आहोत. ३ टक्के आणि १ टक्का आरोग्य आणि पर्यावरण. जे माणसाच्या जीवनाशी, आरोग्याशी संबंधीत विषय आहेत. त्यातल एक साध उदा. सांगतो ज्या ज्या ठिकाणी मी हा ड्रेस परिधान करुन आलेलो आहे त्या एक वेदना आहेत. या इंद्रायणी काठावरची जर गाव पाहीलीतर अशी हिरवीगार, त्या स्वच्छ निर्मळ पाण्यामध्ये सगळी पोरं पाण्यामध्ये पोहायची. गुरं, ढोर

यायची पाणी प्यायची आणि दिवसभर बसायची थकल्या नंतर ती घरी जायची. असं पर्यावरण व आरोग्य त्याठिकाणी होतं. ज्यावेळेस महापालिका त्याठिकाणी आली, महापालिका ही सगळया नागरीकांसाठी कर्दनकाळ ठरली. कशा पध्दतीने त्याठिकाणी प्रदुषण होतंय हे तुम्हांला सांगण्याची वेगळी गरज नाही. पण आपण नेते म्हणून अत्यंत निष्क्रीय आहोत, पर्यावरण विषयी नदीच्या प्रदुषणा विषयी आपण अत्यंत निष्क्रीय आहोत. हे बजेट बनविताना आपण कुठेही पर्यावरणाचा, नदीचा विचार केलेला नाही. गेल्या कित्येक महीन्यापासून पवना नदी असेल, इंद्रायणी नदी असेल, मुळा-मुठा असेल या गटारगंगा झालेल्या आहेत. यांना कोणी वाली नाही, कोणी पुढे येवून यांच्या स्वच्छतेसाठी आंदोलन करत नाही. कोणी म्हणत नाही यांना एवढ बजेट दया. प्रत्येकजण म्हणतो माझ्या वॉर्डासाठी एवढं पाहीजे, माझ्या मॉडेल वॉर्डासाठी एवढ पाहीजे. पण ज्यांनी आपल्याला आरोग्य दिलं, ज्यांनी आपल्याला जीवन दिलं त्या नदयांसाठी काय? कोण करणार त्याच्यासाठी आंदोलन, त्यावर मी जास्त बोलणार नाही. ही वेदना, ही नदी आपण त्याला माता म्हणतो त्या नदी मातेची वेदना बजेट संदर्भात मला याठिकाणी खरंच मांडावी वाटते की जनू काही ती नदी एक स्वप्नात आली आणि सांगते की आता तुम्ही माझ्यासाठी काहीतरी करा म्हणून त्या नदीनं एक छोटस पत्र आपल्याला सर्वाना ऐकण्यासाठी दिलेलं आहे, ते दोन ओळीत मी याठिकाणी वाचून दाखवणार आहे. इंद्रायणीनदी काय म्हणते- सन्मा.आयुक्त, सन्मा.महापौरताई ऐका- "माझ्या वेदना, माझ्या भावना सभागृहाला मांडण्यासाठी हा पत्रप्रपंच याठिकाणी केलेला आहे. आयुक्त साहेबांना म्हणते, आयुक्त साहेब आपण अतीशय आरोग्यप्रिय व्यक्ती आहात असं मला समजलं तुमची ती एंट्री संपुर्ण शहराने पाहीली हातामध्ये झाडू घेवून तुम्ही रस्त्याची साफसफाई करत होतात, इंद्रायणी नदी म्हणते. वर्तमानपत्रामध्ये तुमचे फोटो आले, सर्वाना आनंद झाला त्यावेळेस मलाही आनंद झाला की माझा उध्दार करण्यासाठी कोणीतरी या शहरामध्ये एक चांगली व्यक्ती, चांगल्या विचाराचा अधिकारी याठिकाणी आलेला आहे. मी प्रदुषणमुक्त होणार म्हणून फार मला आनंद झाला आहे. फार मोठी अपेक्षा घेवून मी याठिकाणी जगत होते, परंतु पुन्हा एकदा माझा अपेक्षा भंग झाला. मी आता पुर्ती उध्दवस्त झाली आहे. माझ जीवन फार गरगट  झालयं, मी आता गटार झाले आहे. जीला तुम्ही माता म्हणतात, आरोग्य तुम्हांला देते, ती काय म्हणते, मी आता गटार झाले, एकेकाळी खटयाळ, नटखट मुलं माझ्या आंगा, खांदयावर खेळायची माझ्या निर्मळ पाण्यात डुबके मारायची, गुरं-ढोर माझ स्वच्छ पाणी प्यायची दिवसभर माझ्या थंडगार पाण्यात पडुन रहायची. काटावरची

शेती हिरवीगार व्हायची. रंगबेरंगी पाखरे शितल पाण्यात न्हायची, कुठं गेलं हे सगळ, कोणी केली माझी ही दुर्दशा. गटाराच्या पाण्यानं मी तुडूंब भरुन गेले, जलपर्णीन मला पुर्णपणे जणु वेढलयं, जणु माझे हातपाय कोणीतरी जखडून टाकलेत. सन्मा.आयुक्त मी नरक यातना भोगतेय. कारखान्यांच विषारी पाणी, रसायनमिश्रीत पाणी माझ्या पात्रात सोडल जातंय. असं वाटत की जखमेवरती कोणीतरी माझ्या मीठ चोळतंय. अशा जीवघेण्या यातना मा.महापौरताई, सन्मा.आयुक्त साहेब मी सहन करतेय. रस्त्यावर नुसता खड्डा जरी पडलातरी तुम्ही आंदोलन करता, या शहरात आंदोलन होतात मग माझ्यासाठी आंदोलन का होत नाहीत, असं इंद्रायणी नदी बोलतेय". तुमच्या आरोग्य आणि पर्यावरण विभागालातर गार झोप लागलेली आहे. संजय कुलकर्णी साहेब आणि दंडवते साहेब तुमच्यासाठी आहे- तुमच्या आरोग्य आणि पर्यावरण विभागालातर गार झोप लागलेली आहे "माझ्या प्रदुषणापेक्षा त्यांना टक्केवारीमध्ये जास्त इन्ट्रेस्ट आहे. मी तुम्हांला सर्वांना आरोग्यदायी जीवन देते, तुम्ही मला काय दिले, नरकयातना. सन्मा.आयुक्त साहेब, पर्यावरण आणि आरोग्याविषयी तुमच्या बजेटमध्ये माझ्यासाठी काहीच तरतूद नाही. मॉडेल वॉर्डासाठी १०० कोटी मग माझ्यासाठी काहीच नाही हा माझ्यावरती फार मोठा अन्याय आहे, असं मी नाही बोलत, इंद्रायणी नदी बोलतेय. आयुक्त साहेब, तुमच प्रशासन ही माणस माझ्या स्वच्छतेसाठी काहीच करणार नाहीत, मला माहिती आहे, याची मला पुर्ण खात्री आहे. आता माझे आंदोलन मीच करणार, आता मी ठरवलय या बजेटमध्ये माझ्या स्वच्छतेकरिता भरीव बजेट दया अन्यत: मला रस्त्यावर उतराव लागेल आणि जर मी रस्त्यावर उतरलेतर महापूर येईल, जर मी रस्त्यावर उतरलेतर निसर्गाचा प्रकोप होईल. तुम्हां सर्वांना मी उध्दवस्त केल्याशिवाय राहणार नाही असं इंद्रायणी नदी बोलतेय. जर आपण हे काम वेळेत घेतल नाहीतर निसर्गाच्या या अंतरयातना तुम्हीजर ऐकल्या नाहीतर येणारा काळ निश्चित आपण पाहता माफ करणार नाही. अनेक घटना घडतात, माणस मरतात आणि असं पर्यावरणा विषयी आपण जर निष्काळजीने राहीलोतर १०० टक्के हा प्रकोप होणार आहे. सांगण्याचा मुद्दा एकच आहे की आता डोळे उघडा आणि बघा निट. मी का बोलतो या अनोख्या आंदोलनाची दखल एबीपी माझाने घेतलेली आहे. मला आताच फोन आले की तुम्ही जे आरोग्याचे आंदोलन केलेले आहे ते संपुर्ण जगामध्ये हे आरोग्य आंदोलन प्रसिध्द झालेले आहे. मा.महापौर ताई तुम्ही जरी मला याठिकाणी उशिरा संधी दिलेली असलीतरी प्रसारमाध्यमानी त्याची दखल घेतलेली आहे. मा.महापौरताई, उशिरा का होईना मला याठिकाणी संधी दिली त्याबद्दल तुमचे अभिनंदन. आताही वेळ गेलेली

नाही, आपण नदीप्रदुषणासाठी भरपूर याठिकाणी निधी दयावा एवढीच विनंती करतो आणि थांबतो.

**मा.राहूल जाधव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब आज २०१६-१७ चे बजेट मान्यतेसाठी या सभागृहात सादर केलेले आहे त्यावर भरपुर सदस्यांनी शहराच्या विवीध प्रश्नावर चर्चा केलेली आहे. आमच्या गावामध्ये आणि समाविष्ट गावामध्ये त्याठिकाणी आताच संपुर्ण महाराष्ट्राच्या निदर्शनास आलेले आहे एक महीन्यात आठ वेळा आग लागते तर तो परिसर कसा असेल. जर आपल्या अधिका-यांनी वेळेतच दखल घेतली असतीतर शहराचे नाव एवढया खालच्या पातळीला गेलं नसतं. आपण बेस्टसिटी पुरस्कार घेतो. भारतामध्ये नववा व महाराष्ट्रामध्ये पहीला. तुम्हांला जर हा पुरस्कार सत्याने घ्यायचा होतातर ते माझ्या कुदळवाडीतील फोटो काढून त्यांना दयायचे होते आणि तो पुरस्कार घ्यायचा होता. तो पुरस्कार अभिमानाचा पुरस्कार झाला असता. खाली मान घालून हायवेचे फोटो काढून पुरस्कार घेतला त्या पुरस्काराचा मी निषेध करतो. एकाला घ्यायच खांदयावर आणि एकाला घ्यायच बगलेत अशी सवय सोडून दयावी. आमच्या ग्रामीण भागातील सदस्यांनी सुध्दा बोलले आहेत. तुम्ही आम्हांला एक एक, दोन दोन कोटी निधी वाढवून देता आम्हांला अभिमान आहे. परंतु जर आमच्या भागात काम करणारे ठेकेदार ५०-५० टक्के जर बीलो टेंडर भरत असतीलर काय दर्जा घेणार तुम्ही त्या कामाचा. काय काम करुन घेणार तुम्ही त्यांच्याकडनं. या बिलोला मर्यादा पाहीजेत. प्रभागाच टेंडर असू दयात नाहीतर मुख्यालयाच टेंडर असू दयात. या ठेकेदाराची मानसीकता तरी असते का काम करण्याची ४७-४७ टक्के बिलो काम आहे. सात वेळा आग लागली एक महीन्यात चिखलीत. अग्निशामन केंद्राच काम किती आहे २७ लाखाच. २७.२१ टक्के बिलो आहे, काय पध्दतीन काम करणार, काय दर्जा तो कॉन्ट्रॅक्टर तुम्हांला देणार. प्रत्येक वेळी प्रत्येक टेंडर मध्येजर एवढ बिलो असेलतर त्या बिलोला मर्यादा असावी. तुम्ही त्या ठेकेदाराकडून दर्जा घेवूच शकत नाहीत. आज त्याठिकाणी रस्त्यासाठी समजा एक कोटी चाळीस लाखाचची तरतूद झाली आणि टेंडर झाले. त्याठिकाणी ३३ टक्के बिलो, काय तुम्ही रोडचा दर्जा घेणार ठेकेदाराकडून. आमच्याकडे जे कॉन्ट्रॅक्टर येतात त्यांची बिलकूल मानसीकता नसते. जे कॉन्ट्रॅक्टर काम करतात त्यांची भाषा जसे काही पालिकेचे मालक ते कॉन्ट्रॅक्टर आहेत अशी परिस्थिती आहे. आता देहू-आळंदी रोडच बीआरटीच काम चालू आहे. त्याठिकाणी दोन कॉन्ट्रॅक्टर आहेत. पी.पी.ए.कॉन्ट्रॅक्टर आणि त्यानंतर ते काम घेतल व्ही.एम.मातेरे यांनी. किती वेळा तुम्ही पी.पी.ए वाल्यांना

नोटीस दिली ते सांगा. कितीवेळा त्यांना तुम्ही दंड आकारला आणि किती वेळा त्याठिकाणी अपघात झालेले आहेत. आजपर्यंत दिड वर्षे झाले त्या रोकडे वस्तीमध्ये ज्यावेळी पहीला जुना रस्ता होता त्यावेळी रोड आणि घर एक लेव्हलला होती. ज्यावेळी आपण बीआरटी रोड केला, आठ ते दहा फुट रोड आपण खोदला, घर वर राहीली, रोड खाली गेला काय करायच त्या लोकांनी तो रोड दिड वर्षे झाले बंद ठेवला. आजपर्यंत का नाही आपण त्या लोकांचा रोड चालू करुन देवू शकलोत. तुम्ही दोन-तीन वेळा व्हिजीट केली, मी सुध्दा त्याठिकाणी बोललेलो आहे. त्या लोकांना रोड नाही तो रोड खुला करुन दया. आजपर्यंत आपण गेल्या दोन वर्षात तो रोड खुला करुन दिलेला नाही. काय पाप केले त्या लोकांनी. आमच्या गावचा महापालिकेत येण्यास विरोध होता. आज जास्त कंपन्या आमच्या भागामध्ये आहेत, जास्त निधी आमच्या भागातील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला येतो. डेव्हलपमेंट ऐरीया हा आमच्या भागामध्ये आहे. सामाविष्ट गावातून ग्रामीण भागामधुन तुम्हांला जास्त निधी येतो, का नाही तुम्ही आमच्या गावात तो निधी खर्च करत. एमएनजीएल असेल, रिलायन्स असेल या कंपन्याला रस्ता खोदाईला परमीशन दिली. रोड करुन किती दिवस झाले. सेक्टर नं. १६ मध्ये रोड करुन सहा महीने सुध्दा झाले नव्हते. आज तुम्ही परत त्यांना परमीशन दिली आहे. से.नं. १६ व १३ जाधववाडी पुन्हा खोदली गेली. पैसे कुठून आणतो, आपले पैसे आहेत का ते, लोकांचे कररुपाने पैसे घेतलेले आहेत ते असे वाया घालू नका. लोकांना नोटीसा दिल्या की टॅक्स भरा म्हणून. आज तीच लोक स्वत:चे दागदागीने मोडून टॅक्स भरतात आणि ते पैसे तुम्ही असे खर्च करता. देहू-आळंदी रोडपर्यंत बीआरटी रोड आपण केला त्यानंतर प्राधिकरणाचा ब्रीज त्याठिकाणी आला. कोटयावधी रुपये खर्च केलेले आहेत, रस्ता खोदला गेला, का नाही आपण प्राधिकरणाकडून दंड वसुल केला. किती दिवस झाल की आपण रोड करुन. राजन पाटील यांना विचारा, सवणे साहेबांना विचारा. त्याठिकाणी आपण किती खर्च केला होता. फुकटचा पैसा आहे का. इंद्रायणी नदी, आज आम्ही ओरडुन ओरडून दमलो की इन्डस्ट्रीअलवाल्यांनी केमीकल्सच्या कंपनीवाल्यांनी आपल्या ड्रेनेज लाईनमध्ये केमीकल सोडलेल आहे. धनंजय आल्हाट यांना आज आनोख आंदोलन करावं लागलं. नदीमध्ये जलपर्णी आलेली आहे ते गार्डन वाटतय, गार्डन. याठिकाणी त्या वडयामध्ये जे केमीकल जातय त्यांन पुर्ण इंद्रायणीचे काळे पाणी झालेले आहे. एक दिवस एखादी मयत किंवा दशक्रिया असेलनां त्यावेळेला तुम्ही आमच्या गावाला आवश्यक भेट दया, म्हणजे कळेल काय परिस्थिती त्याठिकाणची आहे. आम्ही चेष्टा म्हणून या सभागृहात ओरडत नाहीत, गेली चार वर्षापासून आम्ही ग्रामीण भाग

म्हणूनच ओरडतोय. किती निधी खर्च केला. आम्ही जे बोलतोना ते आम्ही त्याठिकाणी भोगतो, म्हणून आम्ही बोलतोत. आम्ही निवडून आल्यापासून पाण्याची टाकी तुमच्याकडे मागतोय, दिली का तुम्ही पाण्याची टाकी. त्यावेळेला तुम्ही मंजूर आराखडा तयार केला. कुठ टाकल त्या पाण्याच्या टाकीचं आरक्षण, नदी मध्ये पाण्याच्या टाकीच आरक्षण टाकले, तिथून गावाला पाणीपुरवठा होणार आहे का. रेडलाईन्स, ब्ल्यू लाईन्स कुठ, शेतक-यांच्या जमिनीमध्ये. जे बघतोय ते आम्ही भोगतोय. आम्हांला लोकांनी निवडून दिले म्हणून याठिकाणी आलो आहेत. आम्ही लोकांच्या समस्या याठिकाणी मांडतोय. आमच्या सामाविष्ट गावामध्ये आजपर्यंत किती खेळाचे मैदान, किती गार्डन तुम्ही केलेले आहेत हे सांगावे. चार वर्षे झाले निवडून आल्यानंतर आम्ही खेळणी मागतोय, विचारा साळूंके साहेबांना दिली का खेळणी त्यांनी. विदयूत विभाग- आमच्या भागामध्ये नवीन जे रस्ते झालेले आहेत त्याठिकाणच तुम्हांला पण मी पत्र दिलेले आहे. त्याठिकाणी नवीन रस्ते झालेले आहेत तेथे प्रकाश व्यवस्था नाही आणि जी तरतूद केलेली आहे ती अपुरी आहे. त्यामुळे त्याठिकाणी प्रकाश व्यवस्था झाली पाहीजे. जे काही खेळाचे मैदान आम्ही आमच्या पध्दतीने तयार केले. तुम्ही दिलेला आदेश सुध्दा तुमचे अधिकारी ऐकत नाहीत. तुम्ही दिलेला आदेश होता की गायरानाच्या भागामध्ये लाईटचे पोल बसवा, खेळाचे मैदान तयार करा. जर प्राधिकरणवाले किंवा गायरानवाले काही जर बोलले तर आपले पोल आपल्याला काढून घेता येईल. अधिका-यांना विचाराव बसवलेत का पोल. का नाही पोल आपण त्याठिकाणी बसवू शकलो. जे आहे ते तरी ग्राऊंड मुलांना खेळण्यासाठी राहू दया. गायरानाची जागा आहे. गेल्या १७ वर्षामध्ये जी खेळाच्या मैदानाची आरक्षण होती, उदयानाची होती ती आपण ताब्यात घेवू शकलेलो नाहीत. नगररचना विभागाला त्या गोष्टीत रस नाही. त्यांना कोणत्या गोष्टीमध्ये रस आहे हे आपल्या सर्वांना माहिती आहे. आम्ही नव्याने सांगण्याची गरज नाही. कसं काय ठरलेल असत, काय असतं ते सर्वांना माहीत आहे. नगररचना विभागाने लवकरात लवकर आरक्षण ताब्यात घ्यावेत. प्रत्येक वर्षी बजेटमध्ये तरतूद ठेवता पुन्हा त्याठिकाणी जागा ताब्यात नसल्यामुळे ती तरतूद खर्च होत नाही पुन्हा ती तशीच राहते. त्यावेळेला ५०-५० टक्के आरक्षण ताब्यात आलेले आहेत. उर्वरीत ५०-५० टक्के आरक्षण ताब्यात घेण्यासाठी आपण अधिका-यांना आदेश दयावेत. उर्वरीत जागा ताब्यात घेवून त्या ठिकाणी जो निधी दिलेला आहे तो अपुरा तर आहेच परंतु आहे तो तरी खर्च करावा. आपण आमच्या भागामध्ये आरोग्यासाठी डस्टबीन वाटले होते. ओला कचरा आणि सुखा कचरा. ५० टक्के डस्टबीन वाटले व ५० टक्के ठेवले असं का. ब-

याचठिकाणी अन्याय झालेला आहे. लोकांच्या सहया घेवून आपले अधिकारी, कर्मचारी आलेले आहेत परंतु त्यांना ते डस्टबीन मिळालेले नाहीत. त्यामुळ येत्या बजेटमध्ये जे उर्वरीत खरेदी करुन लोकांना ते वाटावेत, कोणावरही अन्याय करु नका. भूसंपादनाचे जे रस्ते आहेत, डीपी रस्ते १८ मी. ३०, २४, १२ मी. ते आतातरी ताब्यात घ्यावेत. आम्हांला सुध्दा वाटत की जसे पिंपरी चिंचवड शहराचे दुसरे गाव आहेत तसं आमचं सुध्दा गाव व्हाव अस वाटत. जागा ताब्यात घेवून लवकरात लवकर ते करावे. आमच्या येथे चिंचवड देवस्थान आहे त्याची जी काही रक्कम असेल ती आपण भरु, पण ते रस्ते झालेतर त्याठिकाणी सुध्दा आमचे चांगले रस्ते होतील, आमचे गाव चांगले होईल. चिखली कमानीच्या विषयाला सुलभाताईनी त्याला उपसूचना दिलेली होती त्या उपसूचनेच काय झाल आणि त्या कमानीच काय झाल. प्रत्येकवेळी आम्ही बोलत असतो पण अजून कमानीचा तो विषय झालेला नाही. ती कमान लवकरात लवकर करावी. आमच्याकडे खेळण्यासाठी मैदानच नाही तरी महापौर चषक असेल, स्पर्धा आमच्याकडे कधी भरणार. आतापर्यंत असे विषय कधी झालेच नाहीत. त्यामुळे खेळाचे मैदान आणि उदयान लवकरात लवकर करावे अशी विनंती करतो. उशिरा का होईना पण बोलण्यास संधी दिल्याबद्दल आभारी.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज बजेट सादर करताना महापौर साहेब तुमचे मी मनापासून आभार मानतो की बोलायला संधी दिली. आज हे बजेट सादर करत असताना आयुक्त साहेब तुमच पण मी मनापासून अभिनंदन करतो की हे बॅलेन्स बजेट सादर करण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे. काही ठिकाणी जरुर सदस्यांचे काही ठिकाणी राहीलेले असेल बजेटतर आमचे पक्षनेते उपसूचनेच्या माध्यमातून ते पुर्ण करणार आहेत. या पंचवार्षीक मधील हे शेवटचे बजेट आहे. पुढच्या टर्मला याच्यामधले किती लोक निवडून येतात, नाही येत. पण येणा-या चार वर्षे तुम्ही दोन वर्षे होते मागे परदेशी साहेब, होते त्याच्या अगोदर शर्मा साहेबही होते. हे काम करत असताना नागरीकांकडे आम्ही ज्यावेळेस मताला जातो आमचा जो रिझल्ट आहे तो बघण्यासाठी प्रयत्न केलातर मी माझा व्यक्तिगत तरी समाधानी आहे. वॉर्डामध्ये काम करत असताना डेफिनेटली स्वार्थ असतो. किती काम आपल्याला मिळेल आणि कितपत मिळेल आणि किती आपण करावं यासाठी आपण प्रयत्न करत असतो. पिंपरी चिंचवड शहर डेव्हलप होत राहणार या महापालिकेचे सर्व सदस्य, कर्मचारी वर्ग असो त्यात मा.महापौर असो, आयुक्त असु दयात या सर्वाचं त्याच्यामध्ये कॉन्ट्रीब्युशन आहे. हे एकटयादुकटयाच शहर नाही. माग योगेश बहल महापौर असताना बेस्ट सिटी

ॲवॉर्ड मिळाला. मागे महापौरांच्या कारकिर्दीमध्ये स्वच्छतेचा सुध्दा ॲवॉर्ड मिळालेला आहे. अभिमानाचा विषय आहे की महाराष्ट्रात नं.१ मध्ये बेस्ट सिटीचा अवॉर्ड मिळालेला आहे आणि देशामध्ये नववा क्रमांक लागलेला आहे. बाहेर गेले की आपण अभिमानाने सांगु शकतो की मी पिंपरी चिंचवड मधील आहे अशा पध्दतीचे डेव्हलपमेंट पिंपरी चिंचवडमध्ये झालेल आहे या चार पाच वर्षामध्ये डेव्हलप करत असताना हा ग्राफ पाहीलातर शेजारच्या सर्व शहराला लाज वाटेल असा आपल्या पिंपरी चिंचवड शहराचा ग्राफ आहे. एवढया मोठया प्रमाणात डेव्हलपमेंट या शहरामध्ये झालेल आहे. राष्ट्रवादीचे कॉन्ट्रीब्युशन मोठ असलंतरी तेवढच विरोधी पक्षाचे कॉन्ट्रीब्युशन आहे कारण सगळया कमिटीमध्ये विरोधी पक्षाचे सदस्यपण असतात. म्हणून या डेव्हलपमेंटला आपल्या सर्वांचा हातभार लागलेला आहे. याठिकाणी मी बाबासाहेब धुमाळ यांचे पण अभिनंदन करतो की त्यांनी एक वस्तुस्थिती याठिकाणी मांडली की काम करुन घेताना कशा पध्दतीने काम करुन घेतले पाहीजे. आम्ही आमच्या पध्दतीने काम करुन घेताना आमच्या वॉर्डामध्ये आरक्षण नसताना, डेव्हलपमेंट करण्यासाठी संधी नाही परंतु ज्या ज्या ठिकाणी वाटले आमच्याकडून होत नसेल किंवा आमच्या अधिका-याकडून होत नसेलतर आम्ही आयुक्तांना विनंती करुन आणि आयुक्तांनी ताबडतोब पॉझिटीव्ह रिप्लाय देवून त्या गोष्टी करण्यासाठी आम्हांला भाग पाडलेल आहे आणि त्याठिकाणी आमच चांगल डेव्हलपमेंट झालेलं आहे. याठिकाणी सांगायला अभिमान वाटतो की उदया परवाच आमच्या वॉर्डमध्ये थरमॅक्स चौक पासून यमुनानगरचा रोडचे काम करणार आहेत. साहेब, तुम्हांला मी विनंती केलेली होती की तुम्ही या पुनर्वसनाच्या नादी लागू नका, हे लवकर होणार नाही, तुम्ही पार्टलीतरी हे डेव्हलपमेंट करा आणि तुम्ही त्याला ग्रीन सिग्नल दिला. बीआरटीएसच्या रुटचे लोक असतील त्यांनी तो पाठपुरावा करुन बजेट करुन त्यास मान्यता दिली. भाजीमंडई सारखे आमच्याकडे डेव्हलपमेंट झालेल आहे. काही ठिकाणी डेफिनेटली डेव्हलप करत असताना, काही ठिकाणी नाराजी असणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील विषय असू दयात, किंवा अजून काही डेव्हलपमेंटचा विषय असू दयात कुठेतरी आपण कमी पडलो, त्याठिकाणी जो माणुस काम करतो तो चुकतो, कुठेतरी कमी पडतो आपण त्याच्याशी पुर्ण फुलफील करा अशी आमची मागणी आहे. आता आमच्याकडे अधिकार, सत्ता असल्यामुळे काही गोष्टी आम्ही आमच्याकडे ओढून आणलेल्या आहेत. सुलभाताईनी आणि सिमाताईनी सांगीतले आमच्याकडे पुढच्या वेळेस सत्ता येणार, तेव्हा डेफिनेटली ते त्यांच्याकडे जाणार आहे, त्यांना आमच्या शुभेच्छा आहेत पण तेवढे सोपे पण त्यांना नाही. पिंपरी

चिंचवड शहरामध्ये सर्व नागरीकांना माहिती आहे की कशा पध्दतीने पिंपरी चिंचवड शहरामध्ये काम झालेली आहेत. कशा पध्दतीने ग्राफ वाढलेला आहे. दहा-दहा लाखाच्या फ्लॅटच्या जागी पन्नास पन्नास लाखाचे फ्लॅट असेच झालेले नाहीत. डेव्हलपमेंट झाल्यानंतरच या गोष्टी आपल्याकडे झालेल्या आहेत. मग रावेत असू देत, पिंपळे गुरव असु देत, पिंपळेसौदागर असु देत, भोसरी असू देत, मर्सिडीसचा ऐरीया असू देत हा सर्व ऐरीया डेव्हलप करत असताना सुंदर पध्दतीने ते झालेले आहे. पुनर्वसन प्रकल्प राबवत असताना झोपडपट्टीतील लोकांना आपण पुनर्वसन केलेल आहे. त्याठिकाणी काही गोष्टी घडलेल्या आहेत. जेएनएनयूआरएमच्या फंडस्च्या माध्यमातून झोपडपट्टी पुनर्वसन करायचे आपण त्यात कुठेतरी कमी पडलेलो आहेत. त्यालाही आपण फुलफील करण्याचा प्रयत्न करावा अशी याठिकाणी मी अपेक्षा करतो. पाण्याच्या संदर्भात बोलायचे झालेतर बाकीच्या देशामध्ये जे दुष्काळी परिस्थिती आहे, महाराष्ट्रात जी दुष्काळी परिस्थिती आहे या सर्वांच्या पेक्षा आपण किती सुखी आहोत. याच्या बद्दल का आपण कौतूक करायला नको. आज आपल्या पवना डॅममध्ये ४७ टक्के पाणी शिल्लक आहे. आपले पाणीपुरवठयाचे अधिकारी चांगल्या पध्दतीने बॅलेन्स करतात. आताच पंधरा टक्के पाणी कमी केले आहे. अजून तरी आपल्याला एवढा हार्ड रोल घ्यायची गरज भासणार नाही. ही खुप चांगली गोष्ट आहे पण बंद पाईपलाईन योजना त्यावेळेस झाली असतीतर कदाचित ही वेळ आपल्यावर आज आली नसती. त्यावेळेस त्या गोष्टी करत असताना कदाचित काही त्रुटी राहील्या असतील परंतु आज आपण कितीतरी पटीने त्याच्यापेक्षा समाधानी आहोत. पाण्याच्या संदर्भात आदेश दिले पाहीजेत. मा.मुख्यमंत्री यांनी स्विमींग पुल बंद करण्याचे आदेश दिलेले आहेत त्यांच स्वागत आहे, कारण चांगल्या गोष्टी आहेत. आपण सुध्दा जनजागृती करणे गरजेच आहे. ज्या पध्दतीन स्विमींगपुल असु दयात, कारचा वॉशींग ऐरीया असू दयात, पिंपळेगुरव, पिंपळेसौदागर याठिकाणी टाऊनशिप आहेत त्याठिकाणी चार चार कार असणा-या गाडयांचे मालक आहेत ते गाडयांची वॉशिंग करतात त्यांना आपल्याला रोखणं गरजेच आहे. काही जाणकर लोक खुप आहेत, चांगली लोक पण आहेत पण काही उर्मठ लोकही आहेत की माझी गाडी आहे माझ पाणीबील मी पैसे भरतो. यांच्यावर फाईन लावून त्या लोकांना कंट्रोल करणे गरजेचं आहे. अशा छोटया छोटया गोष्टी आहेत. वॉशींग बंद केल तर हा असलेला जो साठा आहे तो येणा-या दोन ते आडीच महीन्यासाठी आपल्याला फुलफील होईल आपण पाणीपुरवठा विभागाला आदेश दयावेत. पाणीपुरवठयाच पण काम चांगल आहे २४X७ पाणीपुरवठा झालातर काही लोकांचा जास्त वापर होईल काही लोकांचा कमी वापर होईल

असे म्हणतात तो टेक्निकली ईश्यू आहे तो पुर्ण करावा २४ तास का नको, सर्वाना व्यवस्थीत पाणी मिळणार असेलतर चांगली गोष्ट आहे. एक तास दोन तास दया पण प्रेशरन पाणी दया, बजेट आहे, पाणी आहे व्यवस्था आहे. आपले प्रॉपर बजेट युज केलतर हरकत नाही. आता सिमाताईनी सांगीतले की निगडीपासून दापोडीला जायला एवढी दाट वस्ती आहे की मला असं वाटते की कुठतरी मुंबईला जातो की काय. परंतु मला असे कधीच वाटले नाही. निगडीला माझा व्यावसाय आहे मी पुण्याला निगडीपासून जात असतो, पिंपरी चिंचवड शहरामध्ये चांगले रोड आहेत मग बीआरटी रुट असु दयात, रावेतचा रोड असु दयात, स्पाईन रोड असु दयात पिंपरी चिंचवडचे रोड एक नंबरचे आहेत. सुंदर रस्ते याठिकाणी केलेले आहेत. याठिकाणी आपण बिलकूल कमी पडलेलो नाहीत. याठिकाणी स्लम ऐरीया आहे, ग्रामीण ऐरीयामध्ये कमी पडलेलो आहेत त्याठिकाणी लक्ष दिलेतर चांगले होईल. वायसीएमसारखी मोठी संजीवनी पिंपरी चिंचवड शहराला आहे, अर्ध्या नगरसेवकांची काम वायसीएम करुन टाकतं, कारण त्यांना ॲम्ब्युलन्स पाहीजे, पोस्टमार्टेमच काम पाहीजे, आयसीयू पाहीजे, मेडीसीन पाहीजे, डॉक्टर पाहीजे कारण आपल्याकडे गोरगरीब जनता आहे ती त्याठिकाणी औषधोपचार घेते. मी तर झोपडपट्टीच प्रतिनिधीत्व करतो त्याठिकाणचे सर्रास पेशंट त्या वायसीएममध्ये असतात. मग ते ॲक्सीडेंटचे असू दयात, हार्टचे असु दयात, डिलेव्हरीचे असु दयात त्याठिकाणी आम्हांला एक हेल्पींग हॅण्ड होत. आम्ही फोन केला की बील माफ, आम्ही फोन केला की ॲम्ब्युलन्स फ्रि, आम्ही फोन केला की औषध फ्रि या सगळया गोष्टी वायसीएमच्या माध्यमातून होतात. त्याठिकाणी तुम्ही जास्तीत जास्त बजेट दयावे. कारण प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये एवढया मोठया प्रमाणावर उत्मात चालू आहे त्या माध्यमातून वायसीएमची आपल्याला खुप मोठया प्रमाणात मदत मिळते क्रीडा क्षेत्रामध्ये सांगायचे झालेतर क्रीडाचे सभापती स्वत: खेळाडू आहेत. आण्णासाहेब मगर स्टेडीअमबद्दल ते नेहमी बोलत असतात. राजू मिसाळ माझे मित्र आहेत. प्राधिकरणामध्ये धिंग्रा स्टेडीयम किंवा संजय काळे ग्रांऊड याठिकाणी ग्राऊंडची कमतरता आहे. त्याच्या आरक्षणामध्ये आपल्याला थोडस लक्ष दिल पाहीजे जेणेकरुन आरक्षीत जागा ताब्यात मिळतील. मी एक याठिकाणी सूचना करतो की महापौर निवासाची आपल्याकडे त्याठिकाणी जागा आहे. त्याठिकाणी एक गार्डन दिलेल आहे व संजय काळे ग्राऊंड प्राधिकरणाच्या ताब्यात आहे. पण महापौर निवास ते एक ग्राऊंड आहे, एक चांगल्या स्पॉटवर ग्राऊंड आहे त्याठिकाणी महापौर निवास होईल तेव्हा होईल आज कमीत कमी त्याठिकाणी ग्राऊंडवर खेळण्यासाठी मुलांना तुम्ही व्यवस्था करुन दिलीतर

प्राधिकरण, आकुर्डी, दत्तवाडी ऐरीयातील लोकांचा, खेळाडूंचा प्रश्न मिटेल. त्याठिकाणी खुप चांगले खेळाडू तयार होतात, चांगले खेळणार आहेत मग कबड्डी, फुटबॉल, ॲथेलेटीक्सचे खेळाडू त्याठिकाणी आहेत. प्राधिकरणामध्ये उपलब्ध केलेतर खेळाडूनां संधी मिळेल. पिंपरी चिंचवड शहरात प्राधिकरणामध्ये नाटयगृह चाललेले आहे जे चाललेले आहे त्याला गती देवून एक वर्षात पुर्ण होईल हे असे करावे. भविष्यामध्ये माझ्या प्रभागात होणार आहे या गोष्टी ॲडव्हान्टेज आहेत. एज्यूकेटेड मतदारसंघामध्ये अशा गोष्टी पाहीजेत जे आम्हांला बेनिफीट आहे. जे नगरसेवक काम करतात त्यांना एक बेनिफीट आहे. नाटयगृह फास्ट करुन ते पुर्ण करावे ८०० ते ८५० चा मोठा हॉल आणि त्याच बरोबर एक लहान मुलांसाठी २५० क्षमतेचा एक हॉल त्याचबरोबर एक एक्झिब्यूशन हॉल असे तीन्ही हॉलची तयारी चालू आहे ते तुम्ही त्याठिकाणी फंड कमी न पडता प्रायोरीटीने केलेतर आम्हांला, आमच्या कुठल्याही पक्षाच्या नगरसेवकाना त्याचा बेनिफीट होईल. रावेतच्या पट्टयात पुलाचे काम हाती घेतलेले आहे तो पुल भक्ति-शक्ती पासून डायरेक्ट मुकाई चौकात तुम्ही पोहचणार आहेत. म्हणजे देहूरोडची अर्धी ट्रॅफीक कमी होणार आहे. एक्सप्रेस हायवेला तो पट्टा मिळालेला आहे तो फास्ट केलातर चांगला मॅसेज होणार आहे. आम्ही आमच्या वॉर्डात काम करतो, तुम्हांला हे क्रेडीट मिळणार आहे. ग्रीनरी संदर्भात तुम्हांला खुप आवड आहे. प्राधिकरणामध्ये तलाव असु दयात, गार्डन त्याठिकाणी आहे हे करत असताना आम्हांलाही अभिमान वाटतो की, या शहराचा मी नागरीक आहे. एलईडी संदर्भात स्ट्रीटलाईट अव्हेलेबल होत नाहीत. तुपे साहेबांनी सांगीतले प्रोसिजरमध्ये आहे. ३१ मार्च संपायच्या अगोदर या गोष्टी झाल्यातर आम्हांला त्याचे ॲडव्हान्टेज घेता येईल आणि नागरीकांनाही त्याचा फायदा होईल. गार्डन आपल्या शहरामध्ये खुप चांगले आहेत. जे आम्ही बाहेर बघत असतो ते आपल्याकडे चांगले गार्डन आहे. रिझर्व्हेशनच्या प्लॉट संदर्भात आपण निर्णय घेतला, माझ्याकडचे गार्डन चार वर्षे झाले पाठपुरावा करतो अजून हातात येत नाही. काही ठिकाणी रस्त्याच आरक्षण आहे ते तुमच्या हातात येत नाही. अशा मुलभूत सुविधा आहेत त्या तुम्हांला देणे क्रमप्राप्त आहे. मग ते रोडलाईट असू दयात या गोष्टी आपल्याला खुपच जरुरी आहेत. हे आपल्या पब्लिकचे पैसे आहेत. माझ्या टर्ममध्ये गेल्या चार वर्षात त्याच रस्त्याला दोन वेळा डांबरीकरण केले, तीसऱ्या वेळा आता केले. पहील्या वर्षी रिलायन्सन खड्डे केले, दुसऱ्या वर्षात एअरटेलने खोदून गेलेले आहेत, परत एमएसईबी आले आणि दुसऱ्या दिवशी खोदून गेले. मग हे कोण पैसे देते, कोण मंजूर करतय याला अर्थ नाही. हे लोक १० कि.मी. ची मंजूरी घेतात आणि खोदतात

१०० कि.मी. आणि यांना गुंड लोक पोसावे लागतात. हे लोक गुंड पोसतात, काय कारण आहे. कशासाठी चार-चार फोन येतात याचा अर्थ त्याठिकाणी काहीतरी गौडबंगाल आहे. मी माझ्या कार्यकर्त्याला सांगीतल जा चेक करुन ये तर पटकन मला फोन येतो की उल्हास तु काही लक्ष देवू नकोस माझा माणूस आहे. एखादा लीगल काम करणारा असेलतर त्याला या गोष्टी येणारच नाहीत. जो माणुस चोरी करतो त्यालाच भीती असते. चोरी न करणाराला भीती नाही. स्लम संदर्भात, स्वच्छतेच्या संदर्भात आपण मागे आहोत. त्यांच्याकडे लेबर नाही, तो थँकलेस जॉब आहे. आरोग्य डिपार्टमेंट हा थँकलेस जॉब आहे. आज एक दिवस केले म्हणजे तो विषय मिटला असे नाही, उदया परत घाण होणार आहे. त्यांच्याकडे स्टाफ नाही, गाडी नाही. अजेंडानगरमध्ये काय परिस्थिती आहे. मी लोकांना घेवून स्वच्छता अभीयान घेत असतो. मा. मुख्यमंत्री साहेबांनी अनधिकृत बांधकामाचा विषय घेतलेला आहे. माझ्या जुन्या वॉर्डात अनधिकृत बांधकाम भरपूर आहेत. आता ३१ मार्च २०१६ पर्यंतचे करणार आहेत. चांगल्या गोष्टी आहेत, चांगल डिसीजन आहे पण याच्यानंतरच ऍक्च्यूली क्लेरीफिकेशन आपल्यापुढ आलेले नाही. फ्लेक्स लावून अमूक तमूक केल, आम्हीही फ्लेक्स लावू पण कधी, ऍक्च्युली पोझीशन आल्यावर. आज परिस्थिती काय आहे, फक्त हावेत गोळीबार आहे. कस करणार, कुठल्या नियमाने करणार हे आलेले नाही. तुम्ही बिल्डरने बांधलेल्या चौथ्या मजल्यावरच रेग्युलराईज करणार का एक गुंठयामध्ये बांधलेल करणार, काय करणार, कुठल्या नियमात करणार आहेत. तुम्हांला रेव्हेन्यू भरपूर मिळणार आहे कोर्टात का रेग्युराईज करणार नाहीत. एका गुंठयावर तीन मजली बांधले असतीलतर त्याला रेग्युलराईज करता. एक गुंठयाचा प्लॉट, त्याला साईड मार्जीन सोडलेली आहे, एनओसी घेतलेली आहे त्याने पाप केलेले आहे. शेजा-याला तीन मजले दिले याला एक हजार बांधायच मग तो म्हणणार नाही का मला पण दया अजून दोन मजल्याच परमीशन. त्यावेळेला तुम्ही काय करणार आहेत. मग हा दुजाभाव होणार नाही का. या गोष्टीच क्लेरीफिकेशन यायला आजून वेळ आहे. मंजुर आता झालेले आहे. तुमच्याकडे आदेश येणार, क्लेरीफिकेशन येणार त्यानंतर या गोष्टी होणार. झालेतर आम्हांला सुध्दा अभीमान आहे. हे झाल्यानंतर झोपडपट्टीचा किंवा अनधिकृत बांधकामाचा प्रश्न मिटलातर आम्ही सुध्दा अभीनंदन करु. आम्हांला सुध्दा मनापासून बरं वाटणार आहे की या सगळया गोष्टी केल्यात. टॅक्स, एलबीटी, पाणीपट्टी भरपूर गोळा केलेली आहे. लाईट बील भरल नाहीतर लाईट कट केली जाते तसं या गोष्टी करायला पाहीजे. आज टॅक्सची सुध्दा भरपूर लोकांकडे बाकी आहे. लीगल, ईलीगल कन्स्ट्रक्शनचे पैसे बाकी

आहेत. भरपूर गोष्टी आहेत. हे सगळ फुलफील केलतर आपल्याला बजेट बिलकूल कमी पडणार नाही. मागच्या वर्षी जे बजेट वर्षभर करत होतो. या बजेटचे तसे पुढे होता कामा नये. कारण ऑक्टोबर, नोव्हेंबर पर्यंत या गोष्टींचा निकाल लागणार आहे की आपण सदस्य येथे येणार का नाही ही शंका आहे. आशावेळेस टेंडरींग प्रोसिजर, याठिकाणी चेअरमन साहेब आहेत त्यांना पण विनंती आहे काही ठिकाणी ठेकेदार म्हणतात की फाईल सोडत नाहीत, वेळ लागतो तरी तुम्ही पण जेवढ जमेल तेवढ फास्ट सही करुन पुढे फाईल पाठवीलीतर या टेंडरींग प्रोसीजर लवकर होवून आमच्या लोकांना कामाला ते उपयोगी पडेल. नाहीतर काय होईल आज एवढ मोठ बजेट केलं आणि ऑक्टोबर पर्यंत ते फुलफील नाही केलंतर नवीन येणा-या नगरसेवकांना ते ॲडव्हान्टेज मिळणार आहे. आम्हांला असं वाटतय की आम्ही केलेल्या कामाच आम्हांला ॲडव्हान्टेज मिळायला पाहीजे. आम्हांला बजेट मिळाला पाहीजे. भविष्यामध्ये त्यांची जी अपेक्षा आहे त्यावेळेला आम्ही आश्वासन दिलेल होत आम्ही फुलफील करु. आम्ही ते फुलफील केलेतर आम्हांला स्वत:ला मनाला समाधान होईल अशी अपेक्षा व्यक्त करतो. पुन्हा एकदा आयुक्त साहेबांच अभिनंदन करतो आणि याठिकाणी थांबतो.

**मा. अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब हे बजेट मांडत असताना बजेट पुर्वी सायन्सपार्कला एक बैठक घेतली त्याआगोदर तुम्ही प्रभागाच्या बैठका घेतल्या आणि सगळया सभासदांच्या ज्या काही मागण्या आहेत त्या तुम्ही त्यामध्ये अंतर्भाव करण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे अत्यंत हुशारीन आपण केल त्याबद्दल तुमच सगळयानी कौतूक केलं मी पण कौतूक करतो की खुप चांगल बजेट आपण याठिकाणी सादर केलं आहे आणि सगळयाना न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आयुक्त साहेब, या पिंपरी चिंचवड शहराचा आपण आतापर्यंतचा प्रवास पाहीलातर पुर्वीची असलेली गाव नंतर नगरपालीका नंतर महानगरपालिका हा जो प्रवास जर पाहीला आतापर्यंतचा तर त्या त्या वेळी त्या त्या नेतृत्वाने म्हणजे मा.यशवंतराव चव्हाण यांनी याठिकाणी कारखानदारी आणली नंतर आदरणीय शरद पवार साहेब असतील, कै. रामकृष्ण मोरेसर असतील आणि आता मा.अजीतदादा पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली या शहराचा जो काही विकास झालेला आहे तो आपण सर्वजण पाहतो. आपल्या शहराला स्मार्ट सिटीचा पुरस्कार मिळाला, आता स्वच्छतेचा पण पुरस्कार आपल्या पिंपरी चिंचवड शहराला मिळाला आहे हे जे काम आहे इतक्या वर्षे त्या त्या वेळीच्या लोकप्रतिनीधीने केलेल्या कामामुळे आज ही स्टेज आपल्या या पिंपरी चिंचवड शहराला प्राप्त झालेली आहे परंतु हे सगळ करत असताना आज आपण

जवळपास ३८००/- ते ३९००/- कोटीच बजेट सादर केलेलं आहे. सुरवातीला थोड थोड करुन आज हे बजेट या स्तरावरती आलेलं आहे. याच्यामध्ये टप्याटप्याने जी वाढ झालेली आहे याच्यामध्ये आपण जर अभ्यास केलातर या पिंपरी चिंचवड शहराची जी ग्रोथ आहे ती देशातल सगळयात फास्ट ग्रोईंगच हे शहर आहे याची लोकसंख्या इतकी झपाटयानं वाढत चाललेली आहे सगळयाच ठिकाणी वेगवेगळया गोष्टी डेव्हलपमेंट होतात. आज आपल्या सगळया समोर असं चॅलेंज आहे की आता जवळपास २० लाखाच्या आसपास आपली लोकसंख्या गेलेली आहे, उदयाच्या काळामध्ये ही ४० लाखापर्यंत जाण्याची शक्यता आहे आणि हे करत असताना आज आपल जे बजेट आहे आपली जी यंत्रणा आहे, पुर्वी असलेली यंत्रणा, आता असलेली यंत्रणा, पुर्वीची जी अधिकारी/कर्मचारी यांची संख्या होती आणि आता जी अधिकारी/कर्मचारी यांची संख्या याचा जर विचार केलातर आपण त्याच्यामध्ये कुठेतरी कमी पडतो आहोत आपल्याला गती देण्याची गरज आहे. आपल्याला ही जी काम आहेत ती गतीने करण्याची गरज आहे. जर आपल्याला येणा-या काळामध्ये वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टिने आपल्याला जे काही इन्फ्रास्ट्रक्चर लागतं, ज्या काही मुलभूत सुविधा लागतात या जर दयायच्या असतीलतर आपल्याला तेवढच गतीने काम आपल्याला येत्या काळामध्ये कराव लागणार आहे. हे सगळ करत असताना आयुक्त साहेब आपणही एका गोष्टीचा अभ्यास केला असतातर या शहरामध्ये पुर्वीची जी गाव होती त्याच्यानंतर काही गाव आली, त्यानंतरही काही गाव आली त्या मुळे हा पिंपरी चिंचवड शहराचा जो विकास झालेला आहे हा बॅलेन्स, समतोल विकास झालेला नाही. याचा बॅलेन्स कुठेतरी कमी जास्त आहे. आज आपण जर पाहीलतर भोसरी, काळेवाडी, रहाटणी, थेरगाव ही जी गाव आहेत ही पुर्वीपासून नगरपालिकेत, महानगरपालिकेत आहेत परंतु येथील काम करताना यांची प्लॅनींग, ऑथोरेटी प्राधिकरण असल्यामुळे याठिकाणी काही त्रुटी राहून गेल्या आहेत. अनेक ठिकाणी बकालवस्ती तयार झाली. त्याच तुलनेमध्ये नंतरच्या काळामध्ये जी गाव आली पिंपळेसौदागर असेल, पिंपळेनिलख असेल, गुरव पिंपळे असेल, सांगवी हा जो परिसर आहे या परिसराचा खुप नियोजनबध्द विकास झालेला आहे. याठिकाणी डेव्हलपमेंटसाठी स्कोप होता. जागा मोकळया होत्या, डेव्हलपमेंट प्लॅनची अंमलबजावणी आपल्याला त्याठिकाणी करता आली. रस्ते त्याठिकाणी आपण चांगले विकसीत केले. त्याठिकाणचे आरक्षण विकसीत केले. आज जर आपण पाहीलतर नदीच्या पलीकडचा जो परिसर आहे त्याठिकाणचे डेव्हलपमेंट इतके प्लॅनींगने झालेले आहे आणि त्याठिकाणच्या जमिनीचे दर असतील, त्याठिकाणच्या फ्लॅटचे दर असतील हे खुप

जास्त आहेत. तुलनात्मकदृष्टया आपण जर विचार केला, इतर भागातला आणि त्या भागातलातर त्याठिकाणी खुप चांगल्या पध्दतीने विकास झाल्यामुळे त्याठिकाणी प्रॉपर्टीचे दर लोकांना जास्त मिळालेले आहेत. बाकीची जी गाव आहेत, भोसरी, काळेवाडी, रहाटणी याठिकाणी थोडस बकाल स्वरुप आलं नंतरच्या काळामध्ये आता पठाणताईनी सांगीतल्याप्रमाणे खुप निधी दिला असं त्यांच म्हणण होत परंतु त्यांच म्हणण बरोबर पण आहे परंतु काही प्रमाणात चुक पण आहे म्हणजे पुर्ण भोसरी मतदारसंघात अनेक गोष्टी देण्याचा त्याठिकाणी प्रयत्न आपण केलेला आहे. कुठेतरी हा बॅकलॉग भरुन काढण्याचा निश्चितपणे आम्ही प्रयत्न केलेला आहे. मागचे आमदार असतील, आताचे आमदार असतील सगळी मंडळी यासाठी प्रयत्न करतात की या भागामध्ये चांगला विकास व्हावा, नियोजनबध्द विकास हा आमचा राहीलेला आहे. आपण नव्याने गाव म्हणतो परंतु ती गाव आपल्याकडे येवून बरेच वर्षे झालेली आहेत सुरवातीच्या काळामध्ये ही गाव महापालिकेत ठेवावीत का नाही ठेवावीत तिथल्या लोकांचा यासाठी विरोध होता, तिथल्या लोकप्रतिनीधींचा विरोध होता. त्यामुळे ही गाव महापालिकेत ठेवू नये, वगळावी अशी मागणी सुरवातीच्या काळामध्ये त्या भागातल्या गावातल्या लोकांची आणि तिथल्या लोकप्रतिनीधींची होती. त्याच्यामुळे काही प्रमाणात तेथील विकास हा झाला नाही. परंतु नंतरच्या काळामध्ये अशी अपेक्षा सगळयाचीच राहीलेली आहे की आता जर आपल्याला ही गाव पिंपरी चिंचवडमध्ये ठेवायची असतीलतर आपल्याला जास्तीचा निधी देण्याची गरज आहे. आज तो तुम्ही देण्याचा प्रयत्न केला आहे परंतु तेवढा तो पुरेसा नाही. उदा. च-होली असेल, मोशी असेल, डुडूळगाव असेल या गावाच क्षेत्रफळ खुप मोठ आहे आणि त्या क्षेत्रफळाच्या तुलनेमध्ये जो काही आपण निधी देतो तो अत्यंत तुटपूंजा आहे. त्यात तेथील नागरीकांच समाधन होत नाही आणि नगरसेवकांच समाधान होत नाही. आज आपल्याला सर्वात मोठी संधी त्याठिकाणी डेव्हलपमेंट करण्याची आहे. जसा पिंपळेसौदागर आणि तो परिसर झालेला आहे तसा हा परिसर उदयाच्या काळामध्ये होणार आहे. पण हे कधी होवू शकतं जर आपण त्याठिकाणी निधी दिला, त्याठिकाणी आपण प्रॉपर प्लॅनिंगने त्याठिकाणचे रस्ते टप्याटप्याने केलेतर, टप्याटप्याने तिथली आरक्षण डेव्हलप केलीतर नक्कीच त्याठिकाणचा विकास त्या पध्दतीने होईल. परंतु कुठेतरी प्रशासन याच्यामध्ये कमी पडतय. आज तुम्ही मॉडेल वॉर्डाच्या नावाखाली एक वॉर्ड ठरवला हरकत नाही, तुम्ही एखादा वॉर्ड ठरवला, चांगली गोष्ट आहे. पण असे करण्याऐवजी जर तुम्ही वेगवेगळे ग्रामीण भागातील वॉर्ड निवडले असतेतर तुम्हांला अधिक चांगले काम त्याठिकाणी

दाखवता आले असते, करता आलं असतं. खर मॉडेल वॉर्ड करण्याची गरज ही आमच्या ग्रामीण भागात होती, कारण तिथ स्कोप पण आहे तिथ मोकळया जागा आहेत आणि तिथ केल असतंतर निश्चितपणे महापालिकेचा ठसा उमटला असता परंतु दुर्दैवाने तसं झालेल नाही. आता धनंजय आल्हाट आणि राहूल जाधव यांनी उल्लेख केला की इंद्रायणी नदी आपल्या शहरातून वाहते या तीन चार नदयाची अवस्था इतकी वाईट आहे. इंद्रायणीनदी, पवित्र नदी आपल्या देहू-आळंदीच्या परिसरा मधुन वाहते. देहू-आळंदीमध्ये महाराष्ट्राच्याच नव्हेतर देशाच्या कानाकोप-यातून लोक त्याठिकाणी श्रध्देने येतात त्या नदीमध्ये ते आंघोळ करतात आज त्या नदीची जर अवस्था पाहीलीतर इतक घाण पाणी, प्रदुषीत पाणी त्याठिकाणी झालेल आहे. मध्यंतरी आपल्याला एमपीसीबीने नोटीस सुध्दा दिलेली आहे. तुम्ही या नदीमध्ये जे घाण पाणी सोडतात त्याच्यावर उपाययोजना कराव्यात, त्याठिकाणी स्वच्छ पाणी राहील यासाठी आपण प्रयत्न करावेत. पण तसं दुर्दैवाने केल जात नाही आणि प्रशासन कुठेतरी कमी पडते खरं म्हणजे आपण नदी सुधार प्रकल्पाबाबत अनेकवेळा चर्चा केली. चर्चा करत असताना आपण सुध्दा आणि आदिच्या आयुक्तांनी सुध्दा असं सांगीतले की आपण लवकरात लवकर या ज्या नदया आपल्या शहरातून वाहतात याच्यामध्ये आपण नदी सुधार प्रकल्प राबऊ यात. पण प्रत्यक्षात तशी तरतूद नाही पण ही काळाची गरज आहे. जो काही पुररेषेचा विषय आहे, निळी पुररेषा, लाल पुररेषा आहे ती आपण आपल्या शहरामध्ये आखुन घेतली. याच्यामध्ये इरिगेशन डिपार्टमेंटने दिशा दिली त्याच्या मागची भूमिका होती की उदयाच्या काळामध्ये जर या शहरामध्ये पुर आलातर तिथं कुठलही बांधकाम नसाव, तिथ कुठलही नुकसान होऊ नये, जिवीत हाणी होऊ नये या भूमिकेतून ही पुररेषा आखली गेली आहे. परंतु जर आपण नदी सुधार प्रकल्प राबविलातर ही रेषा सुध्दा आपल्याला कमी करता येईल. गुजरात मध्ये नदी सुधार प्रकल्प राबविला गेला तसा राबविलातर पुररेषेच्या नदीच्या बाजूच्या ज्या जागा आहेत त्या जागा सुध्दा बील्टेबल होवू शकतात रेसिडेन्शिअलमध्ये त्याचा जर बदल झालातर त्याच्यामध्ये प्रिमीअम चार्ज करुन या भागातील जागा सुध्दा आपण प्रॉपर प्लॅनींगने विकसीत करु शकतो. खरं म्हणजे तशाप्रकारच्या आपण उपाययोजना आखल्या पाहीजेत आणि ते केल गेल पाहीजे. मोशीचा जो भाग आहे त्या मोशीमध्ये कचरा डेपो आहे आज त्या कचरा डेपोची अवस्था अशी आहे की त्या भागात जर तुम्ही संध्याकाळी गेलाततर, मग मोशी असेल, च-होली असेल, डुडूळगाव असेल किंवा भोसरीचा काही परिसर असेल किंवा इंद्रायणीनगरचा परिसर त्या भागामध्ये संध्याकाळी वास येतो.

याच्यासाठी आज एवढं आधुनीक तंत्रज्ञान आहे. तुम्ही या कच-यावरती प्रक्रीया करुन त्याठिकाणी महापालिकेचे उत्पन्न सुध्दा जनरेट करु शकता. परंतु अजुनही दुर्दैवाने तशाप्रकारच्या कुठल्याही उपाययोजना आपल्या महापालिकेकडून, प्रशासनाकडून केल्या जात नाहीत ही दुर्दैवाची बाब आहे. हे करत असताना आयुक्त साहेब, तुम्ही मनापासून चांगल काम करता, तुमची सुध्दा इच्छा आहे की या परिसराचा विकास झाला पाहीजे परंतु येत्या काळात हे कुठतरी व्हाव अशी आमची अपेक्षा आहे. नाशिक फाटा ते मोशीचा जो रोड आहे हा आपल्या महापालिकेच्या ताब्यात नाही, हायवे असल्यामुळे त्याचा जो ताबा आहे त्याचा जो विकास केला जातो तो शासनाकडून केला जातो त्यामुळे असा प्रॉब्लेम आहे की आपल्या शहरातील सगळे रस्ते विकसीत होतात आमचा देहू-आळंदी रस्ता पण विकसीत होतो, पुणे-आळंदी रस्ता पण विकसीत होतो परंतु नाशिक फाटा ते मोशी हा जो रस्ता आहे हा विकसीत करण्याची गरज आहे. २००७ ला कन्सलटंट अपॉईंट केला होता त्या रस्त्यावरती कुठे ब्रीजेस असले पाहीजे याच आपण प्लॅनींग केल होत परंतु नंतरच्या काळात हा रस्ता आमच्या ताब्यात नसल्याचे सांगून हा रस्ता कुठतरी बाजूला पडला त्याच्यामुळे काय झाल तो नाशिक फाटा ते मोशीचा परिसर आहे हा थोडासा इतर भागाच्या मानाने विकासाच्या दृष्टिकोनातून मागे राहीलेला आहे. येत्या काळामध्ये त्याठिकाणी इन्टरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर होईल. मध्यंतरी आम्ही प्राधिकरणाचे सीईओ म्हसे साहेब होते त्यांच्याकडे गेलो होतो. त्यावेळेस त्यांनी आम्हांला सांगीतल की जर इन्टरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर झालतर महीन्याला १० लाख परदेशी नागरीक त्याठिकाणी येतील. दहा लाख महीन्याला नाहीतर वर्षाला जरी नागरीक आलेतर आणि अशा ठिकाणी इन्टरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर होत असेलतर महापालिकेचे धोरण काय. त्याठिकाणी मेट्रोची सुध्दा सुचना आली मेट्रो पहीली पिंपरी पर्यंत आणली त्यावेळेला उपसूचना मांडताना निगडीपर्यंत केली नंतर ते मोशीपर्यंत न्यावी अशी उपसूचना मांडली. परंतु प्रत्यक्षात आता जी चर्चा आहे ती पिंपरी पर्यंत, परंतु ती निगडी आणि मोशी पर्यंत होण्याची गरज आहे. उदयाच्या काळामध्ये खेड परिसरात इन्टरनॅशनल ईअरपोर्ट होतय आणि मग इन्टरनॅशनल ईअरपोर्ट जर त्या परिसरामध्ये झालतर त्याचा सगळा ताण आपल्या पिंपरी चिंचवड शहरावरती येणार आहे. त्याचा जास्तीत जास्त ताण त्या सगळया ग्रामीण पट्टयावरती येणार आहे. आपला प्रयत्न काय राहीला पाहीजे की त्या भागामध्ये जास्तीत जास्त विकास कसा होईल हे पाहीले पाहीजे. पाण्याच्या बाबतीत तुम्ही आम्हांला अनेकवेळा सांगीतल आहे की भामा-आसखेडच्या बाबतीत. या कामाला गती देणे अत्यंत गरजेच

आहे. तो जो पट्टा आहे त्या पट्टयावर संपुर्णपणे अधिकृत घर होतात, अधिकृत इमारती होतात, मोठमोठे प्रकल्प होतात. त्याठिकाणी लोकांना पुरेस पाणी जर दयायच असेलतर आपल्याला या प्रकल्पाला गती देण्याची गरज आहे आणि त्यादृष्टिकोनातून आपण अधिक जास्तीच लक्ष त्या कामावरती दिल पाहीजे अशी माझी आपल्याला विनंती राहणार आहे. आपली ड्रेनेज सिस्टीम खुप चांगली आहे पिंपरी चिंचवड शहरामध्ये अजून लोकसंख्या वाढली तरी आपली ड्रेनेज सिस्टीम पुरेशी आहे परंतु अजून आपल्याला पुढचा दृष्टिकोन डोळयासमोर ठेवून आपल्याला ड्रेनेज सिस्टीममध्ये सुध्दा आणखीन नव्याने काही एसटीपी प्लॅन्ट किंवा आणखीन काही ड्रेनेज लाईन टाकायची विशेषत: त्या पट्टयमध्ये गरज आहे. त्यासाठी येत्या बजेटमध्ये कमी तरतूद आहे परंतु येत्या काळामध्ये आपल्याला कुठून पैसे वर्ग करता येतील का आणि त्या परिसरामध्ये ज्या ज्या मुलभूत सुविधा आहेत त्या कशा देता येतील त्यासाठी आपण प्रयत्न करावेत अशाप्रकारची माझी विनंती राहणार आहे. आता नव्यान आपल्या शासनान जो काही निर्णय घेतलेला आहे टिडीआर संदर्भात आणि त्याच्यामुळे डबल टिडीआर, डबल एफएसआय लोकांना मिळणार आहे आणि त्याच्यामुळे आपल्या ताब्यात अनेक रस्ते, आरक्षण येऊ शकतात. प्लस आपण ज्याठिकाणी लोडींग करणार आहोत त्याठिकाणी जो ॲडीशनल टिडीआर लोड करण्याची मुभा शासनाने आपल्याला दिलेली आहे त्याच्यामुळे येत्या काळात आपल्याला खुप मोठया प्रमाणामध्ये लोक प्लॅन टाकणार आहेत आणि प्लॅन टाकत असताना खुप मोठमोठया इमारती त्या त्या परिसरामध्ये होणार आहेत, उंच इमारती त्याठिकाणी बांधल्या जाणार आहेत. त्यामुळे आपल्याला हे सर्व इन्फ्रास्ट्रक्चर त्यादृष्टिकोनातून आतापासून त्याठिकाणी नियोजन करण्याची गरज आहे. त्याच्यामुळे येत्या काळात आपण बारकाईने लक्ष घातले पाहीजे. या बजेटच्या अनुषंगाने जे काही आपले उत्पन्नाचे स्त्रोत आहेत, उत्पन्नाच्या बाजू आहेत त्याच्यातली मुख्य उत्पन्नाची बाजू आपली एलबीटी आहे आणि एलबीटीचे उत्पन्न कमी होईल असे वाटले पण तसे झालेले नाही. आज ५० कोटीच्या खालच्या लोकांची एलबीटी शासनाने रद्द केलेली आहे तरी सुध्दा एलबीटीचे उत्पन्न वाढलेले आहे यासाठी मी माने साहेबांच आणि त्यांच्या टिमचही कौतूक करेल. परंतु पुढच्या काळामध्ये जीएसटी येणार आहे त्यावेळेस आपल्याला अडचण निर्माण होणार आहे. आपल्याला संपुर्णपणे शासनावरती त्या निधीसाठी अवलंबून रहावे लागणार आहे त्याच्यामुळे आपले बाकीचे जे उत्पन्नाचे आपले स्त्रोत आहेत ते वाढविण्याची गरज आहे. याच्यामध्ये सगळयात जास्त आपण वाढ करु शकतो ती मला वाटत बिल्डींग

परमीशनमध्ये जास्त उत्पन्न आपण वाढवू शकतो आणि त्यादृष्टिने आपल्याला प्रयत्न करायचे आहेत. नियम करताना आपल्याकडन काही चुका झालेल्या आहेत उदा. बीआरटीच्या रोडच्या बाबतीत त्यावेळेस आपण एसपीव्ही फॉर्म केल आणि डेव्हलपमेंट करत असताना बीआरटीएसच्या बाजूने आपण अधिकचा टिडीआर दयायच ठरवल परंतु प्रत्यक्षात ती चुक झाली, सभागृहाकडन पण झाली आणि प्रशासनाकडन पण झाली त्यामुळे प्रत्यक्षात त्या बीआरटी रोडवरती कुठल्याही प्रकारचे प्रकल्प मंजूरीसाठी येवू शकलेले नाहीत. त्या भागातल बिल्डींग परमीशनच उत्पन्न घटलेल आहे. परंतु अशा ज्या काही चुका येथून मागच्या काळात, आता मला वाटत ॲडीशनल टिडीआर निमीत्ताने आपल्याला त्याठिकाणचा जो काही प्रिमीएम आहे तो मला वाटत रद्द करता येईल आणि लोकांना त्या भागामध्ये डेव्हलपमेंट करत असताना तो प्रिमीअम चार्ज न करता जो काही शासनान आता लोडींगची त्यांना मुभा दिली त्याप्रमाणे आपल्याला लोडींग करुन देता येईल. दुसरा एक मुद्दा आहे की आता आपण हायराईज बिल्डींगला जेव्हा जाणार आहोत की जी काही फायर एनओसी घेताना आपण पैसे भरतो, एका ठरावीक विशिष्ठ उंचीवरती गेल्यावरती आपले जे घर आहे त्याच्यापेक्षा त्याच्यापुढ जाऊन आपण हाईटला जातो ते जवळपास आठ ते दहा पट जास्त दर लावले गेलेले आहेत. त्याच्यामुळे ते प्रॅक्टीकल नाही. कुठलाही बांधकाम व्यावसायीक किंवा कुठलाही खाजगी जागामालक त्याठिकाणी बिल्डींग बांधायची असेलतर तो काय विचार करेल की मला त्याच्यापुढे बिल्डींग प्लॅन पास करता येणार नाही कारण एवढे पैसे मी भरु शकत नाही. आज जर आपण मार्केटचा त्या परिसरामधला विचार केलातर त्या व्यावसायीकाला, त्या जागा मालकाला ते शक्य नाही. त्यामुळे हे सगळे नियम येवून सुध्दा आपल्याला जे अपेक्षीत उत्पन्न बिल्डींग परमीशनच्या माध्यमातून मिळणार आहे ते मिळणार नाही. त्याच्यामुळे याच्यामध्ये आपण अभ्यास करावा, विचार करावा. जे गरजेचे आहे तेवढे तुम्ही शंभर टक्के फायरचे जे नियम आहेत ते पाळले गेले पाहीजेत, नियमाप्रमाणे जे काही पैसे घेतले पाहीजेत ते शंभर टक्के घेतले पाहीजे परंतु जी काही अनावश्यक, विनाकारण त्याच्यामध्ये वाढ केली गेलेली आहे जे कुठेतरी चुकीच्या पध्दतीने झालेले आहे. याचा परिणाम उत्पन्नावर होईल. येत्या काळात आपल्याला याचा विचार करावा लागेल. आता मागच्या आठवडयातच अनधिकृत बांधकाम नियमीत करण्याच्या संदर्भात मा.मुख्यमंत्री यांनी स्टेटमेंट केले, त्याच्याबद्दल मी १०० टक्के त्यांचे आणि त्यांच्या टिमचे मनापासून अभिनंदन करतो. त्यांनी चांगला निर्णय घेतलेला आहे आणि येथून मागचा इतिहास पाहीलातर मागच्या काळात आमचे

मा.अजीतदादा पवार साहेब असतील, माजी आमदार विलासराव लांडे असतील, माजी आमदार आण्णा बनसोडे असतील, मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप असतील या सर्व पक्षाच्या नेत्यांनी ही अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्यासाठी त्या त्या वेळी प्रयत्न केलेले आहेत. आणि त्या प्रयत्नातूनच मागच्या शासनाने कुंटे समिती अपॉईंट केलेली होती त्यांच्या अहवालातून हा निर्णय झालेला आहे. मागच्या काळात दुर्दैवाने तो निर्णय होवू शकलेला नाही. पण आता निर्णय झालेला आहे  तो निर्णय होत असताना याच्यामध्ये आणखीन अडचणी पुढे आपल्याला येणार आहेत त्याची कल्पना तुम्हांलाही आहे, प्रशासनालाही आहे. की ज्यांनी अधिकृत घर बांधलेत त्याचा नियम आणि अनधिकृत घर बांधणा-यांना जो काही शासन आता नियम ठरविणार आहे, माझ्या माहीती प्रमाणे अधिकृत जो बांधकाम करतो त्याला १०० रु.प्र.स्क्वे.फुट डेव्हलपमेंट चार्जेस जवळपास कमीत कमी तेवढा खर्च आपल्या महापालिकेला डेव्हलपमेंटच्या माध्यमातून दयावा लागतो. अनधिकृत बांधणा-या माणसाना नेमका किती डेव्हलपमेंट चार्जेस भरावा लागेल याचा सुध्दा अभ्यास करण्याची गरज प्रशासनाला पण आहे आणि त्या पध्दतीची आपण शासनाकडून सुध्दा माहीती घेतली पाहीजे. आज आपण सगळेजण लोकांना सांगतो तुमचे घर नियमीत होणार आहेत परंतु खरच त्यांच ते स्वप्न पुर्ण होणार आहे का. कारण एवढया मोठया प्रमाणात जर १०० रुपया पेक्षा जास्त दंड लावलातर कुठतरी त्यांच्यावरती ते अन्यायाकारक होईल. दुसरा मुद्दा असा आहे की, नियमाप्रमाणे किती एफएसआय आहे. समजा एक हजार स्क्वे.फुटाचा त्याचा प्लॉट असेल, त्याला ॲडीशनल १५ टक्के बाल्कनी, टेरेसेस धरुन काही मिळेल परंतु जर त्यांनी दोन, तीन, चार हजार स्क्वे.फुट बांधलेले असेलतर त्यांच्या बाबतीत नेमके धोरण काय त्याचा सुध्दा प्रशासनाने अभ्यास केला पाहीजे आणि आम्हांला सुध्दा त्या पध्दतीची माहीती सांगीतली पाहीजे. येत्या काळात हे वेगळे डिपार्टमेंट बिल्डींग परमीशनशी संलग्न  सुरु करावे लागेल. अनधिकृत बांधकाम अधिकृत करण्यासंदर्भात प्रत्येक प्रभागामध्ये विभाग सुरु करावा लागेल. कदाचित सेपरेट अधिकारी नेमावे लागतील कारण लोकांना अनधिकृतचे अधिकृत करण्यासाठी जी काही माहीती लागेल ती त्यांना दयावी लागेल. या सगळया गोष्टी आपल्याला येत्या काळामध्ये कराव्या लागतील त्यादृष्टिने आपल्याला प्रशासनाला सज्ज रहावे लागेल. त्याच्यामुळे हा झालेला निर्णय अत्यंत चांगला आहे परंतु त्या निर्णयाची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. त्या नागरीकांपर्यंत ते पोहचण्याची गरज आहे. मा.मुख्यमंत्री साहेबांनी डिसेंबर २०१५ पर्यंतचा निर्णय घेतलेला आहे परंतु आजही अनेक ठिकाणी बांधकाम चालू आहेत अनेक

बांधकाम अशी पण आहेत की डिसेंबर २०१५ च्या अगोदर बांधली गेली आहेत पण त्यांची नोंद झालेली नाही. जर आपण शासनाला विनंती केली त्या तारखेपर्यंत जर ही बांधकाम आपल्याला नियमीत करता आलीतर नक्कीच आपल्या शहरातील नागरीकांना त्याचा फायदा होईल. आयुक्त साहेब ज्यांच्या नोंद राहीलेल्या आहेत त्या नोंदी करण्याबाबत तशाप्रकारच्या सूचना करसंकलन विभागाला कराव्यात. आता नागरीक ज्या ज्यावेळेस करसंकलन कार्यालयात टॅक्स भरण्यासाठी जातात त्यावेळेस त्यांना असं सांगण्यात येत की मार्च महीना आहे म्हणून नोंदी करु शकत नाहीत. तरी प्रत्येक नागरीकांच्या नोंदी करुन घ्याव्यात असे सांगावे. जास्तीत जास्त लोक यामध्ये कसे बसतील असे करावे व करसंकलन विभागाला तशाप्रकारे आदेश दयावे लागणार आहेत. ज्याठिकाणी रोड आहे, ज्याठिकाणी आरक्षण आहेत ज्याठिकाणी बांधकाम आहेत ती नियमीत करता येऊ शकतात पण ते कधी रोड शिफ्ट केला २०० मी. मध्ये किंवा आरक्षण शिफ्ट केलतर. या संदर्भात नगरसेवकांकडे लोक येतात, आम्हांला भेटतात की अशाप्रकारच मा.मुख्यमंत्री साहेबांच स्टेटमेंट आहे, तर नेमक काय आहे याचा सुध्दा अभ्यास करुन माहिती दयावी. वेगवेगळया ठिकाणी आमच्या सगळयांच्याच प्रभागामध्ये रस्त्यावर बांधकाम झालेली आहेत, काही ठिकाणी आरक्षणावर बांधकाम झालेली आहेत. ते नियमीत होऊ शकलीतर १०० टक्के त्यादृष्टिने प्रशासनाने प्रयत्न केले पाहीजेत. जास्तीत जास्त लोकांचे बांधकाम अनधिकृत मधून अधिकृत कसे करता येईल यादृष्टिकोनातून भविष्यकाळात आपल्याला प्रयत्न करावे लागणार आहेत. यातून सुध्दा महापालिकेला खूप मोठा निधी मिळू शकतो. येथून पुढच्या काळात शास्तीकर माफ होणार आहे. येथून पुढच्या काळामध्ये लोक १०० टक्के नियमीत घर कसे बांधतील ही अपेक्षा शासनाची पण असणार आहे आणि आपल्या प्रशासनाची सुध्दा असेल. परंतु त्यासाठी नियमात, कायदयात बदल करण्याची गरज आहे. जे काही कायदयामध्ये बदल करण्याची गरज आहे त्यासाठी सुध्दा सगळयाच नगरसेवकांनी विशेषतः भाजपच्या, सत्तेतल्या सर्व नगरसेवकांनी सुध्दा पाठपुरावा करावा उदयाच्या काळामध्ये लोकांना सहजपणे अगदी सामान्य माणूस सुध्दा प्लॅन पास करण्यासाठी आलातर त्याला सहजपणे त्याचा प्लॅन पास करता येईल. जे छोटे छोटे प्लॉटधारक आहेत त्यांना सुध्दा अधिकृत घर बांधता येतील आणि उदयाच्या काळामध्ये आपल्याला आपल जे शहर आहे ते अधिक चांगल शहर करता येईल. तसेच डीपी प्लॅनची जास्तीत जास्त अंमलबजावणी करुन आपले शहर विकसीत करता येऊ शकत आणि त्यासाठी येत्या काळामध्ये आपण प्रयत्न करु. दुसरी आर्थीक बाजू जी आहे ती करसंकलन विभागाची

आहे त्या बाबतीत सांगायचे झालेतर आपल्या येथे करयोग्य मुल्य जे ठरते ते जुन्या पध्दतीने जुन्या गावाना एक दर नंतरच्या गावाना वेगळा दर पण प्रत्यक्षात हे अन्यायकारक आहे. प्रत्येक ठिकाणच व्हॅल्यूएशन वेगळ आहे, प्रत्येक ठिकाणच्या प्रॉपर्टीचा दर वेगळा आहे रेडीरेकनरचे रेट वेगळे आहेत. असे असताना काही ठिकाणी जास्त दर लागतो व काही ठिकाणी कमी लागतो. वास्तविक काय केले पाहीजे रेडीरेकनरच्या रेटशी आपल्याला ते लींकअप कराव लागणार आहे. मागच्यावेळेस करसंकलन विभागाने खुलासा करताना सांगीतल होत की आगामी काळामध्ये याबाबतीत आपण विचार करु, तसे जर केलेतर ते रेट प्रॉपर केलेतर मला वाटतं त्यातून आपल उत्पन्न वाढू शकत. आपल्या ज्या मिळकती शंभर टक्के सर्वेमध्ये आल्या त्याची नोंद आपण जर केलीतर त्यातून चांगले उत्पन्न मिळू शकते. मगाशी ब-याचशा सदस्यांनी उल्लेख केला, आपण ब-याचशा प्रॉपटर्या बांधलेल्या आहेत त्या भाडयाने दिलेल्या आहेत पण भाडे मिळत नाही. त्याचा मिळकत कर आहे तो अनेक लोकांनी थकवलेला आहे, त्याच्यावरती काही ठिकाणी कोर्टकेसेस आहेत. त्याच्यावर सुध्दा लक्ष दिलं पाहीजे. आपल लिगल डिपार्टमेंट काय करते कुठलातरी बाहेरचा वकील अपॉईट करतं आणि मग त्या वकीलांकडन ती दिरंगाई होते. तरी त्यामध्ये आपण स्वत: लक्ष देण्याची गरज आहे आणि आपल्या ज्या काही पेन्डीग केसेस आहेत त्याचे निकाल लागले पाहीजेत. ते जे पैसे पेन्डीग आहेत ते वसुल झाले पाहीजेत आपल्या प्रॉपर्टीची किमंत खुप जास्तीची आहे त्याच्यातून प्रत्यक्षात जेवढ उत्पन्न आपल्याला मिळायला पाहीजे तेवढ त्यातून ते मिळत नाही एखादा खाजगी व्यावसायीक असतातर त्याच्याकडन जास्ती उत्पन्न मिळाले असते परंतु दुर्दैवाने आपल्याकडून ते होत नाही. परवाना विभागाच्या माध्यमातून होर्डींग्ज असेल असे अनेक उत्पन्नाच्या गोष्टी वाढविता येईल. या शहरात विकास करताना खुप चांगला विकास केला परंतु आपण रस्ते मोठे केले, फुटपाथ केले पण आज शहरामध्ये परिस्थिती काय आहे. प्रत्येक फुटपाथवर अनधिकृतपणे लोक व्यावसाय करतात व्यावसाय करण्याबद्दल आमचा कोणाचाही विरोध नाही त्या छोटया व्यावसायीकांना सुध्दा तुम्ही कुठतरी जागा दया हॉकर्सझोन तयार नसेलतर त्या लोकांना कुठेतरी जागा दया त्याठिकाणी हातगाडया लावू दया, भाजीमंडई करु दया परंतु आज काय परिस्थिती आहे. कोणीही उठाव आणि हातगाडी टाकावी, कोणीही उठाव आणि टपरी टाकावी आणि विशेष म्हणजे या गरीब लोकांकडून काही लोक पैसे गोळा करतात. या गोष्टी प्रत्येक नगरसेवकांनी प्रभागाची मिटींग असेल, जीबीची मिटींग असेल त्याच्यामध्ये या संदर्भातील भावना आपल्यासमोर

व्यक्त केलेल्या आहेत. अमक्या माणसाने सांगीतल असे सांगतात, कशाला सांगता तुम्ही ते तुमचे काम आहे तुम्ही ते केले पाहीजे ज्या लोकांचे घर पाडून रस्ते मोठे केले, दुकान मोठे केले त्यांच्या भावना काय आहेत ते म्हणतात आज आम्ही आमच्या जागा तुम्हांला दिल्या त्या याच्यासाठी दिल्या का. एखादा माणुस काय म्हणतो आम्ही पाच-पन्नास लाख घालून दुकान घेण्यापेक्षा एकदोन लाखामध्ये एखादी टपरी टाकलीतर जास्त उत्पन्न मिळते. अशाप्रकारच्या भावना आमच्याकड लोक व्यक्त करतात. याच्यामध्ये प्रशासनाची इच्छाशक्तीच नाही. प्रभागामध्ये स्टाफ नाही. एखादया दिवशी समजूत काढण्यासाठी जातात परत महीना दोन महीने कोणी फिरकत नाही आणि हीच परिस्थिती सगळया ठिकाणी आहे. आयुक्त साहेब, याच्यामध्ये जी उदासिनता दाखवली जाते ही अत्यंत चुकीची आहे. यामध्ये आपण लक्ष घालाव आणि कुठतरी या शहराला आपण स्मार्ट सिटी म्हणतो अजून आपल्याला या शहराला पुढे न्यायचे आहे. हे करत असताना या लोकांचा सुध्दा विचार करावा. त्यांना कुठेतरी जागा दया, आमच्या भोसरीमध्ये खुप जागा मोकळया पडल्यात. त्यांच्याकडून अधिकृत पैसे घ्या. कोणीतरी पैसे गोळा करण्यापेक्षा महापालिकेनी त्यांना अधिकृत कराव तेवढेच महापालिकेचे उत्पन्न वाढेल, तरी हे आपण गांभीर्याने घ्यावे. कारण सर्रासपणे सगळया ठिकाणी हा उदयोग चाललेला आहे आणि याच्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्ती पण मोठया प्रमाणात वाढलेली आहे. अनेक ठिकाणी हातगाडयावरती दारु, मच्छी विकली जाते त्याठिकाणी वेगवेगळे धंदे चालतात याच्या बाबत प्रशासनाकडून अत्यंत उदासीनता आहे आणि कुठल्याही प्रकारची आपल्या अधिका-याकडून इच्छाशक्ती नाही. आमच्या प्रभागातील मिटींग प्रत्येकवेळी या विषयावरतीच होत असते. सगळया प्रभागात हीच पध्दत असेल. आयुक्त साहेब, तुम्ही याच्यामध्ये लक्ष घालाव त्याच्यासाठी वेगळे लोक नेमावेत तरच आपल शहर एक सुंदर शहर म्हणून आपण लोकांसमोर जाऊ शकतो. येत्या काळामध्ये या सर्व गोष्टी झाल्या पाहीजेत. पाणीपुरवठया संदर्भात उन्हाळा असल्यामुळे पाण्याची परिस्थिती गंभीर आहे. पाण्याच्या बाबतीत सगळे सभासद बोलले. अनेक ठिकाणी अनधिकृत कनेक्शन्स आहेत ते कनेक्शन्स अधिकृत करा, आम्ही ती तोडा म्हणत नाहीत. त्याचा सर्वे करा, अधिकृत करा आणि त्यांच्याकडून पैसे घ्या. काही दिवसामध्ये हेही काम झालेतर त्याच्यातूनही काही महापालिकेला उत्पन्न मिळू शकते. येत्या काळामध्ये तशाप्रकारच्या उपाययोजना आखाव्यात व संपुर्ण शहरामध्ये समान विकास करावा, संपुर्ण शहराला न्याय देण्याचा आपण प्रयत्न करावा अशाप्रकारची मागणी याठिकाणी करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब आपण मागच्या बजेटच्यापुर्वी शहरामध्ये व्हिजीट केली, सर्व प्रभागामध्ये आपण फिरलात आणि ब-यापैकी लोकांची कामे आपण या वर्षभरात मार्गी लावलेली आहेत. आमचे सुध्दा काम मार्गी लागलेली आहेत पण, शेवटी. डांबरीकरण झालेले नाही, टेंडर झाले पण पैसे शिल्लक नाहीत. बजेटच्या ५ टक्के रक्कम ही मागासवर्गीय कल्याणकारी योजनेसाठी ठेवली पाहीजे. आपण बजेट पाहीलेतर मागासवर्गीय कल्याणकारी योजनेसाठी भरीव अशी तरतूद नाही. आपण आजपर्यंतची माहीती घेतलीतर आपल्या योजना तुमच्या समोर येतील. शहरात असे मागासवर्गीय लोक आहेत की ज्यांचे हातावरती पोट आहेत पुरुषांसाठी आपण काही देवू शकलोत का. आता बांधकाम पाडल्यामुळे त्यांचे हात बंद झाले, त्यांनी हातगाडया चालू केल्यात. आज मोठयाप्रमाणावर भाजीमंडई वाढल्यात आणि रस्ते बंद झालेले आहेत. आपण सुध्दा मागच्यावर्षी भाजीमंडई स्थलांतरीत करुन त्यांची व्यवस्था करुया असं ठरवल होत परंतु आजपर्यंत ते झालेले नाही. आताच अजीत गव्हाणे यांनी हॉकर्सचे सांगीतले. हॉकर्समध्ये जास्तीत जास्त मागासवर्गीय लोक आहेत की ज्यांचे हातावर पोट आहेत. छोटेमोठे उदयोग करणा-यासाठी आपण बजेटमध्ये काहीही देवू शकलो नाहीत. मागासवर्गीय कल्याणकारी योजनेपमाणे आता अमृत योजना आलेली आहे. त्या अमृत योजनेमधुन काही झोपडपट्टीधारकांना घरदुरुस्तीसाठी एक लाख देण्याचे ठरलेले आहे ते घोषीत केले त्या लोकांना एक लाख भेटलेतर त्यांचे घर दुरुस्त होऊ शकत आणि ते त्याठिकाणी चांगल्या पध्दतीने राहण्याची सोय करतील. ही योजना अंमलात आणावी. आमच्याही परिसरात रेडझोन असंच आहे. त्याठिकाणी लोक राहतात त्याठिकाणी त्यांना सुध्दा घर दुरुस्ती करता येतील, घर गळतात, लोक पावसात राहतात. मी त्या परिसरामध्ये राहतो म्हणून किव येते. या योजनेवर बजेटच्या ५ टक्के रक्कम खर्च करा, खर्च होत नाही. अशा ब-याचशा योजना आहेत. रस्त्यावर बघीतलेतर लहान-लहान मुलं भीक मागतात त्यांच्या बद्दल आपण काय केलेले आहे. स्मार्ट सिटी म्हणून आपण ईथं मिरवतोय. लंगडे-पांगळे लोक, हात गळयात घातलेली मुलं चौका-चौकामध्ये भीका मागतात यांच्यासाठी काहीच केले नाही आपण. या लोकांसाठी काहीतरी केल पाहीजे. गुन्हेगारी करणारे लोक या मुलांना घेवून जातात त्यांचे हात पाय तोडून त्यांना भीका मागायला लावणारी जमात असेलतर याच्यावर कारवाई झाली पाहीजे. चौकशी करावी हे लोक आलेच कुठून. जर शहरातील असतीलतर त्यांचे पुनर्वसन झाले पाहीजे. त्यांच्या हाताला काम मिळाले पाहीजे. बालकामगार कायदा असताना लहान मुलांना काम करता येत

नाही. त्यांचे आई-वडील घरामध्ये वयस्क असतील, अंध-अपंग असतील, माझ्या वॉर्डात बरेचसे असे अंध-अपंग लोक आहेत. त्यांचे लहान लहान मुलं आहेत त्यांनी कुठेतरी काम केल्याशिवाय घर चालत नाही. त्यांच्यासाठी आपण काहीच करत नाहीत. शासन कायदा काढतो, बालकामगाराचा कायदा आहे त्यामुळे लहान मुलं काम करु शकत नाहीत. त्यामुळे लहान लहान मुल चो-याचपाटया करतात. लहान लहान मुलांची चो-या करण्यामध्ये संख्या जास्त आहे, पोलीसांकडून माहीती मागवा. याबद्दल सुध्दा विचार केला पाहीजे. पाणीपुरवठया बद्दल सगळे बोलले. आज देश हा दुष्काळामध्ये चाललेला आहे. आपल्या शहरात यावर्षी पाऊस पडला नाहीतर पुढच्या वर्षी कसे होईल हे बघावे. धरणामध्ये ३० ते ४० टक्के पाणी आहे. बंद पाईपलाईन साठी पाईप आणून पडलेले आहेत करोडो रुपये त्यामध्ये गुंतलेले आहेत ते पुढे जात नाही पक्षनेत्यांना विनंती आहे त्यांनी आपल्या सभागृहातील खासदार मा.श्रीरंग बारणे, भाजपचे मा.अमर साबळे, मा.आढळराव पाटील हे तीन खासदार व तीन आमदार मा.लक्ष्मण जगताप, मा.महेशदादा लांडगे व मा.गौतम चाबुकस्वार यांना पत्र देवून विनंती करावी व बंद पाईपलाईनमधुन शहराला पाणी कसे येईल हे बघावे. भामा-आसखेडसाठी १०० कोटी दिले असतेतर आपल्या नावाने हे धरण झाले असते. श्री.लडकत साहेबां सारख्या अधिका-यामुळे पाणीपुरवठयाच व्यवस्थीत चाललेला आहे. नॉन करप्शट माणूस आहे अशा माणसाचा सत्कार केला पाहीजे. अशा लोकांसाठी काहीतरी योजना आणली पाहीजे. आज देखील भामा-आसखेडच पाणी आपण बंद नळाव्दारे आणलतर आज त्याची गरज आहे. पाऊसाचे आता काही सांगता येत नाही. मगाशी कवीता वाचून दाखवली. जलपर्णीची कवीता वाचून दाखवली. त्यामध्ये नदी कोपली पाहीजे असं आहे, आहो कोपू दया. आज उजनीसारखे धरण मोकळी पडलेली आहेत. लोकांना त्यामुळे पाणी तरी मिळेल. ड्रेनेजच्या पाण्यामुळे जलपर्णी तयार होते. ड्रेनेजचे पाणी किवळेच्या आलीकडे नाले नदीला गेलेले आहेत आणि नदीत जलपर्णी झालेली आहे. वरच्या साईडला जलपर्णी नाही. जलपर्णी सिटीमध्ये आहे. ड्रेनेजला चांगली तरतूद दिलेली आहे. ड्रेनेजचे काम चांगले झाले पाहीजे तशा तुम्ही संबंधीत अधिका-यांना सुचना केल्या पाहीजेत. ड्रेनेजचे पाणी गटारीला जाते व गटारीचे पाणी नदीला जाते. माझ्याकडे नाला उगम पावतोय तो नाला गावडे कॉलनीत, भाटनगरच्या आसपास नाला येतो. म्हणजे प्राधिकरण, आकुर्डी, चिंचवड, रस्टन कॉलनी, एसकेएफ कंपनी पासून तो नाला येथे येतो, याच्या बद्दल लक्ष घातले पाहीजे. भांडार विभाग आहे त्या विभागात गावडे साहेब आहेत ते सह आयुक्त आहेत. त्यांना फक्त एवढ माहीती आहे की टेंडर कसे काढायचे,

त्याच्या मध्ये काय काय अटि टाकायच्या, कुठला ठेकेदार बसला पाहीजे हे ज्यां विभागाच टेंडर असेल ती लोक त्यांना सांगतात. संगणक विभाग, पोमण साहेबांकडे कधीच कोणीही लक्ष दिलेले नाही. त्यांच्या विभागामध्ये मोनार्च नावाची कंपनी आहे त्याचा मालक राजू शेठ म्हणून आहे तो ज्यावेळेस बघाव त्यावेळेस संगणक विभागामध्ये बसून असतो. पोमण साहेबांबरोबर अजून दोन-तीन जण पवार, बोरुडे हे अधिकारी त्यांच्या हाताखाली आहेत. एस.एस.पवार हे टोटल टेंडर कसे काढायचे ते बघतात त्या टेंडरमध्ये मोनार्च कंपनी कशी बसेल हे पाहतात. आज आपण ई-टेडरींग केलेली आहे. जेवढे टेंडर झालेले आहे ते मोनार्च कंपनी मॅनेज करते. प्रिंटर, संगणक असेल या गोष्टी आपण घेतो. ते एकाच कंपनीचे आहे कॅनन कंपनीचे. कॅनन कंपनीचे संदर्भात सांगायचे झालेतर जगात लागेल तेवढया कंपन्या आहेत, कॅनन कंपनीचा स्पेसिफीक जो डिलर आहे त्यांना कॅनन कंपनीचे पत्र दिले जाते तो मोनार्च आहे. बाकीचे ठेकेदार याठिकाणी कॉम्पीटेशनला येतात. पण त्यांना त्याठिकाणी घेत नाहीत. पोमण साहेबांना बोललो साहेब, असे का करता. कुंपणच शेत खायला लागल्यावर काय करायच. सभागृहाला माहीती नाही त्याठिकाणी त्या डिपार्टमेंटमध्ये जावून पाहा, त्यांचे प्रमोशन केलेले आहे, अजून प्रमोशन पाहीजे म्हणतात, वीस वर्षे झाले महापालिकेत असे अधिकारी आहेत. ठेकेदाराशी हे करुन पालीकेला लुटतात. याची चौकशी करावी. सीबीआय इन्क्वॉयरी लावा, सीबीआय इन्क्वॉयरी लावल्यास तुमच्या लक्षात येईल ई-टेडरींगमध्ये काय केलं जात. कॅनन कंपनी त्याठिकाणी आहे. बाकी कित्येक कंपन्या आहेत. त्याठिकाणी सॅमसंग कंपनी आहे, ईपसॉन कंपनी आहे, ऍपल आहे अशा ब-याचशा कंपन्या आहेत तरी देखील फक्त कॅननच असे का. जोपर्यंत संगणक विभागाने खरेदी केलेले आहे त्याची सगळी चौकशी करावी. तुमच्या लक्षात येईल परंतु मला वाटत नाही तुम्ही कराल म्हणून कारण मी तुम्हांला एका अपंगाच्या प्रमोशनसाठी कित्येक महीन्यापासून बोलतो. त्याच्यावर अन्याय होतो. माझी विनंती आहे की आयुक्त साहेब आपण चांगले काम करतात. सर्वाना घेवून आपण चालला आहात. परंतु अशा गोष्टीमध्ये आपण लक्ष घालावे. त्यांना साईडला टाकू नका. त्यांना घ्या चौकशी करा आपले बरेचसे पैसे वसूल हातील. सॅमसंगला ३५ टक्के बिलो आलेले आहे, त्याच्या पुढे जावुन यांनी काय केल माहिती आहे का, ई-टेडरींगमध्ये फेरफार केला आणि ३० रु. कमी केले आणि त्यांचे टेंडर बसले. २०१५ पर्यंत संगणक खरेदी आहे त्याची चौकशी करावी आणि त्या चौकशीसाठी लडकत साहेबांसारखे, करसंकलनचे गायकवाड साहेब पै-पै गोळा करतात. माने साहेबांनी सुध्दा एलबीटीमध्ये चांगले पैसे गोळा केलेले आहेत

अशा अधिका-यांना तेथे बसवावे व याची चौकशी करावी. त्यांना समजेल महापालिकेचा आपण एवढा पगार घेतो या पगारावरती आपल घर चालल पाहीजे. डब्बू आसवाणी यांनी बजेट सादर केलेले आहे त्यांचे मी अभिनंदन करतो. सायकल खरेदी आपण केलेली आहे, कुमार साहेबांनी सांगीतले मी सुध्दा होतो सायकल चालवायला घेतली, सायकलची बेअरींग लगेच स्लीप व्हायची, डूप्लीकेट बेअरींगा आहेत. गरीबांना दया परंतु चांगल्या वस्तू दया. शिलाई मशीन दया परंतु ब्रॅण्डेट दयावी. चायनामेड नका देवू आपल्या देशातल्या लोकांना मोठ करा. चांगल्या वस्तु दयाव्यात एवढेच सांगतो, सायकलचे बील थांबवावे, धन्यवाद, जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. २०१६ ते २०१७ चे स्थायी समितीमध्ये काही बदल घडवून बजेट आपल्या समोर अंतीम मंजूरीसाठी आहे. आपल्या शेजारच्या पुणे महापालिकेत किमान तीन दिवस बजेट चालते. त्यानंतर हे बजेट प्रदिर्घ चर्चा करुन मंजूर होते असा आजचा इतिहास आहे. या बजेटमध्ये तसे बघायला गेलेतर दुपार पासून आम्ही बघतो की आयुक्त साहेबानी सगळयांना समाधानी ठेवण्याचा पुरेपूर प्रयत्न केलेला आहे. हे सगळयांच्या बोलण्यावरुन जाणवते. प्रत्येकांच्या मागण्या पुर्ण करण्याचा तुम्ही प्रयत्न केलेला आहे त्याचे कारण काय. आपली आर्थीक परिस्थिती चांगली म्हणून शक्य झालेले आहे. या बजेटवर तुम्ही जवळपास आपल्याला खर्च करता येईल असे २७०७ कोटी भेटणार आहेत त्यामध्ये खर्च सुध्दा तेवढाच दाखवलेला आहे वेगवेगळी टक्केवारी वेगवेगळया विभागातून विभागून या बजेटचा अंदाज आपल्या समोर ठेवला. तो बघता बघता लक्षात येते की काही त्रुटी सुध्दा याच्यामध्ये आहेत, काही नियमामध्ये आहे प्रत्येक विभागाची साथ तुम्हांला पाहीजे तशी मिळाली नसेल त्यामुळे या त्रुटी असू शकतील परंतु हे करत असताना आपल्याला जमेची बाजू सुध्दा या अधिका-यांनी, कर्मचा-यांनी दिलेले आहे. या बजेटमध्ये केवळ एकाचा कोणाचा समावेश नाही. आयुक्तांपासून सर्व अधिकारी, कर्मचारी, अगदी वर्ग-४ चे कर्मचारी सुध्दा कंत्राटी पध्दतीचे कामगारांचा सुध्दा यामध्ये सहभाग या अंदाजपत्रकामध्ये आहे. हे बजेट प्रत्येक्षात कामावर खर्च करणारे वर्ग-३, वर्ग- ४ मधले कर्मचारी आहेत त्यामुळे या सर्वाना धन्यवाद देतो. आपण सगळया विषयांचा ऊहापोह केलातर बजेटच्या तुलनेनी तुम्हांला प्रशासन म्हणून सामान्य प्रशासनाच्या खर्चाची टक्केवारी १.८५ टक्के दाखवली ती तुलनेनी कमी दिसते. आज या शहरात राहत असताना जमिनीचे भाव आपण बघतो. नगररचना विभाग तुमच्या प्रॉपर्टीचे भाव ठरवते. हे करत असताना सामान्य प्रशासनातला अधिकारी,

कर्मचारी पाहीलेतर तुम्ही घर घेण्यासाठी २५ लाख कर्ज घेण्यासाठी देता २५ लाखात घर येत का, त्याची मर्यादा वाढविली पाहीजे. आज किमान शहराच्या भागात ४० लाख रुपये आणि शहराच्या बाहेर तो कर्मचारी राहत असेलतर त्याला २५ लाख रुपये कर्ज दयायला पाहीजे. तो काही केवळ २०० फुट, ३०० फुट घरात राहील असे काही नाही. आपल्या महानगरपालिकेत वर्ग-३ च्या कर्मचा-यांचे पगार सुध्दा ४० ते ५० हजारा पर्यंत आहेत त्यामुळे अधिकारी आणि कर्मचारी यांना कर्जाच प्रमाण चांगल ठेवल पाहीजे. जेणेकरुन त्याच्या कामाचा इफेक्ट सुध्दा तुम्हांला चांगल्या पध्दतीने मिळू शकेल आपण बजेट तयार करत असताना बजेटचा आकडा वर्षानुवर्ष शेकडो कोटीने वाढतो परंतु तुमचा स्टाफ मात्र वाढविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येत नाही. गेल्या काही दिवसामध्ये बिंदु नामावलीला अनेक दिवसापासून प्रलंबीत आहे त्याला शासनाकडून मान्यता घेवून स्टाफ वाढविण्याची आवश्यकता आहे. आरआर मंजूर करुन घेणे हा सुध्दा प्रशासनाचा भाग आहे. तुमच्याकडे इतके पैसे यायला लागलेत की ते खर्च करण्यासाठी हात कमी पडतील अशी कदाचित वेळ येईल. पैसे अधिकृत माणसाकडून खर्च करण्यासाठी तुमच्याकडे लोकांची मर्यादा आहे. तुम्ही ते कंत्राटी लोकांकडून खर्च करु शकत नाहीत. तुम्हांला त्यासाठी कायमस्वरुपी असलेला अधिकारी, कर्मचारी उपलब्ध पाहीजे. आर आर या वर्षी कुठल्याही परिस्थितीत मंजूर करुन घेण्याची जबाबदारी ही तुम्ही घेतली पाहीजे. विधी समिती चेअरमनची आर आर मंजूरीसाठी बैठक घेतलेली होती. आम्हांला तुमच्यातल्या तांत्रीक पध्दती या १०० टक्के लक्षात येत नाहीत, पण आम्हांला त्यातील त्रुटी समजावून सांगीतल्या पाहीजेत. जर लोकशाही पध्दती मध्ये या या समित्यांची मान्यता प्रशासकीय कामकाजाला लागत असेल तर ते समजावून सांगण्याच काम पण प्रशासनाचे आहे. तो आर आर समजावून सांगायला पाहीजे तो आर आर सगळयालाच समजेल अशातला भाग नाही. आर आरमध्ये अनेक असे अनावश्यक पदे आहेत हे तुम्हालाही माहिती आहे. त्या पदाची शहरामध्ये गरज नाही तरी सुध्दा आर आरमध्ये समावेश केलेला आहे. आपली जी कामगार संघटना आहे त्यांच्या बरोबर प्रशासनाची, मा.आयुक्तांची कित्येकदा बैठका झालेल्या आहेत. जीबीची मान्यता झालेली आहे त्यानुसार कामकाज व्हायला पाहीजे परंतु तुमच एकमत कुठे होत नाही. आयुक्त म्हणून तुम्ही ठाम निर्णयावर येवून त्यातील काय कमी जास्त पदे करुन सगळया गोष्टी, कामगारांचे ऐकू नका, आमचे ऐकू नका आणि तुमच्याही सांगू नका त्यातल्या त्यात मध्य काढून हा प्रश्न मिटलातर आपल्याकडची कामगार वर्गाची संख्या नक्की वाढलेली दिसेल. कामगारांच्या बाबतीत अनधिकृतचा निर्णय

तुम्हांला कोर्टाने ऐकवला. कोर्टाने ज्यावेळेस हे कामगार घेणे बंधनकारक केले त्यावेळेला तुम्हांला हे १०० ते २०० इंजिनीअर घेता आलेले आहेत. कोर्टाचा निर्णय बंधनकारक असल्यामुळे तुमच्याकडे कोणी येणार नाही सगळे कोर्टात जातील. त्यामुळे प्रशासन म्हणून आपल्याला आपले काम सुलभ व्हावे. आपल्याला कर्मचा-यांकडून चांगले रिझल्ट घ्यायचे असतीलतर कर्मचा-यांना यशदा सारख्या संस्थेमध्ये प्रशिक्षण दयायला पाहीजे. त्यामध्ये चांगल्या चांगल्या कामाचा अनुभव घेवून हे बजेट खर्ची कसे पडेल आणि या शहराला अजून समृध्द कस करता येईल हे पाहीले पाहीजे. प्रशासन म्हणून जर या गोष्टी असल्यातरी यामध्ये प्रशासनाच्या १०० विभागाकडून शहराची गरज भागविण्याचे काम तुम्ही आम्ही करतो. मी २००२ पासून या सभागृहाचा सभासद आहे माझ्या पेक्षा जास्त सभासद याठिकाणी आहेत. या सभागृहाने अनेक चांगले वाईट दिवस पाहीलेले आहे. २००२ ला आमच पहील अंदाजपत्रक होते त्यावेळेला महापालिकेचे बजेट होत २०० कोटीचे आज ते १० पटीने वाढलेल आहे. आज जवळपास जेएनएनयुआरएम धरुन तुम्ही ४००० कोटी पर्यंत पोहचलेला आहात. आज या शहराचा विकास पाहीलातर भारतामध्ये खरोखरच आपले शहर चांगले आहे. स्मार्ट सिटीमध्ये का नाही कशासाठी नाही हे सोडून दया पण आपण मुळातच स्मार्ट आहोत. लोकांना कामकाज करण्याची आमच्या पक्षाची पध्दत आवडत असेल म्हणून आम्ही कदाचित सत्तेवर आहोत यात काही शंका नाही. पण याच्यामध्ये समर्थक म्हणून विरोधकाची सुध्दा वाहवाच करावी लागेल. त्यांनी सुध्दा या शहराच्या विकासात कधी फार मोठी अडचण आणण्याचा प्रयत्न केलेला नाही. त्यामुळे या शहराच्या विकासाला ही गती लाभली याच्यामध्ये कधीही कुठेही खंड पडलेला नाही. मध्यंतरी परदेशी साहेबांच्या काळात मात्र या शहराचा वेग मंदावलेला होता. सगळेच लोक त्यांच्यावर अनधिकृत बांधकामाच्या प्रश्नांमुळे नाराज होते. हे मी एकटयाने सांगायची गरज नाही, सगळया शहराने पाहीलेल आहे, अनुभवलेले आहे त्यामुळे रक्कम त्याकाळात फार कमी खर्ची पडलेली आहे. मात्र हे थांबविण्याच काम त्यांच्या काळात बरचस झालेल आहे. आम्ही त्यांना हेच सांगायचो की तुमचा स्पिड हा काम करण्यासाठी खर्ची करा काम थांबवण्यात खर्ची करु नका. जाधव साहेब ते पुर्ण करण्याचा प्रयत्न करतात. जाधव साहेब आल्यापासून ६५० कोटी निवीदा प्रक्रीयेच्या बचतीच्या माध्यमातून आम्हांला वाचलेले दिसतात. ६०० कोटी वाचतात पण ते योग्य ठिकाणी खर्च सुध्दा करावेत. ६०० कोटी वाचविलेले आहेत ते तुम्हांला चांगल्या ठिकाणी खर्च सुध्दा करता आले पाहीजेत त्यामुळे या खर्चाचे नियोजन तुम्ही जर या बजेटमध्ये अंदाजीत रक्कम काढली असतीतर अजून जास्त

आनंद झाला असता. १०० ते २०० कोटी बिलोमुळे वाचणार आहेत त्याचे नियोजन केले असतेतर त्याचे २०० कोटी आपल्याला मिळाले असते त्याचा उल्लेख केलेला दिसला नाही हे रेकॉर्डवरुन दिसते. गेल्या एक दोन वर्षाच्या निवीदा पाहील्यातर जवळपास ६०० ते ७०० कोटी रुपये वाचलेले आहेत. आपली ई-टेंडरींग प्रक्रीया गेल्या पाच ते सात वर्षापासून महानगरपालिकेमध्ये चालू आहे आणि त्यातल्या त्यात तुमच्या काळात जास्त बचत झाली आहे हे मात्र मला आवर्जून सांगावे वाटते. हि बचत होत असताना अनेक विभागाचे तुम्हांला सहकार्य लाभलेले आहे. उत्पन्नाचे साधन म्हणून जे जे विभाग आपल्याकडे प्रमुख म्हणून आहेत त्यात करसंकलन, एलबीटी असेल. आम्हांला वाटल एलबीटी गेली परंतु सर्वसामान्य व्यापारी जे आहेत ते जनरल कॅटेगरीच्या व्यापा याची एलबीटी १०० टक्के माफ झालेली आहे. ५० कोटीच्या पुढे उलाढाल असलेले अनेक कारखाने या शहरामध्ये तग धरुन आहेत काही निघुन पण गेले आहेत पण त्यांच्या जीवावर या शहराची एलबीटी चांगली राहीली. उदयाच्या काळात जीएसटी लागू झाल्यानंतर काय होईल ते माहीती नाही. पण कुठलाही कर लागू होत असताना केंद्रशासन असो किंवा राज्यशासन असो ते तुम्हांला उत्पन्न देण्याचा प्रयत्न करणारच आहेत. परंतु ते करत असताना तुम्हांला उत्पन्नाचे स्त्रोत १०० टक्के शोधावे लागतील. १०० टक्के शोधत असताना केवळ आपल्याला पारंपारीक उत्पन्नाच्या व्यतिरीक्त नवीन व्यावसाय करावे लागतील ते नवीन व्यावसाय करीत असताना आपल्या मागच्या पाच ते सहा महीन्याच्या एका जीबी मध्ये एलईडीच्या बाबतीत विषय आलेला होता. आपण २४ कोटी ५५ लाख रुपये स्ट्रीट लाईटच्या बीलांसाठी ठेवलेले होते. तुमच्याशी चर्चा केली तेव्हा तुम्ही सांगीतल की आपल्या एलईडीचे ६० टक्के बीलो दर येतात. ६० टक्के बीलो दर येण्याचे कारण काय हे शोधावयाचे आहे. मी जयपुर पॅटर्न सांगीतलेला आहे त्याठिकाणी ७७ टक्के बचत होते. उरलेली बचतीमध्ये ३३ टक्के रेव्हेन्यू शेअरींग हे त्या महापालिकेला म्हणजे जयपूर निगमला दिला जात. आज रोजी ९५ टक्के बील ते भरतच नाहीत. १०० रु. पैकी ५ रु. फक्त त्यांना भरावे लागतात. आज आपण निवीदा काढली तर ६० टक्के बिलो म्हणजे ४० टक्के खर्च तुमचा आहे मेन्टेनन्स तुमचा आहेच त्यानंतर त्याचे मॉनिटेरींग तुमच्याकडे काहीच नाही बीओटी पध्दतीने ते काम करा. शुन्य रुपयात ते काम करा त्याची मॉनिटेरींग सिस्टीम आपल्याकडे येईल. प्रत्येक फिडरपिलरला आपल्याला स्वतंत्र मीटर देता येईल. विदयूत विभागाला बीलाची माहीती मागीतली. पंधरा वीस दिवसापासून फोन सुध्दा नाही २५ कोटीची आपण तरतूद करुन ठेवलेली आहे. आपण कुठेतरी वाचवित असूतर १०० टक्के

वाचविले पाहीजे. खरोखरच निवीदा प्रक्रीया त्याप्रमाणे व्यवस्थीत पारदर्शक झालीतर २४ ते २५ कोटी पैकी आपल्याला फक्त १० टक्के धरलेतरी आपल्याला फक्त ४ कोटी तरतूद ठेवावी लागेल. २० कोटी रुपये आपल्याला उदयाच्या काळात वापरायला मिळतील.अशा पध्दतीने तुम्हांला पुढ जाता येईल आज सेंटर गव्हर्मेंटनी सोलर पॉलीशी वेगवेगळया जाहीर केलेल्या आहेत. रुपटॉप पॉलीशी करत असताना प्रत्येक शासकीय निमशासकीय कार्यालयाना वर सोलर सिस्टीम बसवून घेणे बंधनकारक केलेले आहे. जे दिवसा चालणारे ऑफीसेस आहेत त्या ऑफिसेसवर काही प्रमाणात किंवा कपॅसिटीनुसार सोलर पॅनल लावून घ्यावेत अशा सूचना शासनाने दिलेल्या आहेत राज्यशासनाची पॉलीसी प्रलंबीत होती ती राज्यशासनाने सुध्दा काही महीन्यापुर्वी पॉलीसी फायनल केलेली आहे आणि आपल्याला थर्ड पार्टीसाठी ओपन सोर्स म्हणून किंवा ओपन प्रक्रीया म्हणून त्यांनी आज थर्ड पार्टीला परमीशन दिलेली आहे आजजर माझ प्रॉडक्ट ते असेलतर मी ते मार्केटला विकू शकतो. पुर्वी ही पॉलीसी नव्हती. मला गव्हर्मेंटच्या ग्रीडलाच ती लाईट दयावी लागायची. आज ती परिस्थिती राहीलेली नाही. आज सोलरची वीज तुम्ही बाहेर विकू शकता. आपल्या महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारती मोजल्यातर त्या २१७ आहेत. कार्यालय वेगळे, ओपन जागा वेगळया. ज्या ज्या ठिकाणी अव्हेलेबल होईल त्याठिकाणी करावे. मगाशी ताकवले ताईनी सांगीतले प्राधिकरणातले ऑफीस आहे त्यांना खरंच लाईट बील येत नाही. २४ कोटी ५५ लाख स्ट्रीटलाईटचे सांगीतले, इन्डोअरचे नाही. महापालिकेला रेसिडेन्शीअल दराने लाईट बील येत नाही. महानगरपालिकेला व्यावसायीक दराने लाईट बील येते याचा विचार तुम्ही कुठेही अंदाजपत्रकामध्ये केलेला दिसत नाही. या अंदाजपत्रकामध्ये ही वीजबचत आपल्याला करता येईल का. तुम्ही बॅटरी घेवू नका चार महीन्यानंतर १० वर्षे लाईफ असलेल्या बॅटरी येणार आहेत. सोलरच लाईफ २५ वर्षे असते. सोलरजर तुम्ही घेतलेतर दिवसा जिथ कार्यालय आहेत त्याच ठिकाणी वापरा. सोलर हा असा प्रकार आहे की त्याची एकदा फिटींग केलीतर तुम्हांला कामगार लागत नाही किंवा काही लागत नाही. उजेड झाला की आपोआप चालू होत आणि आंधार पडला की आपोआप बंद होतं. त्यामुळे चांगली आणि सोपी सिस्टीम आपल्या छतावर महापालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत म्हणून बसवावी अशी मी विनंती करतो. यात अजून पैसे वाचवायचे असतीलतर बीओटी मॉडेलकडे सुध्दा तुम्हांला जाता येवू शकेल आख्या भारतामध्ये सोलरचा एवढा गवगवा चालू आहे त्या व्यावसायामध्ये इतके चांगले चांगले फॉरेनचे इन्व्हेस्टर सुध्दा आहेत. तुमची चार पाच मॅगावॅटची कपॅसीटी तुमची एकटयाची

असेलतर तुम्हांला शंभर टक्के चांगला माणुस मिळेल १०० टक्के तो खर्च करेल. आपल्याला पैसे दयायची गरज नाही. पण आपल्याला त्याचा बेनिफीट मात्र किमान वीस ते पंचवीस वर्षापर्यंत राहील असे सांगतो. आपल्याकडे १७२ उदयान आहेत. मला मंगलाताईचा खरंच हेवा वाटतो, मी त्यांना किती वेळा म्हणलं उदयानाला एवढे पैसे का लावले, त्या म्हणाल्या माझ्याकडे काही फरक पडत नाही. चांगल्या गोष्टीला नागरीक १०० टक्के खर्च करुन उदयानामध्ये इन्ट्री घ्यायला अजीबात काचकुच करत नाहीत. आपल्याकडे १७२ उदयान आहेत त्यांचे मेनटेनन्स, लाईट बील, सिक्युरीटी आणि देखभाल व दुरुस्ती. सगळे उदयान बघीतलेतर वीजबील त्यांचे कर्मचारी संख्या, देखभाल दुरुस्ती, सिक्यूरीटी भागविले एकूण मनपाचे उदयान, आपला स्टाफ जो काही आहे त्याची आकडेवारी काढावी. सरसगट एक आकडा ठेवावा. जो उयानाला खर्च करेल त्याचे ॲडीशन त्यात होईल. सगळीकडे एक पॉलीसी ठेवावी. जुन्या लोकांचे असे म्हणणे आहे की शहरामध्ये इन्ट्री नसावी उदयानाला. उदयान करणं, सुविधा देणं आपल काम आहे. १७२ ला जर भागविले केलेतर पाच ते दहा रुपयावर थांबेल. अतीशय कमी ॲव्हरेज चार्ज तुम्हांला शहरामध्ये करता येईल. या बजेटमध्ये तुम्हांला याचा चांगला उपयोग होईल असे सांगावेसे वाटते. मध्यंतरी तुम्ही काही बैठका घेतल्या. संगणक विभागाच्या माध्यमातून त्या बैठका होत्या शहराच्या जीआयएसच्या. केंद्रशासनाने स्मार्ट सिटी आणि अमृत योजनेअंतर्गत तुम्हांला मॅनेटरी केले जीआयएस कडे आज जीआयएस करत असताना आपल्या शहराच्या प्रत्येक गल्लीची माहिती तुमच्या रस्त्याखाली किती इंच पाईपलाईन आहे. केबल किती आहे, खाजगी केबल किती आहे, डक्ट किती आहेत, चेंबर किती आहेत, पोल किती आहे, बोर्ड किती आहेत, ड्रेनेज लाईन किती आहेत, किती डायमीटरचे आहेत, मॅनहोल किती आहेत  तुम्ही आम्ही या सभागृहात राहणार नाहीत, हे रेकॉर्ड तुम्ही केलेतर १०० टक्के राहील. तुम्ही आम्ही राहणार नाहीत त्यामुळे जीआयएस करणे गरजेचे आहे. दहा ते पंधरा कोटी रुपये खर्च होतील या वेळेस दोन तीन कोटीची तरतूद केलेली आहे ते काम वेळेत होणे गरजेचे आहे. २०१७ च्या निवडणूकीच्या कामाला सगळेजण लागलेले आहेत.  हे सगळे होत असताना आम्हांला अजून या शहरात काम करुन घ्यावे असे वाटते. या शहरात चांगल्या नवीन गोष्टी कराव्यात असे वाटते. कदाचित मला त्रुटी आहेत असे वाटते. हे शहर आठ दहा वर्षापुर्वी वायफाय सिटी करु म्हणून बंड साहेबांनी सांगीतलेले होतं. आपण मोबाईलच्या रुपाने जग खिशात घेवून फिरतो परंतु त्यावेळेस ही खर्चीक योजना सांगीतली आहे. आता तुम्हांला खर्च करायची गरज नाही तुम्हांला लोक पैसे देतील

आयडीवाला काय, रिलायन्सवाला काय, एअरटेलवाला काय, व्होडाफोनवाला काय हे आपल्याला पैसे देतील. आम्ही पैसे देतो तुमच्या शहरात करावे म्हणतील. भारतातील १०० टक्के वायफाय सिटी आपल्या शहरात करावे अशी मागणी तुम्हांला मी या निमीत्तान करतो. आपल्या शहरात देशातील पहीले १०० टक्के वायफाय असणारे शहर म्हणून तुम्हांला कदाचित मान मिळू शकेल त्या पध्दतीने तुम्ही विचार करावा असं मी तुम्हांला सांगतो. आज अनेक योजना अशा आहेत की प्रत्येकाला तुम्ही समाधानी ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या दिवशी सगळयाना एकत्र बोलवल आणि मंगलाताई आणि आयुक्तांनी सगळयाना विभागून टाकले. मी जे सांगीतले ते याच्यामध्ये घेतलेले आहे. सगळे समाधानी आहेत त्यामुळे तुमच्या नावाने कोणी खडे फोडतील असे मला वाटत नाही. समाधानकारक अंदाजपत्रक दिलेले आहे. मी पुर्वी ट्रामसाठी पत्र दिलेले होते त्यासाठी एक हेड ठेवलेले आहे. ट्राम असेल, सांगवीचा लॅण्डमार्क स्ट्रक्चर म्हणून आहे तो प्रोजेक्ट त्याठिकाणी ठेवलेला आहे. या शहरात ज्या ज्या चांगल्या गोष्टी कराव्याशा वाटतील त्या तुम्ही भविष्यात कराव्यात असे सांगावेसे वाटते. आपण जेव्हा स्वरसागर करतो, आपला गणपती उत्सव पुर्वी होत होता तो चालू करावा अशी विनंती राहील. पिंपरी चिंचवड फेस्टीव्हल आपण पुर्वी करत होतो यावर्षी ते चालू करावे आपल्या देशात आपण आपले सण करायचे नाहीतर कोण करणार. जर ती प्रथा नसतीतर मी मागणी करणं चुकीच होत. पण ती रुढीपरंपरा आहे त्यामुळे हे पुन्हा चालू केलेतर आपल्या संस्कृतीला नक्कीच चांगला रिस्पॉन्स मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो. ट्रामचा प्रोजेक्ट आपल्या शहरातल्या गल्ली बोळामध्ये असावा, काही लोकांचा ट्रामला विरोध असेल. कॅलीफोर्नियामध्ये डोंगर उताराची परिस्थिती आहे, तेथे डोंगर उताराची परिस्थिती असताना सुध्दा लोक त्याठिकाणी ट्राम वापरतात, अतीशय गजबजलेला परिसर आहे परंतु सक्सेसफुल ट्राम आहे. त्याची स्पिड कमी असते. ट्रामला छोटया रस्त्यावर पण वाव आहे, ट्राम कमी खर्चीक असते त्यासाठी रस्ते खोदावे लागत नाही. जाधवसाहेब तुम्ही आऊटपुट देणारे आयुक्त म्हणून गेल्या दोन वर्षात आम्ही पाहतो आहोत. आपण अनेक काम मार्गी सुध्दा लावलेले आहेत. स्टेडीयमच काम असे अनेक काम आहेत ती न झालेले काम तुम्ही मार्गी लावलेले आहेत विशेष म्हणजे सगळयांचे विरोधक सांभाळून. तुम्हांला ते जमलेले आहे. तुमची यशस्वी कारकीर्द झालेली आहे त्यामुळे तुमचे आभार मानतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.महापौर आपले अभिनंदन करतो आपण अतीशय चांगल्या पध्दतीने बजेटवर चर्चा घडवून

आणलेली आहे. त्याचबरोबर आमचे मित्र डब्बू आसवाणी यांनी सुध्दा विशेष म्हणजे मराठीमध्ये भाषण केले, इतरांनी सांगीतल मगाशी धुमाळसाहेबांनी सांगीतल की "गर्वसे कहो हम हिंदूस्तानी हैं", "भारतमाता की जय", "जय महाराष्ट्र". त्याप्रमाणे मीही म्हणेल आपणही सर्वानी म्हणल पाहीजे की गर्वसे कहो की "हाम पिंपरी चिंचवडवाले स्मार्ट है पिंपरी चिंचवड स्मार्ट हैं". सर्वप्रथम मी मा.पवारसाहेबांचे मा.अजीतदादांचे कौतूक करेल, त्यांच अभिनंदन करेल. त्यांनी गेल्या १५ वर्षात अतीशय बारकाईने या शहरावर लक्ष दिल्यामुळे या शहराचा विकास झालेला आहे. कै.रामकृष्ण मोरे नंतर ख-या अर्थाने या शहराच सर्व काम बारकाईने पाहील असेलतर ते मा.अजीतदादांनी पाहीले. त्यांच्या बारीक लक्षामुळे या शहराचा कायापालट बघतो आहोत. सर्वानी या शहराचे कौतूक केलेले आहे. मग ते बेस्ट सिटीच्या ऍवॉर्डसाठी राहू दया, किंवा आताचा स्वच्छतेचे बक्षीस असेल, या शहराच इन्फ्रास्ट्रक्चर असेल या शहराचे रोड असतील, किंवा सफाई असेल, ठिक आहे काम करताना काही विशिष्ठ अधिकारी/कर्मचा-यांच्या चुका होत असतील काही ठिकाणी दुर्लक्ष झाले असेल परंतु एकंदरीत लेखाजोखा पाहीलातर बोलतांना काहीनी काही गोष्टीमध्ये समाधानही व्यक्त केले. काही लोकांनी त्रुटी आहेत त्या कशा दुर व्हायला पाहीजेत, या बजेटमध्ये कशाचा समावेश नाही. कशाचा समावेश असला पाहीजे होता आणि कशाला प्राधान्य असल पाहीजे होतं. एखादयाच्या वॉर्डामध्ये जास्त बजेट किंवा मोठा प्रोजेक्ट केलातर ठिक आहे काहीना दु:ख होत काहीना वाटत दुसरीकड व्हाव. एखादयाच्या वॉर्डामध्ये नाटयगृह नसेलतरी चालेल, स्विमीगपुल नसेलतर चालेल, मल्टीप्लेक्स नसेलतर चालेल, परंतु त्यांना त्या वॉर्डातील स्वच्छता चांगली असली पाहीजे, त्यांचा पाणीपुरवठा हा व्यवस्थीत असला पाहीजे, तिथले ग्रोथ चांगले असले पाहीजेत, तिथली लाईट चांगली असली पाहीजे. साफसफाई चांगली असली पाहीजे, ड्रेनेज चांगले असले पाहीजे. तिथ महापालिकेची जीम असेलतर तेथे ईक्वीपमेंट चांगले असले पाहीजेत. आपल्या महापालिकेच्या जीमची दयनीय अवस्था आहे. आपल्या महापालिकेच कोटयावधीच उत्पन्न आहे या नागरीकांच्या छोटया छोटया गरजा आहेत परंतु जिथ नागरीक येतो, नगरसेवक एखादा कार्यक्रम घेतो, माझ्या वॉर्डामध्ये अमुक आहे माझ्या वॉर्डा मध्ये तमुक आहे लायब्ररीमध्ये चांगले पुस्तक ठेवले पाहीजे. या छोटया छोटया गरजा आहेत. नागरीक त्याठिकाणी जातात प्राधिकरण सोडून दया. कुमार साहेबांचा आणि राजू मिसाळचा वॉर्ड तुम्ही सोडला, मंगलाताईचा एमआयडीसीचा वॉर्ड सोडला, नारायण बहीरवाडेचां एमआयडीसीचा वॉर्ड सोडला, संततुकारामनगर वॉर्ड सोडलां, इंद्रायणीनगर सोडलं म्हणजे काही भागात लेआवूटमुळे डेव्हलपमेंट झालेले आहे

तेथे तुम्हांला डेव्हलपमेंटला चान्स आहे परंतु कासारवाडीला काही करायचे म्हणलेतर काय परिस्थिती आहे. सदगुरु कदम बसलेले आहेत खुप प्रयत्न करतात परंतु काही स्कोप आहे का. खराळवाडी स्लम आहे, पलीकडे एच.ए. आहे, पलीकडे संततुकारामनगर आहे, मध्ये हाफकीन आहे. काहीच करु शकत नाहीत. आकुर्डी गावठाणवाल्यांनी काय करायचं, भोसरीच्या गावठाणवाल्यांनी काय करायचं, पिंपरी वाघेरेच्या गावठाणवाल्यांनी काय करायचं. त्यांना त्यांच्या वॉर्डामध्ये असे मोठे प्रोजेक्ट करु शकत नाहीत. माझे म्हणणे एकच आहे की तुम्ही मोठे प्राजेक्ट करु नका, पाण्याचे गांभीर्य घेतलेले आहे, पाण्यावर अमुक अमुक कोटी खर्च करतो परंतु पाण्यावर होणारी वसुली काय आहे. आपल्याला स्मार्टसिटीमधुन वगळले गेलेल आहे त्यामधले मायनस पॉईंट होते त्या मायनस पॉईंट मधले तुमचे जे रेव्हेन्यु कलेक्शन आहे पाण्याच त्याच्यामध्ये आपले मायनस मार्क झालेले आहेत. त्याला कारणीभूत आम्हीच आहोत, प्रशासन नाही. कारण २००७ साली पाण्याचा आम्ही २.५० पै. दर केलेला आहे तर २००७ पासून २०१६ पर्यंत आम्ही आडीचच रुपये रेट ठेवलेला आहे. मग तुलना पण आम्हीच करायची, आरडाओरडा पण आम्हीच करायचा रेव्हेन्यु कलेक्शन बद्दल आम्हीच बोलायचं. स्काडा प्रणाली बसविली त्यावेळेला सांगीतलं गेल, त्या सांगण्याप्रमाणे ते प्रॉपर्ली ॲक्टीव्हेट होतं की नाही, आजच्याच सकाळ पेपरमध्ये पाहीले, जवळपास चार ठिकाणी असं दाखवल की पाणी असं वाहतय. आमच्या लोकांना माहीती नाही. सकाळने पेपरला दिलेल आहे की एवढे एवढे लीटर पाणी गळती होते ३० टक्के नसेलतरी २० टक्के तरी गळती होतय. पाण्याचे महत्व लक्षात घेता आज उस्मानाबाद असेल, लातूर असेल याठिकाणची परिस्थिती काय आहे. त्याचे गांभीर्य या शहरातील नागरीकांना आहे का. त्याच पहील गांभीर्य आमच्या अधिका-यांना असल पाहीजे, आमच्या प्रशासनाला असले पाहीजे. दोन टाईम परिस्थितीमध्ये पाणी वेस्ट होता कामा नये. आपणतर पाण्याचे महत्व जाणणारे आहेत. मगाशी सांगीतले ११०२७ कनेक्शन या कॅनबेवाल्यांनी आयडेन्टीफाय केलेले आहे ते पाणी वापरतात परंतु त्यांना अधिकृत मीटर दिलेल नाही, अधिकृत नळजोडही नाही आणि तुम्ही कट सुध्दा करु शकत नाहीत. म्हणजे ज्याच्याकडे मीटर आहे तो पाणीबील प्रामाणीकपणे भरतो त्यांनी जर बील भरल नाहीतर तुम्ही त्याच कनेक्शन कट करतात, त्याला नोटीस देता. परंतु असे जे कनेक्शन आहेत की त्यांच्याकड काहीही नाही त्यांच आपण काहीच करु शकत नाहीत ते सर्रास पाणी वापरतात. हा किती मोठा रेव्हेन्यूचा लॉस आहे. मी महापौर असताना डिक्लेअर केले होते की मागेल त्याला पाणी दया. ते अनेक दिवस चालल होतं. मध्ये ज्यावेळेला अनधिकृतच २००८ पासून सुरु

झाल नंतर आपण प्रॉपटर्याच्या नोंदी बंद केल्या. मी मध्यंतरी गायकवाड साहेबा कडे गेलो त्यांना सांगीतले नेहरुनगरला एक वर्कशॉप आहे ते २००८ ला सुरु केल आहे त्यांना पाण्याचे कनेक्शन महापालिकेची परवानगी आहे. एमएसईबीचे लेटर, शॉपॅक्ट लायसेन्स आणि तुमच्याकडे त्यानी २०१० ला अर्ज केलेले तेव्हा पासून तुम्ही ॲसेस्मेंट करुन दया ते म्हणाले नाही, २०१२ मध्ये आपण अशी ऑर्डर काढली त्यावेळेस परदेशी साहेबां कडून मी अमूक अमूक सही घेतली होती म्हणून तुमच ॲसेमेंट आम्ही २०१२ पासूनच करु शकतो किंवा २०१३ पासून करु शकतो. जे टेक्निकली प्रॉब्लेम आहेत ते टेक्निकली प्रॉब्लेम कुठेतरी बसून कायदयाच्या चौकटीत बसऊन तुम्ही ते सॉल्व्ह केले पाहीजे. मी उदा. दिलेले आहे. उल्हास शेट्टीच्या वॉर्डमध्ये एक थिटे नावाचा ग्रहस्त आहेत ते महापालिकेत फिरुन फिरुन दमले पण त्याना न्याय देवू शकलो नाहीत. तो न्याय मागतो त्याला न्याय देता यायला पाहीजे. शेटे म्हणून तो आहे तो कोर्टात गेलेला आहे. तुम्ही काय सांगतात असे जर केलतर दहा ते पंधरा हजार लोक आहेत मग एवढया लोकांना दयावे लागेल. म्हणजे तुम्ही बेकायदेशीरपणे काम करणार का. श्रीकर परदेशी साहेब असताना त्यांनी एक अभय योजनेची स्किम काढली. त्यामध्ये कितीतरी कोटी रुपयाचे बील हे बोगस होते. पाण्याचे महत्व सगळयांना समजले पाहीजे. या महापालिकेत चांगले काम केलेल्यांचे नेहमी अभिनंदन केलेले आहे, कौतुक पण केलेल आहे. जुने अधिकारी पहील्या पासून काम करतात. एखादयाची कपॅसिटी कमी असेल परंतु काही चांगले अधिकारी पण आपल्याकडे आहेत ते चांगले काम करतात परंतु तुम्हांला आशी विनंती आहे की अधिका-याकडे चार्ज दयायचा आणि सहा-सहा महीने, दोन-दोन वर्षे चार्ज दयायचा, त्यामुळेतर ते चार्ज ठेवून डिस्चार्ज होवून जातात तरी असे काही करु नका. कोणालातरी सिनॅरीटीने सिटी इंजिनीअर पद देवून टाका. शासनाकडे आपण मागीतल होतं शासनाने दिलेले नाही. चार्जवर ठेवू नका. तो आयुक्तांचा अधिकार आहे. एखादयाला तुम्ही सिटी इंजिनीअर केले. तुम्हांला वाटल की तोच त्या पर्टीक्युलर कामासाठी योग्य आहे तुम्ही त्याला ते डिपार्टमेंट काढून दया पठाण साहेबासारखे बील्डींग परमीशनमध्ये चांगले काम करणारे अशा माणसाना तुम्ही ठेवा, तो नॉन करप्ट अधिकारी आहे. या शहराचा रिव्हाईज डीपी करायचा आहे तो अतीशय महत्वाचा विषय आहे. ज्या गोष्टी मागच्यावेळेला झालेल्या नाहीत मग रिक्षा स्टॅण्ड असेल, टॅक्सी स्टॅण्ड असेल, हॉकर्स झोन असेल, पार्कींग असेल, व्हेजीटेबल मार्केट असेल, प्लेग्राऊंड असेल या गोष्टी मागच्या डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये झालेल्या नाहीत. ज्याठिकाणी पॉसीबीलीटीज असेल ते या रिव्हाईज डीपी मध्ये इनकॉर्पोरेट

व्हायला पाहीजे. मागच्या राज्यशासनाने चुका केल्या त्यावेळेस त्यांनी घाईघाईने ब्ल्यू लाईन टाकली, रेड लाईन टाकली आम्ही येथे पदाधिकारी होतो, आम्ही ओरडलो. त्यावेळेला मा.अजीतदादांनी सांगीतले पैसे भरा आम्ही त्यावेळेस चुक केली आणि ती लाईन ओढून घेतली आणि त्यामध्ये आम्ही आडकलो. रेडलाईनचा प्रॉब्लेम आहे, ब्ल्यू लाईनचा प्रॉब्लेम आहे, डिफेन्सचा प्रॉब्लेम आहे. एवढया त्रासामध्ये सुध्दा हे शहर नावलौकीक करतय हे शहर चांगल काम करतय आणि म्हणून मी सुरवातीला म्हणालो की दादांचे कौतूक करा, अभिनंदन कराव तेवढे कमी आहे. आमच्या बरोबर इतर संघटनेचे, इतर पक्षाचे लोक असतील परंतु ते कायम अलीप्तच राहीलेले आहेत आणि आता ठिक आहे चांगल आहे आज अनेकांनी याठिकाणी भाषण केलीत “मुंगेरीलाल के हासीन सपने” बघुयात शेवटी शहर ठरवेल. इतकी चांगली काम केलेली आहेत राष्ट्रवादी पक्षाने, त्यामुळे राष्ट्रवादी पक्षाला भरभरुन यश मिळेल कदाचित या परसेन्टेजमध्ये नसेलतर थोड कमी होईल. फरक काय पडणार आहे, माझीतर विनंती आहे स्वप्न बघत रहावे काही हरकत नाही. स्वप्न साकार करणारी शेवटी जनता आहे आणि जनतेने ते करायच आहे. चेन्नईमध्ये लाट आली, मोठमोठया इमारती गेल्या. आता मा.मोदीजींची लाट होती त्यामध्ये नाही ते निवडून आले.

**मा.महापौर-** बजेटवर बोलावे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, जे बेसीक काम आहेत त्या कामावर आपण आधिक लक्ष दिलेतर निश्चित चांगले होणार आहे. महत्वाच म्हणजे मा. मुख्यमंत्री यांचे अभिनंदन केल आम्हीही अभिनंदन करु. त्यावेळेला सिताराम कुंटे समिति स्थापन झाली २०१२ साली १६ मेंबरला घेवून ही समिति गठीत झाली. कोर्टाने इन्व्हेन्ट केले, कोर्टाने इन्व्हेन्ट केल्यानंतर पुन्हा ते कोर्टामध्ये सबमीट करुन घेणार आहे. सगळयानाच वाटत की शास्तीकर पुर्ण माफ व्हावा. शास्तीकराचा विषय नसावा आणि जे रेग्युलराईजेशन आहे ते पण गरीबाला परवडेल, त्यांना दंड भरता यावा, रेग्युलराईज करता यावा आणि हे रेग्युलराईजेशन करत असताना रोड मधली ती जागा नसली पाहीजे, रिझर्व्हेशनमधली नसली पाहीजे रेडझोनमध्ये नसली पाहीजे, ब्ल्यू लाईनमध्ये नसली पाहीजे या सर्व गोष्टीचा समावेश त्या अहवालामध्ये आहे. त्याची सम्मती ज्युडीशिअल कडून, लॉ-कडून येणार आहे. शेवटी शासन कोणाचे जरी आसलेतरी आपण या भारताचे नागरीक आहोत. या शहरातल्या गोरगरीब नागरीकांनी बांधलेली जी घर आहेत आणि त्यामध्ये प्रशासनाने केलेल्या चुका आहेत आणि आता येथून पुढे चुका करु नयेत. येथून मागे आम्ही सर्वानीच मग मी असेल, भाऊसाहेब भोईर असतील,

त्यावेळेला लक्ष्मणराव जगताप असतील, आर.एस.कुमार असतील, बाकीच्या मंडळीने, सिनीअर लोकांनी आमच्या सर्वाचे म्हणणं एकच होतं की ईलीगल काम होत असेलतर फौंडेशनलाच तुम्ही ॲक्शन घ्या. ते घर मोठ उभ झाल्यानंतर त्यांच्या घरातील लोक रडणार ते शेवटी आपले मतदार असतात आणि त्यावेळेला मात्र आम्हांला इन्टरफेअर करावा लागतं आणि सांगाव लागतं की साहेब, आता इतक्या मोठया रक्कमेच तुम्ही नुकसान करु नका. तुम्ही अनधिकृत बांधकाम होऊच का देतात. मगाशी सांगीतल्याप्रमाणे आज सुध्दा शहरामध्ये बेकायदेशीर बांधकाम चालू आहेत याला जबाबदार कोण आहे. एका बाजुला न्यायालयात अफेडेव्हीट देतो आणि दुस-या बाजूला आम्ही सभागृहात ओरडून सांगतो की बेकायदेशीर बांधकाम होवू देवू नका. आमच म्हणणं नागरीकांना आज पण असं आहे की, तुम्ही बेकायदेशीर बांधकाम करु नका. तुमच्या घरावर हातोडा पडू शकतो. तुम्ही आजजर बेकायदेशीर बांधलतर संपुर्ण घराची शास्ती तुम्हांला भरावी लागणार आहे. कायदा लवकर येतोय, कायदा आल्यानंतर तुम्ही परवानगी घेवून काम करावे असे आमच्या सर्वच सदस्यांच मत आहे. परंतु मोठे बांधकाम झालेतर मग ते नुकसान होतं, त्याच कुटूंब रस्त्यावर येतं, उध्दवस्त होतं. त्या परिस्थिपर्यंत प्रशासनाने डोळेझाक करु नये. तुम्ही त्याला जागेवर डिमॉलीश करा. याच्यामध्ये तुम्हांला क्वीक ॲक्शन घ्यावी लागेल. बजेटवर मी जास्त बोलत नाही कारण पाऊणे आकरा वाजत आलेले आहेत. आपणही पाहताय की दुस-या बाजूला महसुलचा एक्सपेन्डीचर व्हायरस झालेला आहे आणि जर मागच्या तीन वर्षाच्या फिगरच्या तुलना केल्यातर तुम्ही ६०० कोटीवर भांडवली खर्च करत नाहीत. आतापर्यंत तुम्ही दाखवताना ८०० ते ९०० दाखविले असलेतरी तीतका भांडवली खर्च तुम्ही करत नाहीत. माझी प्रशासनाला विनंती आहे, डब्बू आसवाणीनां विनंती आहे की स्थायी समितीमधुन लवकरात लवकर विषय आणा. आम्हीतर जीबीला ज्यावेळेस बजेट मंजूर करतो त्यावेळेस बजेट बरोबर आम्ही सर्वच विषयाला परवानगी देतो. आमच्यामध्ये असंही होत नाही की तो शिवसेनेचा आहे म्हणून मदत नाही करायची तो बीजेपीच्या म्हणून मदत करायची नाही, तो मनसेचा आहे म्हणून मदत नाही करायची असे घाणेरडे काम आपण कधीही केलेल नाही. टिका आपण करतो परंतु कोणाच्या कामामध्ये ढवळाढवळ करत नाहीत आणि तो विषय नसतो त्यामुळे अगोदरच आम्ही एकत्रीत मंजुरी देत असतो. प्रशासनाने इलेक्शनचे वर्षे लक्षात ठेवता काम चांगले दर्जेदार आणि अधिक गतीने करावेत. बीलो टेंडरने ई-टेंडरींगमुळे महापालिकेचा फायदा होतो इथपर्यंत ठिक आहे परंतु दुसया बाजूला शंका अशी पण असते माझ्या स्वतःच्या

वॉर्डामध्ये एकूण ५० टक्के बीलो, ४८ टक्के बीलो, ५१ टक्के बीलो मग तो ठेकेदार काय काम करणार आहे मग अशावेळेला काय होते १०, १२, १५ टक्के आम्ही समजु शकतो २० टक्केच्यावर बीलो जातो, ५० टक्के बीलो जातो आम्ही काय समजायचे. एकतर तुम्ही जो डीएसआर रेट घेतलेला आहे तो चुकीचा आहे, एकतर तो अधिकारी एमबीए नोटींग करुन घेतो, मग चुकीचे पेमेंट होतं. कारण अधिका-यांना टक्केवारी मिळाल्याशिवाय बील होत नाहीत. काही ठेकेदार आमचे मीत्र आहेत त्यांना जर आम्ही बोललोतर ते म्हणतात नगरसेवकांचा काय संबंध आहे, अधिका-यांना सांभाळावे लागते त्याशिवाय ते बील कशी काढतील. मग हे जर ते लोक जाहीर करीत असतील आणि आम्हांलाही जास्त खोलात जायच नाही. अशा परिस्थितीमध्ये क्वालीटी तरी मिळाली पाहीजे. काम चांगले व्हायला पाहीजे. श्रीकर परदेशी साहेब असताना, अशिष शर्मा साहेब असताना त्यांनी लिमीट बांधलेल होतं. एका ठेकेदारानी एका फायनानशियल ईअरमध्ये एवढया लिमीटच्यावर त्यांन काम करु नये किंवा घेवू नयेत. आता उलट परिस्थिती झालेली आहे. एक एक ठेकेदारकडे ४०-४०, ५०-५० काम आहेत. मग कस तो काम करुन देणार, तुमच टार्गेट कसं पुर्ण होणार आहे आयुक्त साहेब तुम्ही आढावा बैठका घेता, तुम्ही चांगले प्रयत्न करता. तुम्ही मंगलाताई आल्या की त्यांनाही रिस्पेक्ट देणार, सिमाताई आल्या की डबल रिस्पेक्ट देणार, पठाणताई गेल्या की आजून डबल रिस्पेक्ट देणार, सुलभाताई आल्या की ऍण्टीचेंबरमध्ये बसा म्हणणार, म्हणजे सगळयांनाच शांततेने हॅण्डल करणार. तसेच तुमचे अधिकारी सुध्दा हॅण्डल करा. नगरसेवकामध्ये तुम्ही पटाईत आहेत, नगरसेवकांची कोणाची तक्रार येऊ देत नाहीत, बरोबर हॅण्डल करणार पण अधिकारी पण तसेच हॅण्डल करावेत. तुम्ही प्रशांत मागे लागला की तुम्ही टेंडर काढा म्हणता, टेंडर निघतो पण तो किती टक्केनी भरला त्याचा आढावा तेच मुळात देत नाहीत आणि तुम्ही विचारत नाहीत. एका ठेकेदाराकडे किती काम आहेत. तो किती स्पिडने गेला, किती काम तो करतो. समजा महेशदादा लांडगेनी आरडाओरड केला की ते एकटे येत नाहीत पाच पंचवीस लोक आणतात आणि त्याच्यामुळे सगळा गराडयात ही काम ती काम याला फोन करा त्याला फोन करा त्यांचे टेंडर निघतात. वर्षे संपलेतरी बजेट खर्च होत नाही. आम्हांला दाखवताना स्वप्न तुम्हीपण दाखवता की तुम्ही ८०० ते ९०० कोटीचे बजेट खर्च करायला तयार आहेत परंतु तुम्ही ५०० ते ५५० कोटीचा पण खर्च करु शकत नाहीत. पैसे खर्च करायची तुमची क्षमता नाही तुमच्या अधिका-याची पण क्षमता नाही. कारण तेच पोसलेले ठेकेदार तेच लोक या महापालिकेमध्ये फिरतात, त्यांच्या ५०-५० फाईली आहेत. मग चांगल

कॉम्पिटेशन व्हायला नको का. नवीन ठेकेदार यायला नको का. क्वॉलीटीवाईज डिपार्टमेंट ठेवा. तुम्ही मागे जीबी मध्ये विषय आणला. अनधिकृत बांधकामाचे कोर्टाने तुम्हांला निर्देश दिले, एवढे करुनही जर अनधिकृत बांधकाम चालू असेलतर याच्या व्यतीरीक्त कुठल दुर्दैव. अशा पध्दतीने या बारीक सारीक गोष्टी सांगीतल्या आहेत त्याच्यावर लक्ष ठेवावे.  वायसीएमसारखे मोठे हॉस्पिटल आहे तेथेही पुर्ण दुर्लक्ष आहे पेशंटची अवस्था अतीशय वाईट आहे. वायसीएमच बजेट सुध्दा खर्च होत नाही. वायसीएम मध्ये सुध्दा डॉक्टर कमी आहेत. आणि जे तेथे बसलेले आहेत त्यांनी टिम करुन ठेवली प्रत्येकाची एकएक संघटना आहे. त्याठिकाणी कोणाची काम करण्याची इच्छा राहीलेली नाही. तेथील परचेस पण सगळ बंद आहे, त्याठिकाणी काम सगळ ढिसाळ झालेल आहे. पेशंटला व्यवस्थीत ट्रिटमेंट मिळत नाही. आपण थेरगांवला हॉस्पिटल आणतो तेथे चांगल्या गोष्टी केल्या पाहीजेत. कारण वायसीएमचा लोड कमी होणार आहे. एका बाजुला तालेरा आहे, दुस-या बाजुला वायसीएम आहे, जिजामाता आहे, आता भोसरीमध्ये आपण एक रुग्णालय घेतल आहे. हे सर्व करत असताना मगाशी पठाणताईनी सांगीतल शेवटी या शहराच्या नागरीकांचा हा पैसा आहे. दुस-या बाजुला दुर्दैव म्हणजे आमच्याकडे एवढे खासदार असताना, आमचे आमदार असताना मग कोणी भाजपचे आहेत, कोणी शिवसेनेचे आहेत तरी सुध्दा दुर्दैव असे आहे की  या शहराला स्मार्ट सिटीमध्ये घेतलेले नाही हे काही नागरीक विसरु शकणार नाहीत आणि क्षमाही करणार नाहीत. कारण  सर्व पात्रता असताना, सर्व कुवत असताना आम्हांला त्यातुन वगळल गेले आहे. शेवटी हे घाणेरडे राजकारण केले, हे चांगले काम केले नाही. पिंपरी चिंचवड शहराचा सुजाण नागरीक आहे तो कदापि विसरु शकत नाही की या महापालिकेवर सत्ताधा-यानी केलेला घाला हे विसरणार नाहीत. स्मार्ट सिटीमध्ये निवड झाली असतीतर अजून शहराच्या विकासामध्ये भर पडली असती, असो. मी आधिच म्हणलं होतं की "गर्वसे कहो की हाम पिंपरी चिंचवडवाले ऐसेही स्मार्ट हैं" वायसीएम मधल्या आपण चांगल्याही गोष्टी केल्या. धन्वंतरी योजना आहे. आयसीयू, मेमोग्राफी चालू करायची आहे, लहान मुलांचा सुध्दा राहीलेल आहे. अशा पध्दतीने एका बाजुला आरोग्य सेवा, दुस-या बाजुला बेसीक सर्व्हीसेस असे असताना माझी दुसरी एक विनंती आहे की  जरी कोणाची मागणी असेल, मला व्यक्तीच्या नावाला किंवा कोणा व्यक्तीला विरोध करायचा  नाही. त्याचा बजेटमध्ये तुम्ही आतापर्यंत समावेश केला असेल, काम सुरु केल असेल ठिक आहे परंतु नवीन काम करताना स्विमींगपुल असेल, मनपाच्या शाळा असतील, मोठे प्रोजेक्ट असेल, कमर्शिअल कॉमप्लेक्स असेल, हे

करायचच झालतर बीओटी वर करावे. कारण इतके स्विमींगपुल आहेत, किती स्विमींग पुल चालू आहेत प्यायला पाणी नाही दुसऱ्या बाजुला आता २४ X ७ चाललेले आहे. माझा विकास कामाला कधीच विरोध नसतो. माझ असं म्हणण आहे की २४ X ७ हे करण्यासाठी केंद्रशासनाची गाईडलाईन आहे. आपण करतोय, पाण्याची गळती थांबवली पाहीजेत. कनेक्शन्स रेग्युलराईज केले पाहीजे. पण त्याच्या व्यतिरीक्त पहील भामा-आसखेडचे पाणी उचलणे आवश्यक आहे. आपल्या शहराला पुढ पंचवीस वर्षासाठी जे काही करता येईल, कुठे कपात करायची ती कपात करा आणि पहीले निगोशिएशन करुन पैसे भरा आणि ते पाणी रिझर्व्ह करा, ते आपण पहील केल पाहीजे. २४ X ७ चे अनेकवेळेला भाषणात बोलले जाते. ई-टेंडरींग करताना त्या ज्या काही बेसीक गोष्टी टाकायच्या असतात. क्वॉलीफिकेशन त्याच तुम्ही करणार, प्रि क्वॉलीफिकेशन तुमचे अधिकारी करतात. टेंडर कोट झाल्यानंतर मग कोणीतरी बाहेरचे कोटेशन आणून दयायच आणि तुम्हांला दाखवायच आणि हे एवढयाला बाजारात मिळतं म्हणायच मग हे एवढयाला कसं काय आणि त्याच तुम्ही उत्तर देत बसता मग तुम्ही कशाला टेंडरींग करता. नंतर आलेल्या गोष्टीला तुम्ही घेवून त्या पध्दतीने रिस्पॉन्स करता तुम्ही टेंडर पहील पब्लिश करता ई-टेंडरींग होतं. तुम्हांला दम दिला म्हणजे तुम्ही थांबवता आम्ही म्हणत नाही घरचा कायदा लावा. ज्यांना कोणाला भरायच त्यांनी भराव. त्यांना आणाव, सगळे काम त्यांनी घ्याव. तुम्ही चांगले काम करताना चांगले काम करा आम्ही तुमच्या बरोबर आहोत. बाकीच्या आपल्याकडे ऑनलाईन सिस्टीम असेल, जीआयएस असेल, संगणक डिपार्टमेंट मधली लोक असतील तेथे सुध्दा प्रॉब्लेम आहेत बाकीच्या लोकांची आपण पदनिर्मीती ठेवलेली आहे. विधी समितीचे मी कौतूकही करेल, अभिनंदनही करेल की त्यांनी अतीशय लक्ष घालून आपल्या डिपार्टमेंटचे लोक बोलवून, आपल्या प्रशासनाचे लोक बोलवून त्यांच्याशी चर्चा करुन आपल्या महासंघाच्या लोकांशी चर्चा करुन, की काय असल पाहीजे, नियमावली काय आहे, किती लोक पाहीजेत, किती अधिकारी पाहीजेत. याबाबत बारकाईने त्यांनी चर्चा केलेली आहे. तो विषय विधी समितीमार्फत राज्यशासनाकडे पाठविणार आहोत. आपले जे अधिकारी लायबल आहेत, फिट आहेत त्या लोकांना तुम्ही प्रमोट करा आणि त्यांना काम पाहीजे असेलतर ईकडचे तीकडे काम देवू शकतो. पण उगीच त्यांच्याकडे चार्ज चार्ज देवून त्यांना डिस्चार्ज करु नका. दुसर म्हणजे घनकचरा जो आहे त्या घनकचऱ्याच्या प्रक्रीया आणि त्या प्रक्रीया मधुन होणारी जी ऊर्जा निर्मीती करायची आहे हे सुध्दा बीओटीवर दयायला पाहीजे याच्यामध्ये चांगल्या एजन्सी येत असतीलतर ते केले पाहीजे. मागे आशिष शर्मा साहेब

आणि परदेशी साहेब असताना हे सबंध शहर वायफाय व्हावे, तुम्ही पुन्हा प्रयत्न करता तुमच्या काळामध्ये हे तुम्ही करुन घ्या ते क्रेडीट तुम्हांला जरी गेलतरी आम्हांला आमच्या कारकिर्दीमध्ये चांगले काम केले असे होणार आहे. हे शहर वायफाय करायच्या अनुषंगाने जे कोणी प्रायव्हेट पीपीपी पार्टनर असतील किंवा बीओटी पार्टनर असतील त्यांना तुम्ही इन्व्हाईट करा आणि तुम्ही हे शहर वायफाय करा. नाहीतरी ई-गव्हर्नींग वगैरे बाकीच्या गोष्टी आपण करतोच, हे शहर वायफाय व्हायला पाहीजे त्यादृष्टिकोनातून आपण प्रयत्न करावेत. घनकच-याची समस्या खुप मोठी आहे मोशीचा उल्लेख अनेकांनी केलेला आहे त्यामुळे मी पुन्हा उल्लेख करु इच्छित नाही. त्याठिकाणी जी प्रक्रीया असेल ती प्रक्रीया करणे, तेथील दुर्गंधी कमी होणे, कच-याची विल्हेवाट लावणे, या शहरामध्ये स्लॉटर हाऊसची आवश्यकता आहे. स्लॉटर हाऊस सुध्दा कोणत्याही परिस्थितीमध्ये होणं गरजेच आहे. ते कुठ व्हाव, कसं व्हाव, जेथे नागरीकांचा विरोध नसेल तेथे ते करावं परंतु स्लॉटर हाऊस सुध्दा होणं हे तीतकच आवश्यक आहे. त्यामुळे या शहराला स्मार्ट करण्या मध्ये जे अजून काही इनपुटस असतील ते इनपुटस आपण निश्चितच टाकावेत. त्याच बरोबर आपण ब्रिटीश लायब्ररीच्या धरतीवर सेंट्रलाईज लायब्ररी केलेली आहे त्या सेंट्रलाईज लायब्ररीमध्ये सुध्दा अद्यावत पुस्तक ठेवावे त्याचबरोबर मा.महापौरांनी एक बैठक घेतलेली होती आणि ज्येष्ठ नागरीकांना एक सेंट्रली ऑफीस दयायच आहे ते व त्यांना ज्या काही सुविधा महापालिकेच्या वतीने देता येतील त्या दयाव्यात. मगाशी चोंधेताईनी सुध्दा सांगीतले होते की विदयार्थ्यांची जी समस्या आहे. ते राहण्यासाठी पिंपरी चिंचवड मध्ये आहेत व शिक्षणासाठी पुण्यामध्ये जावे लागते परंतु शिष्यवृत्ती देतांना त्यांना पुणेही मदत करत नाही आणि आपणही करत नाहीत आणि अशी टॅलेण्टेड मुलं हे आपल्याकडन बाजूला पडतात तरी त्यांचा सुध्दा समावेश पुढच्या वेळेस व्हावा. नवीन हद्दीमध्ये, नवीन गावामध्ये जिथ आवश्यक असेल तिथली तुम्ही लोकसंख्या बघुन मगच शाळा काढाव्यात अन्यत: आपल्या शाळेची दयनीय अवस्था तुम्ही बघा. पटसंख्या सुध्दा नाही, गळती होत चाललेली आहे. मात्र शिक्षणमंडळाचे बजेट दरवर्षी वाढतच चाललेले आहे. त्यामुळे एज्यूकेशन क्वॉलीटीपण मिळली पाहीजे. आपल्या छोटया-छोटया डिस्पेन्सरी असतील, हॉस्पिटल असतील त्याच्यावर लक्ष केंद्रीत करावे. जीमवर लक्ष केंद्रीत करा. ग्रंथालयावर लक्ष केंद्रीत करा. लाईट असेल, स्वच्छता असेल, मुबलक पाणी असेल एवढ साहेब तुम्ही केलतर नागरीक वाहवा करतील. लोकांना टॅक्सची बील व्यवस्थीत वेळेत दयावीत. या नागरीकांच्या बेसीकली गोष्टी आहेत नंतर मोठया गोष्टी

आहेत. त्याचबरोबर इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट चांगले केले आहे, चांगले रोड केले आहेत, फ्लाय ओव्हर ब्रीज केलेले आहेत. पुर्वी आम्ही असं म्हणायचो पुणे पुढे पुणे पुढे आता अशी परिस्थिती आहे पुणे नाहीतर महाराष्ट्राने आपल अनुकरण कराव अशी परिस्थिती आपल्या शहराची चांगली आहे. परंतु हे करत असताना काँक्रीट रोड आपण स्टेप बाय स्टेप केले पाहीजेत. ज्या ज्या ठिकाणी गल्ली-बोळा असतील उदा. भोसरी असेल, पिंपरीवाघेरे असेल, आकुर्डी गावठाण असेल ज्याठिकाणी आपले रोलर फिरत नाहीत, डांबरीकरण नीट करता येत नाही तुम्हांला काँक्रीट मात्र छोटया छोटया रस्त्याला करता येते अशा ठिकाणी टप्याटप्याने तुम्ही जर असे काँक्रीट रोड घेतलेतर महापालिकेचा भविष्यकाळाचा विचार करता तुमचे पैसे एकदाच काँक्रीटवर गेलेतर कमीत कमी ते आठ ते दहा वर्षाची गॅरटी देतात. मग दरवर्षी डांबरीकरण करण्यापेक्षा छोटे छोटे रोड दरवर्षीच्या बजेटमध्ये आपण घेतले, याही वर्षी प्रयत्न करुन तुम्हांला कुठला फंड जर डायव्हर्ट करता येत असेलतर, मोठया रस्त्याला जे पैसे ठेवलेत त्यातले काही पैसे कमी करुन किंवा ज्याठिकाणी तुम्हांला पैसे वाचतील असं वाटतय ती तुम्ही स्थायी समितीची मान्यता घेवून किंवा याच्यामध्ये हेड ओपन करायच असेलतर तशी उपसूचना घेवून हेड ओपन करावे. परंतु डांबरीकरणा ऐवजी हाळूहाळू काँक्रीट रोड पण या शहराला आवश्यक आहेत त्या काँक्रीट रोडचा समावेश व्हावा अशी विनंती करतो. चांगल्या प्रकारचे बजेट सादर केलेले आहे. छोटयाशा उणीवा आहेत त्या आपण कमी कराव्यात पुनश्च एकदा मा.महापौरांच आणि आपल्या सगळयांच याठिकाणी आभार मानतो आणि थांबतो, जयहिन्द.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सहकारी, अधिकारी वर्ग, सन्मा.सभागृह. मला वाटते की या पंचवार्षीक मधले हे शेवटचे बजेट आहे. गेल्या चार वर्षात असे वाटत होते की पहीले वर्षे झाल्यानंतर पुढच्या वर्षी आपण काहीतरी करु. म्हणून कोणालाही त्या बजेट बद्दलच टेन्शन नव्हतं. परंतु यंदाच्या वर्षी निवडणूकीला सामोर जाताना प्रत्येकाला असं वाटत होतं की या बजेटमध्ये आमच्या कामाचा सामावेश झाला पाहीजे आणि आमची काम झाली पाहीजेत. मला असं वाटत की गेल्या चार वर्षामध्ये कधीही पक्षीय राजकारण केलेलं नाही आणि यंदाच्या वर्षीही पक्षीय राजकारण कुठेही केले गेल नाही याचा सार्थ अभिमान मला आणि माझ्या सहकार्याना आहे असं मला नक्कीच वाटतं. आणि म्हणूनच आज आपण बजेट करताना स्थायी समितीने बजेट केले त्याला उपसूचना दिल्या त्या उपसूचना भूसंपादनामध्ये १०० कोटीचे भूसंपादन निधी त्यातल्या ५३ कोटीच्या उपसूचना स्थायीने दिल्या व

आपल्या हातामध्ये ४७ कोटी रुपये शिल्लक राहीले. सगळयांना कुठल्यातून घ्यायचे हे करत असताना प्रत्येकाला असं वाटल की आम्ही भूसंपादनातूनच आमच्या उपसूचना दिल्या गेल्या पाहीजेत. ४७ कोटी शिल्लक असताना जवळपास १६० कोटी पर्यंतचा आकडा त्याच्यापेक्षा जास्त सुध्दा आकडा भूसंपादनामध्ये आला जेणेकरुन ४७ कोटी शिल्लक होते आणि म्हणून जशा नगरसेवकांनी दिलेल्या उपसूचना त्याजर तशाच पध्दतीच्या सगळयांच्याच घ्यायच्या, सगळयांना न्याय दयायचा असं जर केल असतंतर ४७ कोटीच्या नंतर जेवढया उपसूचना आल्या त्या अग्राहय ठरल्या असत्या. आणि म्हणूनच मी आयुक्त साहेब, सिटी इंजिनीअर, कार्यकारी अभियंता, भोसले साहेब, चव्हाण साहेब मी या सगळयांच मनापासून आभार मानते की हे बजेट करत असताना माझ्या एवढया नगरसेवकांच्या, हे पहा बोलणारे नेहमी मोठया झाडावर दगड मारतात, त्याला काही अर्थ नाही. परंतु हे करत असताना जर माझ्या सर्वपक्षीय नगरसेवकांच्या उपसूचना अग्राहय होणार असतीलतर मी काय करायला पाहीजे हे मला वाटलं आणि म्हणून आयुक्त साहेब, आपले सर्व कार्यकारी अभियंता, भोसले  साहेब, तुम्ही, सर्व पी.ए.असतील त्यांच सुध्दा मी आभार मानेल. मा.महापौरांचे पी.ए. असतील, मा.उपमहापौरांचे पी.ए.असतील, माझ्या डिपार्टमेंटचे पी.ए.त्या सगळयांनी हे बसून केलं. प्रभागनिहाय अ,ब,क,ड,इ,फ सर्व पक्षाच्या लोकांनी उपसूचना आणून दिलेल्या आहेत हे करत असताना एवढे झाल्यानंतर कसे करायचे. मिटींग घेतली त्यावेळेला कुठल्याही प्रभागावर अन्याय होऊ नये याच्यासाठी स्थायी समितीने दिलेल्या उपसूचनानंतर शिल्लक किती राहीले. एवढी मोठी महापालिका असल्या नंतर सगळया सदस्यांनी, सगळया गटनेत्यांनी ऐकाव की एवढी मोठी महापालिका असताना काहीतरी भूसंपादनावर ठेवायलाच पाहीजे याद्दष्टिकोनातून आम्ही एक आकडा ठेवला की २५ कोटी तरी एवढया मोठया बजेटला भूसंपादनासाठी शिल्लक असले पाहीजे. हे करत असताना २५ कोटी झालेतर खाली शिल्लक काहीच राहत नव्हते. म्हणजे २५ कोटीच्या भूसंपादनाला जर १६० कोटीच्या उपसूचना असल्यातर काहीच झाल नसतं म्हणून आपण सगळी कडून प्रत्येकाना न्याय कसा देता येईल, त्या पध्दतीने सगळया कार्यकारी अभियंत्याला सगळया उपसूचना वाटल्या आम्ही त्या उपसूचनांवर नंबरींग केले. म्हणजे कुठल्याही नगरसेवकानं असं म्हणू नये की आम्ही तुम्हांला कागद दिला होता आमचा कागद कुठे गहाळ झाला. म्हणून आम्ही त्याला नंबरींग केलेल आहे. हे प्रत्येक नगरसेवकांनी त्यांच्या कार्यकारी अभियंत्याला विचाराव. आम्ही त्यांना सांगीतल की त्या त्या प्रभागातील काम मार्गी लागण्यासाठी, त्यांचे हेड ओपन होण्यासाठी उदया

त्यांना भविष्यामध्ये कुठलीही अडचण येता कामा नये. सगळया प्रभागाला न्याय पण मिळाला पाहीजे. त्यातल्या त्यात ग्रामीण भागाला दरवेळेस आपण थोडस जास्तीच बजेट दिले गेलेले आहे. त्याप्रमाणे यंदाच्या बजेटमध्ये सुध्दा ग्रामीण भागाला जास्तीच बजेट दिलेल आहे. ते धरुन अ प्रभागाला १११.९७ कोटी बजेट दिलेले आहे. ब प्रभागाला ९३.५० कोटी बजेट दिले गेलेले आहे, क प्रभागाला १०४.६६ कोटी बजेट दिले गेलेले आहे, ड मुख्यालयाला १०३.३८ कोटी बजेट दिले गेलेले आहे, ई मुख्यालयाला ग्रामीण भाग त्याच्यामध्ये येतो १३४.९ कोटी बजेट दिले गेलेले आहे आणि फ प्रभागाला १३०.६२ कोटी बजेट दिले गेलेले आहे. असे हे सगळयांना एक सारख बजेट देण्यासाठी प्रयत्न केलेला आहे या मताशी माझे सर्व सहकारी सहमत असतील. त्यादृष्टिने काम करत असताना आपल्याकडून त्याप्रमाणे या उपसूचना वाचल्या जातील. बजेटवर बोलत असताना सगळयानी ज्या त्या पध्दतीने बोलण्याचा प्रयत्न केलेला आहे. मला असं वाटत की उल्लेख करताना वैयक्तिक उल्लेख करण्यापेक्षा प्रत्येक नगरसेवकनी हे शेवटच वर्षे आहे, काहींना दहा वर्षे झाली काहीना सहा टर्म झाल्या आहेत प्रत्येकांना असं वाटत होतं की काम करायला पाहीजे त्या दृष्टिकोनातून ज्यावेळेला तुम्ही पुर्वीचे टर्म बघीतले आज पर्यंत एखादया व्यक्तीची टर्म बघीतली तीस-तीस वर्षे काम करणारे लोक या सभागृहात आहेत. नगरपालिकेची महानगरपालिका झाली त्याच्या अगोदरपासून याठिकाणी लोक काम करतात. ज्यावेळेला डेव्हलप झालेला भाग त्यावेळेला तुम्ही २५ वर्षापुर्वी त्या भागामध्ये जर काम केलेल असेलतर सद्स्थितीमध्ये त्या भागाची पण डेव्हलपमेंट झाली पाहीजे. मग उदया आपण म्हणणार की आणखीन गावे येणार आहेत. मग शहरी भाग ओस ठेवायचा का आणि बाहेरची गाव घ्यायची आणि त्यांची डेव्हलपमेंट करायची का. पाणी आपल्या शहरात पुरत असेलतरच शेजरच्याला, हद्दीला लागून लोक आहेत त्यांना दया. जर आपल्याला पाणी पुरणार नाहीतर, बाहेरच्या लोकांना पाणी दयायच दायीत्व का घ्यायच. आपल्या ताटातच नाहीतर समोरच्यांना का वाढा. सिध्दीविनायक नगरीमधले काही लोक आमच्यावर नाराज आहेत, पाणी देत नाहीत म्हणून. येथून मागे जर आपण सहा महीने अगोदर पाणी दिले असतेतर आज २५ टक्के आपल्याला कपात करावी लागली असती. आणि म्हणून आपण पाण्याच्या बाबतीत पाणी शहराबाहेर न जाता टँकरचा बिझनेस थांबवून आज आपण पाण्याच्या बाबतीत व्यवस्थीत आहोत. आयुक्त साहेब तुमचे तोंडावर कौतूक करावे म्हणून कौतूक करणार नाही. श्रीकर परदेशी असताना सुध्दा माझ त्यांच कधीही भीनसल नाही, कारण माझ्या भागामध्ये अनधिकृत जास्त काही नाही. किरकोळ किरकोळ एखादी गोष्ट टप-

या असतील. परंतु त्यांचा आणि माझा कुठल्याही गोष्टीमुळे वाद झाला नाही आणि तुमचाही नाही परंतु पहीले आडीच वर्षात शहरामध्ये कामच झाली नाहीत नगरसेवकांना पुर्वी असे वाटत होते की आम्ही निवडून कशासाठी आलो. परंतु आडीच वर्षानंतर आता जे काम चालू झालेले आहेत त्यामुळे नगरसेवकांना असं वाटत की आता आमच्याकडून खुप काम व्हायला पाहीजे आणि आताशी कुठतरी नगरसेवकांना या दिड वर्षामध्ये जे काम मार्गी लागली जे टेंडर निघालेले व येथून पुढे टेंडर निघणार आहेत. शेवटच्या वर्षामध्ये डब्बू आसवाणी स्थायी समिती सभापती आहेत त्यांच्यावर सुध्दा खुप मोठी जबाबदारी आहे. सभागृहाने कधीही कुणालाही अडवल नाही ब्लँकेट मंजूरी पहील्या वर्षापासून आजपर्यंत स्टॅण्डींगला मिळालेली आहे. त्याच पध्दतीने यावर्षी सुध्दा देणार आहेत. आयुक्त साहेब, तुमच आमच सर्वाच अधिका-यांच यंदाच्या वर्षी स्किल लागणार आहे. पहील्या चार महीन्यात काम मार्गी लागले पाहीजेत. त्याचे सगळयांचे टेंडर निघाले पाहीजेत. येणार असणारा पावसाळा या पावसाळयामध्ये टेंडरची प्रोसिजर पुर्ण होवून पावसाळा संपल्या संपल्या काम चालू झाली पाहीजेत. कारण आपण डिसेंबरपर्यंत आचारसंहीतेला सामोरे जाणार. शहरात सगळीकडे चांगले काम झाले पाहीजे, शहर आमचं आहे. आज एखादा माणुस त्या भागातून उदया दुसरा कुठलाही निवडून येईल म्हणून शहरामध्ये सगळीकडे काम चांगल झाले पाहीजे. मला नेहमी असं वाटायच की जी नव्यान गाव घेतली आहेत त्याठिकाणी अंडरग्राऊंड ड्रेनेज पुर्ण झाले पाहीजेत. पाण्याची लाईन पुर्ण झाल्या पाहीजेत. एसटीपी लाईन टाकून झाल्या पाहीजेत नंतर तुम्ही रस्ते करताना दहा वेळा तो रस्ता उखडणार नंतर रस्ता करणार आणि हे करत असताना आपलेच महापालिकेचे पैसे वाया जाणार. काम ही जिथ नव्याने भाग आलेला आहे तिथं जास्तीत जास्त व्हायला पाहीजेत. यंदाच्या वर्षी सुध्दा पहीली बजेटची ज्यावेळेला मिटींग होती त्यावेळेला म्हणले होते की ज्या भागामध्ये अंडरग्राऊंड ड्रेनेज नसेल त्याठिकाणी कितीही बजेट लागलतरी अंडरग्राऊंड ड्रेनेज पुर्ण झाले पाहीजे १०० टक्के पिंपरी चिंचवड शहराचे अंडरग्राऊंड ड्रेनेज पुर्ण झाले पाहीजे मी एलबीटीच कौतूक करेल, माने साहेबांचे, गायकवाड साहेबांचे कौतूक करेल. सगळे कौतूकास पात्र अधिकारी आहेत. हाताची पाचही बोट सारखी नसतात. कोण कोणावर ताशेरे ओढेल सगळयांचच एकमेकाशी घरात सुध्दा पटत नाही. आपल्याकडे झोपडपट्टीचे काम गावडे साहेबांनी केलं, खूप चांगल्या पध्दतीने काम केलेले आहे. आता नव्यानं सगळी मंडळी आलेली आहेत ती सगळी मंडळी हे त्यांच्या परीनं व्यवस्थीतरीत्या काम करतात. पिंपरी चिंचवड शहराचा आदर्श इतारांनी सुध्दा घ्यावा. शहर चांगले करण्यासाठी आपण खुप चांगल्या

पध्दतीने प्रयत्न केले पाहीजेत. टप-या वाढलेल्या आहेत. आपण ज्या परिस्थितीमध्ये शहर टॉपला नेत चाललेलो आहेत त्याठिकाणी आपण थोडीशी कडक भुमिका घेतली पाहीजे. साहेब, तुम्हांला कोणीही चार प्रश्न विचारणार आहेत. जे कायदयामध्ये बसते ते तुम्ही करा. आम्ही सुध्दा म्हणले आणि ते कायदयामध्ये  बसत नसेलतर ते अजीबात करु नका, चुकीचे करु नका. परंतु तुम्ही सरळ काम करत असताना शहराच्या दृष्टिकोनातून शहर कस सुंदर, स्वच्छ, चांगल होईल व लोकांना बेसीक गोष्टी मिळाल्या पाहीजेत. बजेटवर सगळयानी बोलले आहेत. फक्त सगळयाकडून एकच विषय सुटलेला आहे त्यावर मी बोलते. कुदळवाडीमध्ये एवढया झपाटयान आग पाच ते सात वेळा लागलेली आहे. गेल्या कित्येक वर्षे आम्ही बोलतो आज आठ हॉस्पिटल करण्यासाठी आपण तयारी दाखवली, फक्त बर्न वॉर्ड करण्यासाठी का म्हणून नको. आज आपण येथून पुण्याला पेशंट घेवून जायचं आज जर कुदळवाडीला काही घटना घडली असती, आपल्याकडे इन्डस्ट्री आहे त्याठिकाणी काही घटना घडू शकते. मागे एकदा कंपनीमध्ये सुध्दा आग लागलेली होती मग येथून काही घटना घडलीतर ससूणला पेशंट न्यायचे का. इतक्या किली मीटरवर नेणा-या नागरीकांच आपल काही दायित्व आहे की नाही. कमीत कमी बर्न वॉर्ड तरी झाला पाहीजे. हे आपल्याकडून केले गेले पाहीजे. हॉस्पिटलसाठी सगळीकडे चांगली तरतूद आहे.  शंभर टक्के देवू शकतो असे नाही. कोणी कोणाच नाव घेवून जरी बोलले, मला पण असं वाटत पण मी कोणाच नाव घेवून, कोणाच्या वॉर्डाचे नाव घेवून मी कोणाला मोठे करणार नाही आणि कोणा व्यक्तिलाही त्याच नाव घेवून मी त्याला मोठ करणार नाही. मला सगळयानी माझ नाव घेवून मोठ केलं मला आनंद आहे. मी माझ्या वॉर्डातील नागरीकांसाठी माझ्या आयुष्यात जितकी ताकद आहे तेवढयासाठी नक्की मी माझ्या वॉर्डातील नागरीकांसाठी झटेल. मी सर्व नगरसेवकांना सांगेल की तुम्ही तुमच्या वॉर्डातील नागरीकांसाठी नक्की चांगले, चांगले प्रयत्न करा. शेवटच्या वर्षी नाहीतर पहील्या दिवसापासून प्रयत्न करा. तुमचा वॉर्ड सुध्दा मॉडेल वॉर्ड होईल. मॉडेल वॉर्ड होणं म्हणजे माझ्याकडे काही दोन शिंग आणि चार हात वाढीव कोणी दिलेले नाहीत. पहील्या तीन वर्षामध्ये कोणी ब्लॉक सुध्दा तिथे टाकले नाहीत. नुसतीच आकडेवारी वाचतात. आपल्या वॉर्डामध्ये आपण काय करतो हे पहील बघीतले पाहीजे. आपण आपल्या नागरीकांसाठी काही करतो का हे आपण बघीतले पाहीजे. मी एवढे प्रकरण उकरुन काढले, हे करण्यात काही अर्थ आहे असं मला वाटत नाही. माझे नागरीक खुष आहेत, मी नागरीकांसाठी काम करणार मी शहरासाठी सुध्दा काम करते. आणि म्हणून मी

